

॥ श्री ॥

या देशात हिंदुराष्ट्र स्थापण्याच्या आपल्या कार्याचा वारसा वीर सावरकरांनी हिंदु जनतेला दिला आहे. त्यासाठी प्रयत्नशील राहणे हे तिचे कर्तव्य आहे. या दृष्टीने सावरकर चरित्राचे सार आहे - हिंदुत्वाचा उद्धार ! यासाठी प्रत्येक हिंदूने -

*सर्वोपनिषदो गावो दोग्धा दामोदरनंदनः ।*
*भारतो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं हिंदुत्वमद्भुतम् ॥१॥*
*हिंदुत्वमेव कर्तव्यं किमन्यैः शास्त्रसंग्रहैः*
*यं स्वयं विनायकस्य मुखपद्मात् विनिःसृतम् ॥२॥*

(रामचंद्र शर्मा)

हे दोन श्लोक मुखोद्गत करून प्रातःसमयी न चुकता म्हणणे हेच भगवान सावरकरांचे पुण्यस्मरण होय !

मी पाहिलेले सावरकर संकलक ग.म. भट वीर गौरव समिती



## भगवान सावरकरांची हिंदु समाजाला हाक !

अखिल हिंदु विजयध्वज हा । उभवुया पुन्हा
ध्वज हा लढवुया पुन्हा ॥ धृ० ॥

या ध्वजाखची त्या काळी । रोविती पराक्रमशाली
रामचंद्र लंकेवरती । वधुनि रावणा । ध्वज तो उभवुया पुन्हा ॥ १ ॥

करित जैं शिकंदर स्वारी । चंद्रगुप्त ग्रीकां मारी
हिंदुकुशशिखरी चढला । जिंकुनी रणा ॥ २ ॥

रक्षुणी ध्वजाच्या वाची । शालिवाहनाने साची
उडविली शकांची शकले । समरि त्या क्षणा ॥ ३ ॥

जई जई हिंदुसम्राटे । अश्वमेध केले मोठे
करित पुढती गेला हाचि । विजयघोषणा ॥ ४ ॥

उगवुनी सूड हिंदूंचा । मद मर्दुनि मुस्लीमांचा
शिवराय रायगडि करिती । वीरपूजना । याच्या वीरपूजना ॥ ५ ॥

ध्वज हाच धरुनि दिल्लीला । वीरबाहु भाऊ गेला
मुसलमीन तख्त फोडी । हाणुनि घणा ॥ ६ ॥

तोचि आंग्ल दैत्य आला । हिसकुनि घाली घाला
बुडविला सिंधुतचि त्याही । करुनि कंदना ॥ ७ ॥

पुढति नेम काही टळला । ध्वज जरी करातुनि गळला
उचलुया पुनरपि आता । काढुनि पणा । ध्वज हा
उभवुया पुन्हा । ध्वज हा लढवुया पुन्हा ॥ ८ ॥

— वि. दा. सावरकर

२८-५-९०

# मी पाहिलेले सावरकर

(ज्यांनी सावरकरांना पाहिले आहे अशा नामवंत सावरकर-भक्तांच्या आठवणी)

संकलक

रा. स. भट

कै. रि. श्री. जोशी
(क्रांतिकारकांचे चरित्रलेखक)
ह्यांच्या संग्रहातून भेट.

वीर गौरव समिति, पुणे
७०५ सदाशिव पेठ, पुणे ३०

* प्रकाशक :
रामचंद्र सदाशिव तथा रा. स. भट
कार्यवाह, वीर गौरव समिती
७७६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

* © सर्वाधिकार सुरक्षित

* प्रथमावृत्ती :
१६ मे १९९०, वैशाख, कृ. ६, शके १९१२
स्वा. सावरकरांची १०७ वी जयंती

* मुद्रक :
सौ. कमल रामचंद्र पळसाणे
संजीव मुद्रणालय
४६९ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

* मूल्य :
नव्वद रुपये

---

स्वा. सावरकरांची १०७ वी जयंती हे हिंदुत्वाचे संवत्सर असल्यामुळे या वर्षात दि. १५ नोव्हेंबर १९९० पर्यंत विशेष सवलत म्हणून हे पुस्तक रुपये ५० + टपाल खर्च या मूल्यात विकले जाईल.

# हितगुज

स्वा. वीर सावरकर यांच्या चरित्राचे मधूनमधून आलोकन करणे हा आमचा एक छंद आहे. अलीकडेच स्वा. वीरांचे चरित्र वाचून संपवीत होतो तोच शेवटचे आत्मसमर्पणाचे प्रकरण वाचताना खिस्ताब्द १९६६ मध्ये त्यांनी जगाचा निरोप घेतला. हे वाचले आणि एक कल्पना मनात चमकून गेली. सावरकरांच्या आत्मसमर्पणाला कमीपुरी २५ वर्षे होत आहेत. त्यांच्या आत्मसमर्पणाच्या वेळी २०-२२ वर्षांची जी तरुण पिढी असेल, ती आज पन्नाशीच्या आसपास असणार. वीर सावरकरांना पाहिलेली ही कदाचित शेवटचीच पिढी ठरण्याचा संभव असल्याने, यांपैकी बऱ्याच जणांनी वीर सावरकरांना पाहिलेले असणार व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची त्यांना कल्पनाही असणार. यांच्यापैकी काहींना सावरकरांच्याविषयी काही सांगण्याची इच्छाही असणार.

आता या मंडळींच्याकडून सावरकरांना समक्ष पाहून त्यांना जे काही सुचले ते शब्दांकित करता आले तर पाहावे, या हेतूने, ज्यांनी सावरकरांना समक्ष पाहिले आहे, अशांच्याच आठवणी 'मी पाहिलेले सावरकर' या ग्रंथात आम्ही समाविष्ट करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे सतत २ वर्षे प्रयत्न करून सावरकर भक्तांच्या काही आठवणी आम्ही जमवू शकलो. या आठवणीत सावरकरांचे काही सामान्य व काही नामवंत भक्त यांच्या सुमारे १०० हून अधिक आठवणी या प्रकाशनात ग्रथित केल्या आहेत.

ज्यांना आम्ही हिंदुस्थानातील पहिल्या क्रमांकाची व्यक्ती मानतो ते लोकमान्यांचे पौत्र श्री. जयंतरावजी टिळक, हिंदुस्थानातील समाजवादी विचाराचे प्रथम क्रमांकाचे अग्रणी सौजन्यमूर्ती एस. एम. तथा श्री. म. जोशी, ज्ञाननिधीचे भांडार असलेले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्रातील साहित्याचे गाढे अभ्यासक साहित्याचार्य श्री. न. श्री. दीक्षित, सदैव सार्वजनिक कार्यात अत्यंत प्रसिद्धी पराङ्मुख झाकले माणिकच असलेले श्री. पु. गोखले, सावरकरांचे केवळ बहिश्चर प्राण असलेले त्यांचे निकटवर्तीय आजचे हिंदुमहासभेचे अध्यक्ष आचार्य बाळाराव सावरकर, मराठीचे नामवंत पत्र पंडित– भीष्माचार्य– मामाराव दाते, हिंदुत्वासाठी ज्यांनी साऱ्या जन्मभर कष्ट उपसले आणि मुसलमानांच्या उन्मत्तपणाला आयुष्यभर ज्यांनी ठेचून काढले ते हिंदूंचे एकमेव नेते श्री. गणपतरावजी नलावडे, विविध क्षेत्रांतील सामाजिक कार्यकर्ते श्री. पु. ह. पतके, सांगलीचे सावरकर भक्त प्रा. रानडे, वीर सावरकर अंदमानातून सुटून येताच त्यांचेजवळ जाण्यास जनता घाबरत होती. त्यावेळी आपुलकीने त्यांना आपल्या घरात ठेवून घेणारे शिरगावचे त्यांचे प्रारंभीचे सचिव श्री. गजाननराव दामले, महाराष्ट्राचे आवडते लेखक आचार्य अत्रे व

सावरकरांच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयातील अभियोगाची तयारी करणारे बॅ. जोसेफ बॅप्टीस्टा व सावरकरांच्या जीवनपटाचे वर्णन करणारे सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. भा. द. खेर इत्यादी कित्येक नामवंतांच्या आठवणी या ग्रंथात ग्रथित करण्याचे भाग्य वीर सावरकरांचे कृपेने आम्हास लाभले आहे. अशा या मौलिक आठवणींचा हा संग्रह सावरकर भक्तांच्या हाती देताना आम्हांला अतिशय आनंद होत आहे. यानंतर आम्ही सावरकर भक्तांना 'आम्ही ऐकलेले सावरकर' या शीर्षकाखाली सावरकरांनी विविध प्रसंगी दिलेली सुमारे १०० महत्वाची लहान व्याख्याने ग्रथित करून त्याचाही ग्रंथ तयार करून देणार आहोत. आशा आहे की, सावरकर भक्त या रोचक नैवेद्याचा आपुलकीने आस्वाद घेतील, त्याचा स्वीकार करतील व त्याचा आनंद लुटतील. अशा तऱ्हेचा हा संग्रह करण्याचे भाग्य ज्यांच्या कृपेमुळे लाभले ते आमचे अध्यात्मातील गुरू योगीराज गोपाळ महाराज करवेकर व स्वा. वीर विनायक दामोदर सावरकर यांचे चरणी ही आमची सेवा आम्ही समर्पित करीत आहोत.

ज्ञानेश्वर माउलींच्या शब्दांत

" वेथ न्यून ते पुरते
अधिक ते सरते
करून घ्यावे हे तुमते
विनवित असे "

एवढेच म्हणतो.

रा. स. भट
कार्यवाह



# अनुक्रमणिका


| | | पृ. क्र. |
|---|---|---|
| १) श्री. क्षीरसागर क. वा., पुणे | सैनिकीकरणाच्या प्रचाराचा प्रभाव | १ |
| २) डॉ. पुरंदरे पां. गो., पुणे | स्वा. सावरकरांचे अमोघ वक्तृत्व ! | २ |
| ३) श्री. प्रा. सुहास हरी जोशी, चोडनदी | मी स्वातंत्र्यवीरांना पाहिले | ३ |
| ४) श्री. भा. ल. शानडे, सांगली | सुदर्शन सावरकर | ४ |
| ५) श्री. भा. वा. पोटे, नाशिकरोड | परकीय शब्दाविरुद्ध कटाक्ष | ५ |
| ६) श्री. कृ. अ. कोल्हटकर, पुणे | तात्यारावांचे मित्र-प्रेम | ६ |
| ७) सौ. सुशीला पं. जोशी, पुणे | सावरकरांच्या लोकप्रियतेचे गमक | ८ |
| ८) श्री. प्रभाकर जोशी, नागपूर | अविस्मरणीय बलिदान | ९ |
| ९) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई | सावरकरांचा क्रांतिकारक समादेश | १० |
| १०) श्री. गंगाधरराव पाठक, भोपाळ | एका संघ-स्वयंसेवकाचे विचार | ११ |
| ११) श्री. पु. शं. पतके, पुणे | राष्ट्राच्या नेत्यांनी केलेली सावरकरांची उपेक्षा | १२ |
| १२) श्री. डब्ल्यू. आर. राजिवेरकर | वीर सावरकरांच्या कार्याला गुप्तपणे दान करणारे धनिक | १४ |
| १३) श्री. दत्ता शिरगावकर, रत्नागिरी | हिंदु बंदीमुळे झालेली हानी | १५ |
| | ऐतिहासिक देशद्रोही पूर्वजांबद्दल चीड | १५ |
| १४) श्री. न. श्री. फडके, बेळगाव | सावरकरांचे मला झालेले दर्शन | १६ |
| १५) श्री. मु. भा. निमकर, मुंबई | सावरकरांचा स्वाभिमान | १७ |
| १६) श्री. डॉ. श्री. द. लिमये, पुणे | कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्याची सावरकरांची हातोटी | १८ |
| | २. संस्कृतनिष्ठ हिंदीचा प्रचार | १९ |
| | ३. कार्यकर्त्यांना अचूक ओळखण्याची किमया | २० |
| | ४. अचूक मार्गदर्शन | २१ |

| | |
|---|---|
| १७) श्री. डॉ. श्री. द. लिमये, पुणे | ५. प्रगाढ पांडित्य 22 |
| | ६. मातृभूमीचे नितांत प्रेम 23 |
| | ७. विज्ञानाचे प्रेम 23 |
| | ८. सावरकरांचे आशीर्वादातील दैवी बळ 24 |
| | ९. सावरकरांचे अचूक राजकीय आराखडे 25 |
| | १०. सावरकरांची मुत्सद्देगिरी 26 |
| | ११. सावरकरांचे चपखल उत्तर 28 |
| | १२. सावरकरांचा व्यवहारी आदेश 29 |
| | १३. सावरकरांची विशाल बुद्धिमत्ता 30 |
| | १४. सावरकरांचा पाताळयंत्रीपणा 30 |
| १८) श्री. गजानन वि. दामले | १. सावरकरांची असामान्य कार्यक्षमता 31 |
| | २. सावरकरांचे कन्याप्रेम 33 |
| | ३. सावरकरांचे योग्य मार्गदर्शन 34 |
| | ४. सावरकरांची लोकांना जिंकण्याची कला 35 |
| | ५. कॅट इज आऊट ऑफ द बॅग 36 |
| | ६. सावरकरांचा मुत्सद्दीपणा 37 |
| | ७. सावरकरांचे दीर्घकालीन आखाडा 37 |
| १९) श्री. शारदा परांजपे, पुणे | प्रचारक सावरकर 40 |
| २०) श्री. मधुकर पां. खेर, सांगली | लहान मुलांचे सावरकर प्रेम 40 |
| २१) श्री. महादेव लक्ष्मण येहरे, कल्याण | तरुणांना प्रोत्साहन देणारे सावरकर 41 |
| २२) श्री. रमेश गो. घारे, कोल्हापूर | सावरकरांची नितांत भक्ती 42 |
| २३) श्री. ना. वो. सालोडकर, अमरावती | स्वराज्य रक्षणाचा उपाय. 43 |
| २४) श्री. वामनमूर्ती सातवळेकर<br>सदस्य मधुर आश्रम | मधुर आश्रमाची महत्त्वाची कामगिरी 44 |
| २५) श्री. मा. द. खेर, पुणे | एक अमृतरसपूर्ण आठवण 45 |
| २६) श्री. वि. गो. आपटे, ठाणे | सावरकरांची अम्लान स्मृती 46 |
| २७) श्री. एस. जी. कुलकर्णी, दौंड | सावरकरांचा स्फूर्तिदायक उपदेश 47 |
| २८) श्री. बी. एस. गर्गे, मुंबई | सावरकरांची अमाप भक्ती 48 |
| २९) श्री. द. ब. सोमठाणकर, कल्याण | स्पर्श परिसाचा 49 |
| ३०) श्री. ना. वि. काकतकर | अजून आठवते ते अद्भुत तेजदर्शन 50 |
| ३१) श्री. म. श्री. दीक्षित<br>साहित्य चळवळीचे कार्यकर्ते | मारावलेले पर्व 53 |
| ३२) श्री. श्री. गो. नातू, पुणे | सावरकरांच्या सहवासात 55 |
| ३३) श्री. बाळाराव काळे, वाई | सावरकरांना मिळालेले पहिले मानपत्र 57 |





| | |
|---|---|
| ३४) सौ. निशा पाठक, नागपूर | कार्याशी एकरूप होणारे सावरकर 58 |
| ३५) श्री. श्री. वा. गोखले, मुंबई | दगडाचे खरे सोने 59 |
| ३६) श्री. आ. ग. साळवी, रत्नागिरी | सावरकरांचा प्रभावी प्रचार 60 |
| ३७) श्री. वा. रा. जोशी, कऱ्हाड | स्वा. सावरकर यांच्या आठवणी 61 |
| ३८) श्री. श्रीकृष्ण अंदूरकर, उन्नाव | क्रांतिकारकांच्या अश्रूंने दिलेला आशीर्वाद 62 |
| ३९) श्री. वि. वा. तानवडे, सातारा | कोल्हापूरची लोकांचे हृदयस्पर्श 63 |
| ४०) श्री. डॉ. नी. ग. तळवलकर, मुंबई | वैराग्यशील सावरकर 64 |
| ४१) श्री. क. दि. देवधर, मुंबई | संघ व हिंदुमहासभा यांतील फरक 65 |
| ४२) श्री. श्रीकृष्ण अंदुरकर, उन्नाव | सावरकर : पहिले नि एकमेव भारतीय देशभक्त 67 |
| ४३) श्री. एन. जी. भावे, अकोला | सावरकरांचा वाघेपणा 68 |
| ४४) श्री. डॉ. रा. ल. परांजपे, नागपूर | स्वतःच्या हाल-अपेष्टांविषयी सावरकरांची निःस्पृह वृत्ती 69 |
| ४५) श्री. मो. न. रत्नपारखी, अकोला | विरोधकांवर प्रभाव पाडणारे सावरकर 69 |
| ४६) श्री. ना. मो. सावरकर, पुणे | बुद्धीच्या कसोटीवर विचार करणारे सावरकर 70 |
| ४७) श्री. प्रा. बा. रा. पोतेकर, कोल्हापूर | सावरकरांचे मंत्रमुग्ध करणारे वक्तृत्व 71 |
| ४८) श्री. पद्माकर शेवडे, मुंबई | सर्वांना आवडणारे सावरकर 72 |
| ४९) श्री. एस. द. श्रीमंगले, नांदेड | कधीही विस्मृतीत न जाणारे सावरकरांचे कर्तृत्व 74 |
| ५०) श्री. गणपतराव नलावडे, पुणे | गणपतराव नलावडे यांची महापालिकेतील अविस्मरणीय कामगिरी 75 |
| | २. हिंदुराष्ट्रदलाची स्थापना 75 |
| | ३. एकषष्ठीचा सत्कार 76 |
| | ४. निर्बंध मुक्तता 78 |
| | ५. भाषा शुद्धी 79 |
| | ६. स्वा. सावरकरांनी केलेले माझे तीन मोठे सत्कार 80 |
| ५१) श्री. एस. व्ही. तुळजापूरकर<br>अमरावती | स्वातंत्र्यवीराला अभिवादन 80 |
| ५२) श्री. शं. रा. तथा मामाराव दाते<br>पुणे | सावरकरांच्या सहवासात 81 |
| ५३) श्री. म. श्री. दीक्षित, पुणे | हे सूत्रधरिते विधु 85 |
| ५४) श्री. वीणा हरदास, नागपूर | सावरकरांशी सुसंवाद 88 |

| | |
|---|---|
| ५५) श्री. ना. वि. दामले, मुंबई | १. एक हृद्य आठवण 91 |
| | २. ना. वि. दामले यांच्या आठवणी 92 |
| | ३. झाले बहु होतील बहु परंतु यासम हा 94 |
| ५६) सौ. वसुंधरा पटवर्धन, बेळगाव | सावरकर ज्ञानेश्वर होते 95 |
| ५७) डॉ. वि. रा. करंदीकर, पुणे | सावरकरांचे बंधुप्रेम 97 |
| ५८) श्री. मो. वि. दामले, रत्नागिरी | विजयी वीरांना सावेशा निरोप 100 |
| | तात्यांपेक्षा माझा जीव मोलाचा नाही 102 |
| | तत्त्वाबाबत तडजोड नाही 102 |
| ५९) डॉ. वि. म. शिंदे, रत्नागिरी | स्वा. सावरकर सुवर्ण स्मृती 104 |
| ६०) श्री. लक्ष्मी देव, डोंबिवली | मी पाहिलेले सावरकर 111 |
| ६१) सौ. शैलजा राजे, पुणे | असे होते सावरकर 112 |
| ६२) श्री. श्री. पु. गोखले, पुणे | दोन प्रकांड पंडितांची अविस्मरणीय भेट 114 |
| ६३) श्री. दादूमिया, बडोदे | सयाजीराव, सावरकर व बडोदे 117 |
| ६४) श्री. के. कृ. वाडेकर, पुणे | जीवनात परिवर्तन घडविणारे सावरकरांचे भाषण 121 |
| ६५) श्री. श्री. ज. जोशी, पुणे | मागून सुचलेले सुविचार 123 |
| ६६) श्री. पां. त्र्यं. जोशी, अमरावती | असामान्य आठवणी 123 |
| ६७) श्री. बाळ शंकर देशपांडे गिरगाव, मुंबई | एक साहित्यिक आठवण 125 |
| ६८) श्री. शं. दा. वऱ्हाडे, यवतमाळ | सावरकरांच्या दर्शनाचा झालेला परिणाम 128 |
| ६९) श्रीमती शैलजा पंडित, पुणे | लोकांना हवेहवेसे वाटणारे स्वा. सावरकर 130 |
| ७०) श्री. देवीदास द. साने पांढरकवडा (यवतमाळ) | तरुणांनो सैन्यात भरती व्हा. 131 |
| ७१) श्री. श्रीकृष्ण स. देशपांडे नाशिक रोड | स्वा. सावरकरांचे शेवटचे दर्शन 133 |
| ७२) श्री. भिमराव कृ. चोपडे, सोलापूर | असा वक्ता होणे नाही. 134 |
| ७३) श्री. ल. बा. पेंढरकर, चिंचवड, पुणे | परक्या माणसाचे सावरकरांच्याबद्दल विचार 135 |
| ७४) सौ. उषा र. बढे, अमरावती | एका स्वयंसेविकेची आठवण 136 |
| ७५) श्री. अशोक वि. हेडाऊ, वर्धा | सावरकर, पुन्हा जन्म घ्या. 137 |
| ७६) डॉ. वि. म. शिंदे, रत्नागिरी | एक आठवण 137 |
| ७७) श्री. कुमुद रेगे, रत्नागिरी | सावरकरांचे रत्नागिरीतील महान कार्य 138 |
| ७८) श्री. श्रीधर वि. गोगटे, पुणे | एका गरीब विद्यार्थ्याची आठवण 141 |
| ७९) श्री. मा. शि. अळेकर, नागपूर | सावरकरांना वंदन 143 |





| | |
|---|---|
| ८०) श्री. आचार्य बाळाराव सावरकर मुंबई | सिद्ध पुरुष भगवान श्री. विनायक दामोदर सावरकर 144 |
| ८१) श्री. अच्युत शंकर जोशी, रत्नागिरी | सावरकरांचा व्यवहारीपणा 146 |
| ८२) श्री. पांडुरंग गो. शिरगावकर रत्नागिरी | सावरकरांचे तेजस्वी उद्गार 147 |
| ८३) श्री. गणेश ना. दाडेकर, दापोली | सावरकरांची थोर योग्यता 148 |
| ८४) श्री. अच्युत ल. परळीकर परळी वैजनाथ | सावरकरांचा मोठेपणा 148 |
| ८५) श्री. जगन्नाथ वि. आठल्ये, रत्नागिरी | सावरकरांची आस्तीकता 149 |
| ८६) कै. एस. एम. जोशी, पुणे | सावरकरांचा सर्व पक्षांबद्दल आदर 150 |
| ८७) श्री. अनंत भो. सावेडे, मुंबई | सावरकरांची नेत्रदीपक सुटका 151 |
| ८८) श्री. सुशीला आपटे, सोलापूर | सावरकरांचा आदर्श 152 |
| ८९) श्री. पां. त्र्यं. जोशी, अमरावती | हिंदुराष्ट्राचा ध्यास 152 |
| ९०) श्री. अच्युत मो. बठार | सावरकरांची मौलिक आठवण 153 |
| ९१) श्री. जयसिंग दुधे, पुणे | सर्वांना आवडणारे सावरकर 154 |
| ९२) श्री. एम. आर. ठकार, पुणे | स्वातंत्र्यवीरांचा स्फूर्तिदायक सहवास 155 |
| ९३) आचार्य अत्रे | अत्रे यांच्या मौलिक आठवणी 156 |
| ९४) बॅ. बॅप्टीस्टा | बॅप्टीस्टा यांची मौलिक आठवण 156 |
| ९५) श्री. रा. स. भट, पुणे | १. मी निवडणूक लढवणार नाही 156 |
| | २. कम्युनिस्टांना भिक नको. 157 |
| | ३. चोर, दरोडेखोरांनासुद्धा शिक्षण द्यायलाच पाहिजे ! 158 |
| ९६) श्री. ज. श्री. टिळक | लिपीशुद्धीबाबतचे सावरकरांचे कार्य 158 |

# आता प्रथम बलाढ्य सैन्य हवे !

" ह्या प्रयत्नांतील पहिल्यातील पहिला प्रयत्न म्हणजे एकही क्षण वाया न दवडता आपल्या ह्या नवार्जित राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संरक्षणास्तव बलाढ्य सैन्य उभारणे. आपण तीनचतुर्थांश स्वदेश सध्या मुक्त केला, पण एकचतुर्थांश अजून विलग राहिलेला आहे. आपल्या नैसर्गिक रणांगणीय सीमा ( Strategic Natural Boundaries ) अद्याप अमित्रांच्या हाती अडकलेल्या आहेत. तुसती तत्त्वज्ञानाची अंगाईगीते गाऊन त्यांचे मित्रत्व कालत्रयीही साधणार नाही. तशा भोंगळसुतीपणाने, मिळविले आहे तेही पुन: गमावून बसू. जशास तसे ह्याच राजनीतीने परकीयांशी यापुढे तरी आपण वागू तरच टिकू, जिंकू. आवतीभोवतीचे आक्रमक जग हातात अॅटमबॉम्ब घेऊन टवकारून पाहात आहे, म्हणून तुम्ही पण हाती आलेली ही स्वातंत्र्याची सुवर्णसंधी साधून, बलाढ्य सैन्य उभारून, एका हातात आत्मज्ञान घेऊन का होईना, पण उजव्या हातात अॅटमबॉम्ब घेऊन आपल्या हिंदुराष्ट्राच्या संरक्षणार्थ उभे ठाकले पाहिजे. वेळी चालून गेले पाहिजे !

हिंदु तरुणांनो, हे काम आता मुख्यत्वेकरून तुमचे आहे. भारतीय भूदलात, सिंधुदलात, वैमानिक दलात लाखो हिंदु तरुणांनी, त्यांतही महाराष्ट्रीय तरुणांनी, लगोलग शिरले पाहिजे. आजच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या महोत्सवातील तुमच्या तारुण्याला शोभेलसा तुमचा तेजस्वी कार्यक्रम म्हणजे एकच— प्रत्येक पाणीदार हिंदु तरुणाने आज शपथ घ्यावी की, 'मी इतर कर्तव्ये दुय्यम मानून मातृभूमीच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ सैन्यात शिरेन ! निदान पक्षी स्वतःपुरते तरी सैनिकी शिक्षण घेईन ! "

**स्वातंत्र्यवीर सावरकर**



१

क्षीरसागर क. बा.
आळंदी ७१३, पिंपरी,
पुणे ४११०१७.

## सैनिकीकरणाच्या प्रचाराचा प्रभाव

सोलापुरात माझे बालपण गेले. माझे आतेभाऊ श्री. दत्तात्रय अण्णाराव भरते शहर हिंदुमहासभेचे कार्यवाह होते. स्वातंत्र्यवीरांची पुस्तके घरी येत. ती मी वाचून काढली. मी ही हिंदुसभेच्या दलात बालगटनायक झालो. येथेच हिंदुत्व विचाराची गळाठी प्रथम झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व गांधीवधापूर्वी एक मेळावा सावरकर सदनी आयोजित केला गेला होता. आतेभावाने मला त्यात सहभागी केले. आम्ही मुंबईस आलो. माझे वय अकरावारा, समज-नासमजमधील स्वातंत्र्यवीरांचे प्रत्यक्ष दर्शन होणार, मनःचक्षूंपुढे त्यांचे भगूरमधील बालपण, अष्टभुजादेवीसमोरील घेतलेली शपथ, तन, मन, धन अर्पून दिलेला लढा, तो कारावासातील भयंकर छळ, अशा अवस्थेतही त्यांना स्फुरलेले काव्य, तेथील लोकांना दिलेला हिन्दी पाठ, मिर्सेडात मारलेली उडी, सुभाषचंद्रांना दिलेली संज्ञा, की ज्या योगे हिंदसेनेने दिलेला सशस्त्र लढा, सारेसारे आठवून तात्यांना पाहण्यास मी उत्सुक झालो. एवढ्या मोठ्या समुदायात मीच तेवढा लहान व सुर्वनमस्काराने मिळविलेले सौष्ठव होते. तात्या माझे दैवत, खोल चेअरवर समारत्यानी आले. त्यांची गोरवर्ण, कृश काया, मात्र अतिशय भेदक, तेजस्वी नेत्र पाहून कृतकृत्य झालो. त्यांनी समोवार पाहिले व नेमका मी त्यांच्या लक्षात आलो. मला बोलावून चौकशी केली व मला सल्ला दिला की, आपण नाविकदलात जा. एवढेच, पण किती परिवर्तन झाले माझे ! त्या क्षणापासून ध्यास लागला. आतेभावाने योग्य वेळेस पुण्यास नेले. व मी नाविकदलात देशसेवेस रुजू झालो. पेटीऑफिसर पदावरून निवृत्त झालो. एक प्रकारचा स्वातंत्र्यवीरांच्या प्रभावाने मी वसा घेतला. माझा मुलगा नाविकदलात चीफ पेटी ऑफिसर आहे अनेक तरुणांना भरतीसाठी माहिती देतो. त्याप्रमाणे काहीजणांची निवड होऊन सैनिक पेशात रुजू आहेत. कधी नदी न पाहिलेला, सातदी समुद्र प्रवास घडला, अनेक खंड पाहून आले. देशोदेशीच्या पर्यटनामुळे आलेली प्रगल्भता ही सर्व तात्यांची देण आहे. मी त्यांचा फार ऋणी आहे.

• •

२

डॉ. पां. गो. पुरंदरे,
एम. ए., पी.एच. डी.
८४९ नवा सदाशिव, पुणे-३०.

## स्वा. सावरकरांचे अमोघ वक्तृत्व !

चाळीस-बेचाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. स्वा. सावरकर पुण्यात आले होते. एस. पी. कॉलेजच्या मैदानावर त्यांचे भाषण होते. प्रचंड जनसमुदाय जमला होता. त्यावेळी मी कॉलेज विद्यार्थी होतो. आम्ही काही मित्र कॉलेजच्या प्रवेशद्वारापाशी धाऊन उभे राहिलो. दुतर्फा अनेकजण दाटीवाटीने उभे होते. इतक्यात स्वातंत्र्यवीर आले, आणि त्यांच्या नावाचा गगनभेदी जयघोष झाला. डोळ्यांत प्राण आणून आम्ही पाहत होतो.

गाडीतून तो तेजस्वी महापुरुष उतरला, आणि माझ्या डोळ्याचे पारणे फिटले. धारदार नाक, भव्य कपाळ आणि तेजस्वी डोळे ! क्षणात प्रभाव पडावा असेच त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. मावळा पोशाख, हातात छत्री, व्यासपीठावर स्थानापन्न झाले. जनसागर हेलावत होता. अनेकजण त्यांचे वक्तृत्व ऐकायला आतुर झाले होते.

भाषणाचा ओघ सुरू झाला. हिंदुत्व, सैनिकीकरण, हे त्यांचे आवडते विषय. मराठीतून भाषण चालले होते, पण मधूनच इंग्रजीत, ओघवत्या इंग्रजीत काही वाक्ये कानावर पडू लागली. इतिहासातील तेजस्वी उदाहरणे, बुद्धाचा, गांधींचा उल्लेख, सगळे विवेचन अगदी तर्कशुद्ध व प्रतिभासंपन्न. लोक मंत्रमुग्ध होऊन त्यांचा प्रत्येक शब्द ऐकत होते. प्रत्येकाला त्यांचे म्हणणे पटेल अशी काहीतरी विलक्षण जादू त्यांच्या विवेचनात होती.

भावना, विज्ञान, तर्क, देशप्रेम, यांचा अविरत स्रोत चालला होता. प्रत्येकजण आकंठ बुडाला होता. हा क्रांतिकारकांचा मुकुटमणी भारताचा सरसेनापती शोभत होता. तरा लरोखरच झाला असता तर, भारताचा इतिहास बदलून गेला असता. पण आपल्या तत्त्वांशी तडजोड त्यांना मान्य नव्हती.

स्वातंत्र्यवीर एकाकी लढत राहिले, सोशित राहिले. आज त्यांचे द्रष्टेपण लोकांना अनुभवास येत आहे. असे सावरकर ऐकायला, पहायला मिळाले हे आमच्या पिढीचे 'परम भाग्य' !

• •



३

प्रा. सुहास हरी जोशी
किशोर, यशवंत वसाहत,
शिरूर ( घोडनदी )

## मी स्वातंत्र्यवीरांना पाहिले

स्वा. विनायक दामोदर सावरकर ह्या युगपुरुषाला, त्या पुरुषोत्तमाला, त्या अद्वितीयाला, त्या अप्रतिमाला, त्या दिव्याला, त्या तेजाळा ज्यांनी ज्यांनी पाहिले ते परमधन्य होत. त्यांचं जीवन उजळून निघालं. ते परमभाग्यवान ठरले, अशा भाग्यवंतां-पैकी मीही एक छोटासा भाग्यवान आहे.

१९५६ नि १९५८ च्या दोन छोट्या आठवणी सांगतो. लो. बाळ गंगाधर टिळक यांची जन्मशताब्दी. शनिवारवाडा हे स्थान, नि दोन प्रमुख वक्ते होते. स्वा. विनायक दामोदर सावरकर नि लोकनायक माधव श्रीहरी अणे ! असा दुर्मिळ योग तो ! वीर सावरकर दख्खनच्या राणीने येणार होते. आम्हा कुमारांचा, युवकांचा कोण उल्हास, स्थानकावर ही प्रचंड गर्दी ! सगळेजण अधीर झाले होते. गाडीची वाट पाहात डोळे शिणले, कारण गाडी तशी वेळेवर असूनही प्रत्येक क्षण युगासारखा वाटत होता.... आणि गाडी आली, तो डबा जवळ आला....आला....सगळेजण तिकडे धावले. मी व माझा मित्र यदू भिडे– आम्ही दोघांनी वीर सावरकरांना पाहिले नि कृतकृत्य झाल्या-सारखे वाटले.... मी त्यांच्या अगदी जवळ उभा होतो. त्यांचे वय ७३–७४चे ! पुन्हा अंदमान, पुणे, रत्नागिरी आदी कारावास सहन केलेले ते शरीर.... पण ते जरी थोडे सुटके वाटले तरी ताठ होते. त्यांची दृष्टी स्थिर नि भेदक होती. भोवतालच्या गर्दीत, गडबडीतही पराकाष्ठेचे शांत होते. पँट, कोट, काळी टोपी हा त्यांचा वेष होता. भारतमाता, लोकमान्य नि स्वातंत्र्यवीर यांच्या जयजयकारात मीही हरवून गेलो. तो अनुपमेय पुरुषोत्तम डोळ्यात साठवता येत नव्हता.

दुसरे जे भाग्य मला मिळाले ते क्वचितच कोणाला मिळाले असेल. १९५८ ! स्थळ श्रीशिवाजी मंदिर, पुणे वेळ रात्रीची, अगदी मोजकी माणसे ८ १०च असतील डॉ. चि. ना. तथा चंदोपंत परचुरे यांच्यामुळे मला ही वार्ता कळली. अधीरतेने मी शिवाजी मंदिरात आलो. स्वातंत्र्यवीरांचे जरा वेळाने आगमन झाले. तो उदात्त धीर-गंभीर महापुरुष, प्रख्यात, सुविख्यात व एक प्रकारे अद्वितीय असे गीतरामायणगायक श्रीमान सुधीरजी फडके बरोबर होतेच. वातावरणात विलक्षण चैतन्य होते, स्वातंत्र्यवीर अत्यंत शांतपणे स्थानापन्न झाले. त्यांना वंदन करून त्यांच्या समोरच सुधीरजी बसले आणि अतिशय अतिभावपूर्ण रीतीने–

दैवजात दुःखे भरता, दोष ना कुणाचा,
पराधीन आहे जगती, पुत्रमानवाचा,
दोष ना कुणाचा........

हे गीत असे काही आळवून म्हटले की बस्स ! तोड नाही. इतकी त्यांनी तान कधीच लावली नसेल. विलक्षण भावपूर्ण रीतीने गीत पुढे सरकत होते. स्वातंत्र्यवीर अत्यंत निश्चल होते. वातावरण पराकाष्ठेचे भारावून गेले होते. गीत संपले. अत्यंत निःस्तब्धता. सुधीरजी आपल्या स्थानावरून उठले नि एकदम स्वातंत्र्यवीरांच्या पायांवर आपले मस्तक त्यांनी टेकविले.... स्वातंत्र्यवीरांनी सुधीरजींची पाठ थोपटून त्यांना मनापासून शुभाशीर्वाद दिले. दोघांचेही नेत्र किंचित पाणावले होते. स्वातंत्र्यवीरांसारख्या जणू श्रीरामावतारानीच पाठ थोपटल्यामुळे सुधीरजी कृतकृत्य झाले होते.

आम्ही सारे अनिमिष नेत्रांनी हा सारा प्रसंग पहात होतो, हृदयपेटिकेत साठवून ठेवीत होतो.

त्याच काळात वीर गणपतराव नळावडे नि त्यांच्या पत्नीचा झालेला सत्कार.... मी कधी विसरणार नाही. स्वातंत्र्यवीरांचे त्यावेळचे भाषण अत्यंत संस्मरणीय असेच होते.

* *

श्री. भा. ल. रानडे,
४११, सांमारे पथ, ( गांवभाग )
सांगली ४१६४१६

४

## सुदर्शन सावरकर

' स्वयंवर ' नाटकातील कृष्णदर्शनाने धुंद-धन्य झालेल्या रुक्मिणीप्रमाणे मीही मधुरा भक्तीने म्हणू शकेन– " होय ! मी त्यांना पाहिले. ते माझ्याशी बोलले-देखील ! "

१९३७ मध्ये रत्नागिरीहून सुटल्या सुटल्या कोल्हापुरावरून सांगलीस आले. तेव्हा त्यांच्या प्रकट सत्कारार्थ कै. पंडितराव दांडेकर नि कै. का. भा. लिमये यांच्या पुढाकाराने विराट सभा झाली तेव्हा एक श्रोता म्हणून त्यांचे दुरून दर्शन झाले तेव्हा नित्य वेषासवे त्यांनी मिशा राखल्या होत्या. वरद वक्तृत्वाने कर्णांचे संतर्पण झाले नि अंतःकरणाच्या आळ्यातील आदरबीज अंकुरले.



१९४२ मध्ये स्वा. तात्यारावांच्या अद्भुत विभूतिमत्त्वामुळे हिंदुसभा जोरात होती नि प्रचारार्थ चार भाषांत मुखपत्रे काढण्याचे उद्घोषित झाले होते. रत्नागिरी पटवर्धन प्रशालेच्या चाकरीतून मुक्त होताना मी पूर्वानुज्ञेने मेमध्ये नियतदिनी समयी 'सावरकर सदनी' गेलो. उपसंपादक पद प्राप्तीचा हेतू होता. त्यांच्या खोलीत तासभर होतो. त्यांनी चुकून मला ' प्रोफेसर ' संबोधले. मी नम्रपणे सावरले. ते म्हणाले, " आमची योजना आहे, पण ' उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः । ' साफल्यास तुम्हाला अवश्य बोलवू, पण अवलंबू नका. " " तुम्ही हिंदु गुंड-मुस्लिम गुंड असे का छापता ? गुंडांची जात एकच ! " असे त्यांनी इंग्रजी वार्ताहरांना खडसावले. हैद्राबादच्या बॅ. बोरगावकरांनी आणलेले चित्रपट चालून पहावला, मंचकावरून उठून जेव्हा ते उभे ठाकले तेव्हा त्यांची शरीरसंपदा, प्रज्ञाद्योतक विशाल भाल, तेजस्वी नेत्र पाहून, व्यायामाने शिथिलत्व न आलेल्या पंचविशीतील मला लाज वाटली ! तेव्हापासून झालो स्वकीय भक्त ' Style is Man ' हे पटले. अनुकरणाविना स्तवन वांझोटे !

* *

श्री. भालचंद्र वामन पोटे
टाईप II क्वार्टर, क्र. १५३३
नेहरू नगर, नाशिक रोड.

५

## परकीय शब्दाविरुद्ध कटाक्ष

वीर सावरकरांना आठ-नऊ वेळा त्यांच्या घरी भेटण्याचे भाग्य मला लाभले होते. बोलताना परकीय शब्द न वापरण्यावर त्यांचा कटाक्ष असे, म्हणून प्रथम त्यांच्याकडे मी गेलो तेव्हा परिचय करून देताना ' मी टेक्निक ' आहे असे म्हटले, "काय आहात ?" असे त्यांनी विचारल्यावर मी पुन्हा ' टेक्निक ' हा शब्द वापरला. तेव्हा ते म्हणाले, " अरे बा, तुमचे भाषाशुद्धीकडे लक्ष आहे हे पाहून धन्यता वाटते." वाचनालयाच्या कारभारात येणाऱ्या काही इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द विचारले होते. त्यानंतरच्या भेटीत तात्यारावांनी त्या शब्दांना ' हा शब्द कसा वाटतो ? ' असे विचारीत मराठी प्रतिशब्द सुचवले व नंतर त्यांनी सुचविलेले सर्व शब्द स्वतःच्या वहीत लिहून घेतले तेव्हा ते म्हणाले, " एकदा शब्द आपणास पटला की तोच सतत वापरीत जाणे म्हणजे तो रूढ होतो. रूढीलाच काय ते महत्त्व आहे. ' मेयर ' या शब्दाला मी ' महापौर ' हा शब्द सुचविला, तेव्हा तो शब्द चुकीचा आहे असे काही

व्याकरणतज्ज्ञ म्हणाले. पण तोच शब्द वापरीत गेल्याने वर्तमानपत्रात आज 'महापौर' हा शब्द डौलाने मिरवीत आहे."

१९५९ साली त्यांना आधी पत्र पाठवून भेटावयास गेलो होतो त्यावेळी विश्वासराव नुकतेच नोकरीस लागले होते. म्हणून प्रारंभीच तात्याराव म्हणाले, "तुमचे पत्र मिळाले. विश्वासने चाकरी धरली म्हणून उत्तर पाठविले नाही. चाकरी करावी, असे त्याच्या मनाने घेतले, "माझ्या मुलाला चाकरी द्या." असे मी कुणास म्हटले नाही. लोकमान्यांपासून आम्हाला शिकवण की सार्वजनिक काम तेथे सार्वजनिक काम. तेथे कुटुंबाचा संबंध नाही. नाहीतर 'ही आमची शेती' म्हणून सिंहासनाधिष्ठित म्यानपीठावर मिरवावयचे हे आम्हाला पटत नाही."

भाषाशुद्धी, लिपीशुद्धी व अन्य विषयांवरील माझ्या प्रासंगिक लेखनाविषयी ते म्हणाले की, "तुम्ही लिपीशुद्धी आचरणात आणता ह्याचे कौतुक वाटते. तुमचे अक्षरही चांगले आहे; तुम्ही येथे असता तर माझे लेखनाचे काही काम तुम्हाला दिले असते. इतरही कार्य करता ह्याचा आनंद वाटतो. माझे तर एवढेच सांगणं आहे की, असाल त्या परिस्थितीत देशासाठी काहीतरी करीत रहा."

त्यांनी आम्हाला चिवडा व केळी दिली. त्यावर मी म्हणालो की, "हे कष्ट आपण का घेतलेत? आपले दर्शन लाभले त्यात सर्व काही मिळाले." त्यावर ते म्हणाले, "तुमच्या भावना मी जाणतो, पण आतिथ्य म्हणून काही चीज आहे का नाही? नाशिकचा चिवडा इथपर्यंत येतो तर हे काहीच नाही." त्यांच्याकडे मी जात असे त्यावेळी नाशिकचा चिवडा मी त्यांच्याकडे घेऊन जात असे. म्हणून तात्याराव असे म्हणाले.

त्यांच्याकडून निघताना त्यांच्या प्रकृतीविषयी मी चौकशी केली तेव्हा ते म्हणाले "मी पथ्यपाणी सांभाळतो अन् अजून पंगू झालो नाही. वयपरत्वे कान गेले व अण्णारावांना (मोघटकर) श्वास आहे."

• •

श्री. कृ. म. कोल्हटकर
'अमेय' १९२ डहाणूकर कॉलनी,
४ था रस्ता, कोथरूड,
पुणे ४११००९.

## तात्यारावांचे मित्रप्रेम

मी माझ्या नोकरीनिमित्त पूर्व आफ्रिकेतील केन्या ह्या प्रांताची राजधानी नायरोबी येथे रहात होतो. त्याच गावात डॅ. फडके रहात असत. एकदा गप्पा



मारताना त्यांनी सांगितले की "माझ्या विलायतेच्या वास्तव्यात माझी व श्री. तात्याराव सावरकर ह्यांची मैत्री जमली. तेथे तात्यारावांच्या क्रांतिकारक राजकीय चळवळी चालत त्यामुळे तात्यारावांच्या हालचालीकडे इंग्लंड पोलिस खाते जास्त सावधगिरीने पाहू लागले व त्यामुळेच पुढे श्री तात्यारावांना पकडण्यात आले. आता त्यांना पकडल्यावर कदाचित त्यांच्या मित्रमंडळींच्या हालचालीकडेही पोलिस जास्त लक्ष देतील म्हणून मी भारतात परतल्यावर भारतात स्थायिक होण्याऐवजी नायरोबीत स्थायिक झालो."

डॅ. फडके यांनी त्यांच्या व्यवसायात चांगला लौकिक मिळवला व त्याच्याबरोबर ते सामाजिक व धार्मिक कार्यातही लक्ष घालीत असत. नायरोबीच्या सनातन धर्म-सभेच्या मंदिरात रहाण्याचीही सोय करण्यात आली आहे. त्या खोल्या बांधण्यासाठी एकेक खोलीचा सर्व खर्च करण्याची ज्यांनी इच्छा दर्शविली त्यांच्या नावाचा उल्लेख एकेक खोलीवर पाटी लावून करण्यात आला आहे. त्यातील एका खोलीचा खर्च डॅ. फडके ह्यांनी केला आहे व तसा उल्लेख त्या खोलीच्या भिंतीवर पाटी लावून करण्यात आला आहे.

ह्यावरून राजकारणाप्रमाणे हिंदू धर्माच्या बाबतीत विलायतेच्या वास्तव्यात श्री. तात्यारावांशी झालेल्या चर्चेतही डॅ. फडके ह्यांनी कृती करून दाखविली.

मी एकदा सुटीत भारतात आलो होतो, त्यावेळी श्री. तात्यासाहेबही मुंबईत आहेत असे कळले म्हणून मी त्यांना भेटण्यासाठी गेलो. श्री 'संदेशकार' अच्युतराव कोल्हटकर ह्यांचा मुलगा अशी माझी ओळख करून दिली व नोकरीनिमित्त नायरोबीत असतो असे सांगितले. नायरोबीचे नाव ऐकल्यावर त्यांनी मला विचारले की, "डॅ. फडके कसे आहेत?" त्यांच्या ह्या प्रश्नाने मला फार आश्चर्य वाटले. अर्थात आपल्या मित्राचे नाव लक्षात असणे साहजिकच आहे. परंतु तुरुंगवासाच्या इतक्या खडतर आयुष्यात मित्राच्या वास्तव्याचे आणि त्याही परदेशातील ठिकाण लक्षात ठेवणे म्हणजे श्री. तात्यारावांच्या तीव्र स्मृतीची कल्पना येते. आफ्रिकेतील आफ्रिकन लोक व हिंदी लोकांचे संबंध कसे आहेत? हिंदी लोक त्यांच्या उपयोगी पडतात का? आफ्रिकनांच्या शिक्षणासाठी हिंदी लोक सहाय्य करतात का? वगैरे गोष्टींची श्री. तात्यारावांनी चौकशी केली, त्याबाबतीत बोलताना मी त्यांना सांगितले की, आफ्रिकेत युरोपियन, हिंदी व आफ्रिकन असा भेद केला जातो, त्यामुळे आफ्रिकन लोकांना चांगल्या रुग्णालयात प्रवेश मिळत नाही, ही स्थिती लक्षात घेऊन डॉ. कर्वे (हिंगणे शिक्षण संस्थेचे संस्थापक श्री. अण्णासाहेब कर्वे यांचे पुत्र) ह्यांनी पाण्ड्या मेमोरियल क्लिनिक नावाचे हॉस्पिटलमधील सोयी व चांगली औषधे मिळू लागली.

आफ्रिकनांच्या शिक्षणाबाबतीत सांगण्याचे म्हणजे आमच्या छापखान्यात काम करणाऱ्या एका आफ्रिकन कामगाराच्या मुलाचा ABC पासून ते मॅट्रिकपर्यंतचा सगळा खर्च फी, क्रमिक पुस्तके, शाळेचा युनिफॉर्म मी केला, अर्थात इतर पुष्कळांनीही कार्य केले.

हे सर्व ऐकून श्री. तात्यारावांनी समाधान व्यक्त केले व मग मी त्यांना नमस्कार करून त्यांचा निरोप घेतला व मनात त्यांच्या तीक्ष्ण स्मृतीलाही वंदन केले.

• •

७

सौ. सुशीला पं. जोशी
मुकुंदनगर, १११/२६ सेंट्रल
गव्हर्नमेंट कॉलनी, पुणे ३७.

## सावरकरांच्या लोकप्रियतेचे गमक

१९४० सालची गोष्ट आहे. त्यावेळी मी बारा वर्षांची असेन. सावरकर हे पक्के हिंदुत्वनिष्ठ. माझे वडील हिंदुमहासभेचे. त्यांचे नाव रामदास नथू वैद्य. हे सावरकरांचे जीवश्च कंठश्च मित्र. त्यामुळे आमचा व त्यांच्या घराण्याचा जवळचा संबंध होता. श्री. तात्याराव खानदेशाच्या दौऱ्यावर असताना त्यांचा मुक्काम दोन दिवस पिंपळनेरला आमच्या घरी होता. तिथे त्यांचे फार स्वागत ५१ बैलजोडींच्या गाडीतून केले. आम्ही भगिनींनी त्यांना ओवाळले व खड्या आवाजात स्वागत-गीत म्हटले; ते गीत 'हे पूज्य राष्ट्रवीरा नमन ते तुजला' आणि 'अखिल हिंदु विजय ध्वज हा उभवू या पुन्हा'. समारंभ झाल्यावर त्यांनी मला जवळ घेतले व म्हणाले, "अगदी वडिलांसारखा खडा आवाज आहे." नंतर भोजनाचा कार्यक्रम होता. आमच्या घरी बरोबर बारा वाजता जेवणाची पंगत बसली. १५० मंडळी जेवायला होती. पुणेरी पद्धतीचा जेवणाचा बेत होता. आळूची भाजी, घरच्या दुधाचे श्रीखंड, कांद्याची भजी वगैरे. तात्यारावांना स्वयंपाक फारच आवडला. माझ्या वडिलांना म्हणाले, "बाळ, आळूची भाजी फारच सुंदर झाली आहे, स्वयंपाकही सुंदर झाला आहे. पुण्याहून आचारी आणला का?" श्री. तात्यारावांच्या पानापुढे व पंक्तीपुढे सुंदर फुलांच्या रांगोळ्या, उदबत्तीचा घमघमाट, बसायला शिसवी पाट, टेकण्यासाठी पाट व ताट ठेवण्यासाठी पाट असा सुंदर थाट केला होता. ते 'म्हणाले, खेड्यातही इतकी हुशार, टापटीप व वक्तशीरपणानं वागणारी मंडळी आहेत.' उठताना वडिलांना म्हणाले, आचारी कोणता होता? तेव्हा माझ्या वडिलांनी भर पंक्तीतून उठून माझ्या आईचा (रमाबाईचा) हात धरून त्यांच्यापुढे उभे केले व म्हणाले, "हाच तो पुण्याचा आचारी." सावरकर चकित झाले व पंक्तीमध्ये एकच हशा पिकला. नंतर श्लोक वगैरे म्हणून जेवणाची पंगत संपली. असा झाला तो कार्यक्रम. सावरकरांचे पांढरे शुभ्र धोतर, शर्ट, काळी गोल टोपी व सोनेरी काडीचा चष्मा असे त्यांचे



व्यक्तिमत्त्व व तो प्रसंग आठवताच मन भारावून जाते व असे वाटते इतक्या राष्ट्रप्रेमी पुरुषाला जवळून पाहण्याचा व दोन दिवस आमच्या घरी रहाण्याचा सहवास मिळाला त्यामुळे मी स्वतःला फार भाग्यवान समजते.

• •

८

श्री. प्रभाकर जोशी,
२५ जयप्रकाश नगर,
खामला रोड, नागपूर.

## 'अविस्मरणीय' बलिदान

स्वा. तात्याराव सावरकर ह्यांचे आगमन नागपुरास निश्चित ठरले होते, व त्याप्रमाणे मुंबई-दौरा मेलने नागपूरच्या रेल्वेस्टेशनच्या तीन क्रमांकाच्या प्लॅट-फॉर्मवर प्रवेश केला, हजारो लोक सत्कार व स्वागतासाठी प्लॅटफॉर्मवर उपस्थित होते. त्यात श्री. मावकर, श्री. पु. भा. भावे हे दोन तरुण हातात मोठे मोठे हार घेऊन पूर्वयोजनेनुसार हिरीरीने पुढे होते. दोघांत पैज लागली 'पहिला हार मी घालीन-' प्रथम श्रेणीच्या डब्याच्या दारात तात्याराव उभे होते, गाडीची गती कमी कमी होत होती, परंतु ह्या तरुणांची धावण्याची गती वाढती होती. गाडी थांबण्यापूर्वी श्री. मावकरांनी डब्याचा लोखंडी बार धरण्याचा प्रयत्न केला, एका हातात फुलांचा हार होता, हात सटकला आणि श्री. मावकर हारासह गाडीखाली गेले. क्षणात त्यांच्या शरीराचे अक्षरशः दोन तुकडे झाले, गाडी थांबली. वंदनीय श्री. भोपटकर, स्वा. तात्याराव व त्यांच्यासह इतर मंडळी खाली उतरली. श्री. भावे यांच्या हातातला हार हातातच राहिला, 'मावकर गेले, मावकर गेले' ह्या शब्दात स्टेशन गरजले, त्यांच्या देहाचे तुकडे वर काढले गेले व नागपूर रेल्वे स्थानकावरून तो देह लो. टिळकांच्या पुतळ्यासमोरील मावकरांच्या छोट्याशा घरात नेण्यात आला, त्यानंतर त्यांची शव-यात्रा गंगाबाईच्या घाटावर नेल्यानंतर स्वा. सावरकरांनी प्रथम श्रद्धांजली अर्पण केली, ती ह्या शब्दांत-

"ज्यांच्या खांद्यावरून आम्ही जायला पाहिजे, त्या तरुण शूरवीराला आमच्या खांद्यावरून आज न्यावे लागते ह्यापेक्षा दुसरे दुर्भाग्य कोणते असू शकते?" स्वा. सावरकर मृत्युंजय, त्यांच्या अंतःकरणातील तरुण देशभक्तांबद्दलची तळमळ, मनाची थोरवी, आणि विचारांचा विशालपणा जगाने पाहिला. मी माणूस ओळखला. मी

पाहिलेले सावरकर महापुरुष होते, महापुरुष आहेत. सुमारे ४०-४५ वर्षांपूर्वीची ही घटना अमर, असामान्य, अद्वितीय!

" आत्मविस्तारात ज्यांच्या देशही सामावती,
गाऊ त्यांना आरती, गावी त्यांना आरती. "

* *

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,
वाई, जि. सातारा.

९

## सावरकरांचा क्रांतिकारक समादेश

स्वा. सावरकर यांची व माझी समक्ष भेट आयुष्यात दोनदा झाली. प्रत्येक भेटीच्या वेळी मला मी धन्य झालो, अशा तऱ्हेची उत्कट भावना निर्माण झाली.

पहिली भेट सन १९३१ साली रत्नागिरी येथे वीर सावरकर स्थानबद्ध असताना झाली. त्यावेळी मी रत्नागिरीस सावरकरांची भेट व्हावी याकरिता गेलो नव्हतो. रत्नागिरी येथे साडा म्हणून उंचवटा आहे. त्यावर अनेक इमारती होऊ लागल्या होत्या. त्यातील एका इमारतीत लोकसभेचे माजी सभापती व कायदेपंडित कै. दादासाहेब मावळंकर राहिले होते. त्यांचा प्रज्ञापाठशाळा मंडळाच्या धर्मकोशाशी संबंध होता. कागदपत्रांवर त्यांची स्वाक्षरी घ्यावयाची होती. दुपारी मी सावरकरांच्या निवासस्थानी गेलो, त्यांच्या चरणांना स्पर्श करून वंदन केले. ते मला खूपच ओळखत होते. त्यांनी सांगितले की, पतितपावन मंदिरामध्ये तुमचे भाषण होईल. रात्री मी शहरात थोडी फिरलो. पतितपावन मंदिरात सावरकरांच्या अध्यक्षतेखाली 'धर्मशास्त्र व अस्पृश्यता निवारण' या विषयावर माझे भाषण झाले. त्या प्रसंगी रत्नागिरीस मी तीन दिवस राहिलो होतो, तिन्ही दिवस सावरकरांची व माझी समुद्र-किनाऱ्यावर बातचीत झाली. सोलापूर येथे सन १९३० साली अनेक स्वातंत्र्यवीरांचा वध झाला. त्या वधाच्या संदर्भात सावरकरांनी मला डिवचले आणि म्हटले की, "तो सोलापूरचा कलेक्टर नाईट आता नाशिकला गेला आहे. त्याला त्या सोलापूरच्या हुतात्म्यांच्या बरोबर स्वर्गाला पाठविण्याची काही योजना आखा. दादासाहेब मावळंकरांदेखत हा असा सल्ला दिला. दादासाहेब आणि मी परतत असताना दादासाहेब मला म्हणाले, की हा जो सल्ला माझ्यादेखत दिला त्यामुळे माझी मोठी पंचाईत झाली



आहे, शास्त्रीबुवा! मी म्हटले सावरकरांनी सुचित केलेली योजना कृतीत आणता येईल की नाही याबद्दल मला काही सांगता येत नाही म्हणून निश्चिंत रहा. तिसऱ्या दिवशी पुनः सावरकरांची व माझी सायंकाळी समुद्रकिनाऱ्यावर भेट झाली. त्यावेळी दादासाहेब आमच्या बरोबर नव्हते.

सन १९५१ मध्ये मी सोमनाथ ज्योतिर्लिंगाचा पुनःप्रतिष्ठा समारंभ करून मुंबईस परतलो. देशातील वृत्तपत्रात जवळ जवळ आठवडाभर समारंभाच्या हकिकती येत होत्या. राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद हे यजमान व मी पुनःप्रतिष्ठेचा आचार्य याबद्दल सावरकरांना अत्यंत आदर वाटला. मुंबईत शिवाजीपार्कवर माझ्या बंधूंच्या निवासस्थानी मी उतरलो होतो. जवळच सावरकर निवास आहे. तेथून निरोप आला की तुमची सावरकर वाट पाहत आहेत. मी दुपारी ३ वाजता सावरकर निवासात वरच्या मजल्यावर त्यांच्या खोलीपाशी गेलो. ते बाहेर आले आणि माझा हात धरून खोलीत नेले आणि मला एक पुष्पगुच्छ दिला. मी तो पुष्पगुच्छ स्वीकारून त्यांच्या चरणास वंदन केले.

* *

**श्री. गंगाधर पाठक,**
तुलसीनगर, भोपाल.

१०

## एका संघ स्वयंसेवकाचे विचार

सेलम व मदुरा (मद्रास) येथील १९३९-४० साली झालेल्या अधिवेशनात मी स्वतः हजर होतो व स्वयंसेवक प्रमुख म्हणून व्यवस्था पहात होतो. सेलम अधिवेशनाच्या-वेळी सावरकरांच्या ध्वजावंदनाचा फोटो माझ्याकडे आहे. डॉ. हेडगेवारांच्या सूचने-प्रमाणे मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रचार करत ३९-४० मध्ये मद्रास प्रांतात त्यावेळी होतो. डॉ. वरदराजलु नायडूंनी महासभेतर्फे अधिवेशन घेतले. मदुरा येथे डॉ. मुखर्जी अध्यक्ष होते.

* *

११

श्री. पु. शं. पतके,
१२०४/२०, शिवाजी नगर,
पुणे – ४११००४.

## राष्ट्राच्या नेत्यांनी केलेली सावरकरांची उपेक्षा

वास्तविक स्वातंत्र्यवीरांच्या अगोदर माझी त्यांचे वडीलबंधू कै. बाबा यांच्याशी जास्त परिचय व विद्यार्थीदशेत ये-जा होती. (१९२५ ते ३३) त्यांच्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक कै. डॉ. हेडगेवार, सुप्रसिद्ध क्रांतिकारक भगतसिंह, चंद्रशेखर आझाद, राजगुरू इ. अलौकिक वीर व्यक्तींशी मला बोलता आले. त्यांची सेवा करता आली हे माझे परम भाग्य.

स्वातंत्र्यवीरांचा व्यक्तिगत परिचय होण्याची माझी तीव्र इच्छा होती व तो योग मोठ्या चमत्कारिक पद्धतीने आला. तात्याराव प्रथम दिल्लीस स्वतंत्र होऊन आले तेव्हा त्यांची प्रचंड–न भूतो न भविष्यति मिरवणूक काढावी अशी त्यावेळच्या फेडरल कोर्टाचे जज्ज डॉ. मुकुंदराव जयकर यांची ईच्छा होती. त्यावेळी मी दिल्लीत एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून सर्व स्तरांवर परिचित होतो. डॉ. जयकरांनी मला बोलावून त्यांच्या टेबलच्या ड्रॉवरमधून अक्षरशः हजारो रुपये काढले व मला देऊन ते म्हणाले, "तू वाटेल त्या मार्गाने जास्तीत जास्त माणसे, लेझीम पथके, व्यायामशाळा इ. गोळा करून 'राष्ट्रीय क्षितिजावर नवा तारा उगवला', 'देशाचे भवितव्य सावरकरांचे हाती द्या' इ- घोषणा सुचवल्या. त्यावेळेपर्यंत तात्यारावांनी जरी हिंदुमहासभेचे अध्यक्षपद स्वीकारले होते तरी हिंदुत्ववादी घोषणा देऊ नका. सावरकर हे राष्ट्रीय नेते आहेत, नुसते हिंदूंचे नाहीत व काँग्रेसवाल्यांचे डोळे दिपवून त्यांना सावरकरांचे मोठेपण पटविण्याचा त्यांच्यात भावेतील हा मार्ग आहे. ही मिरवणूक स्व. पं. नेहरू पाहू शकले. कारण त्यावेळी मी पं. नेहरूंकडे काम करीत असे तर हे वृत्त विमान त्यांना कळवले, त्यांना सावरकर व डॉ. जयकरांचा दृष्टिकोन, त्यांचे कार्य, कर्तृत्व, राष्ट्रहीत डॉ. जीना तसेच मंपक काँग्रेसचे त्यांचे डोळ्यात अंजन घालण्यास हा एकमेव नेता समर्थ होता, हे दर्शविले.

ठरल्याप्रमाणे मिरवणूक थाटात पार पडली. दोन लाख लोकांनी त्यात भाग घेतला. २७ लेझीम पथके त्यात सामील झाली, ही सर्व कात्रणे मी पं. नेहरूंना दाखविली व तेही प्रकाशित झाले.

वृत्तपत्रांनी (इंग्रजीतह) आम्हाला चांगलेच सहकार्य दिले; यानंतर मी तात्यांची म. गांधी, स. पटेल व पं. नेहरू यांची भेट घडवून आणावी, ही कामगिरी डॉ. जय-



करांनी माझ्यावर सोपवली. या पुढाऱ्यांकडे नेहमी माझी रोजची ये-जा असल्याने त्यांच्या पुढे तात्यांच्या भेटीचा प्रस्ताव मांडणे सोपे झाले.

**महात्मा गांधी :** महात्मा गांधींनी त्यांच्या नेहमीच्या विनोदी शैलीत "अरे भय्या, वह तो जंगल का शेर है, हम तो इस कुटीमें रहनेवाले फकीर हैं। कहा राजा भोज, और कहा मैं। असे म्हणून भेट टाळली.

**सरदार पटेल :** मग मी सरदार पटेल यांना भेटलो. ते हिंदुत्वनिष्ठ असल्याने मला फार आशा होती पण त्यांनी मला सांगितले की, सावरकर क्रांतिनिष्ठ असल्याने आपले त्यांचे वाकडे आहे, तू त्या भानगडीत पडू नकोस.

**पंडित नेहरू :** त्यानंतर मी योग्य संधी साधून पं. नेहरू यांना एक थोर व्यक्ती म्हणून तुम्ही तात्यांना का भेटत नाही म्हणून विचारताच, 'हां, जरूर मिलेंगे, कुछ देर आप भी कहेंगे' म्हणून सांगितले. पण तात्याराव आपणहून पं. नेहरूंकडे गेले, तर हिंदुसभा नेहरूंना शरण गेली. तुम्ही आपणहून जाऊ नका, असा सल्ला भाई सरदार ताराभिंग यांनी त्यांना दिला. तिकडे इंदिरा गांधी व अन्य नेत्यांनी तुम्ही त्यांच्याकडे जाऊ नका, त्याने काँग्रेसची प्रतिष्ठा कमी होईल. ते भेटले तर औपचारिकरीत्या त्यांच्या पराक्रमाची तारीफ करा, असा सल्ला दिला. अहंकाराच्या कैचीत माझी पंचाईत झाली. तात्या मला म्हणाले, "काँग्रेसचे देशात सदस्य किती आहेत व हिंदू किती आहेत! काँग्रेसपेक्षा हिंदूंची संख्या जास्त असल्याने नेहरूंनीच मला भेटावे." दरम्यान हिंदुमहासभा भवनावर भाई परमानंद यांनी मला वाट देऊ नका, फोन आला तर तात्या नाहीत म्हणून सांगा, असे सांगितले. या सर्व घडामोडीत नेहरूंना मी सकाळी फिरत फिरत सर्व्हंट्स लेनवर हिंदुमहासभा भवनाच्या मागे नेले. परंतु पूर्वी ठरल्याप्रमाणे प्रा. देशपांडे तात्यांना ठराविक वेळी आणू शकले नाहीत व त्यानंतर या प्रकरणावर पडदा पडला. काही वर्षांनी तात्यांची माझी मुंबईला भेट झाली तेव्हा ते म्हणाले, "काँग्रेसवाल्यांनी माझ्या मार्गात अनेक अडचणी निर्माण केल्या असल्या, तरी नेहरूंनासुद्धा त्यांच्याहून वरचढ नेते लाभत नाहीत." यानंतर ३० जानेवारी १९४८ ला नथुराम गोडसे व आपटे हे मी जेथे राहत होतो त्या डालमिया भवनावर आले व तात्यांना शेठजींची भेट पाहिजे, ती तुम्ही घडवून आणा, म्हणून सांगत होते. पण त्याच दिवशी संध्याकाळी महात्माजींचा खून केला व सर्वच वातावरण बदलले. माझ्या दिल्लीच्या प्रदीर्घ वास्तव्याच्या अनुभवावर काँग्रेसमध्ये तेव्हापासून देशसेवेपेक्षा खुर्ची, मान इत्यादींवर भर असल्याने, तात्यांसारख्या प्रामाणिक देशभक्ताशी त्यांनी डाळ शिजू दिली नाही.

• •

## १२

एम. आर. राजेंद्रकर,
पुणे.

## वीर सावरकरांच्या कार्याला गुप्तदान देणारे उदार धनिक

नागपूर येथील उद्योगपती व ऑल इंडिया रिपोर्टर या नियतकालिकाच्या संस्थेचे संस्थापक कै. वामन वासुदेव चितळे यांचा स्वातंत्र्यवीर सावरकर व त्यांचे बंधु बाबाराव सावरकर यांच्याशी अगदी विलक्षण तऱ्हेने १९०८ च्या सुमारास संबंध आला. स्वा. सावरकर त्यावेळी विलायतेत होते तरी बाबाराव सावरकर त्यांच्या अभिनव भारत या संस्थेचा प्रचार सर्वत्र करीत होते. अशा त्या काळात श्री. चितळे यांनी नाशिक येथे गंगेच्या वाळवंटात अभिनव भारताची शपथ घेऊन ते त्या संस्थेचे सदस्य झाले परंतु अभिनव भारताच्या क्रांतिकारकांवर सरकारने दडपशाही घातल्याने क्रांतिकार्य करणे किंवा सामील होणे अशक्य झाले. त्यामुळे चितळे त्या संस्थेचे काहीच कार्य करू शकले नाही. परंतु मध्यंतरीच्या काळात अप्पासाहेब चितळे यांनी ऑल इंडिया रिपोर्टरचा धंदा नावारूपास आणला पुढे १९२४ च्या सुमारास स्वा. सावरकर व त्यांचे बंधू अंदमानच्या बंदीगृहातून मुक्त होऊन भारतात आले त्यावेळी तरुणपणी अभिनव भारताचे सदस्य झालेले अप्पासाहेब चितळे यांनी नाशिक येथे बाबारावांना गाठले व अभिनव भारताची आपण १९०८ साली कशी शपथ घेतली त्याची आठवण दिली व पुढे अत्यंत दुःखाने आपण त्या संस्थेचे काही कार्य करू शकलो नाही, असे बाबारावांना सांगितले व अभिनव भारताच्या कार्याची भर भरून काढण्यासाठी वीर सावरकरांच्या कार्यासाठी द्रव्य देण्याची इच्छा आहे असे सांगितले. व बाबांकडे किती रक्कम द्यावी ? अशी मागणी केली पण बाबांनी काहीच न सांगितल्याने स्वतःहून चितळे यांनी बाबांना दोन सहस्र रुपये दिले. पश्चात दोन दिवसांनी चितळे बाबांकडे गेले असता बाबा आजारी होते तेव्हा चितळे यांनी बाबांना आवश्यक ती विश्रांती घेण्याचा समादेश दिला. पण हाती असलेल्या कार्यासाठी ४ सहस्र रुपये जमा करणे आवश्यक असल्याने ते जमा होईपर्यंत विश्रांती घेणे अशक्य आहे असे सांगितले. बाबांची पैशाची अडचण लक्षात घेऊन अप्पासाहेबांनी त्वरित चार सहस्र रुपये धाडले या वेळी स्वा. सावरकर रत्नागिरीत स्थानबद्ध होते व राजकारणात भाग घेण्यावर बंदी होती तरी आपले बंधु डॉ. सावरकर यांच्या संपादकत्वाखाली मुंबई येथे ते श्रद्धानंद चालवत होते त्याची हिंदी आवृत्ती निघाली. त्यावेळी अप्पासाहेबांनी सहा सहस्र रुपये साहाय्य दिले. अशा तऱ्हेने सावरकरांच्या अभिनव भारत संस्थेला चितळे यांनी गुप्तपणे कोणालाही नकळत दान केले, इतकेच नाही तर शेवटपर्यंत



स्वा. सावरकरांना भेटून त्यांना चितळे साहाय्य करीत. स्वा. सावरकरांच्या देशभक्ती-बद्दल व देशकार्याबद्दल अप्पासाहेबांना आदर वाटे. स्वातंत्र्यवीरांनी सहा सोनेरी पाने हा लिहिलेला हिंदूंचा इतिहास चितळेंनी इंग्रजीत भाषांतर करून तो मुद्रण करण्याची सोय केली व त्या पुस्तकाला ' सिक्स ई पॉक्स ऑफ हिंदू हिस्टरी, ओव्हर ऑल सोर्स ' हे सार्थ नाव दिले. स्वातंत्र्यवीरांच्या वाङ्मयात सहा सोनेरी पाने हा महत्त्वाचा इतिहास असून त्याचा भारतात प्रचार करण्यासाठी १ लाख प्रती छापणार आहे, असे अप्पासाहेब म्हणत. स्वा. सावरकरांच्या कार्यासाठी मुक्त दान करणारे एक उदार धनिक, हीच अप्पासाहेब चितळे यांची इतिहासातील ओळख.

• •

## १३

श्री. दत्ता विळणकर, Ex. M. L. A.
मु. पो. पालशेत, ता. गुहागर,
जि. रत्नागिरी.

## सिंधुबंदीमुळे झालेली हानी

१९४५-४६ च्या सुमारास सावरकर सदनमध्ये दर रविवारी गच्चीवर सायंकाळी ४०-५० लोक जमत. त्यांच्यासमोर सावरकर आपले विचार मांडीत असत. एका रविवारी सिंधुबंदीवर बोलताना सावरकर म्हणाले, " कोकणातील ख्रिस्ती परदेशगमन करून पैसा कमावून आपल्या घरावर सोन्याची कौले घालण्याची तयारी करतो. परंतु त्याच्या शेजारी राहणारा माझा भंडारी बंधु शास्त्रातून आपल्या जीवाची पर्वा न करता नारळाच्या उंच उंच झाडावर चढतो, परंतु परदेशगमनाला भितो. सिंधु बंदी त्याला तोडवत नाही. तो भिकारीच राहिला आहे. त्याचे घर कौलारूच आहे. "

## देशघातकी पूर्वजांबद्दल चीड

सन १९५२ ची गोष्ट आहे. सावरकर रत्नागिरीहून गुहागरला आले होते. गुहागरच्या विश्रामधाममध्ये त्यांचा मुक्काम होता. रत्नागिरीहून येताना परशाकडच्या वाटे रक्त पडून बराच थकवा आला होता, म्हणून पालशेतला म्हणजे त्यांच्या घराण्याच्या मूळ ठिकाणाला इच्छा असूनसुद्धा भेट देता आली नाही. भेट देण्याचे कार्यवाहमार्फत मला पूर्वी कळविले होते, म्हणून मी त्यांची माझ्या घरी पालशेतला वाट

पाहून दुपारी दोन-अडीच च्या सुमारास विश्रामधाममध्ये त्यांचे दर्शन घेण्यास गेलो. तेथे श्री. बाळाराव सावरकरांनी माझा परिचय करून दिला व यांना पाल्हीतला येण्याचे कळविले होते असे सांगितले. त्यावर त्वरित माझे दैवत वदले, " मला क्षमा करा. माझ्या आजारपणामुळे मी येऊ शकलो नाही. " मला गहिंवरून आले. तेथे मी थांबूनच होतो. गुहागरच्या जाहीर सभेची वेळ झाली म्हणून सावरकर कपडे करून तयार झाले. इतक्यात गुहागरचे एक सद्गृहस्थ तेथे आले व सांगू लागले, " हे विश्रामधाम म्हणजे आनंदीबाईंचे वेवघर आहे. " त्यावर सावरकरांनी फक्त ' हां हां ' केले. त्यानंतर सभाठिकाणी जाण्यासाठी सावरकरांसाठी आम्ही घोड्यात आलो. तक्षणी ते सद्गृहस्थ म्हणाले, " तात्या, दक्षिणेला त्या टेकडीवर दुसऱ्या बाजीरावांच्या बंगल्याचे अवशेष आहेत. " त्याबरोबर गलितगात्र झालेले सावरकर एकदम लाल झाले. म्हणाले, ' त्या नालायकाचे नाव घेऊ नका. " त्यांच्या चेहऱ्यावर चीड, वास्तविक संतापाचे दर्शन झाले. आम्ही तेथे असलेले अवाक् झालो.

• •

१४

श्री. म. श्री. दीक्षित

स्वा. सावरकरांचं भावनोत्कट, विचारगर्भ, थरारक भाषण ऐकणं हा एक अनुपम रोमांचकारी अनुभव असे.

• •

श्री. न. श्री. फडके
खडे बाजार, बेळगाव.

१५

## सावरकरांचे मला झालेले दर्शन

मी श्री. बाबाराव सावरकरांच्या घरी दर पंधरा दिवसांनी सावरकर सदनात जात असे. सायंकाळी तात्याराव हातात छडी घेऊन बागेत प्रत्येक झाडाजवळ पाच-पाच मिनिटे थांबून निरीक्षण करीत असत. सहसा ते इतरांकडे लक्ष देत नसत. त्यांच्या



क्रम कपाळाकडे व कृष्णमूर्तीकडे पाहिल्यावर ते एवढे क्रांतिकारक असतील असे वाटत नसे. कारण तात्यारावांचे वय ६० ते ६५ वर्षांचे होते; पण त्यांच्या चेहऱ्यावर बौद्धिक झाक स्पष्टपणे दिसत असे. साधा पांढरा शर्ट व पायघोळ स्वच्छ पांढरे धोतर असा त्यांचा पोशाख असे.

डॉक्टर व बाबाराव सावरकर आमच्या घरी अमलिंडीस हवा बदलण्यासाठी वर्ष-दोन वर्षे राहत होते. चि. अशोक व विक्रम यांच्या मुंजीपण आमच्या घरी झाल्या. त्यावेळेस तात्यारावांबद्दल पुष्कळच माहिती मिळाली.

सावरकर कुटुंबियांशी फारच परिचय झाला. त्यांच्या व आमच्या कुटुंबियांचा एकत्रित कुटुंबाप्रमाणे परिचय होता.

दादरला सावरकरांची व्याख्याने ज्या वेळी होत त्या सर्व व्याख्यानांना मी उपस्थित असे. त्यांच्या समोरच्या लाऊडस्पीकर त्यांचा शब्द झेलण्यासाठी उत्सुक असे व अशा रीतीने ते दोघेही एकरूप होत.

आताप्रमाणे व्हिडिओ टेपची सुविधा त्यावेळी असती तर तरुण पिढीला त्यांचे घरोघरी दर्शन झाले असते.

" असा वक्ता पुनश्च होणार नाही. "

• •

श्री. मुकुंद भा. निमकर
माहीम, मुंबई.

१६

## स्वा. सावरकरांचा स्वाभिमान

२८ मे १९५७ स्वा. सावरकरांचा वाढदिवस. लोकमान्य सेवा मंडळ, चिंचपोकळी-मुंबई. संस्थेच्या द्वारा, संस्थेचे अध्यक्ष तात्याराव मसूरकरांसह मी त्यांच्या दादर येथील निवासी भेटीसाठी गेलो होतो. बरोबर रत्नागिरी हापूसची पेटी घेतली होती.

दर्शन आणि आशीर्वाद घेण्यासाठी माणसांची सतत ये-जा चालू होती.

आम्ही खोलीत प्रवेश केला. मसूरकरांनी माझी ओळख स्वातंत्र्यवीरांशी करून दिली.

यांचे नाव मुकुंद निमकर, आमच्या संस्थेचे सेक्रेटरी आहेत. चटकन तात्याराव म्हणाले, ' कार्यवाह ' आहेत. हे म्युनिसिपालटीत क्लार्क आहेत. त्वरित स्वा. सावरकर

म्हणाले, "म्हणजे मुंबई महापालिकेत आपण लेखनिक आहात-" मग आम्हा सर्वांनाच म्हणाले, "शुद्ध मराठीत बोला."

त्यानंतर मला बंधू किती आहेत, असे विचारले. मी म्हणालो, सात. तात्याराव उद्गारले, शाळेत जाणारा एक भाऊ किमान अभ्यासक्रमानंतर 'सैन्यात' पाठवा.

पाच मिनिटांच्या भेटीत माझ्या मनावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मोठा ठसा उमटला. प्रत्येक क्षण ते स्वातंत्र्य सुरक्षिततेचा विचार करतात आणि स्वाभिमान जागृतीसाठी शुद्ध मराठीचा आग्रह धरतात.

स्वातंत्र्यवीरांना माझे शतशः प्रणाम.

• •

डॉ. श्रीधर द. लिमये
अभेय, १६२ डहाणूकर कॉलनी,
कोथरूड, पुणे २९.

१७

## कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्याची सावरकरांची हातोटी

लहानपणापासून मला 'केसरी' आणि 'श्रद्धानंद'मधील सावरकरांच्या अंदमानातील खडतर अनुभवांच्या वाचनामुळे त्यांच्याविषयी अतीव आदर वाटू लागलेला होता. ते अंदमानातून सुटून रत्नागिरीस स्थानबद्ध झाले. त्यांच्या दर्शनाचा लाभ मिळेल असे केव्हाही वाटले नव्हते. परंतु कै. जमनादास मेहता यांच्या औट घटकेच्या मंत्रीपदाच्या काळात सावरकरांची सुटका झाल्याने त्यांची भाषणे ऐकण्याचे तरी भाग्य लाभले. त्यांचे आणि त्यांच्याविषयीचे सर्व उपलब्ध साहित्य वाचून काढले; परंतु त्यांच्या समक्ष भेटीची आणि संभाषणाची आशा केव्हाही वाटली नव्हती. तो योगही माझ्या सुदैवाने प्रथम १९३९ मध्ये भागानगर चळवळीमुळे आला. "आता रडगाणी संपली आणि रणगाणी चालू झाली आहेत." असे म्हणून सावरकरांनी भागानगर निःशस्त्र प्रतिकाराची हाक दिली आणि "ऐक भविष्याला हिंदु जाती चालली रणाला" असे आपल्या वीरवाणीने बजावले तेव्हा मी या चळवळीत प्रत्यक्षपणे भाग घेण्याच्या विचारात होतो; परंतु श्री. ग. वि. केतकर यांनी मला या चळवळीच्या एका अत्यावश्यक अशा प्रसिद्धी कार्यात गुंतविले. गांधीजींचा म्हणून काँग्रेसचा चळवळीस विरोध असल्याने असोसिएटेड प्रेस किंवा युनायटेड प्रेस या वार्तावितरक संस्था भागानगर चळवळीच्या बातम्या वर्तमानपत्रांकडे धाडीत नसत. पुढे पुढे आर्यसमाजाच्या सत्याग्रहाच्या वार्ता थोड्या थोड्या वृत्तपत्रांत येऊ लागल्या त्यामुळे वर्तमानपत्रांकडे हिंदु



सभेच्या निःशस्त्र प्रतिकाराच्या वार्ता धाडणे प्राप्त होते. श्री. केतकर यांच्याकडे येणाऱ्या मराठी, हिंदी, उर्दू वार्तांचे इंग्रजी भाषांतर करून त्यांचे वार्तापत्र मी स्वतः करी. हे चांगले झाले असावे कारण श्री. सावरकर मुंबईहून चळवळीच्या वार्ता 'हिंदुसभा डायरी वीक बाय वीक' या शीर्षकाने धाडीत ते त्यांनी थांबविल्याचे श्री केतकरांना कळविले आणि बऱ्याच पत्रांच्या छापील प्रती आमच्याकडे धाडल्या. काही नाही तरी १६० वृत्तपत्रांना प्रत्येक दिवशी निदान पान तरी वार्ता आम्ही धाडीत असू. हे काम साडेतीन महिने चालले. उशीर झाला तरी या वार्ता काही वर्तमानपत्रे आणि विशेष म्हणजे पं. नेहरूंचे 'नॅशनल हेरल्ड' ही छापू लागले. अशा प्रकारे प्रोत्साहन मिळाल्याने मी श्री. केतकर यांना सोडून श्री. सावरकर केसरीच्या अतिथिगृहात आले असताना त्यांच्या भेटीस गेलो. केतकरांनी ओळख करून दिली. तेवढ्यात तेथे तीन-चार जण आले. काही शाळेतील विद्यार्थी हस्तलिखित मासिकावर सावरकरांची स्वाक्षरी घेण्यासाठी आले होते. त्यांना "बाळ, तुझे अक्षर छान आहे. मी तुझे मासिक थोडे चाळले. पुढच्या खेपेला 'ळ'ची बाराखडी वापरीत जा हो!" लग्नाचे निमंत्रण देण्यास आलेल्याला, "अहो, किती दिवस लाडू घालणार! पाहिलेत ना, अशी धावपळ असते माझ्यामागे. एरवही निश्चित आलो असतो वधूवरांना आशीर्वाद द्यायला." असे प्रत्येकाशी बोलत असतानाच त्यांचा अंगरक्षक आणि कार्यवाह श्री. मळेकर त्यांना सभेला जाण्यासाठी कपडे घालून कार्यक्रम सांगत होते. माझ्याकडे पाहून त्यांनी कामाबद्दल चौकशी केली. माझी इच्छा त्यांनी मुंबईतील विविध वर्तमानपत्रांना आमच्या वार्ता प्रसिद्ध कराव्या असे होते. यावर ते म्हणाले, "अरे छापतील सगळे आपल्या चळवळीला बळ येईल तसतसे. आत्ता आत्ता आर्य समाजाची वार्ता देतात, उद्या आपली देतील. आपण आपले काम करीत रहावे." अशा प्रत्येकास कार्यप्रवण करण्याची त्यांची हातोटी माझ्या लक्षात राहिली. त्यांची भेट झाल्याचे समाधान अर्थातच मला फार झाले. मात्र यावेळेस व्यक्तिगत माहिती विचारली नाही ती दुसऱ्या भेटीच्या वेळी त्यांनी ती करून घेतली.

## संस्कृतनिष्ठ हिंदीचा प्रचार

केसरी-मराठा संस्थेच्या अभ्यासगृहात माझी व स्वातंत्र्यवीरांची दुसरी भेट झाली. हिंदी प्रचार संघाच्या संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी स्वीकारावे, अशी विनंती करण्यासाठी संघाचे प्रधानमंत्री श्री. शं. दा. चितळे आणि संघाचा सहाय्यक मंत्री म्हणून मी तसेच हिं. प्र. संघाचे एक अबोल कार्यकर्ते श्री. म. स. मर्वे असे आम्ही तिघेजण गेलो होतो. त्यांनी संस्थेची माहिती विचारून घेतली तशी त्यांना ही माहिती सावरका वाऊन श्री. न. वि. गोडसे यांनी आधीच दिलेली होती. संघाचे संस्थापक पंडित ग. रा. वैशंपायन हे तर अभिनव भारताचे पूर्वीचे कार्यकर्तेच होते. आमची तिघांचीही

आस्थेने विचारपूस केली. मी रसायनशास्त्राचा अभ्यासक आणि आमच्या बाळकृष्ण रसशाळेत काम करीत असल्याने तेथील उपकरणे अद्ययावत आहेत किंवा कसे हे त्यांनी विचारून घेतले. हि. प्र. संघाच्या अध्यक्षपदी श्री. न. चि. केळकर व उपाध्यक्षपदी दा. वि. गोखले असल्याची माहिती त्यांना दिली. सावरकरांनी संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारले आणि प्रत्यक्ष सभेच्या वेळी टिळक मंदिराच्या पायऱ्या चढताचढता समोरच बसलेल्या तात्यासाहेब केळकरांना ( आधी ठाऊक असूनही ) आपण येथेही आहातच वाटतं ! असं लटक्या आश्चर्यानं विचारलं आणि भाषणाच्या आरंभी हो, टिळकांच्या पश्चात या महापुरुषाने किती महनीय कार्य केले आहे आणि जनतेने त्यांची स्मृती तेवढी पण राखली नाही, असे कळवळून म्हटले तेव्हा तात्यासाहेबांच्या डोळ्यांत पाणी आले. सावरकरांनी आपले भाषण हिंदीमध्ये केले आणि तसे करताना सांगितले " मैंने, जो हिंदी सीखी है, वह पुस्तकोंसे या किसी पाठशाला में नहीं सीखी है । मैंने अंद-मानके कैदियोंसे हिन्दी सीखी है । " यानंतर त्यांनी भाषणातील व्याकरणाच्या चुकां-कडे दुर्लक्ष करण्याची विनंती करून अस्खलित हिंदीत भाषण केले. त्यात संस्कृतनिष्ठ हिंदीचा पुरस्कार आणि हिंदुस्थानी याने उर्दू कशी आहे हे सांगून तिच्या प्रचारकांवर टीकास्त्र सोडले. सभा संपल्यावर जवळच फिटली घेऊन उभ्या असलेल्या मला म्हणाले, " अगदी कढत कढत दोन पेले चहा दे, घसा दुखतो रे बोलल्यावर. " त्यापूर्वी हि. प्र. संघाचे संस्थापक श्री. ग. र. वैशंपायन यांना आपल्या गळ्यातील हार काढून ते घालू लागले तेव्हा संकोचाने वैशंपायन मागे सरकू लागले तेव्हा बळेबळेच तात्या दुसऱ्या तात्यांच्या ( वैशंपायन ) हार घालता घालता म्हणाले, ' पगार बुडायचा नाही ' हे बहुधा मध्यंतरी काही काळ श्री. वैशंपायन सरकारी सेवेत होते, त्याला अनुलक्षून असावे.

## कार्यकर्त्यांना अचूक ओळखण्याची किमया

ही माझी भेट दादरला सावरकर सदनात झाली. त्यांची कन्या प्रभा(त) हिच्या विवाहाची बोलणी चालली असताना श्री. नथूराम गोडसे मला सावरकरांकडे घेऊन गेले, तेव्हा श्री. जयंतराव टिळक यांचे सहाध्यायी श्री. माधवराव चिपळूणकर यांची माहिती मला होती, तेवढी मी त्यांना दिल्याचे पुसट आठवते. परंतु स्पष्टपणे आठवते ती गोष्ट म्हणजे सौ. माईंच्या हातचा चहा मिळाला होता. पुन्हा काही असा योग आला नाही. तात्यारावांशी ओळख करून दिली तेव्हा त्यांनी पूर्वी केव्हा भेटलो होतो एवढे विचारून घेतले. भागानगर निःशस्त्र प्रतिकाराच्यावेळची वार्तापत्रांची आठवण दिल्यावर, ' आता पटली ओळख ' असे म्हणाले.



## अचूक मार्गदर्शन

सावरकरप्रणीत हिंदुत्ववादाचा प्रसार करण्यासाठी हिंदुराष्ट्र, ' दैनिक अग्रणी ' चालू करायचे ठरले. तेव्हा मला वाटते, प्रकाशनाच्या पहिल्याच दिवशी टिळक स्मारक मंदिरात काही हिंदुत्वनिष्ठांना दोन प्रहरी बोलावण्यात आले होते. स्वतः स्वातंत्र्यवीर सावरकर उपस्थित होते. त्यावेळी सर्वांचा परिचय करून देण्यात आला. माझा परिचय झाल्यावर श्री. सावरकर म्हणाले, " तू विज्ञानाचा अभ्यास करतोस ना ? मग आता आपले वर्तमानपत्र निघत आहे. त्यात विज्ञानाच्या वार्ता देत जा. काल मी कोठेतरी वाचले की, प्राणवायूवाचून माणूस काही काळ जगू शकतो. अशा लोकांना गोडी उत्पन्न होईल अशी माहिती देत जा. " प्रत्येकाला त्याच्याकडून योग्य काम कसे होईल हे पाहून प्रत्येकाकडून योग्य काम करून घेण्याची त्यांची हातोटी माझ्या लक्षात आली, तशीच त्यांच्या योगाभ्यासाच्या आवडीविषयीही मला जाणीव झाल्यावाचून राहिली नाही. त्यांची सूचना ही आज्ञाच समजून मी ' अग्रणी ' मध्ये विज्ञान विषयावर लिहू लागलो.

## प्रगाढ पांडित्य

गांधी हत्या अभियोगातून श्री. सावरकर निष्कलंक सुटल्यावर कलकत्यास डॉ. ना. भा. खरे यांच्या अध्यक्षतेने हिंदुमहासभेचे अधिवेशन झाले. ते आटोपल्यावर सावरकर रेल्वेने नागपूरमार्गे मुंबईस जात आहेत अशी बातमी मला कळली त्यावेळी मी नागपुरात आचार्य रघुवीर यांच्या कोषकार्यात सहाय्यक म्हणून काम करीत होतो. रघुवीरांचा ' प्रशासन शब्दकोश ' नुकताच बाहेर पडला होता. तेव्हा माझ्या मनात आले की, हा कोष सावरकरांना भेट केला तर अतिशय उचित होईल आणि त्यांनाही बरे वाटेल. मात्र त्यात थोडी अडचण होती. तसे पाहिले तर डॉ. रघुवीर यांना सावरकरांविषयी अतिशय आदर होता. किंबहुना डॉ. रघुवीर कट्टर हिंदू होते. लाहोरात ते सनातन धर्म कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. आणि क्रांती कार्यातही ते एकेकाळी सहभागी झालेले होते. त्यांच्या नागपूरच्या ' सरस्वती विहारात ' ( International Academy of Indian Culture ) मध्ये एकदोन पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक तरुण कोषकार्यात काम करीत होते. रा. स्व. संघाच्या सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे ज्या तरुणांना सरकारी खात्यातून सेवापदे मिळणे बंद झाले होते, अशा वीस-पंचवीस जणांना त्यांनी आपल्याकडे ठेवून घेतले होते. हे सर्व खरे असले तरी ते स्वतः सावरकरांना आपला हा कोष स्थानकावर जाऊन देणे अशक्य होते. कारण फाळणी झाल्यावर त्यांना मध्यप्रदेशच्या रविशंकर शुक्ल, द्वारकाप्रसाद मिश्र, श्री. मेहता, घनश्यामसिंग गुप्ता आदि मंडळींनी आश्रय दिला होता. आणि वार्षिक तीस सहस्र

रुपयांचे अनुदान दिले होते. म्हणून मी सकाळीच कार्यालय उघडण्यापूर्वी डॉ. रघुवीर यांच्याकडे गेलो. त्यांना ही कल्पना एकीकडे पटलेली दिसली, परंतु दुसरीकडे वर सांगितल्याप्रमाणे परिस्थिती असल्याने कोणा दिवशीस त्यांचे तसे करणे, चालत्या गाड्यास खीळ पडण्याचा संभव वाटल्याने ते पेचात पडले. त्यावर मी कोष स्थानकावर सावरकरांना नेऊन दिला तर कसे ! असे विचारल्यावर रघुवीरांना मी सावरकरांपर्यंत पोचेन की नाही, अशी शंका आली. यावर मी महात्म्यांच्या निःशस्त्र प्रतिकारातील माझ्या अल्पशा कामामुळे आणि इतरही कारणाने त्यांना पूर्वी भेटलो असून ते मला ओळखतील असे सांगितले. तेव्हा सावरकरांना कोष देण्याचे ठरले. आता तो डॉ. रघुवीर स्वतःच्या स्वाक्षरीने देतील, असे मला वाटले होते. परंतु तोच माझ्या वतीने तो सावरकरांना द्यावा असे ठरले. एवढेच नव्हे तर कोषाची प्रत कशासाठी दिली आहे, हे कार्यालयाच्या व्यवस्थापकास न सांगता मी द्यावी, अशीही सूचना रघुवीरांनी केली. मला खरे तर ही सर्व दक्षता अस्थानी आहे असे वाटले. परंतु कोणाच्या स्वाक्षरीने का होईना सावरकरांच्या हातात पुस्तक पडेल यावर समाधान मानून मी दोन प्रहरी नागपूर स्थानकावर गाडी येण्याच्या वेळेस गेलो. सुदैवाने पहिल्या वर्गाच्या ज्या डब्यात सावरकर होते त्यापाशी फारशी गर्दी नव्हती. आणि मी डब्यात शिरलो त्यावेळी मला चंचल लोकमनाचे वर्णन करणारी रॉबर्ट ब्राऊनिंगची 'पेट्रीअट' या कवितेची आठवण झाल्यावाचून राहिली नाही. अभिवादन करून सावरकरांच्या हाती कोषाची प्रत ठेवली. त्यांनी लगेच डोळ्यावरील आरसी (उप नेत्र) कपाळावर सरकवून डोळ्यांच्या अगदी जवळ धरून काही पानांवरून दृष्टिक्षेप टाकला. पाने चाळता चाळता त्यांच्या ध्यानात कोष माझ्या वतीने दिलेला आहे, स्वतः रघुवीरांच्या स्वाक्षरीने नाही, हे आल्यावाचून राहिले नाही, कारण लगेच मला मिश्किलपणे म्हणाले, "हे काय काँग्रेसचे गृहस्थ आहेत की काय ?" यावर मी वस्तुस्थिती सांगितली आणि मनाने नसले तरी आज स्थानाने राज्यसभेवर काँग्रेसच्याच सभासदांनी नियुक्त केले आहे आणि मध्य-प्रदेश सरकारकडून त्यांना कोषकार्यासाठी तसेच नागपूर विद्यापीठासाठी पाठ्यपुस्तके लिहिण्याच्या कामासाठी वार्षिक तीस हजारांचे अनुदान मिळत आहे तेव्हा उगीच माझा कशाला उठावणारा असा विचार करून त्यांनी मला हा कोष देण्यास आपणाकडे पाठविले आहे. कोणत्याही पक्षाच्या विधानाने का होईना आपल्याला अभिप्रेत असलेले भाषाशुद्धीचे आणि संस्कृतनिष्ठ भारतीय शास्त्रीय शब्दावली सिद्ध करण्याचे महत्कार्य डॉ. रघुवीर समर्थपणे पुढे रेटीत आहेत, हे हा कोष चाळताच आपल्या ध्यानी येईल. यावर ते मनापासून हसून म्हणाले, "अरे मी रघुवीरांची योग्यता चांगलीच जाणतो. उगीच थोडी गंमत केली इतकेच. त्यांची प्रकाशने मी चटकन हाताशी असावीत, अशा प्रकारे दूरध्वनीपाशी सुद्धा ठेवलीत आहेत. त्या योगे आपल्या भाषेतील प्रतिशब्द चटकन पाहता येतो."

गाडी थोडाच वेळ थांबणार होती तरी तेवढ्यात सावरकरांनी Corporation



आणि Academy या शब्दांच्या प्रतिशब्दांविषयी आपले मत पुढीलप्रमाणे सांगितले. कार्पोरेशन या अर्थी रघुवीरांनी बहुधा बौद्ध वाङ्मयातून 'निगम' हा शब्द घेतलेला आहे. तो Life Insurance Corporation सारख्या प्रश्नी योग्य असला तरी मुंबईच्या कार्पोरेशनला 'महापालिका' हा महानगरपालिकेपासून बनलेला संक्षेप अधिक योग्य एवढे म्हणून "तुला नाही असे वाटत ?" असा प्रश्नही केला. ॲकॅडमी शब्दाचा कान्समधील ॲकॅडमी पासूनचा इंग्रजी विश्वकोशातील अर्थ सांगून त्यांनी सुचविलेला 'प्रबोधिनी' शब्द कसा योग्य आहे हे समजावले. भारतीय प्रतिशब्द तोंडात चटकन बसेल आणि अर्थ चटकन ध्यानात येईल अशा प्रकारे दिले पाहिजेत, अशी सूचनाही त्यांनी केली. इतक्या विपरीत परिस्थितीतून जावे लागल्यावरही त्यांची स्वतः अंगीकारलेल्या प्रत्येक लहानमोठ्या कार्याविषयी तळमळ तसेच जिज्ञासा, उत्तरदायित्वही जी दिसून आली ती अनुभवून मी थक्क झालो ! असो, रघुवीरांना सर्व वृत्त कार्यालयात परतल्यावर निवेदन केले तेव्हा त्यांनाही समाधान वाटले.

पुढे रघुवीरांचा 'बृहत् पारिभाषिक कोष' प्रसिद्ध झाला. त्यावर केसरीत सविस्तर अभिप्राय पण आला होता, तो वाचून सावरकरांनी अभिनंदन-पत्र श्री. जयंत-राव टिळक यांस आपल्या हाताने लिहून पाठवले. त्यात शेवटी "आचार्य रघुवीरांचा हा कोष भाषाशुद्धी आंदोलनाचा आधारस्तंभच नव्हे तर विजयस्तंभ आहे," असे गौरवपूर्ण उद्‌गार काढले होते.

## मातृभूमीचे नितांत प्रेम

१९५२ मध्ये मी अमेरिकेत एक वर्ष राहून परत आलो. तेव्हा माझे मेहुणे श्री. पु. गोखले यांनी मला सावरकर यांच्याकडे जाऊन त्यांचे मन अमेरिकेस जाण्या-विषयी वळवावे असे सुचवले. भेटीची व्यवस्था त्यांनी आधीच करून ठेवली होती. त्यांना वाटत होते की, सावरकर जर अमेरिकेस जाऊन स्वामी विवेकानंद यांच्या सारखी हिंदुत्वावर भाषणे देतील तर लाभ होईल. बहुधा सावरकरांना श्री. पु.च्या या बेताचा सुगावा आधी लागला असावा. त्यांनी मला तो विषयच काढू दिला नाही. भाषाशुद्धी इत्यादी विषयावर ते बोलत राहिले. त्यांच्या भाषाशुद्धीसंबंधीच्या लेखांचे संकलन करून त्यात त्यांनी नेहमी सुचविलेले प्रतिशब्द यावेत, अशी योजना झाली. परंतु प्रत्यक्ष प्रकाशन काही झाले नाही. त्यांच्या व्यवस्थितपणाचा मला अनुभव आला तो असा की, मी त्यांच्याकडे दिलेली कात्रणे त्यांनी नंतर मला पुण्यास स्नेह्यांकरवी पोचती केली.

## विज्ञानाचे प्रेम

एकदा मला मुंबईस कामानिमित्त सपत्नीक जाण्याचा योग आला. तेव्हा मनात

आले की, सौ. प्रभाकिनीस सावरकरांच्या दर्शनास घेऊन यावे आणि त्यांचा आशीर्वाद घ्यावा. आधी वेळ ठरवलेली नव्हती त्यामुळे सावरकर सदनात आम्ही गेलो तेव्हा "तात्या आज भेटणार नाहीत." असे कळले. मी माझे 'विज्ञान विहार' हे पुस्तक सावरकरांकडे सादर भेट म्हणून देण्यासाठी ठेवून दिले.

नंतरच्या भेटीत सावरकरांनी मला आपणहून त्यांची भेट मागील खेपेला होऊ शकली नाही, याविषयी खेद व्यक्त केला आणि म्हणाले, "तुझ्या सवे तुझ्या पत्नीही होत्या असे कळले. बाहेरच्यांचे येणे वारंवार होत नाही, असे मी विश्वासला बोललो. तुझे पुस्तक मला मिळाले. विषय माझा नसला तरी त्यातील रस मी थोडाबहुत घेतला."

## सावरकरांच्या आशीर्वादातील दैवी बल

या भेटीच्या वेळी त्यांनी मला म्हटले की, "आता तुझा परिचय मला नीट करून दे. आपण पूर्वी भेटल्याचे मला आठवते, परंतु 'लिमये' आडनाव घेताच माझ्या डोळ्यांपुढे चार-पाच लिमये येतात. एक दत्तोपंत लिमये. लो. टिळकांच्या वेळी 'मराठा' पत्राचे संपादक होते. ते तू नव्हेस. दुसरे आमचे काशीनाथपंत लिमये. रा. स्व. संघाचे प्रांत संघचालक होते तेही तू नाहीस. तिसरा उरला बाळाराव लिमये, तोही नाहीस तू. मग आता सांग, की उरलेल्या लिमयांमधील नेमका कोण तू?" यावर मी भागानगर निःशस्त्र प्रतिकाराच्या वेळची वार्तापत्र प्रकाशनासंबंधीची आठवण करून दिली तेव्हा ते उद्गारले, "आता पटली ओळख. मागील खेपेस पंडितजी होते नव्हे!" यानंतर मी संकल्पित हिंदी विज्ञानछंद मासिकाविषयी काही सांगणार एवढ्यात ते मला म्हणाले, "हे पहा, जरा थांब. मला आधी सांग, तू सध्या काय करतोस? तुला काय मिळते?" यावर थोडे थांबून त्यांनी लगेच पुस्ती जोडली, "म्हणजे कोणाला त्याची प्राप्ती किती आहे हे विचारणे खरे म्हणजे सभ्यपणाला सोडून आहे. परंतु खरं सांगू का तुला? माझ्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक माणसाची होळी झाली म्हणून तुला विचारतो, की तुला काय मिळते?" यावर मी माझ्या प्राप्तीची त्यांना कल्पना दिली. नंतर त्यांनी मला मुले किती आहेत, असे आस्थेने विचारले. त्यावर मी म्हटले, "तात्याराव, मला चार मुले आहेत, पण...." मध्येच अडवून मला त्यांनी विचारले, "पण काय रे? अरे, बुद्धिमान माणसांना मुले हवीत." मी उत्तरलो, "आपण मला बुद्धिमान म्हटल्ये याबद्दल अभिमान वाटतो. पण खरेच सांगतो, सध्याच्या महागाईत भागत नाही. त्यांच्या भावी शिक्षणाची काळजी वाटते." हे ऐकताच त्यांनी लगेच प्रतिप्रश्न केला, "म्हणजे तुझ्या मुलांसाठी तू मिळवतोस? अरे, भ्रम आहे तुझा. मुले घेवून आणतात." असे म्हणून त्यांनी उजव्या हाताची बोटे कपाळावर लावली. हे ऐकताच मी उठून जाऊ लागलो. (खरे म्हणजे तसा बहाणा केला, कारण माझे खरे काम उरले होते) तेव्हा समजाविण्याच्या स्वरात ते



म्हणाले, "अरे रागावू नकोस. बस, खाली बस," मी त्यांना म्हणालो, "तुमच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मी 'सह्याद्री' मासिकात 'विज्ञानवादी वीर सावरकर' असा लेख लिहिला. आगरकरांनंतर आपल्या इतका बुद्धिवादी समाजसुधारक झाला नाही असे आम्ही मानतो आणि आता आपणच कपाळाला हात लावता? हे कसे?" माझे म्हणणे ऐकल्यावर अगदी तळमळीने ते म्हणाले, "अरे मी म्हणालो तेच खरे आहे. जीवनात केवळ बुद्धिवाद नाही आणि केवळ दैववादी नाही. There is nothing absolute in the world. माणसाचे जीवन हे संमिश्र आहे. त्यात बुद्धिवादाइतकाच प्रारब्धवादाही भाग आहे. म्हणून म्हणतो, की मुले आपल्या दैवाने पैसे आणतात. आपण निमित्तमात्र असतो. यासाठीच तुला म्हणतो की, तुला चार मुले आहेत यात काय बिघडले? बुद्धिमान माणसांना मुले नसली तर या देशात काय साळ्यांची आणि कोष्ट्यांची गर्दी करायची आहे? म्हणूनच मी पुन्हा सांगतो, तुला काळजी कशाला? मुले आपली आपण पैसे आणतात. तू त्यांच्यासाठी मिळवतोस हा तुझा भ्रम आहे, हेच खरे!

वीर सावरकरांचे हे उद्गार किती खरे आहेत याची प्रचीती मला पदोपदी आली. माझी पहिली मुलगी सुनंदा मॅट्रीकला होती तेव्हा दीड वर्ष मी बेकार होतो. जर्मन शास्त्रीय वाङ्मयाची भाषांतरे करून मला सरासरी दीडशे रुपये मिळत. ती मॅट्रीक झाली तेव्हा मला दिल्लीला INSDOC मध्ये ४३५ रुपये मासिक मिळू लागले. पुढे चि. कुंदा व चि. हेमंत मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण करण्याआधी किंवा नंतर माझी पदोन्नती होत गेली. आणि वेतनातही वाढ झाली. शेवटचा चि. संजय हायर सेकंडरी उत्तीर्ण झाला तेव्हा मला वेतनवाढ मिळाली नाही. परंतु त्याला मासिक किमान २५० ते ३५० रुपयांची विज्ञानप्रज्ञाची शिष्यवृत्ती सहा वर्षांसाठी मिळाली. प्रत्येक वेळी आम्हाला सावरकरांच्या आशीर्वादात्मक उद्गारांची कृतज्ञतेने आठवण येई!

## सावरकरांचे अचूक राजकीय आडाखे

सावरकरांना बुद्धिबळाचा नाद होता किंवा कसे, हे मला माहीत नाही. परंतु राजकीय पटावर सर्वांच्या चाली त्यांना चांगल्या अवगत होत्या असे अनेक उदाहरणांवरून दिसते. उदा. मुंबईला हिंदी साहित्य संमेलनाचे अधिवेशन पं. राहुल सांकृत्यायन यांच्या अध्यक्षतेखाली साजरे झाल्यावर पं. राहुलजींसह इतर अनेक हिंदी संमेलनातील नेते सावरकर सदनात गेले. त्यावेळी घटना समितीपुढे राष्ट्रभाषेचा प्रश्न विचाराधीन होता. त्यासंबंधी सावरकरांचा पाठिंबा 'हिंदी' भाषेस एका पत्रकाद्वारे यावा, अशी विनंती केली. यावर सावरकरांनी विचारले की, जर आपल्या म्हणण्याप्रमाणे घटना समितीतील अधिकांश सदस्यांचा पाठिंबा हिंदीसच आहे, तर मग माझ्यासारख्या बाहेरील माणसाच्या पाठिंब्याची निकड आपणास का भासावी? यानंतर थोडे थांबून

त्यांनी निस्कीलपणे विचारले, "का ! तसा ठराव झाल्यास कोणी उपोषण करण्याचा धाक घातला आहे की काय ? तसे असल्यास एका महात्म्याने हिंदी विरोधी उपोषण केल्यास दुसऱ्या बाजूस दुसऱ्या एका महात्म्यास उपोषणास बसवावे, म्हणजे त्यास परस्पर काटशह बसेल !"

ही गोष्ट म. गांधींच्या उपोषणापूर्वी सुमारे सहा महिन्यांची आहे. ते कसेही असले तरी कोणाची पावले कशी पडतील यासंबंधी त्यांचे आडाखे अगदी अचूक असत.

## सावरकरांची मुत्सद्देगिरी

आर्य समाजाने हैद्राबादमध्ये चालविलेल्या सत्याग्रहाचे सूत्रचालन आंतरराष्ट्रीय आर्यन लीग करीत असे. त्यासाठी एका नेत्याकडे सत्याग्रहाचे सर्वाधिकार दिलेले असत. या सर्वाधिकाऱ्यास अटक झाली की दुसरा सर्वाधिकारी आर्यन लीग नेमीत असे. अशा प्रकारे नेमले गेलेले श्री. नारायणदास, श्री. चांदकिरण शारदा, प्रभृती चार सर्वाधिकारी निजामाच्या अटकेत पडले. आर्य समाजामध्ये दोन तट होते. एक गट हिंदुसभेला अनुकूल असून दुसरा गट काँग्रेस पक्षाला अनुकूल होता. म्हणूनच सावरकरांनी दूरदृष्टीने आपली हिंदुसभेच्या निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ आर्यसमाजाच्या सहकार्याने परंतु वेगळी स्वतंत्र अशी ठेवली. आर्यसमाजाने सत्याग्रहासाठी धाडलेल्या स्वयंसेवकांची संख्या हिंदुसभेच्या मानाने बरीच मोठी होती. आता पहिले जे तीन चार सर्वाधिकारी अटकेत पडले, त्यांचा कल हिंदुसभेकडे होता. यापुढे मात्र काँग्रेसला अनुकूल असलेल्या आर्यसमाजी नेत्यांकडे सर्वाधिकार सोपविले जाण्याचा संभव अधिक होता. यामुळे असा तूट काढण्यात आला की, सत्याग्रहासंबंधी अंतिम निर्णय करण्याचा अधिकार इंटरनॅशनल आर्यन लीगकडे जो होता तो इतःपर नेमल्या जाणाऱ्या सर्वाधिकाऱ्यास द्यावा म्हणजे त्याला अविलंबाने सत्याग्रहाचे सूत्रचालन करता येऊन तशीच परिस्थिती उद्भवल्यास सत्याग्रह प्रसंगी बंदही करता येईल. यावर साळसूद धोरणामधील खरा डाव असा होता की, म. प्रदेश विधान सभेचे अध्यक्ष श्री. घनश्यामसिंग गुप्त हे म. गांधींच्या धोरणाने चालणारे असल्याने त्यांच्याकडे सत्याग्रहासंबंधी सर्वाधिकार देऊन तो बंद करावयाचा तसे झाले की सावरकरांच्या नेतृत्वाने चालणारी हिंदुसभा तुलनेने बळ कमी असल्याने तोंडघशी पडेल आणि तिलाही आपली चळवळ थांबवावी लागेल.

आता सर्वाधिकाऱ्याकडे सत्याग्रह चालू ठेवायचा किंवा बंद करावयाचा याचे अधिकार सुपूर्द करण्यासंबंधी विचार करण्यासाठी सोलापूर येथे इंटरनॅशनल आर्यन-लीगची सभा घेण्याचे ठरले. सोलापूर हे सत्याग्रह चालविण्याचे आर्यसमाजाचे महत्त्वाचे केंद्र होते. या कारस्थानची कुणकुण सावरकरांना अर्थातच लागली. त्यांनी हिंदुसभेस अनुकूल असलेल्या आर्यसमाजी मंडळींना असे सुचविले की, या महत्त्वाच्या नियोजित



बैठकीचे अध्यक्षस्थान लोकनायक श्री. बापूजी अणे यांना देण्यात यावे; कारण पूर्वी काँग्रेसच्या १९३० मधील सत्याग्रहाच्या आंदोलनाचे ते एक सर्वाधिकारी होते. तेव्हा त्यांच्या नावास म. गांधींना अनुकूल असलेले आर्यसमाजी सदस्य विरोध करणार नाहीत. त्याप्रमाणे सावरकरांनी बापूजींकडे अशी विनंती त्यांना करण्यात आल्यास ती मान्य करावी, असा निरोप धाडला.

अशा प्रकारे सोलापूर येथे श्री. बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली आर्य समाजाची ही महत्त्वाची बैठक भरली. या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी सावरकरांनाही बोलावण्यात आले. अपेक्षेप्रमाणे या सभेपुढे सत्याग्रहासंबंधी अंतिम निर्णय करण्याचे अधिकार आर्य लीगने सर्वाधिकाऱ्याकडे सोयीसाठी सुपूर्द करावेत, असा ठराव बहुधा श्री. घनश्यामसिंग गुप्ता यांनी मांडला. तो संमत होणार असा रंग दिसू लागल्यावर अशा निर्णयास विरोधी असलेल्या आर्यसमाजी सदस्यांनी श्री. सावरकर हे वेगळी असली तरी निजामविरोधी चळवळ चालवीत असल्याने त्यांनीही आपले विचार व्यक्त करावेत, अशी विनंती केली. सावरकरांनी वरपांगी असे दर्शविले की, ते आर्यसमाजाचे सभासद नसल्याने केवळ प्रेक्षक म्हणून उपस्थित राहिले होते; परंतु अधिक आग्रह झाल्यावर ते बोलावयास उठले आणि त्यांनी बैठकीचा रंग पालटून टाकला. त्यांच्या भाषणाचा वृत्तांत त्यावेळी मुंबईहून निघणाऱ्या 'वंदेमातरम्' ( संपादक गो. गो. अधिकारी ) या वृत्तपत्रात काय तो आला होता. त्याचा आशय असा–' आर्य समाजाने आपल्या चळवळीसंबंधी काय निर्णय करावयाचा हे त्यांचे त्यांनी ठरवावे. मी आर्य समाजाचा सभासद नसल्याने माझ्या मताचा विचार करण्याचे कारणच नाही. हिंदुसभेपुरते बोलावयाचे झाले तर ज्या उद्देशाने निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ तिने हाती घेतली आहे, तो उद्देश साध्य होईपर्यंत आमची चळवळ चालूच राहील. आर्य समाजाची जर साथ मिळाली तर आमची बळकट होईल यात शंका नाही. परंतु उद्या आर्यसमाजाने आपला सत्याग्रह मागे घेतला तर कदाचित आमची फसगत होईलही. परंतु मी एवढेच म्हणेन की, आर्य समाजाला एका वेळी एकाच महात्म्याची पूजा बांधता येईल. त्यांनी आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद यांच्या तत्त्वाप्रमाणे न चालता दुसऱ्या कोणा महात्म्याचे अनुसरण केले तर जग असेच म्हणेल की, जी हिंदुसभा स्वामी दयानंदांचा टिळा लावीत नाही, ती दयानंदांच्या तत्त्वांशी एकनिष्ठ राहिली आणि दयानंदांचे अनुयायी म्हणविणारे आर्य समाजी मात्र त्यांच्याशी बेइमान झाले."

सावरकरांचे हे भाषण त्यांच्या वक्तृत्वाचे महत्त्वाचे एक उदाहरण म्हणता येईल. सांगावयास नकोच की, आर्य समाजाने सत्याग्रहासंबंधी आणि निर्णय करण्याची सत्ता पूर्वीप्रमाणे इंटरनॅशनल आर्यन लीगकडेच रहावी; सत्याग्रहाच्या तत्कालीन सर्वाधिकाऱ्याकडे सोपवू नये, असा निर्णय केला.

## सावरकरांचे चपखल उत्तर

आर्य समाजाने चालविलेल्या हैद्राबाद सत्याग्रहाच्या आणि सावरकरांच्या प्रेरणेने चालू असलेल्या भागानगर निःशस्त्र प्रतिकार चळवळीला जसजसे उधाण येऊ लागले तसतशी निजामाच्या जुलमी आणि अन्यायी प्रशासनाची झोप उडू लागली, परिणामतः हैद्राबाद संस्थानचे त्यावेळचे दिवाण सर अकबर हैदरी यांनी अनेक मार्गांनी या चळवळीस बदनाम करण्याचा आणि भारतीय जनतेची दिशाभूल करण्याचा घाट घातला. त्याचाच एक भाग म्हणजे संस्थानचे निवृत्त हिंदू दिवाण महाराजा किशनप्रसाद यांचा मुंबईच्या Times of India या वर्तमानपत्रात लेख प्रसिद्ध झाला. त्यात हैद्राबाद संस्थानच्या कारभाराची भलावण आणि प्रजा सुखी असल्याची ग्वाही दिलेली होती. संस्थानबाहेरच्या लोकांनी उगाचच हे रान निजामाविरुद्ध उठविलेले आहे, असा त्यांचा एकंदर सूर होता. त्याच अंकात टाइम्सकारांनी अग्रलेख लिहून गरळ ओकलेले होते. एका अर्थाने या सर्व गोष्टी चळवळीच्या परिणामकारकतेच्या पावतीसारख्याच होत्या. अग्रलेखात एक विधान असे होते की, या सत्याग्रहात दहा-बारा वर्षांची अज्ञान मुले धाडून या चळवळीचे पाठीराखे पोरखेळ करीत आहेत.

ते दोन्ही लेख एकाच अंकात एकाच पानावर असल्याने मी त्यांचा समाचार श्री. गजाननराव केतकर यांच्या संपादकत्वाने निघणाऱ्या 'मराठा' या केसरी-मराठा संस्थेने चालविलेल्या इंग्रजी साप्ताहिकात 'भाडोत्री आणि देशद्रोही' ( Hiriling and Traitors ) अशा सुलभ मथळ्याखाली दिलेल्या लेखात ( समाचार ) घेतला होता. त्यात टाईम्समधील संपादकीयातील वरील आरोपांचे खंडन नकली पद्धतीने केले होते. ते असे की, सत्याग्रहासाठी लहान मुलांना अजिबात धाडण्यात येत नाही. प्रत्येक स्वयंसेवकाची पूर्ण चौकशी करून तो सज्ञान असेल तरच त्याला या प्रतिकारात भाग घेऊ दिले जाते. इ. इ. माझ्यासारख्या सामान्य युवक आणि सावरकर यांच्यासारखा नेता यांच्यातील अंतर मला थोड्याच वेळात मिळाले.

त्याचे असे झाले की, शनिवारवाड्यासमोरच्या पटांगणात भरलेल्या सभेत सावरकरांनी टाईम्समधील लेखाचा खरपूस समाचार घेतला. प्रतिपक्षी आपल्या विरुद्ध जे आरोप करतो किंवा आपल्याला जे दूषण लावतो ते भूषण म्हणून कसे मिरवावे व प्रतिपक्षावर कसे उलटवावेत हे त्यांनी उत्तराने दाखवून दिले. माझ्याप्रमाणे छोटी मुले सत्याग्रहात जातात हा आरोप खोटा आहे, असे न म्हणता सावरकर गरजले, "टाईम्सकार म्हणतात की, आमच्या या प्रतिकाराच्या चळवळीत दहा आणि बारा वर्षांची मुले, पोरे-सोरे आम्ही धाडतो. मला माहिती नाही, परंतु मागे बसलेल्या या गजाननरावांस ( केतकरांस ) निश्चितच माहिती असेल, यातील खरे-खोटे. परंतु जर खरोखरीच अशी लहान मुले झुंजायला पुढे येत असतील तर माझे अंतःकरण आज भरून येत आहे. इतकी वर्षे पारतंत्र्यात खितपल्यानंतर हिंदुसमाज जिवंत आहे याचा



प्रचीती या बालकांच्या शौर्यामुळे येत आहे. अरे, अभिमन्यू चक्रव्यूह भेदायला गेला तेव्हा किती वर्षांचा होता ? शिवाजीने तोरणा हस्तगत केला तेव्हा त्याचे वय काय होते ? आणि विश्वासराव पानिपतावर पडला तेव्हा तो पोर केवढा होता ? हिंदूंची ही परंपरा आजची ही शूर मुले पुढे चालवीत आहेत, याचा मला अभिमान वाटतो. अशी मुले जर इंग्लंडात निघती तर हत्तीवरून की साखर वाटली असती त्यांनी. पण दुर्दैव त्या टाईम्सकारांचे आणि इंग्लंडचे, की मिरवणुकीने हत्तीवरून साखर वाटायला त्यांच्याकडे हत्तीसुद्धा नाहीत."

सावरकरांचे हे भाषण झालेल्याला आज ५० वर्षे झालेली आहेत. त्यावेळच्या वृत्तपत्रांतून त्याचा किती भाग आला याची कल्पना नाही. परंतु प्रस्तुत लेखकाच्या कानात मात्र ही आवेशपूर्ण वीरवाणी आजही घुमत आहे. यापरती आणखी लिहिणे, स्तुती करणे म्हणजे सूर्याला ओवाळल्याप्रमाणे होईल. कुशाग्र बुद्धी, परंपरेचा ज्वलंत अभिमान, आवेश आणि वाक्पटुता यांचा संगम सावरकरांच्या उत्तरात आढळतो; म्हणूनच सर्वसामान्यांना प्रेरणा देण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या अंगी होते.

## सावरकरांचा व्यवहारी आदेश

फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावरील ज्ञानेश्वर पादुका चौकाच्या पुढे श्रीमंत रामनारायण यांचा सुप्रसिद्ध वाडा आहे ( होता ). तेथे भरलेल्या एका स्वयंसेवक शिबिरात रात्रीच्या वेळी आश्रमांतातील आणि इतर नागरिकांची चर्चा-सभा झाली. श्री. सावरकर यांनी या प्रसंगाने कुंडलिनी कृपाणांकित ध्वजासंबंधी माहिती देता देता त्यांच्या योगाभ्यासाची चुणूक दाखवली. नंतर प्रश्नोत्तरे झाली. उपस्थितांतील सौ. शिंदे ( प्रा. शिंदे यांची पत्नी) यांनी असा प्रश्न केला की, हिंदुसभेत स्त्रियांचे स्थान कोणते ? यावर सावरकरांनी चटकन उत्तर दिले, "स्त्रियांचे स्थान ? स्त्रियांचे ! " असे म्हणून त्यांनी त्यांच्या विशिष्ट पद्धतीने हात हसत हलविले. त्यावर अधिक स्पष्टीकरण करताना ते म्हणाले, "स्त्रियांचे निसर्गदत्त प्रमुख कर्तव्य गृहिणी आणि अपत्य-संगोपन आहे. ते सांभाळून त्यांनी स्वतःला पेलेल आणि सवड मिळेल तसे सार्वजनिक कार्य करावे. साक्षरता-प्रसार, अस्पृश्यता निवारण, शुश्रूषा, इत्यादी कामे त्यांनी मनात आणले तर कितीतरी वाव आहे. उच्च शिक्षण घेऊन सेवापदेसुद्धा घ्यावीत पण एक लक्षात ठेवावे की, शिकेन, नर्स होईन, दुसऱ्यांची मुले सांभाळीन, परंतु स्वतःला मूल होऊ देणार नाही, अशी वृत्ती ठेवू नये. राष्ट्राला सुदृढ, कार्यक्षम, युवकांची किती निकड असते आणि ती जर पुरी झाली नाही तर काय होते हे दुसऱ्या महायुद्धात फ्रान्सचा पाडाव झाला तेव्हा मार्शल पेतां यांनी जी किंकाळी फोडली तिच्यावरून स्पष्ट होते. Too few soldiers, too Few guns, and too few friends. ( सैनिक, तोफा, बंदुका आणि मित्र यांचा तुटवडा ) तेव्हा

आनुवंशिकतेचे जे सिद्धांत आहेत त्यांचे तारतम्याने पालन करून मुलांना जन्म देऊन त्यांना वाढविणे, शिक्षण देणे, ही कामे महत्त्वाची आहेत, ती टाळू नयेत- सार्वजनिक कामात भाग घेण्यासाठी. कारण नवीन पिढी मागच्या पिढीपेक्षा कार्यक्षम नागरिक निर्माण करणे हेही राष्ट्रीय कर्तव्य आहे. स्त्रियांनी या आपल्या निसर्गदत्त कार्याची खंत बाळगण्याचे काहीच कारण नाही. "

## सावरकरांची विशाल बुद्धिमत्ता

कर्णावतीच्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनानंतर सावरकर दक्षिणेत गेले. तेथे गेल्यावर मदुराई किंवा मद्रासच्या असोशिएटेड प्रेसच्या वार्ताहराने त्यांची भेट घेऊन काही प्रश्न विचारले. त्यांतील एक असा होता की, " दक्षिणेत हिंदुमुसलमानांचा प्रश्न नसल्याने तिकडे हिंदुसभेची आवश्यकता का ? "

यावर सावरकर उत्तरले, " म्हणजे जेथे हिंदु-मुसलमानांचा प्रश्न आहे तेथे हिंदुसभा असणे आवश्यक आहे, असे आपल्या प्रश्नातून सूचित होते. तेव्हा हिंदुसभा अशा ठिकाणी असायला हवी हे आपणास मान्य आहे ! आता प्रश्नाच्या उरलेल्या अर्ध्या भागाचे उत्तर असे की: मोपल्यांचे बंड दक्षिणेतच झाले होते ना ? म्हणजे दक्षिणेतही हा प्रश्न आहेच ! आणि समजा, घटकाभर वादासाठी असे गृहीत धरले की, इकडे हा प्रश्न नाही; तरीही मला असे सांगा की, आपल्या पायाला काटा टोचला तर त्याची कळ डोक्यापर्यंत पोचते ना ? आपण अखंड भारताचा विचार करतो. तेव्हा हा देश अविभाज्य आहे, असल्याने मानवी शरीराप्रमाणेच एका अवयवाचे दुःख हे सर्वच शरीराचे दुःख मानले पाहिजे. उद्या हिमालयाला जर आग लागली तर दक्षिण महासागराने ती विझवायला धाव घेतली पाहिजे. या उत्तरात सावरकरांच्या राष्ट्रीयत्वाविषयीच्या कल्पना सुस्पष्टपणे प्रकट होतात हे तर खरेच, पण उत्तरातील उत्तुंग दृष्टांतात त्यांच्या काव्य प्रतीकावादी आविष्कार आहे. सामान्य पुढाऱ्यास किंवा विधिज्ञास असा युक्तिवाद सुचला नसता.

## सावरकरांचा पाताळयंत्रीपणा

१९२१ मध्ये फर्ग्युसन कॉलेजच्या नुकत्याच बांधलेल्या वाई जेरबाई वाडिया ग्रंथालयामध्ये श्री. वासुदेव बळवंत गोगटे या विद्यार्थ्याने त्यावेळचे मुंबई-प्रांताचे गव्हर्नर श्री. हॉटसन यांच्यावर गोळी झाडण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. तेव्हा सावरकर रत्नागिरीत स्थानबद्ध होते. त्यांना रत्नागिरीचे जिल्हाधिकारी गिलीगन यांनी बोलावून घेतले व विचारले की, हॉटसन या प्रसंगातून सुखरूप वाचले यासाठी त्यांच्याकडे अभिनंदनपर संदेश सावरकरांनी धाडला काय ? त्यावर सावरकर म्हणाले,



" मी काही तसा संदेश अजून धाडलेला नाही. आपण सांगत असाल तर धाडतो. " श्री गिलीगन यांनी, असा संदेश आतापर्यंत हॉटसन यांना सावरकरांनी का धाडला नाही, असे दटावणीच्या स्वरात म्हटले. सावरकरांनी त्यांना शांतपणे वस्तुस्थिती सांगितली ती अशी, " मला रत्नागिरीला स्थानबद्ध करताना सरकारने माझ्यावर असा निर्बंध घातलेला आहे की, मी कोणत्याही स्वरूपाच्या राजकीय कामात भाग घेणार नाही. त्यामुळे मी जर गव्हर्नर हॉटसन यांस ते या गोळीबारातून सुखरूप निभावले म्हणून अभिनंदनाची तार केली असती तर माझे तसे करणे राजकीय स्वरूपाचे झाले असते व मला तर कोणतेही राजकीय काम करण्यास सरकारने बंदी घातली आहे. "

सावरकर यांच्या या समर्थनपर उत्तराने अर्थातच कलेक्टर गिलीगन यांचे समाधान होणे अशक्य होते. ते सावरकरांना एवढेच म्हणाले, " सावरकर, आपण अतिशय बुद्धिमान आहात यात संशय नाही. परंतु कृपा करून सरकारला फसविण्याचा प्रयत्न आपण न करणेच बरे. कारण सरकारपाशी या प्रकरणाची सर्व माहिती आहे.

* *

श्री. गजानन वि. दामले
पुणे.

१८

## सावरकरांची असामान्य कार्यक्षमता

स्वा. सावरकर हे हिंदुसभेचे अध्यक्ष म्हणून दिल्लीस प्रथमच येत होते. स्वातंत्र्यवीर दिल्लीस येण्याआधी आठच दिवस अगोदर मुस्लिम लीगचे अध्यक्ष बॅ. जीना दिल्लीस आले असता त्यांची मिरवणूक मुस्लिम लीगच्या वतीने काढण्यात आली होती. स्वातंत्र्यवीर हिंदुमहासभेचे अध्यक्ष म्हणून दिल्लीस आहेत, त्यांची मिरवणूक जीनांच्या दसपट भव्य निघाली पाहिजे म्हणून हिंदुमहासभेचे कार्यकर्ते आणि पुढारी यांनी तर प्रयत्न केलाच, पण स्वतः डॉ. जयकर आणि लोकनायक अणे ( हे त्यावेळी दिल्लीत होते ) प्रभृती हिंदुसभेत नसलेल्या काही पुढाऱ्यांनीही हिंदुमहासभेच्या अध्यक्षांची मिरवणूक मुस्लिम लीगच्या अध्यक्षांपेक्षा दसपट भव्य निघाली पाहिजे, असा प्रयत्न केला होता.

स्वा. वीर सावरकरांची गाडी जुन्या दिल्ली स्थानकावर ६-२-३८ सकाळी ८ वाजता आली त्यावेळी स्थानकावर जमलेल्या प्रचंड जनसमुदायाने स्वा. वीर सावरकर की जय हो ! हिंदुसभा की जय हो ! या घोषणांनी स्थानक दणाणून सोडले.

स्थानकावरून बाहेर पडण्यासच सावरकरांना जवळ जवळ पाऊण तास लागला. स्वा. वीरांच्या स्वागतासाठी लोकनायक अणे स्थानकावर जाण्यासाठी आले होते पण जमलेल्या प्रचंड गर्दीतून त्यांना स्थानकापर्यंत जाण्यासाठी वाट मिळाली नाही. स्वा. वीर बाहेर येताच शृंगारलेल्या बग्गीतून मिरवणुकीस आरंभ सकाळी ९ वाजता झाला. दिल्लीच्या प्रमुख रस्त्यांवरून मिरवणूक जात असताना वाटेत शेकडो हार स्वातंत्र्यवीरांना घालण्यात आले. गुलाबपाणी सारखे शिंपडण्यात येत होते. गुलाबपाण्याने नि हारांनी त्यांचे कपडे ओलेचिंब झाले होते. ' स्वा. वीर सावरकर की जय हो ', ' हिंदुसभा की जय ' असा जयघोष सतत चालू होता. रस्तोरस्ती नि आजूबाजूच्या घरांतून आणि घरांच्या छपरांवरून तिकडे पहावे तिकडे जनसमुदायाचा सागरच दिसत होता. मिरवणूक ज्या ज्या रस्त्याने जाई तेथील ट्रॅफिक बंद असे. अशा उत्साहात सकाळी ९ वाजता निघालेली मिरवणूक दुपारी ३ वाजता संपली. मिरवणूकसमाप्ती-पूर्वी सावरकरांनी जमलेल्या जनसमुदायापुढे चार शब्द बोलल्यावर त्यांना मोटारीने लाला नारायण दत्तांच्या कोठीवर नेण्यात आले. मोटारीतून कसेबसे बैठकीच्या जागेत गेले. आणि तेथे असलेल्या कोचावर अंगातील भिजलेल्या कपड्यांसह आडवे झाले. त्यांना ग्लानी आलेली दिसली. म्हणून लगेच डॉक्टरांना फोन करून बोलावण्यात आले. ग्लानी आलेल्या अवस्थेत डॉक्टरांनी त्यांना तपासले आणि भिण्याचे कारण नाही, अतीव थकव्यामुळे ग्लानी आली आहे, असे सांगितले. आणि डॉक्टरांनी औषध पाठवून दिले. तरी पण आम्ही सर्वजण चिंतातूर होऊन गेलो होतो. ग्लानी आलेल्या अवस्थेत भिजलेल्या कपड्यांसह सावरकर तीन तास त्या कोचावर पडून राहिले होते. सायंकाळी सहाच्या सुमारास ग्लानी थोडीशी कमी झाली. मला त्यांनी वाजले किती म्हणून विचारले तेव्हा मी सहा वाजले म्हणून सांगितले. लगेच त्यांनी सत्कार सभा केव्हा आहे असे विचारले तेव्हा मी सांगितले, सात वाजता आहे. मग त्यांनी मला चहाची व्यवस्था करावयास सांगितले व स्नानासाठी गरम पाणी हवे म्हणून सांगितले. तेव्हा चिंतातूर होऊन स्वस्थ बसलेल्या आम्हास थोडेसे हायसे वाटले. मग त्यांना मी डॉक्टरांनी पाठविलेल्या उत्तेजक औषधाचा भाग दिला आणि चहाची पण व्यवस्था केली.

आदल्या रात्री गाडीतच स्वातंत्र्यवीरांना उलट्या, जुलाब झाले होते, त्यामुळे सकाळी त्यांनी चहाही घेतला नाही आणि त्यातच सहा तास मिरवणुकीचा कार्यक्रम, त्यामुळे स्वा. वीर सावरकरांना फारच थकवा आला. मिरवणुकीचा कार्यक्रम त्यांनी आपल्या मनोबलावर कसातरी पार पाडला.

कोणत्याही पुढाऱ्याची एवढी भव्य मोठी मिरवणूक निघालेली दिल्लीकरांनी पाहिली नव्हती, अशी वर्णने दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली. जीनांच्या दसपट भव्य मिरवणूक सावरकरांची निघाली, असेच लोक म्हणत होते.

उत्तेजक औषधाचा एक भाग आणि चहा घेतल्यावर थोड्या वेळाने स्वा. वीरांनी स्नान केले आणि सायंकाळी सातला असलेल्या सत्कारसभेस जाण्यासाठी कपडे घालून



सिद्ध झाले. सकाळपासून जेवण नाही म्हणून सभेस जाण्यापूर्वी त्यांच्यासाठी चहा व बिस्किटे यांची व्यवस्था केली. त्याप्रमाणे त्यांनी २-३ बिस्किटे आणि थोडा चहा घेतला व उत्तेजक औषधाचा एक भाग पण घेतला.

सायंकाळी ७ वाजता ठीक सभेच्या वेळी जेव्हा स्वा. वीर सभास्थानी आले तेव्हा सभेस जमलेल्या प्रचंड समुदायाने त्यांच्या नावाचा व हिंदुसभेचा जयघोष स्वातंत्र्य वीर व्यासपीठावर जाऊन स्थानापन्न होईपर्यंत सुमारे पंधरा मिनिटेपर्यंत चालू ठेवला होता. सावरकर प्रथमच दिल्लीला आलेले. त्या दिवशीच्या दिल्लीच्या सकाळच्या वर्तमान-पत्रांतून त्यांच्या पूर्वायुष्यातील चित्तथरारक प्रसंगांची वर्णने प्रसिद्ध झालेली. सकाळी निघालेली प्रचंड अशी भव्य मिरवणूक यामुळे सभास्थानी त्यांचे भाषण ऐकावयास अक्षरशः जनसागरच लोटला होता. प्रारंभी स्वागतपर आणि भाषणे झाल्यावर स्वा. सावरकर भाषणास उठले आणि आलेला थकवा कोठल्या कोठे लुप्त झाला. कारण नेहमी प्रमाणे त्यांचे भाषण ७०-८० मिनिटे झालेच. हे भाषण हिंदीतच झाले. आणि ते अत्यंत ओजस्वी असेच झाले. ग्लानीमुळे ही सभा होते का नाही, असे वाटू लागले होते आणि त्यामुळे स्वागत समितीचे लोक अस्वस्थ झाले होते. पण स्वा. वीर सावरकर वेळेवर सभास्थानी आले. इतकेच नव्हे तर त्यांचे ७०-८० मिनिटे हिंदीतून वक्तृत्वपूर्ण ओजस्वी असे भाषणही झाले आणि सत्कार सभा यशस्वीपणे ठरल्यावेळी पार पडली हे पाहून स्वागत समितीच्या सभासदांचा आनंद द्विगुणित झाला.

आदल्या दिवशी रात्री झालेले उलट्या-जुलाब, अन्नाचा कण पोटात नाही, प्रचंड मिरवणुकीमुळे आलेला थकवा, तीन तासांची ग्लानी, या प्रचंड त्रासातून सावर-करांनी ७० मिनिटे प्रभावी भाषण केले होते. त्यांचे भाषण चालू असताना त्यांना वर उल्लेख केलेल्या त्रासातून जावे लागले, याचा मागमूसही नव्हता. नेहमीप्रमाणे भाषण झालेले पाहून मीही आश्चर्यचकित झालो. हे त्यांना कसे जमू शकले, याचा विचार मी सारखा करीत होतो. केवळ मनोबळाच्या सामर्थ्यावरच असे होणे शक्य आहे, असे मला वाटले; कारण मनोबळाच्या सामर्थ्यावरच ते अंदमानची १४ वर्षे पचवून आले होते, हे सर्वांस माहीत आहेच. मनोबळाच्या सामर्थ्यावरच केवळ त्यांनी असामान्य संकटांना तोंड दिले असले पाहिजे, हेच खरे आणि म्हणूनच सर्वसाधारण माणसापेक्षा त्यांच्यात काही विशेष आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव त्या दिवशी मला आला. इतके दिवस अनेक संकटांना तोंड दिले असे वाचले होते, पण आज त्यांच्या मनोबळाच्या सामर्थ्याची अगदी अल्पशी प्रचीती आली.

## सावरकरांचे कन्याप्रेम

कु. प्रभाचे लग्न साधारणतः १८ ते २० वर्षांपर्यंत करावे, अशा मताचेच स्वा. वीर होते. शिक्षणही मॅट्रिकपर्यंत सर्वसाधारण मुलींना पुरे. अर्थात ज्या मुली अत्यंत

बुद्धिमान असतील त्यांनी उच्च शिक्षण अवश्य घ्यावे, असेही ते म्हणत. उत्तम प्रकारची प्रजोत्पत्ती आणि व्यवस्थित संसार करून मग जे सामाजिक व सार्वजनिक कार्य करता येईल ते अवश्य करावे, असा मताचे ते होते.

त्यांची एकुलती एक मुलगी कु. प्रभा ही नाथीबाई ठाकरसी विद्यालयाची मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर स्वा. वीर तिच्या लग्नाकरिता स्थळाच्या चौकशीस लागले. २-३ स्थळे त्यांना सुचविण्यात आली. त्यांपैकी श्री. माधवराव चिपळूणकर यांचे स्थळ त्यांनी पहावयाचे ठरविले. श्री. माधवराव B. Sc. टेक होते. त्यावेळी श्री. माधवराव हिंदुराष्ट्रदल या स्वयंसेवक दलात काम होते. एक दिवस माधवरावांची २-३ मित्र-मंडळी श्री. माधवरावांना घेऊन सावरकर सदनात आली. स्वा.वीरांनी आणि कु. प्रभाने माधवरावांना पाहिले. आणि माधवरावांनीही कु. प्रभाला पाहिले. स्वा.वीरांना व कु. प्रभाला माधवराव पसंत पडले. तसेच माधवरावांनाही मुलगी पसंत आहे, असे समजताच स्वा.वीर स्वतः कु. प्रभाला घेऊन पुण्यास माधवरावांच्या घरच्या मंडळीस दाखवण्यासाठी गेले. यावेळी ते केसरी कार्यालयात न उतरता कै. अण्णासाहेब भोपटकरांच्या येथे उतरले होते. माधवरावांच्या घरच्या मंडळींना मुलगी दाखवण्यात आली आणि त्यांनाही ती पसंत पडली व तसेच भोपटकरांकडेच वाङ्निश्चय होऊन साखरपुडाही झाला.

लग्न पुण्याला दि. ८ मे १९४५ ला गायकवाडवाड्यात थाटाने तसेच वैदिक पद्धतीने झाले. या कार्याप्रीत्यर्थ सावरकरांनी ८ ते ९ सहस्र रुपये खर्च केले. लग्नाला व नंतर जेवणास गुरुवर्य तात्याराव केळकर, अण्णाराव भोपटकर, दं. परांजपे इ. प्रभृती आली होती.

लग्न झाल्यावर सायंकाळी सौ. प्रभा सासरी जाताना श्री. माधवराव चिपळूणकर आणि सौ. प्रभा स्वातंत्र्यवीरांना नमस्कार करावयास आले तेव्हा ते केसरी अभ्यागत-गृहाच्या तिसऱ्या मजल्यावर होते. सौ. प्रभाने नमस्कार केल्यावर तिच्या पाठीवर हात फिरवून स्वा.वीर तिला म्हणाले, “ जपून रहा ” त्यावेळी स्वा.वीरांचा कंठ दाटून आला होता, अश्रु दाटून आले होते, पण संयमाने त्यांनी ते आवरले. तसेच कोरमीचे ४ ते ५ वेळ घेतले व सुमारे अर्धा तास पडून राहिले.

स्वातंत्र्यवीरांना इतके गहिवरून आलेले मी कधीच पाहिले नाही.

## सावरकरांचे योग्य मार्गदर्शन

१९२५ च्या एप्रिल महिन्यात स्वा. सावरकर शिरगावला आमच्या घरी राहात असताना त्यांची भेट घेण्यासाठी डॉ. हेडगेवार व श्री. मार्तंडराव जोग हे दोघे नागपूर येथून आले होते. त्यांचा आमच्या येथे तीन दिवस मुक्काम होता. हिंदूंचीच अशी एक स्वतंत्र स्वयंसेवक संघटना निर्माण करावी, असा डॉक्टरांच्या मनात विचार होता.



त्या संबंधात त्यांनी शिरगाव येथील वाड्यात विचारविनिमय केला. अशा संघटनेचे नाव काय असावे, त्या संघटनेचा उद्देश काय असावा, दैनंदिन कार्य कसे असावे याविषयी त्यांची चर्चा झाली. ‘ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ’ या संघटनेचे नाव असावे असे ठरले. या संघटनेचा हिंदुसभेशी प्रत्यक्ष संबंध न ठेवता, हिंदुसभेच्या कार्यासाठी स्वयंसेवक दलासारखा उपयोग व्हावा; तसेच ही संघटना एकचालकानुवर्ती असावी, असा सावरकरांचा अभिप्राय होता.

या चर्चेनंतरच दसऱ्याच्या मुहूर्तावर त्याचवर्षी म्हणजे १९२५ साली डॉ. हेडगेवार यांनी नागपूर येथे रा. स्व. संघाची स्थापना केली.

## लोकांना जिंकण्याची कला

१९३८ मध्ये खुलना ( आता बांगला देशात असलेले ) येथील हिंदुपरिषदेच्या अध्यक्षपदी वीर सावरकरांची निवड झालेली होती. त्या परिषदेला जाताना वाटेत एक दिवस वीर सावरकरांचा कलकत्त्याला निवास होता. त्या दिवशी कलकत्त्याच्या नागरिकांच्या वतीने सर मन्मथनाथ मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेत सावरकरांना मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्या वेळी सावरकरांनी केलेल्या भाषणाने कलकत्त्याचे नागरिक इतके भारावून गेले होते की, खुलन्याहून परत आल्या-वर सावरकरांचे एक भाषण ठेवावे, असे अनेकांचे फोन सावरकर ज्यांच्याकडे उतरले होते, त्या बॅ. निर्मलचंद्र चटर्जी व श्री. आशुतोष लाहिरी यांना आले. म्हणून त्यांनी खुलन्याहून सावरकर परतणार होते त्या दिवशी सावरकरांची सभा ठेवली नि तसे त्या दिवशीच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध केले.

स्वा. सावरकर त्या दिवशी साधारण ११ च्या सुमारास परत आले तो त्यांना सभेविषयी माहिती देण्यात आली. त्यांनी सांगितले की, मी ठरल्याप्रमाणे सर्व कार्यक्रम पार पाडले. आता मी अगदी थकलो आहे तेव्हा सभेत बोलणे आता मला शक्य नाही.

बॅ. चटर्जी व लाहिरी आदी सर्वजण निराश झाले. शिवाय वर्तमानपत्रात सभा होणार म्हणून ते प्रसिद्ध करून बसले होते.

सावरकर थोडी विश्रांती घेऊन स्नानास गेले तेव्हा तेथे बसलेल्या आशुबाबूंना मी म्हटले की, ते स्नान करून परत आले की प्रयत्न करा. कारण त्यावेळी ते एका वेगळ्या विचारात असतात नि एकदा नकार दिला तरी परत होकार देतात, असा पूर्वीचा दोन-तीन वेळेचा माझा अनुभव आहे.

### अखेर सभा ठरली

स्नान करून आल्यावर स्वस्थ बसले असता त्यांनी मला विचारले की, आशुबाबू अजून बाहेर बसूनच आहेत का ? मी सांगितले की, ते हिरमुसले होऊन बसूनच आहेत,

तेव्हा तात्या म्हणाले की, त्यांना बोलाव. आशूबाबू आल्यावर सावरकर म्हणाले, तुम्ही प्रसिद्ध केलेल्या सभेत मी भाषण देईन, पण मात्री रात्रीची गाडी चुकणार नाही, अशा वेळी सभा असेल तरच. सभेची वेळ तशीच होती. आशूबाबू चटर्जी यांना इतका आनंद झाला, की काही वेळापूर्वी ते जे निराश होऊन हिरमुसले होते त्यांचा आनंद द्विगुणित झाला.

स्वा. सावरकरांच्या पहिल्या सत्कारसभेला डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी एक प्रेक्षक म्हणून उपस्थित होते. पण या दुसऱ्या सभेचे ते अध्यक्ष होते. स्वा. सावरकरांचे भाषण ऐकून ते इतके भारावून गेले, की अध्यक्ष म्हणून भाषण करताना त्यांनी आपण हिंदुसभेचा सभासद होत असल्याचे घोषित केले.

## ' कॅट इज आऊट ऑफ दी बॅग '

हिंदुस्थानात क्रिप्स मिशन पाठविण्याची घोषणा लंडनला पार्लमेंटला केल्याची वार्ता पी. टी. आय.कडे येताच हिंदुस्थानातील सर्व पक्षांच्या धुरीणांची प्रतिक्रिया मिळविण्याची पी. टी. आय. च्या वार्ताहरांची धावपळ चालू झाली.

हिंदुसभेला त्यावेळी सरकारदरबारी हिंदुस्थानातील एक प्रमुख राजकीय संस्था म्हणून मान्यता प्राप्त झालेली होती व तिचे प्रमुख होते स्वा. सावरकर. त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया मिळविण्यासाठी पी.टी.आय.चे मुख्य वार्ताहर श्री. रामचंद्रन् यांनी सावरकर सदनात फोन केला. तो फोन मीच घेतला. ते माझ्या परिचयाचे असल्यामुळे ते मला फोनवरच म्हणाले की, वीर सावरकरांची प्रतिक्रिया आम्हाला हवी आहे. तेव्हा मी त्यांना सांगितले की, फोनवर तात्या काही सांगणार नाहीत. त्यावर श्री. रामचंद्रन म्हणाले, मी फोनवरच डॉ. जयकर, श्री. के. एम. मुन्शी, डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिक्रिया मिळविल्या आहेत तेव्हा वीर सावरकरांना विचारून तर पहा. म्हणून मी तात्यांना विचारावयास गेलो, तात्यांनी फोनवर सांगावयास नकार दिला. तसे मी श्री. रामचंद्रन् यांना फोनवर सांगितले. ते हिरमुसला होऊन मला म्हणाले, क्या बालेजी, हमने विश्वाससे फोन किया था.

तरीपण तासाभरात श्री. रामचंद्रन् सावरकर सदनात आलेच. ती वेळ रात्री ८ च्या सुमाराची होती. मी तात्यांना वर जाऊन कळविले व रामचंद्रनची त्यावेळी भेटही झाली. पण त्या भेटीत तात्यांनी त्यांना सांगितले की, पार्लमेंटमध्ये काय घोषणा करण्यात आली आहे, ती वाचल्याशिवाय मी काय प्रतिक्रिया व्यक्त करू ? ती वाचल्यावर मी काही प्रतिक्रिया व्यक्त करू शकेन.

परत श्री. रामचंद्रन् हिरमुसले झाले, पण त्यांनी चिकाटी सोडली नाही. त्यांनी सावरकर सदनातून पी. टी. आय.च्या कार्यालयात फोन केला व पार्लमेंटमध्ये केलेल्या घोषणेचे वृत्त मागविले. तोपर्यंत रात्रीचे नऊ वाजले. तात्यांनी ते वृत्त वाचल्यावर



आपली प्रतिक्रिया श्री. रामचंद्रन यांना डिक्टेट केली. ती त्यांनी टाईप करून परत तात्यांना दाखविली. एक प्रत तात्यांना दिली व त्यांची घेऊन ती फोनवर पी. टी. आय.च्या कार्यालयाला दिली. तोपर्यंत रात्रीचे दहा वाजून गेले होते. त्या प्रतिक्रियेचा मथळा होता. " कॅट इज आऊट ऑफ दि बॅग. "

## सावरकरांचा मुत्सद्दीपणा

व्हॉईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांच्या निमंत्रणावरून १९४[illegible] मध्ये स्वा. सावरकर सिमल्यास व्हॉईसरॉयच्या भेटीस गेले होते. सिमल्याहून परतताना काल्का स्टेशनवर सावरकर गाडीच्या डब्यात बसलेले असता त्याच गाडीने प्रवास करणारे शेठ वालचंद हिराचंद सावरकरांकडे आले व त्यांनी त्याच गाडीत असलेले त्यावेळचे पंजाबचे मुख्यमंत्री सर सिकंदर हयातखान हे आपणास भेटू इच्छितात, असे सांगितले.

सावरकर लंडनमध्ये असताना सर सिकंदर हयातखान यांचा व सावरकरांचा परिचय झालेला होता, इतकेच नव्हे तर सावरकरांनी स्थापन केलेल्या अभिनव भारत संस्थेचे सिकंदर हयातखान सभासद होते.

शेठ वालचंद यांनी सर सिकंदर हयातखान भेटू इच्छितात, असे सांगितले तेव्हा सावरकर शेठ वालचंदना म्हणाले, ते भेटू इच्छितात तर भेटू शकतात. नंतर थोड्याच वेळात शेठ वालचंद हिराचंद सिकंदर हयातखान यांना घेऊन सावरकरांकडे आले व सर सिकंदर खान यांनी सावरकरांशी हस्तांदोलन करून त्यांना आपल्या वातानुकूलित डब्यात नेले.

त्यावेळी मुस्लिम लीगची पाकिस्तानची मागणी जोरात चालू होती व हिंदुसभेचा तिला तीव्र विरोध चालू होता. अशा वेळी सर सिकंदर हयातखान यांची भेट घेणे महत्त्वाचे होते.

## सावरकरांचे दीर्घकालीन आजारपण

स्वा. सावरकर यांच्या सान्निध्यात त्यांचे घरगुती व सार्वजनिक कार्यात एक स्वयंसेवक व पुढे १९३७ साली त्यांची रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून सुटका झाल्यावर त्यांचा वैयक्तिक कार्यवाह म्हणून मी १९२४ पासून १९४८ पर्यंत त्यांच्या सहवासात होतो.

गुरुवर्य तात्यांची तुरुंगातून १९२४ साली सुटका झाल्यावर त्यांना रत्नागिरी जिल्ह्यात स्थानबद्ध करण्यात आले. जानेवारी १९२४ मध्ये ते रत्नागिरीस रहावयास आले. रत्नागिरीस प्लेग सुरू झाल्यामुळे १९२४ च्या नोव्हेंबरमध्ये रत्नागिरीपासून २ मैलांवर असलेल्या शिरगावी आमच्या घरी ते एकटेच रहावयास आले; कारण

त्यांच्या पत्नी सौ. माई बाळंतपणासाठी सातारला त्यांची बहीण सौ. मतेंक यांच्याकडे गेल्या होत्या. त्यांचा व आमच्या कुटुंबाचा शेवटपर्यंत अत्यंत घरोब्याचा संबंध होता. त्यांनी राजकारणात भाग घेऊ नये म्हणून त्यांच्यावर अट असल्यामुळे त्यांनी सामाजिक कार्यास आरंभ केला. त्या सामाजिक कार्यात आम्ही चारही बंधू स्वयंसेवक म्हणून सहभोजनादी प्रत्येक कार्यात आबाडीचे स्वयंसेवक म्हणून काम करीत होतो. आमचा घरोबा असल्यामुळे त्यांची अनेक घरगुती कामेही ते व सौ. माई आम्हास सांगत असत. त्या काळात ते आमच्याकडे असताना डॉ. हेडगेवार, व्ही. व्ही. अय्यर व पुढे रत्नागिरीस श्री. गा. न. गोगटे भेटून गेले.

१९३७ साली ते हिंदुसभेचे अध्यक्ष झाल्यापासून मी त्यांचा वैयक्तिक कार्यवाह म्हणून होतो. वैयक्तिक कार्यवाह म्हणून त्यांच्याबरोबर माझा काश्मीर ते कन्याकुमारी व लाहोर-कराची ते खुलना असा हिंदुस्थानभर प्रवास झाला.

१९४५ अखेर त्यांना काही केल्या बरे वाटेना म्हणून मुंबईचे प्रसिद्ध डॉ. रा. वि. साठे यांच्या सूचनेवरून ते हवापालट करण्यासाठी शेठ गुलाबचंद यांच्या आग्रहावरून २ जाने. १९४६ ला वालचंदनगरला रहायला गेले. त्यावेळी सुमारे ७-८ महिने त्यांच्या सहवासात २४ तास मी असे. शेठ गुलाबचंदांनी त्यांची रहाण्याची उत्तम प्रकारे व्यवस्था केली होती.

२० जाने. १९४६ ला वालचंदनगरला त्यांना हृदयविकाराचा जोराचा झटका आला. सुमारे दोन तास ते स्वस्थ पडून होते. शब्दही बोलता येत नव्हता. तेथे असलेले डॉ. भिडे यांनी त्यांना कोरॅमिनचे इंजेक्शन देऊन दिले होते.

शेठ गुलाबचंद, मी, डॉक्टर बाहेर खोलीत चिंतित बसून होतो. सुमारे दोन तासांनी ते खाणाखुणा करू लागले व क्षीण स्वरात बोलू लागले. तेव्हा डॉक्टरांनी धोका टळला आहे, असे सांगितले तेव्हा मग आम्ही निश्चिंत झालो.

त्यानंतर मुंबईहून डॉ. साठे कार्डिओग्रॅम घेऊन आले व त्यांनी तपासून धोका नसल्याचे सांगितले.

वालचंदनगरला असताना इंग्लंडहून कॅबिनेट मिशन आले होते. त्याचे निमंत्रणही आले होते, पण हिंदुसभेचे अध्यक्ष म्हणून त्यांनासुद्धा तात्या भेटू शकले नाहीत.

तात्यांना भेटायला वालचंदनगरला सेनापती बापट, तात्याराव केळकर येऊन गेले. त्यांच्याशी पण ते विशेष बोलू शकले नाहीत.

वालचंदनगरला अभ्यंकर व महाजन या दोन पुण्याच्या विधिज्ञांना बोलावून त्यांनी आपले मृत्युपत्रही तयार केले. त्यावेळी मला स्वातंत्र्यवीरांच्या सर्व व्यवहाराची माहिती असल्यामुळे मीच त्या विधिज्ञांना सर्व माहिती पुरवली होती. त्यामुळे असे वाटते की, त्यांना आपल्या प्रकृतीची शाश्वती वाटत नसावी.

ते आजारी असताना दादरचे एक ज्योतिषी श्री. वेदक यांनी सांगितले होते की, २० जानेवारीचा दिवस टळला की, धोका नाही. त्याचा प्रत्यय आला. योगायोगाला गाठ पडली असावी, पण त्याने आम्ही थोडे निश्चिंत झालो. जरी आमचा ज्योतिषावर विश्वास नाही तरी.



स्वा. वीरांचा मुक्काम वालचंदनगरला सुमारे चार महिने होता, त्यापैकी तीन महिने तर एका खोलीतच कॉटवर बसून असत. काही पाहिजे असल्यास हाक मारीत असत. कारण मी पलीकडल्या खोलीतच असे. पुढे एक महिना सायंकाळी एकटेच समोरच्या व्हरांड्यात थोडा वेळ फेऱ्या मारीत इतकेच.

या चार महिन्यांत ते कोणालाही भेटत नसत किंवा काही वाचीतही नसत. त्यांचा वेळ कसा जाई हे समजत नसे पण त्यांची योगाभ्यासाची सवय होती, त्याचा त्यांना त्यावेळी उपयोग झाला असावा असे आम्हास वाटते.

वालचंदनगरला या चार महिन्यांत थोडे बरे वाटू लागल्यानंतर पुढे पुण्यास त्यावेळी जनरल पोस्ट ऑफिससमोर असलेल्या पूना हॉटेलमध्ये मी व तात्या असे दोघेच तीन महिने रहात होतो. कारण वालचंदनगरला त्यांच्या पत्नी सौ. माई व मुलगा विश्वास होता.

पूना हॉटेलमध्ये आम्ही आलो तेव्हा त्यांना थोडे बरे वाटू लागले होते; त्यामुळे सायंकाळी मधून मधून पं. नथूराम गोडसे, नाना आपटे, श्री. पु. गोखले भेटण्यास येत असत. एकदा बॅ. एन्. सी. चटर्जी पण भेटावयास आले होते.

पूना हॉटेलमध्ये असतानाच स्वातंत्र्यवीरांच्या सर्व वाङ्मयावरील बंदी सरकारने उठवली. त्यापैकी १८५७ चे स्वातंत्र्यसमर हे पुस्तक प्रसिद्ध करण्याचा पं. नथुराम गोडसे व नाना आपटे यांनी या पूना हॉटेलमध्येच करार केला.

पूना हॉटेलमध्ये शेवटचा महिनाभर मोटारने गावाबाहेर जाऊन मग फिरत थोडे असत. त्यावेळी त्यांच्याबरोबर मी, गोडसे, नाना आपटे, श्री. पु. गोखले असत.

पूना हॉटेलमध्ये असताना त्यांना कॉलरा झाला असल्याने डॉ. चाफेकर यांना वाटल्यामुळे डॉ. नायडू रुग्णालयात त्यांना आठ दिवस ठेवण्यात आले. तेथेपण मीच त्यांच्याबरोबर असे. जरा चांगले बरे वाटू लागल्यावर १ ऑगस्ट १९४६ च्या टिळक पुण्यतिथीस उपस्थित राहून व भाषण होऊन बरोबर ७ महिन्यांनंतर तात्या सावरकर सदनात परत आले.

या सात महिन्यांत २४ तास स्वातंत्र्यवीरांच्या सहवासात राहण्याचा योग मला आला. स्वा. वीर सावरकरांनी या सात महिन्यांत कोणत्याही सार्वजनिक कार्यात भाग घेतला नाही. लिखाणही काही केले नाही.

तात्यांचा स्वभाव अत्यंत सोशीक, कोणालाही त्रास न देण्याचा असा होता. हे मला माहिती होते; पण या सात महिन्यांत मला ते चांगलेच अनुभवता आले.

अशा प्रकारे या सात महिन्यांच्या प्रदीर्घ आजारपणात २४ तास त्यांच्या समीप राहण्याचे व बरे होऊन सावरकर सदनात परत रहावयास आल्याचे पहाण्याचे भाग्य मला मिळाले. हा एक अपूर्व योगायोग माझ्या आयुष्यात आला, असे मी समजतो. • •

## १९

शारदा परांजपे
पुणे ९.

### प्रचारक सावरकर

सावरकरांच्या या आठवणी साधारणपणे १९२८ ते ३० सालातल्या रत्नागिरी येथील आहेत. त्यावेळी मी साधारण १०–१२ वर्षांची असेन. आमच्या शेजारी सीताराम वैद्यांच्या घरात ते रहात असत.

स्वदेशीला महत्त्व व हिंदुत्वनिष्ठता या दोन्ही गोष्टी त्यांच्या वागण्या-बोलण्यातून दिसत असत.

त्या काळी मुसलमान कासारच खूप असत. पण सावरकरांचा असा आग्रह होता की, आपल्या हिंदू स्त्रियांनी मुसलमान कासारांकडून बांगड्या घेऊ नयेत. आपला हात मुसलमानांच्या हातात देऊन बांगड्या भरून घेऊ नयेत. व्यापारामधला पैसा हा आपल्याच समाजात राहिला पाहिजे, हा त्यामागचा हेतू होता. तेव्हा सावरकरांनी तळेगावच्या पैसा फंड कारखान्यातून देशी बांगड्या रत्नागिरीला मिळविण्याची व्यवस्था केली.

स्त्रियांनी स्वतःचे रक्षण करण्याकरिता स्वतःच समर्थ झाले पाहिजे, असे सावरकर नेहमी सांगत असत व त्याकरिता बायकांनी शस्त्रे चालवायला शिकावी असे त्यांचे म्हणणे होते. तेव्हा पुढे काळ कसा येणार आहे, त्याचा अंदाज त्यांनी तेव्हाच अचूक बांधला होता. कारण आज आपल्याला ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, स्त्रियांना स्वसंरक्षणाकरिता काहीतरी करायची व शिकायची वेळ आली आहे.

त्याचप्रमाणे स्वदेशी बनविलेल्या वस्तू वापरा असे सावरकर नेहमी सांगत. विलायती वस्तूंचा वापर न करता त्यावर बहिष्कार घालावा.

रत्नागिरीला ते नेहमी मेळे भरवीत व त्यातून आपल्या या सर्व मतांचा प्रचार करीत असत.

• •

## २०

श्री. मधुकर पां. खरे
सांगली.

### लहान मुलांचे सावरकर-प्रेम

स्वा. सावरकरांना मी प्रथम त्यांच्या रहात्या घरी म्हणजे ‘ सावरकर सदन ’ येथेच पाहिले. सन १९५१ साली मी नऊ दहा वर्षांचा होतो. आमच्या एका परिचित



व्यक्तीबरोबर त्यांच्या घरी गेलो. मला लहानपणापासून सावरकरांविषयी माहिती व आदर होता. त्यातून हुतात्मा अनंत कान्हेरे हे आमचे नातलग असल्यामुळे ती गोष्ट सांगितल्यानंतर त्यांना अतिशय आनंद झाला व तुम्ही आमच्यात कुळातले, असे उद्गार त्यांनी काढले. नंतर त्यांना वाकून नमस्कार करून परत आलो.

दुसरा प्रसंग १९५७ साली, प्रसिद्ध प्रकाशक कै. ग. पां. परचुरे यांच्या ओळखीने ते आमच्या गावी म्हणजे गुहागर येथे आले होते. त्यावेळी आमच्या शाळेच्या पटांगणावर त्यांचा भव्य सत्कार व भाषण आयोजित केले होते. त्यांची ती तेजस्वी पण काहीशी कृश मूर्ती, अत्यंत तेजस्वी व ओघवती वाणी अजूनही कानात ऐकू येत आहे. अजूनही प्रसंगोचित आठवणीने हृदय गहिवरून येते. आपल्या देशात त्यांची कदर राखली गेली नाही. कोणत्याही पदवीने, शासनाने त्यांना सन्मानित केले नाही, हे शासनाचे दुर्भाग्य.

• •

## २१

श्री. महादेव लक्ष्मण बेहरे
कल्याण.

### तरुणांना प्रोत्साहन देणारे सावरकर

सावरकरांना पाहण्याचा योग १९३९ साली हैद्राबाद सत्याग्रहाला जाणाऱ्या जथ्याला निरोप देण्याच्या वेळी आला, त्यावेळी मी त्यांना आयुष्यात प्रथमच पाहिले. आपले स्फूर्तिस्थान असणारी व्यक्ती प्रत्यक्ष बघण्यास मिळाल्यावर एक वेगळाच आनंद होतो. या प्रसंगानंतर १९४० साली सावरकर धारवाडला जात असताना बेळगाव स्थानकावर काही वेळ थांबले असता भेटण्याचा योग आला. त्यावेळेस त्यांना पुष्पहार अर्पण करण्यासाठी ‘ त्रिकाल ’ दैनिकाचे स्थानिक बातमीदार श्री. पु. ल. ओगले यांनी माझा परिचय सावरकरांना करून दिला. श्री. बेहरे हे १९३९ सालच्या भोपटकर जथ्यात सामील झाले होते, असे ओगले यांनी सांगितल्यावर सावरकरांनी माझे अभिनंदन करून त्यांच्या गळ्यातील हार माझ्या गळ्यात घातला व म्हणाले, “ तुमच्यासारख्या मुलांनीच आम्हा पुढाऱ्यांची अब्रू राखली. ”

त्यानंतर १९४२ साली जुलैमध्ये सांगलीमध्ये सावरकरांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळेस त्यांना पहाण्याचा व त्यांचे भाषण ऐकण्याचा योग आला तेव्हा त्यांनी केलेल्या भाषणाचा विषय ‘ आत्यंतिक अहिंसा हे आत्यंतिक महापाप आहे ’ हा होता. दुसऱ्या दिवशी सायंकाळी मिरजेच्या सरस्वती वाचनालयाच्या पटांगणात त्यांचे

तासभर भाषण झाले. त्या व्याख्यानाचा विषय ' आमचे परराष्ट्रीय धोरण ' हा होता. त्यानंतर त्यांचे आणखी एक भाषण पुण्याला पर्वतीच्या पायथ्याशी झाले, ते ऐकले.

प्रत्यक्ष भेटीचा योग १९४५ साली नोव्हेंबर महिन्यात दादरला सावरकरांच्या निवासस्थानी आला. सुमारे १५ मिनिटांच्या भेटीत त्यांनी आपुलकीने माझा धंदा-व्यवसायाची तसेच बेळगावात हिंदू व्यावसायिक किती आहेत याची विचारपूस केली. माझा फुले विकण्याचा व्यवसाय असल्याने त्यांना त्यासंबंधी माहिती मी सांगितली त्यावर ते म्हणाले, की नोकरीशिवाय इतर कोणतेही चांगले व्यवसाय करण्यास हिंदू माणसाने कमीपणा वाटून घेऊ नये. एखादा छोटासा व्यवसाय हीसुद्धा एकप्रकारे जनतेची सेवाच आहे.

* *

रमेश गो. घारे
कोल्हापूर.

२२

## सावरकरांची नितान्त भक्ती

तात्याराव सावरकरांची ' जन्मठेप ' व ' मॅझिनी ' ही दोन पुस्तके वाचल्यापासून त्या महान देशभक्ताच्या दर्शनाने पावन व्हावे असे फार मनात होते. ' इच्छा धरा ते येई घरा ' असे म्हणतात. ती संधी एकदा चालून आली. ध्यानीमनी नसताना जी इच्छित गोष्ट घडते तिचा आनंद अवर्णनीय असतो.

नक्की आठवत नाही, कारण मी १०-१२ वर्षांचा असेन. परंतु मला वाटते, १९३३-३४ साल असावे, आम्ही त्यावेळी बुधवार पेठ ( आजची शिवाजी पेठ ) रहात होतो. वावडेकरांचा वाडा तेथून जवळच होता. एक दिवस कळाले की, स्वा. वीर सावरकरांचे भाषण वावडेकरांच्या वाड्यात होणार आहे. त्या सोनियाच्या दिवसाची चातकाप्रमाणे वाट पाहत होतो. इच्छा फळाला आली व एके दिवशी सावरकरांचे भाषण वाड्याच्या प्रांगणात होणार असल्याचे समजले. इतरांच्या आधी पोचून शक्यतो व्यासपीठाजवळ जाता यावे म्हणून लवकर गेलो. पण माझ्यासारख्याच विचाराचे असंख्य लोक तेथे पोचले. होते. गर्दीतून धडपड, धक्काबुक्की करून जेमतेम व्यासपीठ दिसेल अशा जागी पोचलो. सर्व जनसमुदाय त्या महान वीराचे दर्शन घेण्यासाठी अधीर झाला होता व आपआपसांत कुजबूज चालू होती. एकाएकी कुजबूज थांबली व लोक माना उंचावून पाहू लागले. एखादा दैवी चमत्कार व्हावा त्याप्रमाणे सर्व जनसमुदाय



निःस्तब्ध झाला. मीही अगतिकपणे अधीर होऊन व्यासपीठावर दृष्टी लावून होतो. वृत्तपत्रांतून व इतरत्र पाहिलेल्या फोटोवरून मनात जे चित्र उमटले होते तेच जिवंत होऊन समोर ठाकले होते. गोल टोपी- गोल काचांचा चष्मा, लहानखुर मूर्ती, अनेक दिवस मनात जपलेल्या त्या मूर्तीकडे इतक्या तन्मयतेने पाहू लागलो, की त्यांचे भाषण सुरू झाल्याचे लक्षात आले नाही. त्यांचे भाषण इतके ओजस्वी व वीरश्रीपूर्ण होते, की शब्दगंगेच्या लहरींवर हेलकावत मन तरंगत होते. इतिहासाची एकेक पाने सजीव करून जनतेपुढे उभी केली व हजारोंनी जमलेला जनसमुदाय त्यांच्या शब्दांच्या जादूने मंत्रमुग्ध झाला. भाषण केव्हा संपले हे कळण्याच्याही मनःस्थितीत मी नव्हतो. मूर्ती लहान, पण कीर्ती महान या उक्तीची साक्ष पटली. ती संस्मरणीय मनःपटलावर आमरण कोरलेली राहणार आहे.

* *

श्री. वा. गो. सातोडकर
अमरावती.

२३

## स्वराज्य-रक्षणाचा उपाय

मी हल्ली सेवानिवृत्त मुख्याध्यापक आहे. एका माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून काम करत असताना १९५२ साली उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही उभयता सावरकरांच्या जन्मदिनी त्यांच्या दादरमध्ये असलेल्या निवासस्थानी त्यांना मोठ्या औत्सुक्याने भेटावयास गेलो असताना ते आपल्या खोलीत बसलेले आढळले. आम्ही त्यांना ओळख करून दिली असता, प्रथम माझ्या त्यांनी पत्नीस माईंना भेटावयास माडीवर जाण्यास सांगितले. नंतर लगेच मला प्रश्न विचारला, " तुम्हाला किती मुले आहेत ? " ह्या प्रश्नातील मर्म मी लगेच ओळखू शकलो. मी उत्तर दिले की, मला मुले नाहीत. त्यावर ते म्हणाले की होतील. त्यानंतर मुले झाली नाहीत हा भाग वेगळा. मला प्रामुख्याने त्यांच्या प्रश्नातील जे मर्म सांगावयाचे आहे ते असे की, तुम्हाला जर मुले असतील तर त्यापैकी एक माझा म्हणजे ( हिंदु ) राष्ट्राचा आहे व तो मला द्यावा. कारण सर्वच मुलांचा त्यांच्या ऐहिक स्वार्थाकरिताच आपण उपयोग करतो. स्वार्थत्यागाच्या भावनेला अनुसरून प्रत्येक कुटुंबातील एकाने तरी राष्ट्रसंरक्षणार्थ व राष्ट्रहितार्थ स्वतःला समर्पित करावे हे त्यांच्या प्रश्नातील मर्म मी त्यांच्या जीवनातील अद्वितीय त्यागावरून ओळखू शकलो. अजूनही प्रत्येक कुटुंबातील कुटुंबप्रमुखाने असे

करण्याची नितांत गरज आहे. त्याकरिता प्रत्येक विद्यार्थ्याला लष्करी शिक्षण सक्तीचे असावे, ही बाब राज्यकर्त्यांना उमजावी ही अपेक्षा. स्वातंत्र्य लक्ष्मी की जय!

नाशिकच्या एका सभेतील त्यांचे उद्गार अजूनही हृदयाचा ठाव घेतात, "स्वराज्य मिळविण्याकरिता आपण जे कष्ट उपसले व त्याग केला त्याच्या कितीतरी पटीने स्वराज्याच्या सुरुवातीच्या कालावधीत आपण कष्ट व त्याग करू, तरच स्वराज्य सुरक्षित राहून ते टिकू शकेल."

• •

## २४

**वामनमूर्ती सातवळेकर**
सदस्य, मसूर आश्रम.

## मसूर आश्रमाची महत्त्वाची कामगिरी

१९३१ साली स्वा. सावरकर यांच्या प्रयत्नांनी रत्नागिरी अखिल हिंदूंना प्रवेश असलेले पतितपावन मंदिर बांधले गेले. हे मंदिर जेव्हा बांधले गेले तेव्हा तेथील मूर्ति-स्थापनेसाठी महाराष्ट्रातील सर्व नेत्यांना बोलावण्यात आले होते. त्यामध्ये क्षात्र जगद्गुरू, ब्राह्मणेतरांचे नेते माधवराव बागल आदींनाही निमंत्रण दिले होते. त्या मंदिराच्या उद्घाटनाला सनातनी मंडळींचा विरोध होता. त्या मंदिरामध्ये अस्पृश्यांना प्रवेश देण्यावर शास्त्री, पंडितांचा विरोध होता. त्यासाठी महाराष्ट्रातील सर्व तीर्थक्षेत्राचे पंडित व शास्त्रींना बोलावण्यात आले. त्याबरोबर शुद्धी संघटनांचे महान कार्यकर्ते व मसूर आश्रमाचे मसूरकर महाराज आले. मुख्य प्रश्न होता तो म्हणजे या मंदिरासाठी फार मोठ्या प्रमाणात द्रव्य खर्च करणारे शेठ भागोजी कीर हे भंडारी असल्याने त्यांच्या हातून मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यास शास्त्रींचा विरोध होता. कारण त्यांच्या मते ब्राह्मणाशिवाय इतरांना वेदोक्ताचा अधिकार नाही. अशा स्थितीत वाद होऊन कोणीही ब्राह्मण भागोजी कीर यांच्या हातून मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यास तयार होईना. स्वा. सावरकरांचे ही प्राणप्रतिष्ठा कीरांच्या हातून झाली पाहिजे, कारण संपूर्ण हिंदूंना वेदोक्ताचा अधिकार आहे, असे म्हणणे होते. अशा परिस्थितीत तेथील कीरांच्या हातून मूर्ती स्थापनेस सनातन्यांचा विरोध असल्याने शेवटी तेथे दंगल होण्याचा प्रसंग उद्भवला. तेव्हा मसूरकर महाराजांनी आपल्या कार्यकर्त्यांकडून सावरकर व कीरांना संरक्षण दिले व मसूर आश्रमाच्या मोडक शास्त्रींना आज्ञा देऊन कीरांच्या हातून मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. रत्नागिरीच्या पतितपावन मंदिराच्या स्थापनेसाठी केलेली मसूर आश्रमाची कामगिरी सुवर्ण-अक्षराने लिहिण्यासारखी आहे. त्यासाठी हिंदू समाज मसूर आश्रमाचा व मसूरकर महाराजांचा ऋणी राहील.

• •



## २५

**श्री. भा. द. खेर**
पुणे.

## एक अमृतरसपूर्ण आठवण

स्वा. सावरकरांच्या समृद्ध सहवासातील चिरंजीव बोल टिपण्याचे भाग्य ज्यांना लाभले ते लोक खरोखर धन्य होत. कित्येकांनी ते बोल आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवले असतील. मलाही थोडेफार ते भाग्य लाभले. व्यर्थ गप्पागोष्टी मारण्याची किंवा स्वतःची फुशारकी मारण्याची तात्यारावांना कधीच सवय नव्हती. ते नेहमी तात्त्विक बोलायचे.

त्यांच्यावरच लिहिलेली 'यज्ञ' ही कादंबरी प्रसिद्ध होण्यापूर्वी मी त्यांच्याकडे गेलो होतो. त्यांच्या लंडनमधील वास्तव्यातल्या काही गोष्टी विचारल्या. त्या शत्रूच्या शिबिरात ठाव मांडून त्यांनी गोऱ्या शत्रूला त्राहि भगवान केले होते. परंतु मी त्यांना तो प्रश्न विचारला तेव्हा विस्मृती आल्यासारखी मुद्रा करून ते म्हणाले होते, "छे! काहीच स्मरत नाही. स्मरण करण्याजोगं फारसं काही घडलं नसावं."

मी अक्षरशः थक्क झालो. माणसे राईएवढ्या आपल्या कार्याचा पर्वत करतात पण हा थोर माणूस आपल्या पर्वताएवढ्या कर्तृत्वाची राई करतो! मॅझिनीप्रमाणे आपले उत्तुंग कर्तृत्व हे एक पवित्र कर्तव्य आहे, असेच मानून चालण्याची तात्यारावांची रीत होती. वस्तुतः अशा कर्तृत्ववान महापुरुषांचा अहंकार हा त्यांच्या कर्तृत्वाचा सहज हुंकार असतो. तो अहंकार त्यांना क्षम्य असतो. शिवाजी महाराज किंवा नेपोलियन यांच्यासारख्या पराक्रमी पुरुषांनी स्वतःच्या पराक्रमाचे गोडवे गाण्यात काहीच गैर नसते. परंतु स्वातंत्र्यवीरांच्या स्वकर्तृत्वाला गोडवे गायनाची रीतच माहीत नव्हती. ती स्वयमेव मृगेन्द्रता होती. तिला कोणाच्या कौतुकाची आवश्यकता कधी भासली नाही.

लाखो लोकांनी प्रकट सभांतून त्यांची अमोघ वक्तव्ये ऐकली. ती ऐकून ज मंडळी मंत्रमुग्ध होऊन गेली. मीही त्याप्रमाणे त्यांच्या वाक्गंगेत आपादमस्तक न्हाऊन निघालो. तृप्त झालो, धन्य झालो.

वरीलप्रमाणे प्रकट सभांतून बोलावे लागे ते बोलत असत, खाजगी संभाषणातून प्रमुख भाषण त्यांचेच चालत असे. तो वाक्गंगेचा ओघ अडविण्याची कोणाची प्राज्ञा नसे व इच्छाही नसे. 'अमृत वर्षावाला बांध कोण घालू शकणार आणि कशासाठी घालणार!' मी तर कधीच बोलण्याच्या ओघात त्यांना अडवले नाही.

असेच एका घरगुती बैठकीत त्यांनी केलेल्या दोन वैशिष्ट्यपूर्ण व्याख्या मला चांगल्या आठवतात. एक व्याख्या होती पुढाऱ्याची आणि दुसरी व्याख्या होती खऱ्या

देशभक्ताची !

पुढाऱ्याची व्याख्या करताना स्वातंत्र्यवीर म्हणाले होते, " जो नेहमी लोकांच्या अग्रेसर असतो तो पुढारी, ही पुढाऱ्यांची नेहमीची व्याख्या झाली. परंतु जो स्वतः मागे राहून लोकांना पुढे ढकलतो त्यालाही पुढारीच म्हटले पाहिजे. "

पुढे एक प्रकट व्याख्यानात त्यांनी पुढाऱ्याची ही व्याख्या उद्घोषित केल्याचेही मला स्मरते.

खऱ्या देशभक्ताची व्याख्या करताना सावरकर म्हणाले होते, " जो आपल्या राष्ट्राच्या संस्कृतीचे जतन करतो तो देशभक्त. परंतु जो गमावलेले पुन्हा कमावतो तो खरा देशभक्त ! "

स्वा. सावरकर कधीच निरर्थक बोलत नसत. असे अर्थपूर्ण तात्त्विक बोलणे आज दुर्मिळ झाले आहे. त्यांचा उभा देहच मुळी मूलभूत तत्त्वज्ञानाचा जणू गाभा होता. आणि शंकराच्या गाभाऱ्यातून असा धीरगंभीर पवित्र ध्वनी बाहेर पडावा त्या-प्रमाणे या विनायकाच्या अंतःकरणातून धीरगंभीर, तात्त्विक ध्वनी नेहमी बाहेर पडत असे. आणि ऐकणारे मंत्रमुग्ध होऊन जात असत. भारावून जात असत.

मी तर असंख्य वेळा याप्रमाणे भारावून गेलो आहे.

• •

## २६

श्री. वि. गो. आपटे
ठाणे.

## सावरकरांची जन्मजात स्फूर्ती

१९५६ मध्ये लो. टिळक जन्मशताब्दी साजरी झाली. पुणे येथील शनवार वाड्यासमोर यानिमित्त स्वातंत्र्यवीरांचे भाषण झाले. मी त्यावेळी काही कामानिमित्त पुण्यात होतो. भाषण ऐकण्याचा सुयोग आला.

सावरकर छडीच्या आधाराने व्यासपीठाचा जिना हळूहळू चढत होते. सभेत श्री. जयंतराव टिळक होते. श्री. जयंतरावांनी प्रास्ताविक सांगितले, " मी काल सायंकाळी सावरकर सदनात गेलो होतो. तात्यांची प्रकृती ठीक नव्हती. दोन दिवस त्यांना शौचावाटे रक्त पडत आहे. तात्यांचे वय ध्यानात घेता ते फारच थकलेले आहेत. तरी ते आले आहेत. "

सावरकरांनी भाषणाच्या सुरुवातीस सांगितले, ' मी जरी आजारी असलो, तरी



लोकमान्यांसारख्या महापुरुषाच्या जन्मशताब्दीला मी न येणे योग्य होणार नाही, म्हणून मी आलो आहे. एका महान देशभक्ताबद्दल चार शब्द बोलताना मी जर थकलो व भाषण थांबवले तर लोकांनी मला क्षमा करावी. '

तात्यांनी स्फूर्तीत बदून पल्लेदार वाक्यांत व श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेणारे असे भाषण केले. लोकमान्यांच्या जीवनातील एक-एक प्रसंग सांगताना ते देहभान विसरले. लोकमान्य काय किंवा स्वातंत्र्यवीर काय, दोघेही महान निःस्पृह देशभक्त व अलौकिक व्यक्तिमत्त्व. आजारी असलेल्या स्वातंत्र्यवीरांनी जवळ जवळ दीड तास भाषण केले. चार शब्द बोलून थांबलो तर क्षमा करावी म्हणणारे सावरकर लोकमान्यांच्या स्मृती-मध्ये स्वतःला, दुखण्याला विसरले. भाषणानंतर त्यांना शारीरिक त्रास किती झाला असेल ते तेच जाणे. हा प्रसंग माझ्या स्मरणात अजून आहे.

• •

## २७

एन. जी. कुलकर्णी
दौंड.

## सावरकरांचा स्फूर्तिदायक उपदेश

तो काळ ब्रिटिश राजवटीचा होता. मी १९३५ ते १९४० सालपर्यंत सोलापूरला डॉ. चाटी अनाथ विद्यार्थी गृहात होतो व ल. दे. हायस्कूलमध्ये शिक्षण घेत होतो. डॉ. चाटी अ. वि. गृहात त्यावेळी १०० विद्यार्थी ( १२ ते २५ वयाचे ) होते व ते सर्व ब्राह्मण जातीतील होते.

सन १९३८ साली भागलपूरचा लढा सत्याग्रह चालू झाला व त्यावेळी श्री. सावरकर भागलपूरला चालले होते. तेव्हा अ. वि. गृह चालकांनी त्यांची भेट आयोजित केली होती. तेव्हा त्यांनी अ. वि. गृहाला भेट दिली. त्यांच्या बरोबर बरेचसे आर्य समाजवादी व हिंदुसभेचे पण कार्यकर्ते होते.

श्री. सावरकर यांनी अ. वि. गृहातील शिस्त, शिक्षण व कार्यक्रम पाहून समा-धान व्यक्त केले. नंतर त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना सभागृहात बोलावले व यताना कागद व पेन घेऊन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे सर्वजण आम्ही सभागृहात आलो. सभागृहात आल्यावर सावरकरांनी आम्हाला कागदावर नाव व शिक्षणानंतर काय करणार ते लिहून मागितले. आम्ही सर्वांनी त्यांना कागदावर लिहून दिले. बहुतेकांनी सरकारी नोकरी, किंवा वकील, डॉक्टर होणार असे लिहिले होते.

सावरकरांनी सर्वांचे कागद वाचले व त्यांचा चेहरा चिंताग्रस्त दिसू लागला, हे आम्ही पाहिले. मग श्री सावरकरांनी आपल्या आसनावरून उठून भाषणास सुरुवात केली. ते म्हणाले, “ आपला देश पारतंत्र्यात आहे, हे आपणा सर्वांस माहीत आहे. तेव्हा आपण आपल्या देशाकरिता त्याग, बलिदान, करावयास पाहिजे व आपला देश ब्रिटिश जोखडातून स्वतंत्र केला पाहिजे. तुम्ही माझ्याजवळ कागद दिलेत ते मी वाचले. पण एकाही विद्यार्थ्याने मातृभूमीसाठी मी देशाला वाहून घेईन, देशसेवा करीन व देश स्वतंत्र करण्यास हातभार लावीन, असे म्हटले नाही. याबद्दल फार खेद वाटतो. ”

नंतर त्यांनी अंदमानमधील तुरुंगात ( काळ्या पाण्याची ) भोगलेली शिक्षा याबद्दल सविस्तर माहिती सांगितली, ती ऐकून प्रत्येकास ब्रिटिशांच्याबद्दल चीड आली.

श्री. सावरकरांचे भाषण ऐकून प्रत्येक जण भारावून गेला होता व आम्हा सर्वांस या क्रांतिवीराचे जवळून दर्शन घडले, आम्ही कृतार्थ झालो होतो.

मग ' वंदे मातरम् ' राष्ट्रगीत होऊन हा समारंभ संपला. श्री. सावरकर व त्यांचे सहकारी भागलपूरकडे रवाना झाले.

• •

## २८

जी. एस. गर्गे
बांद्रा, मुंबई.

## सावरकरांची अमाप भक्ती

मी १९४२ व १९४३ च्या सुमारास स्वा. सावरकर यांना चाळीसगाव येथे ते आले असताना समक्ष जवळून पाहिले, त्यावेळी मी लहान होतो व इंग्रजी तिसरीत शिकत होतो. चाळीसगाव, जि. जळगाव येथे नगर संरक्षक दल ( Civil Defence force ) हनुमान व्यायाम शाळेतर्फे स्थापन झाले होते व मी त्यात सैनिक म्हणून काम केले होते. श्री. जोगळेकर वकील यांच्याकडून तात्या आमच्याकडे जेवावयास आले असताना त्यांच्या हातावर पाणी टाकण्याचे काम मला मिळाले, त्यामुळे मी फार आनंदित झालो. पण दुसरीच व्यक्ती हातावर पाणी घालू लागली. त्यावेळी त्या महान तेजस्वी क्रांतिकारकाचे हात मी पाहू लागलो व मनात सहज विचार आला, की ज्या हातांनी काथ्या कुटलेला आहे, खडी फोडली आहे ते हात लांबून तरी पहावयास मिळाले. मी त्यांचे हात पाहिले तो काय चमत्कार ! त्यांचे हात गुलाबासारखे लालबुंद व अतिशय टणक दिसले. हस्तिदंताप्रमाणे गोरापान चेहरा व करारी डोळे पाहून मी



भारावून गेलो. त्यांचे रात्री चाळीसगावला व्याख्यान झाले. त्यावेळी प्रचंड जनसमुदाय जमला होता. व सर्वत्र C. D. F. ची मुले त्यांचे रक्षण करीत होती. हिंदुत्वावर त्यांचे जोरदार भाषण तर झालेच, पण त्यामुळे अनेक तरुण भारावले जाऊन भागलपूर सत्याग्रहात सामील झाले. त्या तरुणांनी सांगितले की असा जोरदार सत्याग्रह आम्ही आयुष्यात पाहिला नाही व यापुढेही होणार नाही. बुटांच्या लाथा, पाठीत काठ्या बसत होत्या व सर्व वीर ' हिंदुराष्ट्रपती स्वा. तात्याराव सावरकर की जय ', ' हिंदुस्थान हिंदुओंका, नहीं किसीके बाप का. ' याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावाचून, अशी धारणा सर्वांची होती. १९४४ च्या सुमारास या महान नेत्याला पुन्हा नांदगाव ( यचे वाडा ), जि. नासिक येथे पहावयास मिळाले. असा तेजस्वी वीर, वीरशिरोमणी व क्रांतिकारकांचा मुकुटमणी न भूतो न भविष्यति ॥

• •

## २९

द. ज. सोमठाणकर
कल्याण.

## स्पर्श परिसाचा

१५ जानेवारी १९६१ रोजी पुण्यात मा. तात्यांचा ' मृत्युंजय दिन ' साजरा होणार होता. आम्ही सावरकरप्रेमी मंडळी आदल्या दिवशीच पुण्यात दाखल झालो. असंख्य सावरकरभक्त या सत्कार-समारंभास आल्याने निरनिराळ्या ठिकाणी निवासाची सोय केली होती.

दुसरे दिवशी सकाळी १० वाजता सावरकरांची गाडी केसरी कार्यालयात आली ! आम्ही हजर होतोच. तात्यांची भोजनाची, निवासाची व्यवस्था केसरी कार्यालयात वर केली होती.

केसरी कार्यालयात गेल्यावर डाव्या हाताला वर जाण्यासाठी जिना आहे. त्याच्या पायऱ्या उंच असून तो उभा आहे. तात्या गाडीतून उतरले आणि वर जाणाऱ्या जिन्याकडे पाहिले. त्यांना धस्स झालं. त्यावेळी ते ७५ वर्षांचे होते.

वर जाण्यासाठी तात्यांना कोणाचा तरी आधार हवा होता. त्यांनी एकदा जिन्या-कडे पाहिले आणि समोर उभ्या असलेल्या उपस्थितांकडे पाहिले. त्यांची ही अवस्था मी तत्काळ जाणली. आणि निमिषार्धात पुढे झालो. तात्यांनी माझ्या अंगावर हात ठेवला, आणि जिना चढून ते वर गेले....या कृतीने मी भारावून गेलो. मला धन्यता

वाटली. हा स्पर्श ज्यांना झाला असेल ते खरोखरच भाग्यवान.

त्या स्पर्शाची आठवण झाली की शरीर चैतन्यानं फुलून निघतं. आणि क्षणा-क्षणाला कणाकणातून धगधगणारं त्यांचं ज्वलंत जीवन नजरेसमोर येतं.

त्या विजयी संध्याकाळी एस. पी. कॉलेजच्या पटांगणात त्यांचं जाहीर व्याख्यान झालं! तो काळ म्हणजे त्यांच्या जीवनाची संध्याकाळच....वय वाढत होतं आणि शरीर थकत होतं. वृद्धापकाळामुळे आवाजात किरटेपणा आला होता. परंतु मुखावर सकाळचा तेजोमय सूर्य विलसत होता. अत्यंत शांत आणि गंभीरपणे बोलत होते. वाणीत सामर्थ्य होतं. उद्गारांत आवेश होता. आणि शब्दांत तडफ होती. दृष्टीसमोर स्वतंत्र भारताचं चित्र उभं होतं. देशामधला प्रत्येक नागरिक सैनिकाच्या रूपानं नजरेत भरत होता. आणि 'सैन्यात दाखल व्हा, युद्धबल वाढवा' चे प्रतिध्वनी सर्वत्र उमटत होते.

तात्याराव हे जसे स्वातंत्र्य युद्धाचे प्रणेते होते तसेच ते समाज क्रांतीचे उद्गाते होते. ते प्रतिभासंपन्न लेखक होते. साहित्य मंदिरातील सर्व दालनं त्यांनी सुशोभित केली होती. विनायक सावरकर या नावाप्रमाणे ते सर्व क्रांतिकार्यांचे सिद्ध विनायक होते.

माझ्यासारख्या सामान्य माणसाला झालेला हा स्पर्श हा जीवनामधला मोलाचा क्षण होता.

* *

## ३०

ना. वि. काकतकर

## अजून आठवते ते अद्भुत तेजदर्शन

सुमारे तीस वर्षांपूर्वीचा प्रसंग. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न धुमसत होता. एकशे पाच हुतात्म्यांची आहुती पडली होती. सरकारही अशांतच होते. या लढ्याला एक धार आली होती; युक्तिवादाच्या दृष्टीने महाराष्ट्राची बाजू बिनतोड होती....पण पंडितजींचा अजून निर्णय होत नव्हता.

त्यावेळी मी मुंबईतच 'रहस्यरंजन' या नावाचे मासिक चालवीत होतो. मासिकाने चांगलेच बाळसे धरले होते. रहस्यकथा, भयकथा, इतिहासकथा, अद्भुतरम्य, गूढकथा, न्यायालयीन सत्यकथा अशा क्रमाने विचारपूर्वक व योजनाबद्ध पद्धतीने बदल करीत निखळ साहित्याचे रूप आणले होते. मासिकाला वाङ्मयीन दर्जा मिळविला होता. सर्व वाटचालीत एक गोष्ट अभंग होती आणि ती म्हणजे स्वातंत्र्यवीर



सावरकरांचे लेखन आणि त्यांच्याविषयीचे लेख रहस्यरंजनमध्ये सातत्याने आवर्जून प्रसिद्ध होत होते.

स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकर हे माझे लहानपणापासूनचे दैवत होते. अगदी मर्मबंधातील ठेव! जोसेफ मॅझिनी, स्वातंत्र्यसमर या पुस्तकांची मी कितीतरी पारायणे केली होती. पुढे मला माझ्या भाग्याने 'सावरकर सदनात' घरच्यासारखा मुक्त प्रवेश मिळाला. तात्यांना जवळून पहायला मिळाले, सहवास लाभला, उदंड लोभही मिळाला. त्यांचा पंचाहत्तरावा वाढदिवस तोंडावर आला होता. हा वाढदिवस आपण आगळ्या पद्धतीने साजरा करावा, असे मनात घोळत होते. त्यावेळी रंगीत काय साधे कुणाकडे टी. व्ही. ही आलेले नव्हते. त्रिमिती चित्रपट तुरळक आला होता. त्यावरून मला कल्पना सुचली की, तात्यांची आपण एक अनेकमिती अशी बहुरंगी मुलाखत घ्यावी.

बहुरंगी मुलाखत म्हणजे हो काय! असे कोणीही विचारील आणि ते रास्तच आहे. सांगतो तर! तात्याराव सावरकर हे महान देशभक्त, त्यागाचा सर्वोच्च आदर्श, अलोट प्रज्ञेचे महामानव, प्रतिभेचे महाकवी, द्रष्टे समाजसुधारक, इतिहास घडविणारे तेजस्वी महापुरुष असे खूप खूप सांगता येईल. या दृष्टीने एकाच वेळी एक साहित्य समीक्षक, एक इतिहासाचा व्यासंगी, एक जीवनसौंदर्याचा अभ्यासक, एक कविमन टिपणारा कवी, एक चित्रकार, एक छायाचित्रकार अशा पाच-सहा जणांना एकत्रपणे त्यांच्याकडे घेऊन जायचे आणि मोकळेपणाने दोन-तीन तास त्यांच्या सहवासात घालवून गप्पागोष्टी करावयाच्या आणि इतिहासात नोंद करायची की स्वातंत्र्यवीर सावरकरांचा पंचाहत्तरावा वाढदिवस आम्ही प्रत्यक्ष त्यांच्या सहवासात असा साजरा केला.

बहुरंगी मुलाखतीची ही माझी कल्पना!

माझी मित्रांशी बोललो. सर्वांनाच ही कल्पना मनस्वी आवडली. मग प्रथम तात्यांना विचारून त्यांची अनुज्ञा घेतली व वेळ निश्चित केली. तात्यांचा माझ्यावरील लोभच असा विलक्षण की, ही कल्पना सांगताच त्यांनी तत्काळ अनुमती दिली. मग साहित्य समीक्षक आणि विशेषतः सावरकरांच्या वाङ्मयाचे साक्षेपी अभ्यासक डॉ. स. गं. मालशे, इतिहासाचे निरीक्षक व नवशक्तीचे त्यावेळचे सहसंपादक दि. वि. गोखले, कविमनाचे अभ्यासक कवी सदानंद रेगे, सौंदर्यशास्त्राचे अभ्यासक व चित्रकला समीक्षक प्रा. व. र. आंबेरकर, ख्यातनाम चित्रकार एम्. आर. आचरेकर आणि टाईम्स लाईफचे मुंबईतील छायाचित्रकार पुरव अशी निवडक मंडळी बरोबर घेऊन बहुरंगी मुलाखतीसाठी मी सावरकर सदनात गेलो.

प्रसन्नपणे गप्पा सुरू झाल्या. पुरव कॅमेरा सज्ज ठेवून क्षण टिपत होते. चित्रकार आचरेकर रेखाटन करीत होते. सदानंद रेगे कवीच्या दृष्टीने एका अभिजात द्रष्ट्या

कवीचे अंतर्विश्व नि सूक्ष्मातिसूक्ष्म भावतरंग अवलोकीत होते. प्रा. माळवी यांनी कुतूहल म्हणून तात्यांच्या जीवनातील एक नाजूक प्रश्न काढला; आणि मग्यांचा ओघ नाशिक, भगूर, पुणे, लंडन पॅरिस असा धावू लागला, त्यांच्या कविमनाचे, द्रष्ट्या प्रज्ञेचे, असीम देशभक्तीचे, अचूक सावधानतेचे....तेजाचे ओजाचे एक एक पैलू उघडत होते. सारे कसे थक्क करणारे, अवाक् करणारे, अद्भुत अद्भुत म्हणतात त्याचीच अनुभूती आम्हाला मिळत होती.

वेळ संपला, समाधानाने सर्वजण उठलो. उभ्या उभ्या श्री. दि. वि. गोखले यांनी एक प्रश्न विचारला, 'तात्या विचारू का?' संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबद्दल आपले काय मत आहे?'' आणि पिस्तुलातून गोळी सुटावी तसे तात्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडले. "सांगू! माझ्या दृष्टीने सांप्रत संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न क्षुद्र आहे.'

आम्ही सारेच स्तब्ध झालो, एवढ्या ज्वलंत प्रश्नाची वासलात तात्यांनी क्षुद्र शब्दाने लावावी! गोखले थोडेसे पत्रकाराच्या पेटीत म्हणाले, "तात्या हे मी छापू?"

"जरूर, जरूर छापा!" अनादि मी अनंत मी अवध्य मी म्हणणाऱ्या साक्षात निर्भयतेचे ते उत्तर. ती अक्षरे नव्हती ती तर चित्कलिकाच होती! आम्ही त्यांच्या निर्भीड, निर्भर, अविचल चेहऱ्याकडे पाहतच राहिलो. त्यांच्या नेत्रातून अद्भुत तेज उसळत होते. तात्या क्षणभर थांबून आणि ब्रह्मदंडाप्रमाणे बोट वर करून म्हणाले, "आज खरा प्रश्न आहे भारताच्या संरक्षणाचा, उत्तर सीमेच्या रक्षणाचा, आपणच उभे केलेले पाकिस्तान खोडक्यासारखे दोन बाजूंनी लचके तोडू पहातेय. डोक्यावर चीन फणा काढून फुसफुसायला लागलाय. तेव्हा आजचा खरा प्रश्न आहे, भारताच्या संरक्षणाचा. महाराष्ट्राच्या संदर्भात इतिहासाशी इमान राखून बोलायचे तर महाराष्ट्रापुढे खरा प्रश्न आहे अस्मितेचा! महाराष्ट्र उद्या संयुक्त महाराष्ट्र होईलही, पण आज तरी तो स्वतंत्र भारताचा खड्गहस्त व्हायला पाहिजे!"

पुढे महाराष्ट्र भारताचा खड्गहस्त बनला पाहिजे या शीर्षकाखाली 'रहस्यरंजन' मध्ये ही बहुरंगी मुलाखत साग्रसंगीत प्रसिद्ध झाली. त्यानंतर काही काळाने महाराष्ट्राची स्थापना झाली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले आणि थोड्याच अवधीत हा सह्याद्रीचा सिंह, मुख्यमंत्रिपद सोडून हिमालयाच्या रक्षणासाठी भारताचा संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला गेला, हा इतिहास सर्वांना माहीतच आहे.

पण त्या दिवशीचे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे ते तेजदर्शन अजून जसेच्या तसे समोर लकलकते आहे.

• •



३१

म. श्री. दीक्षित
साहित्य चळवळीतील कार्यकर्ते.

## भारावलेलं पर्व

एकोणीसशे अडतीस ते मार्च चव्वेचाळीस या काळांत शिक्षणासाठी मी नागपुरात होतो. राहात होतो महाल भागात म्हणजे नागपूरच्या सदाशिव-नारायणपेठी वातावरणात. त्यावेळची वृत्ती एकूण भावनाप्रधान. काही भव्य, उन्नत, उदात्त पाहिलं-वाचलं की मी भारावून जात असे.

१९३८ च्या हिंदुसभा अधिवेशनप्रसंगी वीर सावरकर येणार होते व त्यांना मी प्रथमच पाहणार होतो. ते आले त्यादिवशी त्यांची भव्य मिरवणूक निघाली होती. नि विमानातून त्यांच्यावर पुष्पवृष्टी होत होती. अधिवेशनातलं आणि इतरत्र झालेलं त्यांचं संजीवक वक्तृत्व ऐकून मी खरोखरी भारावून गेलो. मिसरूड फुटणारं वय हे असंच भारावून टाकणारं असतं. पुढे १९४४ नंतर मी पुण्यात स्थायिक झालो. पुण्याच्या साहित्यिक नि सांस्कृतिक वातावरणात रमू लागलो. सर्वपक्षीय नेत्यांची आणि विचारवंतांची भाषणं ऐकून माझ्या वृत्ती-प्रवृत्तीत बदल होत गेला. पक्षीय राजकारण हा आपला पिंड नसून साहित्य आणि सार्वजनिक कार्य हेच आपलं क्षेत्र आहे, हे ध्यानी आलं. अर्थात हे घडलं मुख्यतः बापूसाहेब माटे आणि दत्तो वामन पोतदार यांच्या सहवासामुळे.

पण असं काही असलं तरी पंचविशीत सावरकरांच्या राष्ट्रवादी, पुरुषार्थी, बुद्धिवादी सुधारकी विचारांचा जो प्रभाव पडला तो मनावर अजून आहे. १९४०-४१ साल असावं. कुठल्यातरी प्रसंगानिमित्त ते नागपुरास येणार होते. त्यांच्या स्वागतासाठी स्टेशनवर प्रचंड गर्दी लोटली होती. स्टेशनात गाडी येऊ लागली तशी गर्दीतले अनेक कार्यकर्ते सावरकरांच्या डब्याच्या दिशेने धावत सुटले. गाडीचा वेग कमी कमी होत होता. पुष्पमालांनी सजविलेला तो डबा दिसताच त्यांना हार घालण्यासाठी जो तो आत घुसू लागला. पण एवढ्यात एक युवक हातातल्या हारासह पाय निसटून गाडीखाली पडला आणि पाहता पाहता त्याला दुष्ट चक्रांनी चिरडून टाकले.

हा दुर्दैवी तरुण होता 'सावधान' या हातोहात खपणाऱ्या हिंदुत्वनिष्ठ साप्ताहिकाचा संपादक कै. मावकर. भाग्यप्रभु पु. भा. भावे ज्या पत्रामुळे प्रसिद्धीच्या झोतात आले, त्या पत्राचा अबोल झुंजार पत्रकार. त्याचा अकल्पित मृत्यू होताच नागपूर स्टेशनला क्षणार्धात प्रेतकळा आली. मग कसले सावरकरांचे जयघोष नि कसला सत्कार! जड पावलं टाकत कष्टी मनाने गर्दीतून वाट काढत ते बाहेर पडले.

सायंकाळी कै. मावकरांची मोठी अंत्ययात्रा निघाली. स्मशानभूमीवर त्यांना श्रद्धांजली वाहताना सावरकरांचे डोळे भरून आले नि ते चारसहाच हेलावून टाकणारी वाक्यं बोलले– हे पाहा, फार बोलण्याचा हा समय नव्हे. मावकरांनी एवढा अत्युत्साह कशाला दाखवायचा ? माझ्यापायी त्यांना अकाली मृत्यू आला. नव्हे वीरमरण आलं. खरेतर तुम्ही नागपुरकरांना तोंड न दाखवता परस्पर निघून जावं, असा माझा विचार होता. पण कर्तव्य चुकत नसतं. कितीही आपत्ती आल्या तरी ते केलं हे पाहिजेच. कै. मावकर हिंदुत्वाचे धुंदे वीर होते, पण शिव ! शिव ! ज्यांनी आम्हाला खांदे द्यायचे त्यांनाच खांदे देण्याचा आज आमच्यावर प्रसंग ! जो हार आज मावकर मला घालणार होते तोच हार मी त्यांच्या अनमोल देहावर वाहिला. क्षमा करा मला, आता अधिक बोलवत नाही. " इतकं बोलून ते खिन्न मुद्रेने कट्ट्यावर बसून राहिले. अश्रूंनी डबडबलेले त्यांचे त्यावेळचे चमकदार नेत्र मला अजून दिसताहेत. वीराने वीराला वाहिलेली अशी श्रद्धांजली माझ्या आजवर ऐकण्यापाहण्यात नाही.

१९५० च्या सुमारास सावरकरांच्या पत्नी यमुनाबाई यांचा साठावा वाढदिवस पुण्यातील भगिनींनी साजरा करण्याचं ठरविलं. मजवर त्यांचं एक छोटं चरित्र लिहिण्याची कामगिरी येऊन पडली. कै. शांताबाई गोखल्यांबरोबर दादरला मी त्यांच्या भेटीला गेलो आणि आमचा मनोदय सांगितला तेव्हा त्यांनी आम्हाला काय ऐकवावे ? थट्टेच्या सुरातच म्हणाले, " अहो, तिने काय केले म्हणून चरित्र, सत्कार हे उद्योग करता ? आणि काय हो दीक्षित, तुम्ही साहित्य परिषदेत असून तुमच्या त्या पत्रिकेत चिटणीस खजिनदार, अहवाल, किंमत, कोरम हे परकी शब्द कसे येतात ? कार्यवाह कोषाध्यक्ष, वृत्तांत, मूल्य, गणपूर्ती हे आपले शब्द का येऊ नयेत ? "

" तात्या, ते खरं आहे, पण माईंच्या सत्काराला संमती द्या. "

" करताच आहात तर करा बापडा ! पण तिला नेण्या-आणण्याचं उत्तरदायित्व तुमचं आणि हे पाहा, तिला छोटंसं भाषणही लिहून द्या. मान्य आहे ? "

आम्ही ' हो. ' म्हटलं नि त्याप्रमाणे पुढे सर्व काही थाटामाटात घडलं.

१९६६ मध्ये सावरकरांच्या मृत्यूची वार्ता कळताच शांताबाईंसह आम्ही काहीजण टॅक्सीने दादरला सावरकर सदनावर पोहोचलो. अंत्यदर्शनार्थ रीघाच रांगा लागल्या होत्या. हार घेऊन आम्ही दर्शनी खोलीत जातो तो त्या मृत्युंजयाचा पुष्पहारांनी मंडित झालेला देह पाहताच विशेषतः त्यांचे उघडे निळसर नेत्र पाहतात आम्हाला भडभडून आलं. ' ये मृत्यो, ये ' असं स्वागत करीत जणू उघड्या डोळ्यांनेच हा महाकवी मृत्यूला सामोरा गेला. त्यामुळे माझ्या जीवनातलं एक भारावलेलं पर्व संपलं.

• •



# ३२

श्री. गो. नातू
पुणे.

## सावरकरांच्या सहवासात

माझे लग्न ७ मे १९३९ रोजी झाले, त्यावेळी मी दादरच्या हिंदू कॉलनीमध्ये काही मित्रांबरोबर रहात होतो. लग्न झाल्यानंतर बिऱ्हाड करण्याकरता जागेच्या शोधात होतो. त्या वेळच्या एकंदर सांपत्तिक परिस्थितीच्या दृष्टीने कमी भाड्याची एक-दोन खोल्या असलेली जागा आम्हाला हवी होती. त्याप्रमाणे तपास करता करता शिवाजी पार्कजवळील सावरकर सदनमध्ये दोन खोल्या भाड्याने द्यावयाच्या आहेत, असे समजले व त्या निमित्ताने श्री. तात्यारावांना भेटण्याचा योग आला.

त्यावेळी येथे ब्रिटिशांचे राज्य होते. काँग्रेस, महात्मा गांधींची चळवळ जोरात चालू होती. व तात्याराव क्रांतिकारक म्हणून ठाऊक होते. अशा अद्वितीय व्यक्तीला भेटण्याचा योग आपण काँग्रेसच्या हिंदुमहासभेच्या कोणत्याही चळवळीत नसतानासुद्धा आला, याबद्दल धन्यता वाटत होती. पण तेच घराचे मालक असल्यामुळे तो योग जुळून आला एवढे खरे. मी त्यांना भेटावयास गेलो त्यावेळी ते पहिल्या मजल्यावरील अभ्यासिकेत बसले होते. त्यांचे व्यक्तिमत्व रुबाबदार व तेजस्वी होते. बोलणेही धारदार होते. त्यांनी अगोदर माझी सर्व माहिती विचारली. मी कोठे काम करतो ? पगार किती आहे ? कॉलेजमधून पास झाल्यानंतर मी एका रेशमी कापड विणणाऱ्या गिरणीमध्ये काम करत होतो व पगार ७५ रु. होता. माझ्या पत्नी कोठल्या आहेत, याचाही त्यांनी तपास केला. त्या श्री. अमरेंद्र गाडगीळांच्या भगिनी आहेत हे सांगितल्यावर त्यांना ओळख पटली. त्यावेळी त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य माणूसच जागा भाड्याने देण्याकरिता हवा होता. ते रहात होते त्याच्या बाजूलाच असलेला दोन खोल्यांचा ब्लॉक त्यांनी मला २५ रु. भाड्याने दिला व ब्लॉक सोडायच्या अगोदर एक महिना सूचना द्यावी लागेल असे सांगितले. हे आम्ही मान्य केले व जून महिन्यात तेथे रहावयास आलो.

तात्याराव, सौ. माई, व त्यांची मुले विश्वास व प्रभा वरील मजल्यावर आमच्या शेजारी व खालील मजल्यावर बाबाराव सावरकर, डॉ. सावरकर व त्यांची कुटुंबीय मंडळी रहात होती व त्यांचे शेजारी आमच्यासारख्याच असणाऱ्या ब्लॉकमध्ये एक सरकारी नोकर रहात होते. त्यांची व आमची पुढे पुष्कळच मैत्री झाली.

त्यावेळी तात्यारावांचा शरीररक्षक एक शीख होता व त्या जिन्याच्या खालील दरवाजावर उभा असावयाचा. आमच्याकडे अथवा तात्यारावांकडे कोणीही भेटावयास

आले तरी तो शीव अगोदर वर येऊन वर्दी द्यावयाचा व नंतरच लोकांना तो वर येऊन द्यावयाचा, जसे दिवस जात होते, तसे कधी कधी तात्यांशी बोलण्याचा प्रसंग यावयाचा त्यांच्या आयुष्यातील रोमांचकारी चित्तथरारक प्रसंग-वाचनात व ऐकून माहीत होते. त्यावेळी कुतुहलापोटी मी एकदा त्यांना विचारले, " तात्या, तुमच्याबद्दल एका लेखकांनी लिहिले आहे की, तुमची बोट फ्रान्सच्या किनाऱ्याकडून जात असताना फ्रान्समध्ये राजकीय संरक्षण घेण्याकरिता तुम्ही मोठ्या शिताफीने समुद्रात उडी मारली व दीड दिवस पोहत जाऊन फ्रान्सचा किनारा गाठला. हे खरे आहे का ? " ते म्हणाले, हे लेखक लोक एखाद्याचे महत्त्व वाढविण्याकरिता अतिशयोक्ती करतात. मी फक्त दीड तासच समुद्रात पोहून फ्रान्सचा किनारा गाठला होता, पण दुर्दैवाने फ्रान्सच्या सरकारने मला संरक्षण दिले नाही.

दुपारच्या वेळी सौ. माई, सौ. प्रभा ( माझी पत्नी ) गप्पा मारत बसावयाच्या. एकदा सौ. माईंनी गप्पा मारता मारता तात्यांना मिळालेली, सोन्या-चांदीची वेलबुट्टी काढलेल्या करंड्यांतून त्यांना दिलेली व माळ्यावर धूळ खात पडलेली काही मानपत्रे दाखविली. अशी शेकडो मौल्यवान मानपत्रे माळ्यावर पडलेली होती. त्यावरून आम्ही एकदा तात्यांना विचारले की, इतकी मौल्यवान सुंदर मानपत्रे अशी धूळ खात का पडलेली आहेत ? ते म्हणाले, अहो, ही सर्व मानपत्रे शोकेसमध्ये ठेवायची म्हणजे आमचे संबंध घरही पुरणार नाही, त्यामुळे ती तशीच ठेवावी लागत आहेत.

तात्या पुष्कळ वेळा सुट्टीच्या दिवशी आमच्या घरी ताजे ताक पिण्यास येत असत. आम्ही त्यांच्या चाळीत ७–८ महिनेच होतो. सौ. माई व मुले यांचे आमच्या घरी येणे-जाणे घरच्यासारखेच होते. तात्यांनीही आपण कोणी महान व्यक्ती आहोत, असे कधीही भासविले नाही.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे वैशिष्ट्य असे होते की, ते कधीही मोकळ्या वातावरणात फिरायला गेले नाहीत. तसे पाहिले तर त्यांच्या घराच्या शेजारी शिवाजी पार्क व पलीकडेच समुद्र होता. तेथे हजारो लोक फिरावयास जात असत. जेव्हा जेव्हा वेळ मिळे तेव्हा तेव्हा ते आपल्या घराच्या गच्चीवर हिंडत.

शेजारी रहाण्याचा आणखी एक लाभ असा होता की, स्वातंत्र्यवीरांना भेटण्यासाठी जे मोठे मोठे पुढारी येत त्यांचे आम्हाला नकळत दर्शन होई. त्यात वं. जमनादास मेहता, लोकनायक अणे, डॉ. मुंजे आदी असत.

• •



# २३

श्री. बाळाराव काळे
वाई.

## सावरकरांना मिळालेले पहिले मानपत्र

१९३७ चा तो काळ होता. वीर सावरकर रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून सुटून महाराष्ट्रात संचार करीत होते. पुण्याला त्यांची पहिलीच भेट होती. नगरपालिकेने त्यांना मानपत्र दिले. त्यासाठी ते नगरपालिकेच्या सभागृहात आले. येतांना त्यांना जिन्यावर नगरपालिकेचे अधिकारी अप्पासाहेब भागवत भेटले. त्यावेळी आप्पासाहेब सावरकरांना म्हणाले, " नमस्कार तात्यासाहेब, तेव्हा सावरकर म्हणाले, नमस्कार स्वीकारतो, पण तात्यासाहेब न म्हणता तात्याराव म्हणा. आप्पासाहेब म्हणाले, ठीक आहे तात्याराव. सावरकर नगरपालिकेच्या सभागृहात हळके हळके जिना चढून गेले. प्रवासामुळे थकले होते व प्रकृतीपण तितकीशी ठीक नव्हती. सकाळची वेळ होती. तरीही सावरकरांची पुण्याला भेट पहिलीच असल्याने नगरपालिकेने सभागृह भरून शेकडो लोक बाहेर उभे होते. सगळ्यांचे लक्ष वीर सावरकर काय बोलतात यावर होते. त्यांनी भाषणाला सुरुवात करताच टाळ्यांचा कडकडाट झाला. भाषणाला प्रारंभ करताना सावरकर म्हणाले, " २७ वर्षांनंतर पुण्याला माझी पहिलीच भेट आहे, त्यामुळे पूर्वीचे पुणे इतके बदलले की, मला ते ओळखणे अशक्य आले. मी केवळ शनिवारवाड्यामुळे हेच ते आपले पूर्वीचे पुणे म्हणून ओळखले. आज तुम्ही मला मानपत्र देत आहात पण माझ्या आयुष्याच्या आरंभीच्या काळात जे मी हालअपेष्टा व कष्ट भोगले त्यावेळी मला अंदमानात पाऊल टाकताच मिळालेले मानपत्र पुन्हा कधीच विसरू शकणार नाही. अंदमानच्या तुरुंगाचा प्रचंड दरवाजा उघडून गेल्यावर प्रथम मला तिथे अंदमानचा कुप्रसिद्ध बंदीपाल बारीबाबाचे दर्शन झाले.

बारीने माझ्याकडे तुच्छतेने पाहात म्हटले, " क्रांतिकारकांचे नेते सावरकर आपणच काय ? " तुरुंगातील बंदोबस्ताने व पहारेकरी व इतर अधिकारी यांच्यामुळे भयंकर दिसणारे ते बंदीगृह बघताच मनात थोडासा घाबरलेला असा मी इतक्या जोरात बारीला उत्तर दिले, " होय ! तोच मी. " बारीने यानंतर माझ्या हातापायांना बेड्या ठोकण्यास व कमरेपासून खालपर्यंत सोडलेली लोखंडी दांडा असलेली बेडी माझ्या कमरेला व पायांना बांधण्याची शिपायांना अनुज्ञा दिली. त्याचवेळी अंदमानच्या तुरुंगातील एक बंदी म्हणून ५० वर्षांची शिक्षा ज्याच्यावर नोंदली आहे, असा एक छोटा फलक माझ्या हाती दिला. बारी म्हणाला, " सावरकर ! तुझ्या हातात दिलेले हे हिस्ट्री तिकीट आहे व त्यावर ५० वर्षांची शिक्षा अंकीत केली आहे, व आता ५० वर्षांनंतर या बंदीशाळेतून सुटका ! कदाचित् या बंदीशाळेतील हालअपेष्टांनी मध्यंतरी

तुझा मृत्यू झाला, तर ज्या दरवाज्यातून तू जिवंत आत शिरलास त्याच दरवाज्यातून तुझे प्रेत नेण्यात येईल हे लक्षात ठेव !" माझ्या हातातले ते हिस्ट्री तिकीट उंचावीत मी म्हणालो, "तुम्ही माझी ५० वर्षांनंतर सुटका होईल, असे सांगितलेले ऐकले, पण माझ्यापुढे प्रश्न असा आहे की, ५० वर्षांनंतर सुटका करण्यास त्यावेळी ब्रिटिशांचे राज्य असणार काय ?" हा माझा प्रश्न ऐकून बंदीपाळ कोणी एखादा धक्का बसावा तसा चमकला. आता यापुढे मला शेकडो पुष्पहार व मानपत्रे मिळतील, पण माझ्या आयुष्याच्या प्रारंभी अंदमानच्या बंदीगृहाच्या दरवाज्यात माझ्यावर चढविण्यात आलेले दंडाबेड्यांचे अलंकार व ५० वर्षांची शिक्षा सांगणारा तो करारनामा हे माझ्या आयुष्यातील पहिला अविस्मरणीय सत्कार व मानपत्र होय !

• •

३४

सौ. निशा पाठक
नागपूर.

## कार्याशी एकरूप होणारे सावरकर

आमची पिढी खरंच भाग्यवान ! आम्ही स्वातंत्र्यवीर सावरकरांना पाहिलं-बालांधवांना पाहिलं हे केवढं आमचं भाग्य ! साल आठवत नाही, पण नागपूरच्या चिटणीस पार्कमध्ये अलोट गर्दीत झालेलं स्वातंत्र्यवीरांचं स्वागत अजूनही आठवतं श्रीनाथ गगन बालकालयाकडे आम्ही त्यांच्याच बालिका त्यांचं 'अखिल हिंदू विजयध्वज' हे गीत म्हणायला गेलो होतो. त्यामुळे व्यासपीठावर बसून सावरकरांना जवळून बघता आलं. आमच्यातील बांता बोरकर नावाच्या मुलीनं त्यांना पुष्पहार घालताना "श्रीनाथ गगन बालकालयाकडे मी ही पुष्पमाला स्वातंत्र्यवीर सावरकरांना अर्पण करते" असं म्हणून त्यांना हार घातला त्यावेळी तिच्या धीटपणाचं कौतुक करीत करीत त्यांनी तिच्या पाठीवर हात ठेवून विचारलं, "नाव काय बाळ तुझं ?"

इथेच प्रसंगीची एक गमतीदार आठवण माझे बंधू (ह. ग. कठाळे) सांगतात की ते बोलताना मुळीच इकडे तिकडे लक्ष नव्हते आणि भाषण देताना त्यांच्या धोतराचा कासोटा सुटला तरीही त्यांना भान नव्हते. शेवटी मागून कुणीतरी त्यांचा कासोटा खोचून दिला. तरीही ते बोलताना मुळीच विचलित झाले नाहीत केवढी ही तादात्म्यता !

नागपूरला हिंदूमहासभेचं अधिवेशन झालं त्यावेळी आम्ही मुली हिंदूचे एकता



गान नि वंदेमातरम् म्हणायला गेलो होतो. शेरवानी काळी, पांढरे शुभ्र धोतर नि बूट परिधान केलेली, डोळ्यांवर चष्मा नि डोक्यावर काळी गोल टोपी असलेली अशी ती स्वातंत्र्यवीरांची मूर्ती आजही इतक्या वर्षांनंतर आठवण येताच डोळ्यांसमोर तरळू लागते. मी त्यावेळी १०।१२ वर्षांची असेन. ते काय बोलले ते समजण्याइतकी माझी बुद्धी त्यावेळी प्रगल्भ झालेली नव्हती तरीही एक गोष्ट निश्चितपणाने आठवते की धबधब्याची संततधार की जी आवाज करीत पडत असावी तशी त्या शब्दप्रवाहाला एक विलक्षण गती होती. प्रभावी नि अत्यंत ओजस्वी अशी ती वाणी जिवाचे कान करून ऐकत रहावीशी वाटत होती. सारा श्रोतृवर्गही जणू मंत्रमुग्ध झाला होता.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आत्मार्पणानंतर आम्ही काही भगिनींनी महाविद्यालयीन मुलींना सोबत घेऊन 'सावरकर दर्शन' हा एक भव्य कार्यक्रम काढायला सादर केला. एक दिवस त्यांच्याकडून सावरकरांच्या कविता बसवून घेत असताना मी वरील आठवणी त्यांना सांगितल्या त्यावेळी त्या मुलीसुद्धा "खरंच ! किती भाग्यवान हो तुम्ही" ! असं म्हणत भारावलेल्या नजरेनं माझ्याकडे बघत राहिल्या. पंढरीच्या पांडुरंगाचं दर्शन घेऊन आलेल्या एखाद्या भक्ताकडे दुसरा एखादा भाविक माणूस ज्या भक्तीनं बघून नतमस्तक होतो तसाच काहीसा भाव त्यांच्या डोळ्यांतून ओसंडत होता. ही किमया माझी नव्हती, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मोठेपणाची होती. त्यांचं माहात्म्यदर्शन घेत असताना आम्ही सामान्य जणी काही उंचावून गेलो होतो. एक महिना कार्यक्रमाची तयारी करीत असताना अनुभवलेले ते भारावलेले दिवस दैनंदिन जीवनात वेगळेच काहीतरी देऊन गेले. !!

• •

३५

श्री. बा. गोकुळे
पुणे.

## दसऱ्याचे खरे सोने

मी १९३५ साली दादर येथे रहात असताना कै. उपाध्ये लॅमिंग्टन रोडीवर लहानपणीचे एक आरोपी यांच्याकडून 'माझी जन्मठेप' (काळे पाणी) हे पुस्तक वाचावयास मिळाले. ते पुस्तक वाचल्यावर मला त्या सावरकरांबद्दल आत्यंतिक प्रेम वाटावयास लागले. १९३७ नंतर मी त्यांची व्याख्याने ऐकली व पुस्तके पण वाचली. त्यांना स्वतः भेटावे, अशी इच्छा झाली व त्याप्रमाणे मी त्यांना भेटलो तो दिवस दसऱ्याचा होता. त्यामुळे त्यांना सोने पण वाहावयास मिळाले. मी

त्यांच्याकडे गेलो त्यावेळी ते घरात होते. मी त्यांना नमस्कार केला व सोने दिले. सोने देताना आपटयांच्या पानातून अर्ध्या तोळ्याची अंगठी लपवली होती, ते सोने घेतल्यावर त्यांना अंगठी मिळाली. ती त्यांनी मला परत दिली व म्हणाले खूप मोठे व्हा, पैसे मिळवा, मग मी तुमच्याकडून पैसे मागून घेईन. आता मला एक रुपया द्या, तेवढा मला पुरे.

• •

## २६


आ. ग. साळवी
रत्नागिरी.


## सावरकरांचा प्रभावी प्रचार

स्वा. सावरकर हे रत्नागिरीस सन १९२४ ते १९३७ पर्यंत स्थानबद्ध होते. या काळात आमच्या भाग्याने त्यांच्याशी ओळख होऊन त्यांना जवळून पाहण्याचा योग आम्हाला लाभला. त्या काळात त्यांनी सामाजिक क्रांतीसाठी जी भाषणे केली, लेख लिहिले, व्यक्तीव्यक्तीशी चर्चा केल्या त्या ऐकण्याचा योग आम्हाला लाभला. सावरकर सखोल विचाराने, त्यांनी केलेली भाषणेही अत्यंत आवेशपूर्ण, बुद्धिवादी व चिकित्सक अशी असत. कोणाची भीड-मुर्वत ठेवता भारतीय संस्कृतीवरील प्रेमाने विज्ञाननिष्ठ दृष्टिकोणातून ते भारतीय जनतेस मार्गदर्शन करीत असत. त्यांची योग्यता जागतिक महापुरुषाची आहे, हे कळण्याची त्यावेळी आमच्यात पात्रता नव्हती. त्या काळात देशातील थोर थोर माणसे साहित्यिक, देशभक्त, तत्त्वज्ञानी, राजकारणी रत्नागिरीला भेट देऊन गेली. कोणी उघड, तर कोणी गुप्तपणे आले. तात्याराव राजकारणविशारद तसेच ते समाजकारणविशारद होते. ते नेहमी म्हणत असत, राजकीय सुधारणेपेक्षा सामाजिक सुधारणा करणे कठीण असते. त्यांची भाषणे तोफेतून सुटणाऱ्या गोळ्याप्रमाणे शब्दांच्या भडीमाराने श्रोत्यांच्या अंतःकरणास भेदून जात. विरोध करण्याकरता आलेले हतबल होत व विरोधकाचे विचार सोडून अनुयायी होत. आज कोणी वक्ते या शहरात आले बोलके की, आमच्या कानाला निरस वाटते. अशी ही अमोघ वाणी, विद्वत्ताप्रचुर भाषणशैली आजही कानाशी गुणगुणते, "तुका आकाशाएवढा" तशी या वीराची योग्यता आकाशाएवढी आहे हे आता कळते.

त्या काळातील स्वदेशीवरील निष्ठेइतक्या आवेशाने ते बोलत होते. आपले म्हणणे दुसऱ्यावर ठसवण्यासाठी समोर किती माणसे आहेत हे न पाहता आपल्या



बिनतोड युक्तिवादाने, केव्हा हसतमुखाने, तर कधी आवेशपूर्ण बोलत असत. त्यांच्या अशा बोलण्याने माझे मन भारावले. मी माझे विचार निश्चित केले. मी भाषाशुद्धी व स्वदेशी यांचा पूर्ण अभिमानी बनलो. माझी मानसिक क्रांती झाली व पुढील आयुष्यात तसे वागण्याचे ठरविले.

• •

## २७


श्री. वा. रा. जोशी
कऱ्हाड.


## स्वा. सावरकर यांच्या आठवणी

### अस्पृश्यतेविरोधी प्रचार

१९३०-३१ चा सुमार. मी मेडिकलला होतो. पहिल्या वर्षाची परीक्षा संपून बोटीने प्रथमच मुंबईच्या भाऊच्या धक्क्यावरून रत्नागिरीला गेलो. थोरले बंधू तेथे इंजिनियर होते. पतितपावन मंदिर पाहण्यास दुपारी एकटाच गेलो. दर्शन घेतल्यावर बाहेरचे फोटो कुतूहलाने पाहण्यात रमलो होतो. स्वा. तात्यारावांनी पाठीवर हात ठेवून कुठला कोण, म्हणून चौकशी केली. तेव्हा ज्यांचे मला कुतूहल होते तेच ते महापुरुष हे समजले.

त्यांनी मला विचारले, बाहेरच्या कोपऱ्यात पूर्ण स्पृश्याचे हॉटेल आहे, त्या ठिकाणी चहा घेणार का? मी गोंधळलो; पण लगेच त्यांच्याबरोबर तेथे चहा घेतला. त्यांना समाधान वाटल्याचे दिसले.

### हिंदुसभा कार्यकर्त्यांचा निर्भयपणा

डॉक्टर झाल्यावर १९४९ साली मुंबईला गेलो. त्यांना भेटण्याची अनिवार इच्छा होती. सकाळची वेळ. बाजारातून चांगली फळे, हार घेऊन सावरकर सदनात चौकशी सुरू केली, तो तेच नेमके जिन्यात होते. शेजारी लहान मुलगी होती. त्यांना मी हार-फळे दिली व मी कऱ्हाड हिंदुसभेचा पदाधिकारी आहे, हे सांगितले. त्यांनी लगेच गांधी-दंगलीत किरकोळ त्रास झाला, म्हणून विचारले. मी गारवडे येथील आमचा मोठा वाडा जाळला, आमचे खून झाले अशा बातम्या सांगितल्या. कऱ्हाडला आम्ही १० दिवस घराबाहेर पडलो नाही. त्यावेळी मनावरील दडपण गेले व मी पुन्हा हिंदुसभेच्या प्रवाहात सामील झालो, ते अगदी निर्भयपणे, असे सांगितले.

तात्याराव १९५७ ला स्वातंत्र्य समराची शताब्दी करण्यासाठी दिल्लीला आले, ते बॉम्बे सेंट्रलहून आमच्याच रेल्वेने. त्यांना दिल्ली स्थानकावर जयजयकार व प्रचंड सभा व हिंदुसभा भवन पाहून मी त्यांच्या व्यक्तिमत्वाने इतका भारावलो की, आपल्या हातून काही भव्य-दिव्य व्हावे, अशी टोचणी लागली व त्याचेच फळ मी जोशी बंधू शुद्धी संघटना करून वास्तू बांधू शकलो व आज तीन वर्षे त्यातून मला द. म. ६०० रु. देता येऊ लागले व ते यापुढे अव्याहत जातील.

### भावनापूर्ण स्वभाव

तात्याराव गेल्याची बातमी आली. मी अस्वस्थ झालो. लगेच टॅक्सी काढून सौ. ताई दातार, मधुकर मराठे, मी व केळकर मुंबईला गेलो. दर्शनासाठी मोठा क्यू होता, पण दर्शन झाल्यावर मी इतका भारावलो की, मला गहिवरून आले. खूप वेळ मला तो वेग आवरेना. ईशान्येच्या बाहेरच्या कोपऱ्यात मी त्या स्थितीत होतो. लोकांनी मला सांत्वनपर थोपटून पाहिले, पण ते सहन करण्यास मला बराच वेळ लागला.

* *

श्रीकृष्ण त्र्यं. खांडूरकर
उचगाव.

## ३८

## क्रांतिकारकांच्या अध्वर्यूने दिलेला आशीर्वाद

नक्की साल आठवत नाही. त्यावेळी मी असेन दहा-बारा वर्षांचा. माझे वडील आणि त्यांची एक-दोन स्नेही मंडळी स्वा. सावरकरांना भेटायला जाणार होती. त्यावेळी आम्ही पुण्यात रहात होतो आणि सावरकरांचा मुक्कामही पुण्यातच होता. माझे वडील सावरकरांचे निस्सीम भक्त! त्यामुळे सावरकरांचे एकूण सर्व चरित्र आमच्या घरातील बहिणी-भावंडांना ज्ञानेश्वरीसारखे अगदी मुखोद्गत! वडील सावरकरांना भेटायला जाणार हे कळताच सावरकरांनी बोटीतून मारलेली उडी हा चित्तथरारक प्रसंग माझ्या बालमनावर उमटू लागला आणि मी वडिलांजवळ हट्ट धरला.

'मीही येणार तुमच्याबरोबर सावरकरांना भेटायला!' वडील सुरुवातीला तयार होईनात हे पाहून आई म्हणाली, 'जा ना त्याला पण घेऊन, अनायासे हा कपिला-षष्ठीचा योग आला आहे तर त्या महान विभूतीच्या पायावर घालून आणा त्याला!' आणि वडील या गोष्टीला तयार झाल्यावर माझा आनंद गगनात मावेना.



सावरकरांना भेटायला जायचे म्हणून वडिलांनी आदले दिवशी पुण्याच्या मंडई-तून चांगल्या हापूसच्या आंब्यांची एक करंडी व फुलांचा एक हार, गुच्छ इ. साहित्य आणून ठेवले होते ते घेऊन आम्ही सावरकरांच्या भेटीला निघालो.

आम्ही सावरकरांच्या घरी पोहोचलो तेव्हा सावरकर देवपूजा करीत होते. आम्ही बाहेरच्या हॉलमध्ये त्यांची मार्गप्रतीक्षा करीत बसलो. आम्हाला फार वेळ थांबावे लागले नाही. लगेच सावरकर बाहेरच्या हॉलमध्ये प्रवेश करते झाले.

सावरकरांची कृश पण गोरीपान तरतरीत मूर्ती पाहून आम्ही सर्व जण आदराने उठून उभे राहिलो.

नमस्कार चमत्कार झाल्यानंतर माझ्याकडे बोट दाखवीत माझे वडील सावर-करांना म्हणाले,

'हा माझा थोरला मुलगा.' यावर मी लगेच सावरकरांच्या पुढे जाऊन त्यांच्या पायावर डोके ठेवून त्यांना नमस्कार केला.

माझ्या दोन्ही दंडाला धरून मला उभे करीत सावरकरांनी माझे नाव विचारले. कितवीत आहेस वगैरे विचारल्यावर माझ्या पाठीवर हात फिरवीत ते मला म्हणाले,

'खूप शिका, मोठे झाल्यावर देशासाठी कार्य करा! हाच माझा तुला उपदेश आणि आशीर्वाद!'

आणि असा आशीर्वाद देऊन करंडीतले चार आंबे काढून त्यांनी मला दिले.

एका तेजस्वी पराक्रमी, महान विभूतीचा मला बालपणात मिळालेला आशीर्वाद नि प्रसाद मी कधीच विसरू शकत नाही.

* *

वि. बा. तानवडे
श्रीसिद्धेश्वर-कुरोली
जि. सातारा.

## ३९

## कोटयवधी लोकांचे हृदयसम्राट

सन १९५९ साली मला या युगपुरुषाचे पुण्यात दर्शन घडले. गर्दीमुळे मला जास्त जवळ जाता आले नाही. या युगपुरुषाचे दर्शन तरी घडले हे मी माझे पूर्व पुण्य समजतो. थकलेली पण दिव्य तेजस्वी मूर्ती माझ्या डोळ्यांसमोर अजूनही तरळत आहे. धोतर, कोट, चष्मा व काळी टोपी हा त्यांचा पेहराव.

तात्या म्हणजे जगातील एक महान ज्वलंत आश्चर्य. या धीरोदात्त पुरुषाने

समुद्रात पोहून दीड मैल कापले. यांच्या क्रांतिकारक कृत्यांमुळे ५० वर्षांच्या प्रदीर्घ अशा दोन जन्मठेपींच्या शिक्षेचा अभिनव असा निर्णय न्यायालयाला देणे भाग पडले. अंदमानात गेल्यावर तेथील कारागृहाचा मुख्याधिकारी बारीबाबा हुकमी आवाजात म्हणाला, 'Where is Savarkar?' तेव्हा तात्याराव तितक्याच खणखणीत आवाजात म्हणाले, 'I am here' बारीबाबा म्हणजे प्रत्यक्ष यमदूतच, पण त्यालाही ते घाबरले नाहीत. महाकवी कालिदासानंतर महाकवी सावरकरच! त्यांनी आपली अनंत व देशभक्तीपर काव्ये अंदमानातील कारागृहाच्या भिंतीवर लिहून ती पाठ केली. कोणता कवी या कसोटीस उतरेल? शिवुष्य व कीर्ती हाच त्यांचा मंत्र होता व तो त्यांनी आयुष्यभर कृतीत घडवून कसोशीने पाळला.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिताच त्यांनी जन्म घेतला होता. पण स्वराज्यात म. गांधी खून खटल्यात त्यांना मुद्दाम गोवले गेले. त्यामुळे त्यांचे स्वास्थ्य हरपले. न्यायालयाने मात्र त्यांना निर्दोष मुक्त केले. मगर येथील त्यांची स्थावर इस्टेट सुद्धा त्यांना स्वराज्यात मुक्तापुन्हा मिळाली नाही. हे आमचे राज्यकर्ते!

'सत्यमेव जयते' मंत्राचे पालन खऱ्या अर्थाने त्यांनीच केले. त्यांनी सत्तेची व खुर्चीची इच्छा केव्हाच केली नाही, तरी ते कोट्यवधी लोकांचे हृदयसम्राट झाले. अशा या युगपुरुषास कोटी कोटी प्रणाम....

राष्ट्रक्रान्तैरग्रदूतम् शास्त्रतंत्र प्रवर्तकम्
आचार्यम् भारतस्य तं नमामि विनायकम् ॥

• •

डॉ. नी. ग. तळवलकर
मुंबई.

## ४०

## वैराग्यशील सावरकर

सौ. माई पहिल्यांदा रुग्णालयात आल्या ते जुलै १९५६ रोजी. पाठीच्या एक्सरेवरून कर्करोग असावा म्हणून. परंतु तो सुदैवाने टी.बी. निघाला. त्या सुमारे तीन महिने होत्या. सावरकर बहुतेक चारचे सुमारास येत. एखादा तास थांबत असत व परत जात असत. आल्याचा काही गाजावाजा नसे 'मा भूत स्वण पीडेती परिमेय पुरःस्सरः' असे येत. पुष्कळवेळा मला कळतही नसे. डॉक्टर करीत आहेत त्यात मला मध्ये पडण्याची जरूर नाही अशी त्यांची विचारसरणी असावी म्हणून त्यांनी केव्हाही ट्रीटमेंटमध्ये हस्तक्षेप केला नाही.



बोलताना आपण मराठी शब्द वापरावेत याबद्दल सावरकरांचा फार कटाक्ष असे. नेहमीच्या बोलण्यात ट्रीटमेंट, ऑपरेशन, इंजेक्शन, कॉट इ. शब्द आल्यास ते लगेच मराठी शब्द सुचवीत असत.

तेव्हाची त्यांची शरीरयष्टी नाजूक, आवाज मृदू व हालअपेष्टांत आयुष्य गेल्यामुळे डोळ्यांवरचे तेजही गेले असल्यामुळे हा किरकोळ दिसणारा माणूस याने ब्रिटिश साम्राज्याला कसे हादरवून सोडले असेल असे वाटले.

सौ. माई ६ ऑक्टोबर १९५६ रोजी घरी गेल्या तो पाठीचा पट्टा घेऊनच गेल्या. मी घरी २-३ वेळा गेलो होतो. तेथे बंदोबस्त कडक असे. वरतून परवानगी आल्याशिवाय जिन्यावर पाय ठेवता येत नसे.

सौ. माई दुसऱ्यांदा आल्या, ऑक्टोबर १९६४ मध्ये. यावेळची स्थिती निराळी होती. त्यांना फुफ्फुसाचा कर्करोग होता. बरे होण्याची शक्यता नव्हती. यावेळेस त्या दोन महिने होत्या व आमच्या रुग्णालयातच त्यांना अंत झाला. या दोन महिन्यांत सावरकर सौ. माईंस भेटण्यास मुळीच आले नाहीत, असे म्हणतात की, घरून निघतानाच त्यांनी माईंना निरोप दिला होता व त्या गेल्यावरसुद्धा ते रुग्णालयात आले नव्हते. इतर मंडळींनी येऊन बिलकूल गाजावाजा न करता सौ. माईंचा पार्थिव देह नेला. परंतु सावरकर हृदय जितके कठीण करू शकत होते, तितकेच मृदू अंतःकरणाचे होते.

वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि
लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति

या अशा थोड्या आठवणी आहेत.

• •

## ४१

श्री. क. वि. देवधर
मुंबई.

## कार्यकर्त्याला आकृष्ट करून घेणारे स्वा. सावरकर

साल १९३६-३७ असावे. कूपर मंत्रि-मंडळाने, अर्थमंत्री श्री. जमनादास मेहता यांच्या खटपटीने स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून अनिर्बंध अशी सुटका झाल्यानंतर तेथूनच त्यांच्या दौऱ्यास प्रारंभ झाला. सर्व जनतेचे लक्ष ते आता कोणत्या राजकीय पक्षात जाणार की स्वतंत्ररीत्या काही चळवळ करणार या ठिकाणी केंद्रीभूत झालेले होते. स्वातंत्र्यवीरांनी आपले धोरण जाहीर केल्यानंतर अनेक शहरांतून त्यांच्या भव्य मिरवणुकी निघाल्या. काँग्रेसवाल्यांना हे आवडले नाही.

५

त्यांची अपेक्षा ही की, ते काँग्रेसमध्ये येतील व त्यांनी आरंभिलेल्या स्वातंत्र्यलढ्यात ते हिरीरीने भाग घेतील व नेतृत्व स्वीकारतील. परंतु सावरकरांनी हिंदू महासभेचे पुनरुज्जीवन करण्याचे ध्येय-धोरण जाहीर केले.

१९३७ मध्ये त्यांचा प्रथमच मुंबईतील भव्य सत्कार झाला व मिरवणूक काढण्यात आली. कॉ. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा गिरगावातील 'श्रीकृष्ण-टॉकीज' मध्ये भव्य सत्कार झाला व प्रमुख वक्ते होते, मल्याळ प्रल्हाद केशव अत्रे! त्याच सुमारास सावरकरांचे ग्रँट रोड येथे सेंट रॉबर्ट मनी हायस्कूलच्या पटांगणात "लेखण्या मोडा नि तलवारी हाती घ्या." या आशयाचे भाषण झाले. व्याख्यानास प्रचंड गर्दी होती.

डॉ. ना. दा. सावरकर यांचा माझ्याशी परिचय झाला होता. १९३४-३५ मध्येच व संघाचे त्यावेळचे तात्पुरते कार्यालयही तेथेच होते व माझी तेथे ये-जा होती. त्यामुळे डॉ. सावरकरांशी गप्पागोष्टी करण्यात मला धन्यता वाटे. १९३८ मध्ये "लोकशाही स्वराज्य पक्षाचे" सोलापूर येथे अधिवेशनात मान्यवर नेते तात्यासाहेब केळकर, आप्पासाहेब भोपटकर, रामभाऊ राजवाडे, नानासाहेब रुपर्डी, बॅ. जमनादास मेहता, इत्यादी अनेक दिग्गज श्रेष्ठ मंडळी उपस्थित रहाणार होती. या अधिवेशनास स्वा. सावरकर देही जाण्यास निघाले असताना दादर स्थानकावर मीही सोलापूर येथे काही इतर कामाकरिता त्याच गाडीने जाणार असल्यामुळे मी कुर्ला येथून लोकलमधून दादरला उतरत असतानाच डॉ. सावरकर व स्वातंत्र्यवीर सावरकर यांना बसलेले पाहिले. डॉ. सावरकरांना मी नमस्कार करताच त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांना माझा परिचय करून, देऊन मी कुर्ला येथील एक संघ कार्यकर्ता आहे असे सांगितले. स्वातंत्र्यवीरांनी मला प्रश्न केला की कुर्ला येथे हिंदुमहासभेची शाखा व कार्य आहे काय? मी त्यांना सांगितले की, कुर्ला हे एक सुमारे तीस हजार वस्तीचे अत्यंत गरीब व मागासवर्गीयांचे व बहुतांश गिरणी कामगारांचे शहर असून त्यात ५० प्रतिशत मुसलमान वस्ती आहे. अलीकडेच येथे संघकार्य चालू झालेले असल्यामुळे येथील संघकार्य एक-दोन वर्षातच चांगले वाढू लागलेले आहे. या समाजातील निरनिराळ्या स्तरांतील तरुण व बाल संघकार्याकडे आकृष्ट झालेले आहेत. त्यातच आमचा बराचसा वेळ जातो इत्यादि ही माहिती मी स्वातंत्र्यवीर सावरकर यांना सांगितली. त्यावर ते एवढेच म्हणाले की, संघकार्य हेही एक उत्कृष्ट कार्य आहे. व हे कार्यही मोठ्या प्रमाणात वाढले पाहिजे; असे म्हणून त्यांनी मला प्रोत्साहन दिले. गाडी आल्यावर सोलापूरला जाण्याकरिता आम्ही निरनिराळ्या डब्यात प्रवेश घेतला.

साधारण पहाटे पहाटे उजाडत असतानाच 'कुर्डुवाडी' स्थानकावर उतरावे, तोंड धुवून चहा घ्यावा, या विचारात मी असताना बाहेरून 'देवधर, अहो देवधर!' असे कोणीतरी हाका मारीत होते. म्हणून घाईघाईने स्थानकावर उतरलो, तो समोर डॉ. सावरकर मला घाईघाईने म्हणाले की, चला लौकर. तात्या तुमच्यासाठी चहा



घ्यावयाचे थांबलेले आहेत. नंतर स्वातंत्र्यवीर व डॉ. यांच्याबरोबर मी चहा घेतला व त्यांच्याविषयी माझे मन कौतुकाने व मोठेपणाने भारून गेले.

लो. स्व. पक्षाचे अधिवेशन झाल्यानंतर सर्व मंडळी पुण्यास 'हिंदु युवक संघ' यांनी आयोजिलेल्या परिषदेस उपस्थित झाली. प्रमुख आकर्षण होते प्रचंड मिरवणूक! श्रीमद् जगद्गुरु शंकराचार्य, प. पू. डॉ. हेडगेवार व स्वातंत्र्यवीर सावरकर या तिघांची प्रचंड मिरवणूक पुणे येथे निघाली. गुलाल उधळीत, चौघडा-वाजंत्रीसह निघालेली, लाखो लोकांनी भाग घेतलेली ही मिरवणूक म्हणजे अविस्मरणीय अशा थाटाची!

इतके प्रकाशमान देदीप्य असे नेतृत्व लाभले असताना हिंदुमहासभेचा प्रभाव देशात का झाला नाही याचेच आश्चर्य वाटते. जर स्वातंत्र्यवीर सावरकर काँग्रेसमध्ये शिरते तर ते श्री. गांधी व नेहरू यांना पचविता आले नसते व त्यांचीही नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याप्रमाणेच अवस्था झाली असती काय?

स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भाषणे प्रचंड गर्दीने लोकांनी ऐकली. ज्वाज्वल्य देशभक्तीने भारलेली अशी व्याख्याने ऐकून जनतेवर पडलेल्या प्रभावाचा फायदा मला वाटते, त्यांचे अनुयायांनी म्हणजेच हिंदुमहासभेतील युवकांनी घेतला नाही व ही चळवळ तळा-गाळापर्यंत व समाजातील सर्व स्तरांमध्ये पोचवू शकले नाहीत व हे कार्यकर्ते युवक बनले ते 'व्यक्तिनिष्ठ' व केवळ सावरकरवादीच!

या थोर स्वातंत्र्यवीरास व प्रखर देशभक्तास शतशः प्रणाम!!

• •

## ४२

श्रीकृष्ण व्यंकटेश अंबूरकर
मु. पो. उचगाव
ता. करवीर, जि. कोल्हापूर

## सावरकर : पहिले नि एकमेव भारतीय देशभक्त

माझे वडील कट्टर सावरकरभक्त होते. स्वा. सावरकरांच्या जीवनावर 'शत्रूच्या गोटात सावरकर' या नावाचा तीन-साडेतीनशे पृष्ठांचा सुंदर ग्रंथही त्यांनी लिहिला आहे. माझ्या वडिलांच्या बरोबर दोन वेळा मला स्वा. वीर सावरकरांच्या दर्शनाचा, त्यांना जवळून पाहण्याचा योग आला आहे!

कै. स्वा. वीर वि. दा. सावरकर यांचे सारेच आयुष्य प्रखर ज्वलंत देशभक्तीने ओथंबलेले असल्यामुळे ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून आणि स्वकीय राज्यकर्त्यांकडून त्यांच्या वाट्याला अनन्वित हालअपेष्टा, कष्ट, मानहानी आणि उपहास सहन करण्याचे अनेक प्रसंग आणविले गेले. अंदमानच्या रोगट नि कुबट हवेत वर्षानुवर्षे तेलाच्या घाण्याला

कोंडून, काळ्या कुटडीत डांबून राज्यकर्त्यांनी त्यांच्या आयुष्यातला ऐन तारुण्याचा कालखंड पिचून काढला आणि सहनशक्तीचा अतिरेक केला. उभ्या भारतात राज्यकर्त्यांना शह देण्यात, निष्णात शत्रूचा पवित्रा ओळखून तो परतविण्यात कुशल, शाठ्यं प्रति शाठ्यं ही प्रतीकात्मक तंत्रप्रणाली आणि पारतंत्र्याचा निःपात करण्यासाठी सौम्य वा उग्र, वैध वा अवैध अशा कोणत्याच मार्गांचा राज्यकर्त्यांवर परिणाम होत नाही, असे अनुभवाला आल्यानंतर सशस्त्र क्रांतीची मशाल पेटवून त्या मशालीच्या सहाय्याने देशस्वातंत्र्याचे ध्येय साध्य करून घेण्यासाठी शक्ती, युक्ती आणि कृती या मार्गांचा अवलंब करणारे, राज्यकर्त्यांची कुटिल, कपट राजनीती जगाच्या वेशीवर टांगून बिलंदरात त्याची नाचक्की करणारे स्वातंत्र्यवीर सावरकर हेच पहिले नि एकमेव भारतीय देशभक्त होत !

• •

## ४३

एन. जी. भावे
अकोला ( M. S. )

### सावरकरांचा साधेपणा

वि. सावरकर जेलमधून सुटल्यानंतर महाराष्ट्र, विदर्भ या भागात बऱ्याच ठिकाणी त्यांचे स्वागतपर दर्शन झाले.

चांदा जिल्ह्यात नवरगाव नावाचे एक गाव आहे. तिथे ते येणार म्हणून मला कळले त्यावेळी मी चिमोर या गावी रहात होतो, तर तिथून चालत त्यांच्या दर्शनाकरिता गेलो; कारण त्या काळात तिकडे जाण्यायेण्याची काहीच सोय नव्हती. त्यावेळेला मी विद्यार्थी होतो.

तेव्हा त्यांचे दर्शन घेतले आणि सावरकरांना आमच्या गावास म्हणजे चिमोरला येण्याचे आमंत्रण दिले आणि एक प्रश्न केला की, ज्यावेळेला आपण इंग्लंडला राउंड टेबल कॉन्फरन्सला गेलो होतो त्यावेळेला कोण्या इंग्रज माणसाने ब्लडी ब्लॅक इंडियन्स असे म्हटले होते, असे मला कळले आणि आपण त्यांच्यावर थिस इज इंडियन स्टिक, म्हणून उगारली ही गोष्ट सत्य आहे काय ?

तेव्हा ते हसले आणि माझ्या पाठीवरून हात फिरवला. एका छोट्या पानदानात काजू किसमिस ठेवला होता, तो सर्व मला दिला आणि मी येईन, असे म्हटले. परंतु नंतर त्या भागात ते येऊ शकले नाहीत.

• •



## ४४

डॉ. रा. ल. परांजपे
नागपूर १८, ४४००१८

### स्वतःच्या हालअपेष्टांविषयी सावरकरांची निःस्पृहवृत्ती

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या आयुष्यातली अत्यंत रोमांचकारी घटना म्हणजे फ्रेंच किनाऱ्याजवळ त्यांना बंदिवान म्हणून नेणाऱ्या बोटीच्या संडासाच्या पोर्ट होल-मधून अंगाला साबण लावून मारलेली त्यांची धाडसी उडी. ज्या बोटीतून उडी मारली तिच्यापासून किनारा किती दूर होता याबद्दल अनेक आख्यायिका मी वाचल्या व ऐकल्या होत्या. जास्तीत जास्त दोन फर्लांगापर्यंत अंतर होते, अशी ही लोकांची समजूत होती. १९३६ साली स्वा. सावरकर नागपूरला आले असता श्रीमंत बाळासाहेब चिटणीस यांच्याकडे त्यांना मेजवानी झाली. निमंत्रितांत मीही होतो. पहिल्या रांगेत स्वा. सावरकर व त्यांच्या नंतर डॉ. मुंजे, माझे वडील डॉ. ल. वा. परांजपे व इतर १०।१५ जण होते. मी त्या रांगेच्या समोरच्या रांगेत सावरकरांच्या समोर बसलो. मार्सेलिसच्या त्यांच्या समुद्राच्या उडीचे कुतूहल असल्यामुळे मी त्यांना त्या उडीबद्दल व किती अंतर पोहावे लागले याबद्दल विचारले. त्यांनी ते अंतर ६०–७० यार्डांपेक्षा जास्त नव्हते असे सांगितलेले आठवते.

• •

## ४५

मो. न. रानपारखी
अकोला ४४४००१

### विरोधकांवर प्रभाव पाडणारे सावरकर

गोष्ट १९४२ ची आहे. तेव्हा आम्ही झांशी येथील सिपरी बाजार ह्या वस्तीत रहात होतो. त्या वर्षी स्वातंत्र्यवीर सावरकर कानपूर हिंदु महासभा अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. अमृतसर एक्सप्रेसने ( त्यावेळची पेशावर एक्सप्रेस ) ते झाशीला सायंकाळी चार वाजता आले. तिथे त्यांची कानपूर बोगी अलग करण्यात आली, रात्री नऊ वाजता ती पुढे लखनऊ एक्सप्रेसला लागणार होती.

आमच्या छावणीचे चालक श्री. जोगळेकर हे पूर्वी तात्याराावांचे लिपिक म्हणून

काम करत होते. आम्ही त्यांना सावरकरांना खानावळीत आणून सत्कार करण्यास सांगितले.

आमंत्रणाप्रमाणे सावरकर तावडतोब आले. सत्कार झाला. आम्हा तरुण मुलांना संदेश देऊन ते परत निघाले.

परत जाताना त्यांना डॉ. माटे ह्यांचे श्वशूर श्री. वैद्य माटे ह्यांनी आमंत्रण दिले. आता डॉ. माटे, संपूर्ण काँग्रेस पक्षीय तर वैद्य माटे हिंदुसभावाले, जाणत्याची नाराजी पत्करून वैद्यराजांनी सावरकरांना घरी बोलावले होते. कानपूर गाडीची वेळ होईपर्यंत वीर तात्याराव सावरकर आम्हा तरुणांसह तिथेच होते.

स्टेशनवर जाताना सावरकरांबरोबर वैद्यराज आपली पडशी घेऊन गेले, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे डॉक्टर साहेब ही आपली सूटकेस घाईघाईने भरून त्यांच्या बरोबर गेले.

स्वातंत्र्यवीरांच्या वाणीच्या प्रभावामुळे विरोधकही कसे आपलेसे होत ह्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

• •

४६

श्री. मा. मो. सावरकर
१२ शिवाजीनगर

## बुद्धीच्या कसोटीवर विचार करणारे सावरकर

१९३२ च्या मे महिन्यातील ही आठवण. त्या सुमारास किर्लोस्करमधील लेखांमुळे सर्वसाधारण सुशिक्षित लोक सावरकरांच्या सडेतोड सामाजिक विचाराने भारलेलेच होते. सुटीत मी रत्नागिरीला आत्तेभावाकडे आलो होतो. त्यावेळी गाजलेले श्री. भागोजी कीर यांनी बांधलेल्या पतितपावन मंदिराबद्दल औत्सुक्य होतेच. सावरकरांची प्रत्यक्ष भेट घडावी, हीही एक आंतरिक ओढ.

रोज सायंकाळी तात्याराव मंदिरातील आवारात एका लहानशा टपरीत हरिजनाला काढून दिलेल्या हॉटेलात येऊन बसत व चहापान, शिवाशिव न पाळता सर्वांनी तेथे चहापाणी घ्यावा, असा प्रचार ते करीत. त्या निमित्ताने आम्ही तेथे गेलो व चहा मागवला.

अपेक्षेप्रमाणे आमची त्यांच्याशी भेट झाली. त्यांनी कौतुकाने आमची चौकशी केली. मी जेव्हा सांगितले की, मी बनारस हिंदु युनिव्हर्सिटीत शिकतो तेव्हा ते उत्स्फूर्तपणे म्हणाले, "तुमचे पं. मालवीय गोलमेज परिषदेला जाताना ४०० घागरी गंगेचे पाणी घेऊन गेले, पण नेले शेवटी इंग्रजांच्या बोटीवरूनच! मग काय फरक पडला? विचार करा."



खोट्या भावनेच्या आहारी न जाता बुद्धीच्या कसोटीवर घासून-पुसून विचार करणारे होते सावरकर.

• •

४७

प्रा. वा. रा. पोतेकर
कोल्हापूर ४१६००२

## सावरकरांचे मंत्रमुग्ध करणारे वक्तृत्व

माझे वडील कै. रा. बा. पोतेकर शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल–रमणबाग, पुणे यांच्या ऐन तारुण्याचा काही काळ स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या निकट सहवासात गेला. विद्यार्थिदशेत ते नगरकर तालमीचे कुस्तीगीर व कसरतपटू होते. दांडपट्टा, फरीगदगा इ. मर्दानी खेळातही ते कुशल होते. सुदृढ व सुडौल देहयष्टी आणि शरीर शिवाजी महाराजांसारखे नाक या सर्व गुणांमुळे त्यांचे सहाध्यायी त्यांना शिवाजी या नावानेच संबोधीत. अशा तडफदार तरुणांच्या शोधात सावरकर नित्य असत. त्यांनी आपणास आपल्या खास गोटात कसे खेचले याची जी हकीकत वडिलांकडून मला समजली तिचा काही भाग पुढे देत आहे.

त्या काळी पर्वती टेकडीमागे दाट जंगल पसरलेले होते. दिवसाढवळ्याही तिकडे एकटे दुकटे फिरकण्यास कोणी धजत नसे. अशा जंगलात वीर सावरकर मध्यरात्रीच्या काजळी काळोखात आपल्या गुप्त बैठकी भरवीत व मसलती करीत. त्यात सामील होण्याचे भाग्य आपणास मिळाले, याचा माझ्या वडिलांना मोठा अभिमान वाटे. क्रांतीच्या सळसळत्या तप्त रक्ताचे दहा–बारा बळदंड जवान त्या वीर धुरीणाभोवती वीरासन घालून बसत व त्यांचे ज्वलंत शब्द एकाग्र चित्ताने ऐकत. गंभीर हुंकार, उफाळणारे उष्ण निश्वास आणि स्फुरणारे बाहू या आविष्कारातील त्या युयुत्सूंचा प्रतिसाद चित्तथरारक असे. धाडसी वृत्तीचे युवक म्हणून या देशभक्त महत्त्वाकांक्षी जवानांना स्वातंत्र्यवीरांच्या क्रांती-मसुद्यावर स्वतःच्या रक्ताने आपली नावनिशाणी दाखल करावी लागे. त्या नियमानुसार माझ्या वडिलांनीही स्वातंत्र्यवीरांच्या समक्ष स्वतःचे बोट कापून त्याच्या रक्ताने आपली निशाणी नोंदविली होती.

## माझी–स्वत:ची एक आठवण

दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा वणवा पेटला होता. शहरा-शहरांतील वातावरण प्रक्षुब्ध झालेले होते. उद्याचा भरवसा नव्हता. युद्धसेवेतील कर्मचाऱ्यांची प्रातःकाळापासूनच धावपळ सुरू होई. रेशन दुकानासमोरील रांगा उन्हातान्हात तिष्ठत उभ्या राहत. ब्रिटिश फौजेतील रणगाडे धाडधाड् आवाज करीत, हमरस्त्यावरून रात्रंदिवस गस्त घालीत. त्यांच्यावरील तोफा आणि काळेबुंद्र, उग्र चेहऱ्याचे ब्रिटिश सोल्जर छातीत धडकी भरवीत. असाच एक रणगाडा नव्या पुलावरून रणगर्जना करीत सुसाट्याने धावत चालला होता आणि त्याच वेळी शनवारवाड्यासमोरील भव्य पटांगणात प्रचंड जनसमुदाय एखाद्या मंत्रमुग्ध नागराजाप्रमाणे डोलत होता. कोण होता तो डोलविणारा मांत्रिक ! कोण होता तो जादूगार ! धनुष्याकृती भुवयांचा, शृंगाररसाचा जादूगार तो निश्चितच नव्हता. तो होता वीररसाचा जादूगार ! क्रांतीचा किमयागार ! मी पुढे सरकलो, तेवढ्यात हिंदुत्वाची ती जाज्वल्य व्यापक व्याख्या तुतारीच्या ललकारीप्रमाणे कानावर आदळली. दिल्ली दरवाजासमोरील उंच व्यासपीठावरून एक वामनमूर्ती आपल्या धीरगंभीर आवाजात आवाहन करीत होती. गोऱ्यापान तेजस्वी मुखचर्येवर सोनेरी फ्रेमचा चष्मा झळाळत होता. डोळ्यासमोरील गोल, काळ्या टोपीमुळे ती मुखकांती अधिकच उजळून दिसत होती. आणि ओठावर तर स्फुल्लिंगच बाहेर झेपावत होते. म्यानातून तलवार सर्रकन् उपसून शत्रूवर बेभान तुटून पडण्याचे सामर्थ्य त्या प्रखर वाणीत सामावले होते.

* *

श्री. पद्माकर महादेव शेवडे
मुंबई ४०००६०

४८

## सर्वांना आवडणारे सावरकर

मी वयाची ५८ वर्षे उलटलेला एक सेवानिवृत्त आहे. परंतु ' सावरकर ' हे नाव ५–६ वर्षांचा असल्यापासून ऐकत आहे. तेव्हा मी राजापूरला ( जि. रत्नागिरी ) होतो. मोठी मुले त्यावेळी सावरकरांनी मार्सेलीस बंदरात, बोटीतून मारलेल्या उडीबद्दल अगदी चवीष्टपणे बोलत असत आणि मलासुद्धा अजाण असलो तरी त्या गप्पा अगदी कुतूहलाने ऐकाव्याशा वाटत. तेव्हा नुकतेच रत्नागिरीला सावरकर असल्यामुळे मोठ्या माणसांच्या आपापसांतील संभाषणात ' सावरकर, पतित पावन मंदिर, सहभोजन ' हे शब्द ऐकावयाला येत. नंतर त्यावेळच्या इंग्रजी ६ वी – ७ वीत असताना सावरकरांची ' काळे पाणी ' ही कादंबरी व आत्मचरित्र वाचनात आले होते. ' यंत्र है शाप की वरदान ' हा त्यांचा निबंध आमच्या मराठी क्रमिक पुस्तकात होताच त्यामुळे सावरकर ही व्यक्ती पहाण्याची मला लहानपणापासून फारच उत्कंठा होती.

परंतु मला सावरकर पहावयास मिळाले ते वयाच्या २३–२४ व्या वर्षी. तेव्हा मी मुंबईत नवीनच नोकरीला लागलो होतो. लहान गावच्या वास्तव्यात पुढाऱ्यांची भाषणे विशेष ऐकावयाला मिळत नसल्यामुळे मी मुंबईत आल्यानंतर अशा भाषणांना जाण्याचा धडाका लावला होता. ते १९५३ साल असावे. सावरकर तेव्हा वृद्ध क्रांतिकारकांसाठी निधी जमविण्याचा प्रचार करीत होते. त्यावर त्यांचे ब्राह्मण सभेच्या हॉलमध्ये भाषण होते. मी त्यावेळी सावरकरांना पहिल्यांदा पाहिले. पांढरी पँट, पांढरा कोट, काळी टोपी अशा वेषात ते होते आणि माझ्या विशेष लक्षात राहिलेली गोष्ट म्हणजे त्यांनी आपली छत्री समोरच्या टेबलावर आडवी ठेवली होती. संरक्षण युद्धनीती यांचा अभ्यास असल्यामुळे हा त्यांचा संरक्षणाचा छोटा उपाय ! भाषणाला त्यांचा जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे ते विशेष रंगले हे लिहावयाला नकोच !

नंतर १९५८–५९ च्या सुमारास सं. महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या दिवसात आचार्य अत्रे यांच्या ' सिंहगर्जना ' पुस्तकाचा प्रकाशन-समारंभ ब्राह्मण सभेच्याच हॉलमध्ये होता, त्याला मी गेलो होतो. गर्दी एवढी होती, की मला जिन्याच्या एका पायरीवर उभे राहून भाषणे ऐकावी लागली. तात्याराबांबद्दल त्या कार्यक्रमाच्या आयोजकांचे प्रेम एवढे दांडगे, की ते उपस्थित राहू शकत नव्हते, म्हणून एका नकलाकार गृहस्थांना ( मोंडे नव्हेत ) सावरकरच कार्यक्रमाच्या सुरुवातीचे भाषण करीत आहेत, असे समजून बोलावयाला सांगितले. त्यांनी खास सावरकरी शैलीत सुरुवात केली " माझी प्रकृती म्हणाल तर अत्यंत अत्यंत क्षीण झाली आहे. तरीसुद्धा या आंदोलनाच्या आत्यंतिक आत्मीयतेने मी येथे आलो आहे.

२६ फेब्रुवारी १९६६ रोजी जेव्हा सावरकरांनी आत्मार्पण केले त्या दिवशी शनिवार असल्यामुळे ऑफिस लवकर सुटल्यावर मी मुंबई बंदरातील क्रूझर बेट पहावयास गेलो होतो. लाँचने सायंकाळी परत येऊन प्रिन्सेस डॉक धक्क्यावर उतरल्याबरोबर लगेच सावरकरांच्या निधनाची बातमी समजली. काही लोक सावरकरांना केवळ मध्यमवर्गीयांचे पुढारी समजतात. परंतु मुंबईतील गोदी भागात जेथे बहुसंख्य अशिक्षित कामगारवर्ग आहे तेथेसुद्धा त्यांच्या महानिर्वाणाची बातमी सर्वतोमुखी झाली होती. अशी होती स्वातंत्र्यवीरांची लोकप्रियता !

* *

४९

एस. इ. श्रीमंगले
जि. नांदेड

## कधीही विस्मृतीत न जाणारे सावरकरांचे कर्तृत्व

मी सावरकरांचे भाषण ऐकले आहे. एखाद्या फुलाच्या वृक्षावरून टपटप पुष्पवृष्टी व्हावी आणि त्यात आपलं अंग न्हाऊन निघावं अशा प्रकारचा भास त्यांचं भाषण ऐकून होत होता. त्यांच्या भाषणं म्हणजे माधुर्य गुणांचा अप्रतिम शृंगार. त्यांच्या भाषणात आवेश फार होता म्हणूनच ते श्रेष्ठ वक्ते ठरले.

मला वाटतं आज स्वातंत्र्यवीर सावरकर अवतरले तर नक्कीच हिंदु धर्माला आगळं स्वरूप प्राप्त होईल व त्यांच्यावर होत असलेला अक्षम्य अन्याय दूर होईल.

मुंबई इथं भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात त्यांनी अध्यक्षीय भाषणात सर्व जमलेल्या कवींना अशी चेतावणी दिली की, "लेखण्या टाका आणि बंदुका हातात घ्या." या त्यांच्या कणखर वाक्यावरून मी असा तर्क काढतो की, सावरकर हे सरड्याप्रमाणे रंग बदलणारे होते. त्यांच्यामध्ये परिस्थितीप्रमाणे वागण्याचं चातुर्य होतं. मी नेहरू, गफारखान,, इंदिरा गांधी यांसारख्या अनेक हुतात्म्यांना पाहिले आहे. पण स्वातंत्र्यवीर सावरकरांसारखी व नाना पाटलांसारखी मूर्तीच मला सापडली नाही. त्यांची मूर्ती धिप्पाड होती व चेहरा तेजोमय होता.

त्यांचं अलौकिक साहित्य, अलौकिक शरीर, अलौकिक देशप्रेम पाहून मला वाटतं, त्यांच्यासारखा असाधारण हिरा समाजात उपजणंच अशक्य !

त्यांची "सागरा, प्राण तळमळला." ही कविता वाचून माझ्या नेत्रातून दुःखाश्रू आपोआप टपटपू लागले, वाटलं, मातृभूमीविषयी प्रगाढ प्रेम असलेल्या या पोलादी पुरुषाला नियतीनं असं कसं रसातळा नेलं ! पण आचार्य अत्रे म्हणतात ते अगदी खरं आहे. ते म्हणतात, "काळ हा कधी न थांबणारा प्राणी आहे." सत्य हे आहे काळ कोणासाठीही थांबत नाही.

स्वातंत्र्यवीर सावरकर स्वर्गवासी होण्या अगोदरसुद्धा त्यांच्या मूर्तीमध्ये काहीही बदल झालेला नव्हता. चेहऱ्यावरील कळा उतरली नव्हती. त्यांचा जहाजावरील प्रसंग वाचून मला वाटतं ते इंग्लंडच्या किनाऱ्यापासून फ्रान्सच्या किनाऱ्यापर्यंत अंतर गाठलं व अंगाला काहीही न लावता पोहत येणारे एकमेव जलतरणपटू असावेत.

अशा असामान्य व्यक्तीचा मृत्यू होणे म्हणजे नियतीचा एक कठोरपणा आहे. ते समाजातून गेले, पण कार्याने अमर आहेत.

• •



५०

श्री. रा. स. भट
पुणे ३०

## गणपतराव नलावडे यांची महापालिकेतील अविस्मरणीय आठवण

माझ्या आयुष्यातील तो दिव्य क्षण होता. पुण्याच्या पालिकेचे महापालिकेत रूपांतर झाले होते. पूर्वी मी एकदा नगरपालिकेचा अध्यक्ष म्हणून निवडून आलो होतोच. असे असतानाही माझ्या मित्रांच्या आग्रहावरून मी महापौरपदाची निवडणूक लढवली व त्यात भरपूर बहुमताने निवडून आलो. एकदा नगराध्यक्ष झाल्यानंतर पुन्हा महापौर म्हणून निवडून येणे हा माझ्या आयुष्यातील विक्रम होता. विशेषतः मी हिंदुत्वनिष्ठ असताना मी निवडून आलो, हा त्याहून मोठा विक्रम होता. मी निवडून आल्यानंतर मेयरचा पूर्वापार पद्धतीचा तांबडया मखमलीचा झगा माझ्यापुढे करण्यात आला. पण मी तो झगा घालण्याचे नाकारले व दुसऱ्या दिवशी मी भगव्या रंगाचा करून घेतला. त्यापूर्वीपासून माझी टोपी भगवी होतीच. विशेष म्हणजे माझ्या या विजयाबद्दल माझे गुरू स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन करणे माझे काम होते. म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी मेयरची गाडी घेऊन मी मुंबईस जाऊन सावरकर सदन गाठले व सावरकरांच्या चरणास वंदन केले. "सकाळीच मी वृत्तपत्रात वाचले. अभिनंदन करतो असे ते म्हणाले व पुढे म्हणाले की, तुमच्या कार्यालयावर मेयरफलक असेल त्याऐवजी महापौर हा शब्द घालून फलक करा. मेयर ऐवजी महापौर म्हणा. डेप्युटी मेयर म्हणजे उपमहापौर असे त्यांनी मला सांगितले. पुण्याला आल्यावर माझ्या कार्यालयात मराठी पाट्या लावल्या, स्वातंत्र्यवीर सावरकरांपाशी मी जे शिकलो त्याप्रमाणे 'परम जनहितम् ध्येयम्' हे त्यांचे ब्रीदवाक्य वेळ घेताच पुण्याच्या महापालिकेने ब्रीदवाक्य म्हणून संमत करून घेतले, तेच ब्रीदवाक्य आज महापालिका वापरत आहे. त्याचप्रमाणे महापालिकेचा ध्वज कोणता असावा याची चर्चा चालू असताना तो भगवा ध्वज असावा असे माझे मत मांडले, ते मान्य होऊन महापालिकेचा ध्वज भगवा असावा असे ठरविण्यात आले, त्याप्रमाणे अद्याप चालू आहे व पुढेही चालू रहाणार आहे.

### हिंदुराष्ट्रदलाची स्थापना

१९४२ या वर्षी माझ्या मोठ्या मुलीचे लग्न होते. स्वा. वीर सावरकरांनी वधूवरांना आशीर्वाद देण्यासाठी यावे अशी माझी उत्कट इच्छा होती. केवळ लग्नाकरिता पुण्याला सावरकर येणे कठीणच नव्हे तर अशक्य होते. मी काहीतरी युक्ती शोधीत होतो. या वर्षी पुणे नगरपालिकेचा नगराध्यक्ष म्हणून माझी निवड झाली

होती. नि महाराष्ट्र प्रदेश हिंदुसभेचा अध्यक्षही निवडलो गेलो होतो. योगायोगाने प्रांतिकच्या कार्यकारिणीची जी सभा घ्यावयाची होती त्याला जोडून महाराष्ट्रात तरुणांचा मेळावा घेण्याचे मी ठरवले. नि स्वा.वीर सावरकर मार्गदर्शनासाठी येणार असून हिंदुसभेच्या कामासाठी "हिंदुराष्ट्र दलाची स्थापना करण्याचेही ठरविले होते त्यामुळे महाराष्ट्रातील हिंदुसभेचे पुढारी तरुण कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. व म. प्रां च्या कार्यकारिणीची सभा सकाळ दुपार अशा दोन्ही वेळात एक दिवसात उरकली. दुसऱ्या दिवशी सकाळी मेळावा भरला. त्यात 'हिंदुराष्ट्र दल' स्थापन करण्याचा प्रस्ताव एकमताने संमत झाला. ध्येय, धोरण ठरविण्याविषयी अनेक सूचना आल्या शेवटी स्वा. सावरकरांनी असे सांगितले की, 'हिंदुराष्ट्र दल' हिंदुसभेचे म्हणून मानावे पण ही संघटना स्वतंत्र असावी. नि संघटनेचे प्रमुख वा विभागवार जे नेते निवडले जातील त्यांच्या नियंत्रणाखाली ही सेवा काम करील. हिंदुमहासभेचे जे जे म्हणून हिंदुत्वनिष्ठ कार्य असेल ते ते करण्याचे दायित्व या संघटनेचे राहील.' यावर स्वा. वीर सावरकरांनी पाच मिनिटे विवरण केल्यावर इतरांनी केलेल्या सूचना परत घेतल्या. या दलाचे एकमेव सर्वाधिकारी म्हणून स्वा. सावरकर नि महाराष्ट्र दल प्रमुख म्हणून श्री. गणपतराव नलावडे यांची नेमणूक झाली. दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता माझ्या मुलीचे लग्न होते. त्याला वीर सावरकर उपस्थित राहिले व त्यांनी आशीर्वाद दिला. माझ्या मुलीचे लग्न शुक्रवार पेठेतील अहिरे सुवर्णकार यांच्या कार्यालयात झाले. आशीर्वाद देण्याकरिता वीर सावरकर येणार असल्याचे त्या भागातील लोकांना कळले होते. त्यांना पहाण्यासाठी प्रचंड गर्दी झाली होती. स्वा. वीर सावरकर विवाह स्थळी येताच सावरकरांच्या जयजयकाराने वातावरण दुमदुमून गेले होते, कार्यालयात प्रवेश करण्यापूर्वी बाहेरच उंचावर उभे राहून त्यांनी पाच मिनिटे भाषण केले.

याच दिवशी सायंकाळी ५ वाजता नगरपालिकेच्या वतीने स्वा. सावरकरांना बहुमानाचा कार्यक्रम ठेवला होता. नगरसेवक, अधिकारी नि नगरातील निमंत्रित प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. मी सावरकरांचे व उपस्थितांचे स्वागत केले. नि आभारही मानले. स्वा. वीर सावरकरांनी नगरपालिकेचा कारभार उत्तम प्रकारे करावा असा उपदेश केला.

## एकसष्टीचा सत्कार

मी १९२५ या वर्षी पुण्यात 'संग्राम' नावाचे साप्ताहिक सुरू केले. तेव्हापासून निरनिराळ्या कारणांसाठी समाजाकडून अनेक वेळा माझे सत्कार झाले. तथापि माझ्या एकसष्टाव्या वाढदिवसाचा स्वा. वीर सावरकरांच्या अध्यक्षतेखाली जो सत्कार झाला त्याचे वर्णन करणे माझ्या शब्दापलीकडचे आहे. मी एवढा भाग्यशाली असेन, असे मला त्यापूर्वी कधीच वाटलेले नाही.



हिंदुसभेच्या स्वयंसेवक मित्रांनी माझ्या सत्काराची कल्पना मला दिली. ती मी फेटाळली, पण माझ्यावर निर्व्याज प्रेम करणाऱ्या मित्रांनी आपला आग्रह चालू ठेवला. तेव्हा मी त्यांना अशी मेख घातली की, आपण योजलेल्या माझ्या सत्काराला स्वा. सावरकर अध्यक्ष असतील तर मी तुमच्या म्हणण्याला संमती देईन. नाही तर नाही. कल्पना अशी की, स्वा. वीर सावरकर मान्यता देणार नाहीत. म्हणजे आपण कार्यकर्त्यांच्या तावडीतून सुटू ! पण घडले उलटे ! स्वा. वीर सावरकरांनी एकदम मान्यता दिली. नि सत्कार सोहळा माझ्या योग्यतेपेक्षा प्रचंड प्रमाणात घडून आला.

माझे दुर्दैव मात्र असे की, माझ्या सत्काराच्या ठरलेल्या दिनांकापूर्वी चार दिवस वीर सावरकर तापाने आजारी पडले. दोन दिवसांत त्यांचा ताप उतरला. थकवा बराच आला होता, पण अशा स्थितीतही ते आले. दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे लोकांची रीघ लागली. त्यांना विश्रांती मिळाली नाही. व त्यांना थोडा ताप भरला. खूप थकल्यासारखे वाटू लागले. तरी ते सर्व कार्यक्रमाला वेळेवर आले.

समारंभ श्री. शिवाजी मंदिरात सायंकाळी ६ वाजता होता. सकाळी धार्मिक कार्यक्रमानंतर दुपारी १२ वाजता जेवणाचा कार्यक्रम शिवाजी मंदिरमागील सावरकर सभागृहात होता. त्या कार्यक्रमाला स्वा. वीर सावरकर वेळेवर आले. पंगतीला थाट अपूर्व होता. केळीच्या पानाभोवती हिंदुसभेच्या महिलांनी इतकी उत्तम रांगोळी काढली होती की, मी माझ्या आयुष्यात प्रथम इतकी सुंदर कला पाहिली. पहिल्या पंगतीला माझ्या कुटुंबातील मंडळी नि बहुतेक परगावची हिंदुसभेची प्रमुख मंडळी होती. सावरकरांच्या एका बाजूला धर्मवीर अण्णाराव भोपटकर तर दुसऱ्या बाजूला श्रीमान गुलाबचंद हिराचंद दोशी होते. मी दुसऱ्या पंगतीला बसण्याचे ठरविले होते. पण तात्या म्हणाले, "उत्सवमूर्ती जर आमच्या बरोबर बसणार नसतील तर आम्ही जेवणार नाही. त्यांच्या पत्नी वगैरे सर्व मंडळी आमच्याबरोबरच जेवायला पाहिजेत. मग नाइलाज झाला नि तात्यांच्या समोरच्या ओळीला आम्ही कुटुंबीय मंडळी भोजनाला बसलो. वीर सावरकरांनी थोडा भात खाण्याखेरीज काहीच घेतले नाही. पण सर्वांचे जेवण संपेपर्यंत पानावरून उठले नाहीत व सर्वांना वाढण्याचा मात्र आग्रह करीत होते.

स्वा. वीरांच्या अंगात ताप असतानाही सभास्थानी ते वेळेवर आले. शिवाजी मंदिराचे आवार स्त्री-पुरुष श्रोत्यांनी भरून गेले होते. वीर सावरकरांचा तीन वेळा जयजयकार झाला. सभेचे संचलन केसरीचे निवृत्त उपसंपादक कै. नामजोशी यांनी केले. प्रथम माझा सत्कार झाला. श्रोत्यांकडून भेटवस्तू दिल्या गेल्या. यात बराच वेळ गेला. माझे उत्तराचे भाषण चालू असताना तात्यांनी मला लवकर आवरण्याची सूचना केली व मी माझे भाषण आवरले.

स्वा. वीर सावरकरांचे भाषण झाले. ते म्हणाले, आता माझ्या अंगात थोडातरी का होईना ताप आहे. मला खूप थकवा वाटतो. श्री. नलावडे यांचा आपण सत्कार

केल्याने त्यावरून त्यांची लोकप्रियता किती आहे हे तुम्ही पाहिलेच आहे. त्यांच्याविषयी मला सांगण्यासारखे खूप खूप आहे, पण मला या आसनावर बसण्याचाही शीण होतो आहे. श्री. गणपतराव नलावडे हे हिंदुसभेचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत. ही माझी त्यांना पावती मिळाली आहे. बाकी काय ते तुम्ही जाणून घ्या. हिंदुसभेचे प्रकट असे जे जे कार्य ते करतात ते तुमच्यापुढे आहेत. तथापि प्रकट न करण्यासारखीही कार्ये त्यांच्या हातून घडली आहेत. तुमच्या या पुणे नगराची ते सेवा करीत आहेत, हे तर तुम्ही जाणताच. त्याचबरोबर नगरपालिका, महानगरपालिका यांची पदेही त्यांनी यशस्वीरीत्या भूषविली आहेत. श्री. नलावडे यांच्याप्रमाणे तळमळीने कार्य करणारी माणसे हिंदु समाजात निर्भयपणे निर्माण होतील, तर या देशात छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदुराज्य निर्माण होण्यास वेळ लागणार नाही.

## अनिर्बंध मुक्तता

गांधीजींनी शाळा, विद्यालये, महाविद्यालये, न्यायालये, विधिमंडळे, या सर्वांवर बहिष्कार घातला होता. गांधींना कालांतराने चूक उमगली. त्यांनी विधिमंडळाच्या निवडणुकांवरील बहिष्कार मागे घेऊन काँग्रेसच्या वतीने निवडणुका लढविल्या. पण मंत्रिमंडळात भाग घेण्यास मान्यता दिली नाही. त्यामुळे त्या काळच्या ब्रिटिश-धार्जिण्या लोकांचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले. त्यात सातारचे एक पारशी उद्योगपती श्री. कूपर यांच्याकडे मंत्रिमंडळ आले, पण त्यांच्या मंत्रिमंडळात अर्थमंत्रीपद कौशल्याने सांभाळील असा एकही मनुष्य नव्हता. त्यावेळी लोकशाही स्वराज्य पक्षाच्या वतीने विधिमंडळात निवडून गेलेल्या बॅ. जमनादास मेहतांना त्यांनी अर्थमंत्रीपद स्वीकारण्याची विनंती केली. त्यांनी असे सांगितले की, माझ्या पक्षाने संमती दिली, तर मी स्वीकारीन. पक्षाच्या मान्यतेकरिता त्यांनी साहित्यसम्राट न. चिं. केळकरांना दूरध्वनी केला नि तातडीने पुण्यास आले. त्यापूर्वी सर्व प्रमुख मंडळींना केळकरांनी धर्मवीर ल. ब. भोपटकर यांच्या निवासस्थानी बोलविले. मी तेथे उपस्थित होतो. चर्चा झाली व शेवटी असे ठरले की, विनायक दामोदर सावरकरांना रत्नागिरीच्या बाहेर न जाण्याचा निर्बंध घातला आहे. त्यातून ब्रिटिश शासन सावरकरांवरील निर्बंध दूर करीत असेल तर बॅ. जमनादासांनी अर्थमंत्रीपद स्वीकारावे. त्याप्रमाणे श्री. कूपर यांना कळविले. त्यांनी गव्हर्नरला, गव्हर्नरनी व्हाइसरॉयला, कळवले नि शेवटी पार्लमेंटची मान्यता मिळवून स्वा. वीर सावरकरांची निर्बंधातून मुक्तता झाली.

सर्वप्रथम ते पुण्यास आले. त्यांच्या स्वागताकरिता एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीचा मी कार्यवाह होतो. त्यांच्या स्वागताचा कार्यक्रम ठरवितांना ज्या सूचना आल्या त्या मला पटल्या नाहीत. समितीची मिरवणुकीला अनुकूलता नव्हती. त्यांची गौरव सभाही टिळक मंदिरात भरवावी अशी सूचना ज्येष्ठ मंडळींनी



केली. या त्यांच्या दोन्ही सूचना डावलून मी मिरवणूक काढण्याचा हट्ट धरला. तिचे सर्वस्वी दायित्व पत्करले.

स्वा. वीर सावरकरांचे पुणे स्थानकावर अपेक्षेपेक्षा मोठ्या प्रमाणावर स्वागत झाले. त्यांचा सकाळचा चहा आचार्य अत्रे यांच्या घरी झाला. त्यावेळी आचार्य अत्रे सारस्वत वसाहतीत रहात असत.

सकाळी ८ वाजता सावरकरांच्या जयजयकारात रुबाबात मिरवणूक निघाली. ती सकाळी १० वाजता गायकवाड वाड्यात पोहोचली. स्वा. वीर सावरकरांना पहाण्यासाठी नि अभिवादन करण्यासाठी रस्त्याने तुडुंब गर्दी झाली होती. ठिकठिकाणी नागरिकांनी त्यांना पुष्पहार घातले. सुवासिनींनी ओवाळले. सर्वत्र उत्साहाचे वातावरण पसरले होते.

## भाषाशुद्धी

१९५३ च्या वर्षी सावरकर पुण्यात आले होते. त्यावेळीही सावरकरांचा सत्कार महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आला. मी त्यांना निमंत्रित करण्यासाठी मुंबईला गेलो होतो. ते मला म्हणाले, “ नगरपालिकेच्या वतीने मानपत्र देऊन सत्कार केला. १९४२ च्या वर्षीही माझा सत्कार झाला. आता पुन्हा कशाला सत्कार करता ? ” मी त्यांना म्हणालो, तात्या हा सत्कार महानगरपालिका करते, नगरपालिका नव्हे. ” ते म्हणाले, “ शाब्बास ! अशी चतुराई केली का ? त्यांनी मान्य केले; मला आनंद वाटला. कारण मी त्यावेळी महापौर होतो. सत्काराच्या उत्तराच्या भाषणात सावरकर म्हणाले, “ मेयरसाठी महापौर शब्द, कार्पोरेशनला महानगरपालिका शब्द आपण वापरतच आहात, पण आपल्या भाषेवर परक्या मुसलमानांनी नि इंग्रजांनी जे आक्रमण केले आहे ते आपण घालविले पाहिजे. आपण आपल्या मातृभूमीवरचे आक्रमण, स्वातंत्र्य संपादन करून घालविले तसेच आपल्या भाषेवरील आक्रमण आपण दूर केले पाहिजे. कितीतरी अरबी, उर्दू व इंग्रजी शब्द आपण मराठी बोलतांना वापरतो. हे आता सोडले पाहिजे नि आपली भाषा समृद्ध, शुद्ध केली पाहिजे. आपल्या राष्ट्रात प्रांतनिहाय भाषा असल्या तरी संस्कृत हीच सर्व भाषांची माता आहे. भाषाशुद्धी हा कोणा एका पक्षाचा कार्यक्रम नाही. तर तो प्रत्येक मराठी माणसाचा कार्यक्रम असल्याने या कामात मतैक्य असलेच पाहिजे.

• •

## स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केलेले माझे ३ मोठे सन्मान

माझ्या ६१ व्या वाढदिवशी शिवाजी मंदिरात सावरकर हे अध्यक्ष होते. स्वातंत्र्यवीरांच्या अध्यक्षतेखाली माझा ६१ वा वाढदिवस होणे माझे भाग्य समजतो. त्या दिवशी एवढ्या मोठ्या महापुरुषाचा आशीर्वाद मला व माझ्या पत्नीला मिळाला. ही मोठी अपूर्व घटना होती. दुसरा प्रसंग १९५५ साली रत्नागिरी येथे अखिल हिंदूंच्या गणेशोत्सवांचा वाढदिवस झाला. या समारंभासाठी महाराष्ट्रातील प्रमुख नेते आले. या समारंभात तीनही दिवसांच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान इतर नेत्यांना टाळून मला दिले व माझ्या हिंदुत्वनिष्ठेच्या कार्याबद्दल माझा गौरव केला.

तिसरा प्रसंग हिंदुसमाजाच्या संरक्षणासाठी पुण्यात हिंदू राष्ट्रदलाची स्थापना करण्यात आली. हिंदुसमाजाच्या संरक्षणाची विशेष योजना आखून त्या संस्थेने कार्य करावे, असे स्वातंत्र्यवीरांचे म्हणणे होते. परधर्मीयांपासून हिंदुसमाजाचे संरक्षण करणाऱ्या या संस्थेच्या पदी कोणीतरी कणखर कार्यकर्ता असावा अशी सावरकरांची इच्छा होती. त्यासाठी माझ्या आयुष्यातील विविध घटनांची माहिती सांगून त्या संस्थेच्या प्रमुखपदी माझी निवड केली व हिंदूंच्या संरक्षणासाठी हीच निवड योग्य असे सांगितले. स्वा. सावरकरांनी माझ्यावर या संस्थेची ही जबाबदारी टाकली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. कारण योग्य जागी योग्य व्यक्ती निवडण्याचा सावरकरांचा हातखंडा होता. स्वा. वीर सावरकरांच्या पवित्र सहवासातून मला हे सन्मान लाभले ते म्हणजे 'पुष्पसंगे मातीस वास लागे' अशाच तऱ्हेचे आहेत, हे म्हणणे अतिशयोक्तीचे नाही.

• •

**५१** श्री. एस. व्ही. तुळजापूरकर
अमरावती.

## स्वातंत्र्यवीराला अभिवादन

प्रस्तुत पत्रलेखक कविता करीत असे व अजूनही करतात. ते हिंदुत्वनिष्ठ असल्यामुळे सावरकरभक्त पण होते, काही प्रसंगाने स्वातंत्र्यवीर सावरकर हे नागपूरला आले असता त्यांच्या जाहीर सत्काराच्या वेळी मी आपली कविता म्हणून दाखविली. उपस्थित जनसमुदायाला व स्वतः सावरकरांनाही ती आवडल्याचे त्यांनी सूचित केले



व सोबतची कविता ही स्वतःजवळ ठेवून घेतली. तिची स्थळप्रत कधाचही आठवण म्हणून माझ्याजवळ होती. त्यावरून त्याची एक प्रत आपणाकडे पाठवीत आहे.

नागपूरला वि. दा. सावरकरांच्या सत्कारप्रसंगीचे काव्य केले त्याचा आरंभ असा होता.

> आहे कुठे तो काळ पूर्वीचा उत्कट भक्तीचा
> देशासाठी तन मन धन ते अर्पित करण्याचा
> 'देशभक्त' हे देशामध्ये अगणित दिसतात
> विनायकापरी प्रखरवीर ते दुर्लभ असतात ॥ १ ॥

• •

**५२** श्री. मामाराव तथा शं. रा. दाते
पुणे.

## सावरकरांच्या सहवासात

मी १९२३ या वर्षी रत्नागिरीस गेलो होतो, त्यावेळी मी स्वातंत्र्यवीर सावरकर यांना प्रथम पाहिले. रत्नागिरीस जाण्यापूर्वी त्यांना भेटण्याची संधी मिळावी ह्या हेतूने मी त्यांना पुण्याहूनच एक पत्र पाठविले होते व त्यात त्यांना भेटण्याची माझी इच्छा कळवली होती. रत्नागिरीस गेल्यावर मी त्यांच्या भेटीसाठी पटवर्धन यांच्या वाड्यात ते रहात असत तेथे गेलो तेव्हा ते तेथे एकटेच एका झोपाळ्यावर बसलेले होते. मी त्यांना माझी ओळख सांगितली त्यावेळी मी पुण्यास १९२४ सालापासून हिंदुसभेचे काम करीत आलो होतो व ख्रिश्चन, मुसलमानांचे शुद्धीकरण करण्याचे काम करीत असे. त्यामुळे त्यांच्या माझ्या चर्चेचा समान विषयाचा धागा शुद्धीकरणाच्या कामातील अडचणी हा प्रामुख्याने होता. त्यांनीही रत्नागिरीस असताना शुद्धीकरणे घडवली होती. या कामात आम्हास कशा प्रकारच्या अडचणी येतात त्या संबंधाने आम्ही बरेच बोललो. त्या काळात शुद्धीकरणाला कुण्या समाजात विशेष पाठिंबा नव्हता. उलट अडचणीच अनेक होत्या. पण त्यातून मार्ग निघत असे. मूळच्या ईसाई मनुष्यानेही आम्ही हिंदुकरण त्या काळात घडवले होते. त्या कामी आम्ही शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांचा आशीर्वाद मिळवला होता.

त्यांच्या माझ्या चर्चेचा आणखी एक विषय म्हणजे मुद्रणासाठी देवनागरी लिपीचे टाईप सुधारण्यासंबंधीचा होता. देवनागरी लिपी यंत्राच्या सहाय्याने जुळविता यावी यासाठी त्या काळात बरेच संशोधकांचे प्रयत्न चालू होते. त्यातच स्वातंत्र्यवीर

६

सावरकरांचाही एक प्रयत्न होता. त्यासाठी त्यांनी रत्नागिरी येथेच एका पंचशिल्पकाराकडून अनेक सुधारित अक्षरांचे ठसेही कोरून घेतले होते. माझाही याच काळात देवनागरी लिपी लिनोटाइप किंवा मोनोटाइप यंत्रावर बसती करण्याचा प्रयत्न चालू होता व त्या कामात मला बऱ्यापैकी यशही मिळाले होते. १९३१ साली मी मोनोटाइप यंत्रावर देवनागरी लिपीची जुळणी करण्याच्या कामात यशस्वी झालो होतो. स्वातंत्र्यवीर सावरकरांना त्याचे कुतूहल होते. या भेटीत मी माझ्या योजनेचा तपशील त्यांना सांगितला. देवनागरी लिपीच्या वळणात किंवा मुद्रण लेखनपद्धतीत विशेष कोणताही फरक न करता मी देवनागरी मोनो यंत्रावर बसवली होती.

तथापि सावरकरांच्या प्रयत्नांची दिशा वेगळी होती. टंकलेखन यंत्रावर सामान्यतः ८४ अक्षरेच बसतात व तेवढ्यात देवनागरी लिपीची जुळणी कशी करता येईल यासाठीही त्यांचा प्रयत्न होता. त्यात प्रत्येक अक्षर व्यंजन स्वरूपात म्हणजे बिनकान्याचे करावयाचे व त्याला आकाराचे चिन्ह म्हणजे काना जोडावयाचा अशी त्यांची योजना होती. या योजनेनुसार प्रत्यक्ष अर्ध्या अक्षराला काना जोडून पूर्ण अक्षर करावे लागे. या योजनेने टाईपांची/अक्षरांची प्रकारसंख्या जरी घटली तरी प्रत्येक व्यंजनाला म्हणजे अर्ध्या अक्षराला काना लावावा लागे. त्यामुळे जुळणीचे किंवा टंकलेखनाचेही काम जवळजवळ दुप्पट होई. त्यामुळे ती सोय ठरू शकली नाही. शिवाय क फ या अर्ध्या अक्षरांना काना जोडून पूर्णाक्षर करावे लागे त्यामुळे त्यांच्या स्वरूपातही बदल होई. तसेच 'र' हे अक्षर अर्ध्या स्वरूपात दोन प्रकारांनी व पूर्ण स्वरूपात तीन वेगवेगळ्या प्रकारांनी विशेषतः जोडाक्षरे तयार करताना येते, जसे र ्र ॅ ि या सर्वांऐवजी असे तिरक्या फाट्याचे अर्धा र चे एकच अक्षर त्यांनी सुचविले होते व त्याला काना लावून त्याचे पूर्ण अक्षर बनवावे अशी त्यांची योजना होती. मला लिप्यात अनेक अडचणी वाटल्या. ष, र ही अक्षरे अनेक शब्दांत वारंवार येणारी असल्याने सावरकरी पद्धतीने लिहिण्याने लिपीच्या रूढ स्वरूपात बदल होईल असे माझे म्हणणे होते. तथापि अर्ध्या र बद्दलचा त्यांचा आग्रह कायम होता व त्यांचे र चे ( ॅ ) हेच स्वरूप त्यांनी आपल्या जीवनभर कटाक्षाने वापरले.

मी रत्नागिरीस गेलो तेव्हा पतितपावन मंदिरात जाऊन आधीच आलो होतो. १९३० च्या वर्षीच स्वा. सावरकरांच्या प्रेरणेने भागोजी कीर यांनी या मंदिराची स्थापना केली होती. मी या मंदिरात जाऊन यावे, असे मला सावरकरांनी सुचविलेही, पण मी आधीच जाऊन आल्याचे त्यांना सांगितले तेव्हा त्यांनी त्या मंदिराच्या आवारातच आपल्या पूर्वास्पृश्य बांधवाने एक खाद्यपदार्थांचे दुकान आहे तेथून काही तरी पदार्थ घेऊन खाण्याबद्दल सूचना केली. अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याबद्दल त्यांचा किती कटाक्ष होता हे अनेक प्रसंगांनी दिसून येत होते. मी पुन्हा मंदिरात गेलो तेव्हा त्या दुकानातून एक-दोन खाद्यपदार्थ घेऊन खाल्लेही.

स्वा. सावरकरांची संपूर्ण सुटका १९३७ वर्षी झाली. १९३८ वर्षी मराठवाड्यात



अनेक ठिकाणी हिंदुसमाजावर इस्लामी अत्याचार होत असत. त्याची पाहणी करण्याचे काम महाराष्ट्र हिंदुसभेचे अध्यक्ष आप्पासाहेब भोपटकर यांनी मला सांगितले होते. मी ही भाऊसाहेब मोडक व बाबाराव काळे यांच्या समवेत मराठवाड्यात अनेक ठिकाणी जाऊन तेथील पाहणी केली व त्याचा वृत्तांत भोपटकरांना सादर केला व त्याची एक प्रत स्वा. सावरकरांना पाठवली. त्यातूनच भागानगर निःशस्त्र प्रतिकाराचा लढा लढला गेला. हिंदुसभेने मोठ्या प्रमाणावर घडविलेला हा पहिला लढा होता व तो पूर्ण यशस्वी झाला. आम्ही तुरुंगातून सुटून आल्यावर त्या लढ्याचा इतिहास लिहिण्याचे काम स्वा. सावरकरांनी मला सांगितले. व तोही इंग्रजीत लिहून प्रसिद्ध करावा, अशी सूचना केली. त्याप्रमाणे मी तो १९४० मध्ये लिहून प्रसिद्ध केला. त्याचा सावरकरांनी मदुरा येथे झालेल्या हिंदुसभेच्या अधिवेशनात त्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून भाषण करताना मुद्दाम उल्लेखही केला आहे. अशा वेळच्या त्यांच्या काही दौऱ्यांच्या वेळेला त्यांच्याबरोबर प्रवास करण्याचीही मला संधी मिळाली होती. त्यांचे ? अनेक विषयांवर चर्चा होण्याचे होत असे.

१९५८ वर्षी माझ्या वयाला ६० वर्षे झाली. त्यानिमित्त माझा व माझे ज्येष्ठ सहकारी गणपतराव नलावडे यांच्याही वयाला थोडे आधी साठ वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्ताने आम्हा दोघांचेही साठी समारंभ एकाच वर्षात झाले. त्या दोन्ही समारंभांना स्वा. सावरकर हे अध्यक्ष म्हणून आले होते. आमच्या दृष्टीने तो एक अपूर्व योग होता.

त्यांचा मृत्युंजय समारंभ पुण्यात मोठ्या थाटात १९६० साली झाला. ब्रिटिश सरकारने त्यांना दोन जन्मठेपांची व त्याही नंतर दुसरी पन्नास वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली होती. त्यांना अंदमानच्या तुरुंगात नेण्यात आले, तेव्हा तेथील तुरुंगाधिकारी बारी बाबा उद्गारला होता की, "सावरकर, आता तुमची अखेर येथेच होईल." तेव्हा सावरकरांनी त्याला उत्तर दिले होते की, "पण पन्नास वर्षे इंग्रजांचे राज्य राहील तरी काय?" सावरकरांचे हे उद्गार खरे ठरले. १९४७ साली इंग्रजांचे राज्य संपले व सावरकर दोन जन्मठेपींचा पन्नास वर्षांचा काळ जिवंत राहून मृत्युंजय ठरले. यानिमित्त हा मोठा समारंभ पुण्यास झाला. त्यावेळी त्यांच्या सन्मानार्थ निधी समर्पण करण्यात आला होता. त्यातून त्यांचे वाङ्मय प्रसिद्ध करून तेही चिरंतन करण्याचा विचार हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांनी केला व पुढे ते सर्व वाङ्मय प्रसिद्ध करण्याचे काम त्यांनी माझ्यावर सोपविले. त्याप्रमाणे १९६३-६५ या काळात मी समग्र सावरकर वाङ्मयाचे आठ खंड प्रसिद्ध केले. त्यात त्यांचे अनेक प्रसंगांनी प्रसिद्ध झालेले निरनिराळे ग्रंथ एकत्रित समाविष्ट केले आहेत. उदा., 'माझी जन्मठेप' हे, आत्मचरित्र, 'काळे पाणी' ही कादंबरी कथावाङ्मय, त्यांचे सामाजिक वाङ्मयीन सांस्कृतिक व राजकीय निबंध, भाषाशुद्धी, त्यांचे समग्र काव्य, त्यांनी लिहिलेली नाटके ही सर्व सात खंडांत समाविष्ट आहेत. यांचे हिंदुत्व व हिंदुपदपादशाही हे दोन इंग्रजीत लिहिलेले निबंध व त्यांची

हिंदुसभेचे अध्यक्ष या नात्याने झालेली व्याख्याने व काही निवेदने त्यात समाविष्ट आहेत. १९५२ साली त्यांचा मूळ मराठी ग्रंथ 'भारतीय स्वातंत्र्यसमर' म्हणजे १८५७ च्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास हा ग्रंथ उपलब्ध झाला. त्यांनी तो १९०७–८ साली लिहिला होता. तो प्रसिद्ध करण्यासाठी त्यांनी विलायतेहून बाबाराव सावरकरांकडे पाठविला होता. तो क्रांतिकारक असल्याची कुणकुण ब्रिटिशांना आधीच लागली होती व ते त्याच्या पाळतीवर होते. तो प्रसिद्ध होण्यापूर्वीच ब्रिटिशांनी तो जप्तही केला होता. हा मूळ मराठी ग्रंथ प्रसिद्ध करण्याच्या कामात अनेक अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे तो प्रसिद्ध करणे अशक्य झाल्याने तो परत सावरकरांकडे पाठविण्यात आला. त्यावेळी ते फ्रान्समध्ये होते. पुढे ते विलायतेस परत गेले तेव्हा जाताना त्यांनी तो कामाबाईंच्या जवळ दिला. पुढे १९१४ च्या सुमारास सावरकरांच्या अभिनव भारत संस्थेतील सहकारी डॉ. कुटिनो हे अमेरिकेस गेले. तेव्हा कामाबाईंनी तो कुटिनो यांच्याजवळ दिला. कुटिनो हे गोवेकर ख्रिश्चन असून सावरकरांच्या अभिनव भारत संस्थेचे सदस्य होते. कुटिनो यांनी तो आपल्याजवळ जपून ठेवला. पुढे १९४७ साली स्वातंत्र्यानंतर सरकारने सावरकरांच्या सर्वच वाङ्मयावरची बंदी उठवली; ही वार्ता डॉ. कुटिनो यांना जेव्हा समजली तेव्हा त्यांनी एका इसमाबरोबर तो ग्रंथ डॉ. मुंजे यांच्याकडे पाठविला व तो सावरकरांना देण्यास कळवले. डॉ. मुंजे यांनी तो सावरकरांकडे पोचता केला. पुढे जेव्हा सावरकरांचे समग्र वाङ्मय प्रसिद्ध करण्याचे ठरले तेव्हा त्यात सावरकरांनीच त्याचे १९०९ साली करविलेले जे इंग्रजी भाषांतर केले ते हॉलंडमध्ये छापले व फ्रान्समध्ये प्रसिद्ध करून त्याच्या प्रती जगभर प्रसारित केल्या. क्रांतिकारकांची गीता असेच त्या ग्रंथाचे वर्णन केले जात असे. कारण क्रांतिकार्याचे तत्त्वज्ञान व मार्ग यांचे त्यात दिग्दर्शन घडले आहे. भगतसिंगांनी त्याचे एक गुप्त प्रकाशन घडविले होते व सुभाषबाबूंनीही १९४६ साली सिंगापूर भागात त्याची इंग्रजी आवृत्ती प्रकाशित केली होती. पण आता मूळ मराठी ग्रंथ उपलब्ध झाला होता व सावरकरांच्या समग्र वाङ्मयात त्याचा समावेश असणे आवश्यकच होते. मी तो ग्रंथ या समग्र ग्रंथमालिकेत प्रसिद्ध करण्यासाठी मागितला व त्यांनी तो दिला. त्या ग्रंथाने या समग्र वाङ्मयाला पूर्णता लाभली आहे. त्यानंतरही त्यांचे काही इंग्रजी व इतर ग्रंथ बाळाराव सावरकरांनी प्रसिद्ध केले असून त्यांचे चार खंडांत चरित्रही प्रसिद्ध केले आहे.

सावरकरांशी मला १९२३ सालापासून त्यांच्या निधनकालापर्यंत सतत दीर्घकाळ संपर्क ठेवता आला. त्यांच्याशी चर्चा करण्याची, त्यांच्या अंगीकृत कार्यात सहभागी होण्याची, त्यांचे वाङ्मय प्रसिद्ध करण्याची संधी मला मिळत गेली, हा माझ्या जीवनात विशेष होय. त्यांनी आत्मार्पण करून आपल्या जीवनाची समिधा राष्ट्रकार्यास अर्पण केली, हे यांचे अलौकिकत्व दीर्घकाळ लोकांना प्रेरणा देत राहील.

• •



## ५३ वीर सावरकरांच्या ओजस्वी वक्तृत्वाच्या आठवणी

म. श्री. दीक्षित

### 'हे सुरसरिते सिंधू !'

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला नि १९५० साली स्वतंत्र सार्वभौम भारतीय गणराज्य अस्तित्वात आले. त्यामुळे पन्नास वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या 'अभिनव भारत' या सशस्त्र क्रांती संस्थेची आवश्यकता उरली नव्हती. त्या चळवळीची औपचारिक सांगता करण्यासाठीच सावरकर त्यावेळी पुण्यपत्तनी आले होते. सळसळत्या यौवनात जो प्रखर ज्योत लावली तिचा स्वातंत्र्यरूपी प्रकाश भारतभूमीवर पडला असल्यामुळे आता आनंदाश्रूंनी ती विझवून कृतार्थतेचा उद्घोष ते करणार होते.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे भावनोत्कट, विचारगर्भ व धारदार भाषण ऐकणे हा एक अनुपम रोमांचकारी अनुभव असे. ज्यांनी हा अनुभव आस्वादला ते भाग्यवान होत. ज्यांनी न अनुभवला ते अभागी होत. नागपुरात आणि पुण्यात संधी मिळेल तेव्हा सावरकरांची भाषणे मी न चुकता ऐकली. हायस्कूलमध्ये असताना त्यांचं व्याख्यान प्रथम मी ऐकलं, ते १९३७–३८ साली. नागपूरच्या हिंदुसभा अधिवेशन प्रसंगी रा. स्व. संघाच्या शिवाजी छावणीतही त्यांनी या काळात एक व्याख्यान दिल्याचं आठवतं ! त्यानंतर १९४३ च्या मे महिन्यात साठीच्या प्रकट समारंभ प्रसंगीची त्यांची दोन व्याख्याने ऐकण्याची मला संधी लाभली. पहिलं स. प. कॉलेज मैदानावरील लाख जनसमूहामुळे गाजलेलं आणि दुसरं गोखले हॉलमध्ये साहित्यिकांनी मानपत्र दिले त्या प्रसंगीचं !

स. प. च्या मैदानावरील सावरकरांच्या वक्तृत्वपूर्ण भाषणातील काही कोमल, कातर, वाक्यं आठवली की अंगातून अजूनही एक विद्युल्लहर उमटून जाते. सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना भारावून गेल्या अवस्थेत ते उद्गारले—

'काही काही भावना इतक्या सूक्ष्म नि तरलकोमल असतात की त्यांना शब्दांचा स्पर्शसुद्धा सोसवत नाही. माझे स्वागत करण्यासाठी उभारलेल्या या समोरच्या प्रवेशद्वारातून प्रवेश करीत असताना माझ्या दृष्टीसमोर अंदमानी कारागृहाचं ते मरणद्वार उभं राहिलं. तिथली काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना तुम्ही कधी सुटका होईल, आणि हा असा भव्य सत्कार होईल असं परमेश्वरानं जरी मला सांगितलं असतं तरी त्यावर माझा अणुमात्र विश्वास बसला नसता, कारण त्या अंदमानी कारागृहातील पन्नास वर्षांची शिक्षा भोगत असताना मी केवळ हिंदुत्वाची एक किनाळी हाकेनच लिवलप पडलो होतो.'

त्यानंतरच्या काळात पुण्यात झालेली सावरकरांची सर्वच व्याख्यानं मी ऐकली.

पण त्यातील सर्वांत प्रभावी, स्फूर्तिशाली कोणतं असं जर मला कोणी विचारलं तर
सांगेन, १९५२ च्या १० मे रोजीचं अभिनव भारत सांगता समारंभ प्रसंगीचं, व्याख्यान
कसलं ते मूर्तिमंत वक्तृत्वच होतं, एक महान कष्टयोगी मराभूमीच्या तेजस्वी पुत्राने
गायलेलं चैतन्यशाली स्तोत्र होतं नव्हे सिंधुस्तव होतं........
गांधीवधाच्या अभियोगातून मुक्त झाल्यानंतर वीर सावरकर पुण्याला प्रथमच
येत असल्याने ९ मे रोजी सायंकाळी पुणे स्थानकावर त्यांचे प्रचंड जयघोषात स्वागत
झाले. त्यांच्या निवा सी सोय त्यावेळी 'केसरी'च्या अतिथिगृहात केलेली होती.
१० मे हा क्रांतिदिन म्हणून पाळावा आणि या दिवशी 'सत्तावन ते सुभाष' पर्वतच्या
सर्व सशस्त्र क्रांतिकारकांना, देशभक्तांना श्रद्धांजली वहायची, ही प्रथा नव्या जोमाने
सावरकरांनीच सुरू केली.

१० मे ५२ रोजी सकाळी जुन्या टिळक स्मारक मंदिरात क्रांतिकारकांच्या
चित्रांचे नि राष्ट्रीय वाङ्मयाचे एक प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यासाठी मी श्रम
घेतले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन दे. भ. केशवराव (तात्या) जेधे करणार
होते व त्यांच्या समवेत तात्याराव सावरकर आणि सेनापती तात्या बापट पाहायला–
ऐकायला मिळणार होते. सावरकर तर उद्घाटनाआधीच तिथे अचानक येऊन ठेपले
नि प्रदर्शन न्याहाळू लागले. पाहता पाहता मध्येच थांबून त्यांनी आम्हाला विचारलं,
'अरे, या चित्रावलीत म. फुले कुठे दिसत नाहीत. त्यांचं चित्र अवश्यमेव लावा. का
ते सांगेन भाषणात.' आम्ही धावपळ करून थोड्याच वेळात फुल्यांचं चित्र मिळवून ते
प्रदर्शनात योग्य ठिकाणी लावलं.

मंदिराच्या बाहेरील आवारात श्री. जेधे यांचं उद्घाटनाचं भाषण झाल्यावर वीर
सावरकर दहा–बारा मिनिटंच बोलले, पण त्यात केवढी कृतार्थता आणि प्रेरणा होती.
यांचि देही याचि डोळा ही भरतभूमी खंडित अवस्थेत का होईना, पण स्वतंत्र
झाल्याची पाहायला मिळाली, हे आमचं केवढं भाग्य! मी आता खरोखर कृतार्थ आहे.
समाधानी आहे. सत्तावनच्या वीरांपासून तो थेट नेताजींपर्यंत नव्हे, मुंबईत उठावणी
करणाऱ्या आमच्या नौदल सैनिकांपर्यंत ज्यांनी ज्यांनी म्हणून या देशाच्या स्वातंत्र्या-
साठी रक्त सांडलं, बलिदान केलं, कारावास भोगला त्या सर्वांचा संपादनात वाटा
आहे. अगदी अहिंसेने लढणाऱ्या काँग्रेसजनांचासुद्धा! आपण या सर्वांविषयी कृतज्ञ
राहिले पाहिजे आणि आपलं नूतन स्वराज्य–मग ते कोणत्याही पक्षाच्या हाती असो–
प्राणपणाने संरक्षिलं. शिवाजी महाराज, लो. टिळक, अगदी म. फुलेसुद्धा सारेजण
आपले स्फूर्तिदाते आहेत. ज्योतिबांनी पूर्वायुष्यात स्वराज्याच्या प्रेरणेने काही काळ
लाठीकाठी फिरवली होती हे विसरू नका. म्हणून पुन्हा सांगतो, आज मी मोठ्या
संतोषाने, कृतार्थ भावनेने या प्रदर्शनातील सर्व थानथोर क्रांतिकारकांना शतशः
श्रद्धांजली वाहतो.

सायंकाळी सारसबागेनजीकच्या पटांगणावर अभिनव भारत सांगता समारंभाचा



मुख्य सोहळा आयोजित केलेला होता. यावेळी सावरकरांचे भाषण ऐकण्यासाठी
लाखावर गर्दी उसळली होती. समारंभाच्या ठिकाणी हुतात्म्यांच्या स्मरणार्थ एक
क्रांतिस्तंभ उभारण्यात आलेला होता. व्यासपीठावर सावरकरांखेरीज सेनापती बापट,
केशवराव जेधे, गोळवलकर गुरुजी, ग. स. करंदीकर इत्यादी थोर मंडळी विराजमान
झालेली होती. सारा जनसमर्द वीरवाणी ऐकण्यास विलक्षण उत्सुक झालेला होता.
आरंभीची प्रास्ताविक सोपस्काराची भाषणं झाल्यावर वीर सावरकर ध्वनिक्षेपकाजवळ
सरकले, तेव्हा त्यांच्या जयजयकाराने अवघा पर्वती परिसर अल्पकाळ दुमदुमून गेला.
१८५७ ते १९५७ पर्यंतच्या स्वातंत्र्यलढ्याचा आपल्या उत्कट, ओजस्वी व नाट्यपूर्ण
शैलीत आढावा घेत घेत सावरकर भाषणाच्या समारोपापाशी येऊन ठेपले तेव्हा त्यांचा
कंठ दाटून आला आणि मग तो महान क्रांतिकारक देशभक्त अंतरीचे खळखळणारे
बोल बोलून गेला –

'आज भारताची तीनचतुर्थांश भूमी मुक्त झाली आहे, परंतु जिच्या तीरावर
पवित्र वेदसूत्रे रचली गेली होती नि यज्ञयागातील मंत्रघोष दुमदुमले होते त्या सिंधूचे
विमोचन अद्याप व्हावयाचे आहे. ती सिंधू नसती तर हिंदूही नसते! सिंधूविना हिंदू
हा शब्द निरर्थक आहे. हे सुरसरिते सिंधु! इतर सर्वांना तुझा विसर पडला तरी
आम्हा हिंदूंना तुझे विस्मरण कसे होईल? सिंधूविना हिंदू! अर्थावाचून शब्द! प्राणा-
वाचून कुडी! अशक्य, अशक्य! इतर कोणी नाही तरी निदान मराठी वीर केव्हा
ना केव्हा उठाव करतील नि तुझे विमोचन करतीलच करतील.'

हे अखेरचं स्फुरणदायी वाक्य ऐकताच लाख कंठांतून पुन्हा एकदा वीर
सावरकरांच्या नावाचा जयघोष निनादत राहिला. 'अखंड भारत अमर रहे! हमारा
नेता वीर सावरकर....'

११ मेची सकाळ. वेळ ९–९॥ ची असावी. सावरकर कुणाला तरी भेटण्यासाठी
'केसरी' कार्यालयातून बाहेर पडले. तासाभराने परतणार होते. या मधल्या अवधीत
मी एका छायाचित्रकाराला बोलावून 'केसरी'च्या आवारात प्रवेशद्वाराजवळ कॅमेरा
सज्ज ठेवण्यास सांगितला. अर्ध्याएक तासाने सावरकरादि मंडळी गाडीतून उतरताना
दिसली. मी लगबगीने पुढे आलो. सात पावले टाकत सावरकर आत वाड्यात येत
होते. डाव्या अंगाला माडीवर जाण्याचा जिना होता. साहजिकच ते त्या बाजूला
वळले. पण एवढ्यात मी त्यांना आर्जवी शब्दांत म्हणालो, 'तात्या, एक विनंती
आहे. आपल्या समवेत समारंभाच्या कार्यकर्त्यांचं एक छायाचित्र काढावं, अशी इच्छा
आहे. आपण फक्त पाच मिनिटं बसा. ती पहा सर्व सिद्धता करून ठेवली आहे.' नाही
म्हणणे त्यांना अशक्यच झाले. गाडी चढाओढ यशस्वी झाली. मधोमध खुर्चीवर
सावरकर, त्यांच्या आजूबाजूला जयंतराव, गणपतराव नलावडे, रा. ब. गोगटे,
श्री. पु. गोखले, श्री. रा. स. भट, गांगुर्डे इत्यादी आणि मी बरोबर सावरकरांच्या
मागे उभा. इतर सहकारीही असेच उभे. असे ते १५–२० कार्यकर्त्यांचं छायाचित्र मी

मोठ्या अभिमानाने जपून ठेवले आहे.

१९५२ मधील त्या ऐतिहासिक छायाचित्रात पँन्ट, कोट, नि हातात हॅट या वेशभूषेत मी उभा होतो. पुढे १९५५ पासून पायजमा, नेहरू शर्ट, जाकीट नि कल्ले या रूपात मी वावरू लागलो, तो आज १९८८ उजाडेपर्यंत. माझं हे 'मीपण' मी कटाक्षाने जपत आलो आहे. खंत वाटते ती एवढीच की, कल्ल्यांवेरीज सावरकरांचं कृतीत काहीच अनुकरण करता आलं नाही. करीत आलो ते फक्त त्यांचं गुणगान.

* *

वीणा हरदास
नागपूर २.

५४

## सावरकरांशी सुखसंवाद

मराठीत एक म्हण आहे – कुठे इंद्राचा ऐरावत आणि कुठे शामभट्टाची तट्टाणी! तसंच माझं आहे. कुठे स्वातंत्र्यवीर सावरकर आणि कुठे मी एक सामान्य स्त्री! पण माझ्या सामान्य आयुष्यात जे काही भाग्याचे क्षण आले, त्यात वीरवर तात्यांचे दर्शन हा अलभ्य लाभच म्हटला पाहिजे. पहिला भाग्याचा क्षण आमच्या विवाह मंगलाचा आणि पुढचे क्षण माझ्या पतिदेवांच्या पुण्याईनेच अनुभवता आले.

इ. स. १८५७ ची शताब्दी सार्‍या भारतात साजरी झाली. तेव्हा महामहोपाध्याय बाळशास्त्री हरदासांना मुंबई, पुणे, इंदूर, लखनौ आणि दिल्ली अशी पाच गावे व्याख्यानासाठी दिली होती. पैकी दिल्लीचे भाषण रामलीला मैदानावर होते. त्या भाषणाचे अध्यक्ष होते, स्वा. वीर सावरकर. ते त्यांचं मला झालेलं पहिलं दर्शन. पण ते फार दुरून झाले. साहजिकच उत्सुकता वाढली. त्यांना जवळून पहावे आणि त्यांच्या पवित्र चरणकमलावर मस्तक ठेवून आपण पुनीत व्हावे, अशी इच्छा झाली. पहिली इच्छा तर दुसऱ्याच दिवशी पूर्ण झाली. सकाळी दिल्लीच्या महाराष्ट्र मंडळाने त्यांना निमंत्रित केले होते, त्यावेळी त्यांना अगदी जवळून पहाता आले. डोळ्याचे पारणे फिटले. परमेश्वराने त्यांच्यावर सद्गुणांचा वर्षाव केला. तसाच सौंदर्याचीही उधळण केली होती. त्यांची राजकीय, सामाजिक मतं आणि त्यांचे विचार सर्वांना माहीत आहेत. आपल्या भाषणात त्यांनी तरुणांना सैन्यात जाण्याचा उपदेश केला. स्त्रियांकडे वळून ते म्हणाले, "भगिनींनो, तुम्हाला दोन मुलगे असतील तर एकाला सैन्यात पाठवा. मला जाणीव आहे, तुम्हाला भय वाटते की आपला मुलगा मरून जाईल. पण मी सांगतो की, माणसाला मरण एकदाच येते, ते घरी असूनही येते. स्टोव्हनं किंवा गॅसनं जळून मरण्याची शक्यता असते. म्हणून स्त्रियांनी स्वयंपाक करायचं सोडले आहे काय? विमान पडले तर मरण येते म्हणून कुणी विमानात बसत नाही काय? तसंच सैन्याचंही आहे. न भिता आपल्या मुलांना सैन्यात पाठवा.' त्यांच्या शब्दाशब्दांत कळकळ होती. त्यांचा आवाज तरी किती मधुर होता. माझे कान आणि डोळे कसे सुखावले होते.

त्याच दिवशी संध्याकाळी रा. स्व. संघाचे दिल्लीचे संघचालक श्री. लाला हंसराज यांनी तात्यांना चहाला बोलावले होते. आम्ही उभयता तेथे होतोच. खाणेपिणे होऊन ते जायला निघाले तेव्हा चालता चालता उपस्थितांचा परिचय श्री. वसंतराव ओक त्यांना करून देत होते. माझ्या समोर येताच ते म्हणाले, "ह्या शास्त्रीणबाई!" तोच तात्या म्हणाले, "मला वाटलंच, अहो! ही आमची, महाराष्ट्रीय महिला, नऊवारीतली." त्यांच्या त्या तेवढ्याच शब्दांनी मला अगदी महदानंद झाला. वास्तविक ते माझ्याशी संभाषण नव्हतेच.

माझी दुसरी इच्छाही परमेश्वराने पूर्ण केली. त्यांचा अमृतमहोत्सव होता. त्यानिमित्त त्यांच्या घरी मुंबईला होमहवन होते. ह्या मंगलप्रसंगी ह्या मृत्युंजयाचे दर्शन घेण्यासाठी आम्ही उभयता नागपूरहून मुंबईला गेलो. सकाळी टॅक्सी करून सावरकर सदनात गेलो. बाहेरच्या खोलीत सौ. माई (तात्यांच्या पत्नी) आरामखुर्चीत बसल्या होत्या. मी त्यांची खणा-नारळानं ओटी भरली. आणि तात्यांना नमस्कार करायला जाणार तोच थोड्यासाठी गाडी चुकावी तसं झाले. तात्या हात जोडून हवनासाठी आलेल्या ब्राह्मणांचा निरोप घेत होते. म्हणाले, "बराय, मी विश्रांतीसाठी जातो." ब्राह्मणही हात जोडून तात्यांना म्हणाले, "आपण आपल्या सेवेचा आम्हाला जो चान्स दिलात त्याबद्दल थँक्यू!" आणि आत जायला वळलेले तात्याराव एकदम परत फिरून म्हणाले, "आपल्याला हे वाक्य पूर्णपणे इंग्रजीत म्हणता येतं?" ब्राह्मणांनी नकारार्थी माना हलविल्या. तेव्हा तात्या म्हणाले, "नाही ना! मग हेच शुद्ध मराठीत म्हणा की, 'आपण आम्हाला ही जी संधी दिलीत त्यासाठी आम्ही आभारी आहोत.' परकी शब्दांची सरमिसळ कशाला?" असे म्हणून ते आत झटकन निघून गेले.

भाषेच्या शुद्धीसंबंधी त्यांचा फार कटाक्ष असे. रत्नागिरीच्या चौदा वर्षांच्या स्थानबद्धतेच्या काळात जी अनेक सामाजिक कार्ये त्यांनी केली त्यात अस्पृश्यता निवारणासारखेच भाषेचे शुद्धीकरण हेही एक कार्य आहे. शुद्ध बोला, शुद्ध लिहा, एवढे सांगून ते राहिले नाहीत तर इंग्रजी शब्दांना मराठीत प्रतिशब्द त्यांनी तयार केले. प्लॅटफॉर्मला स्थानक, टेलिफोनला दूरध्वनी, रेडीओ सावधान असे कितीतरी शब्द लोकांच्या तोंडी येतात ते तात्यांचेच आहेत.

यावरून एक गोष्ट आठवली म. म. हरदासांनी नागपूरच्या राष्ट्रशक्ती साप्ताहिकातून एक लेखमाला लिहिली ती जवळजवळ आठ-दहा महिन्यांपर्यंत चालली.

लेखमालेचा विषय 'भारतीय क्रांतिकारक' हा असल्यामुळे ते लेखाचा प्रत्येक अंक तात्यांकडे मुंबईला पाठवीत. तात्यांना उद्योग केवढा ! त्यांनी प्रत्येक लेखाचं कात्रण काढून त्यातील उर्दू शब्द अधोरेखांकित करून ( हाही शब्द तात्यांचाच अंडरलाइन या शब्दाचा मराठी प्रतिशब्द ) ते पाकिटात घालून नागपूरला पाठवले आणि पत्रात लिहिले, 'शास्त्रिबुवा, आपण संस्कृत पंडित आहात, आपल्या लेखनात तरी उर्दू शब्दांची भेसळ अपेक्षित नव्हती. मंदिरात उंदरांचा सुळसुळाट असावा, तसा तुमच्या लेखनात उर्दू शब्दांचा झाला आहे, असो.'

तात्यांना नमस्कार करण्याची माझी आशा मावळली तरी पण पुन्हा एकदा प्रयत्न करून पहावा म्हणून मी त्यांच्या मुलीकडे–सौ. प्रभाकडे–गेले. तिच्याजवळ माझी तीव्र इच्छा प्रदर्शित केली. ती म्हणाली, 'थांबा, मी विचारून येते.' माझी आशा पुन्हा पल्लवीत झाली. प्रभानं येऊन सांगितले तात्या मला आत बोलावताहेत. आता उत्सुकतेची जागा एक प्रकारच्या भयानं घेतली. पुरुषसिंहाच्या गुहेत जायचे होते. काय बोलतील ! काय विचारतील ? आपल्याला उत्तर देता येईल काय ? ह्या विचारातच मी खोलीत प्रवेश केला. तात्या पलंगावर बसले होते. पाय खाली सोडले होते. मी देवाच्या पायावर ठेवावं तसं त्यांच्या चरणकमलावर आपलं मस्तक टेकलं. मला वाटतं तेही थोडे गडबडले असावे. म्हणाले, 'अरेरे! सुवीन बैस ना.' ही आरामखुर्ची होती. त्यांच्यासमोर तिच्यावर कसं बसावं ? नं बसावं तरी कसं ? मी तिच्या हातावर टेकल्यासारखं केले, मला म्हणाले, "ह्यापूर्वी तू मला कधी पाहिलं होतंस ?" मी म्हटलं, "काल आपले नेहरू पार्कमध्ये....मला मध्येच अडवून ते म्हणाले, 'पार्क नव्हे उद्यान म्हण की. तू होतीस का तिथे ? आणि शास्त्रीबुवा कुठे आहेत ? मी तुमच्या घरी नागपूरला आलो होतो. तुला कल्पना आहे की नाही ? तेव्हा तुमचा साखरपुडा होता. आता ते घर खूप संभाळत असणार. आमचा शास्त्रीबुवा तर हिरा आहे. छान ! ते इ. १९४२ मध्ये श्री. दक्षिणमूर्ती मंदिरात आले होते, इतक्या वर्षांनीही त्यांची स्मृती अगदी ताजी होती. मला बोलण्याची आवश्यकताच नव्हती. मानेनंच मी होकार देत होते. मध्येच काहीस आठवल्यासारखं करून तात्या पुन्हा म्हणाले, "का ग, तुझे आणि लोकनायक अणे यांचे काहीतरी नातं आहे असं शास्त्रीबुवांनी तुमच्या विवाहाच्या वेळी मला धाडलेल्या पत्रात लिहिले होतं. माझं स्मरण बरोबर आहे ना !" मी म्हणाले, "मी त्यांची भाची आहे." म्हणाले, "छान, मी आता विश्रांती घेऊ ?"

मी पुन्हा एकदा नमस्कार केला आणि त्या हिंदुराष्ट्रपतीकडे पाठ न करता ते सुंदर रूप डोळ्यांत साठवीत दाराजवळ आले. मला ब्रह्मानंद झाला होता. स्वर्गाला अगदी दोन बोटं उरली होती. आपल्या आयुष्याचं सार्थक झालं असं वाटत होतं. बैठकीत बसलेले लोकही मी केव्हा परत येते ह्यासाठी अधीर झाले होते.

शास्त्रीबुवांनी विचारले, "बोलले" ? मी होकारार्थी मान हलवली. माझ्या मनात त्या छोट्याशा संवादाच्या आवृत्त्या चालल्या होत्या. शास्त्रीबुवांनी तर ते परम-



दैवत होते. आणि ते दैवत त्यांच्या पत्नीवर प्रसन्न झालं होतं. डोळ्यांतून आनंद ओसंडत होता. मला म्हणाले, "वीणा ! तू भाग्यवान आहेस."

• •

श्री. ना. वि. दामले
मुंबई ४०००२८.

५५

## एक हृद्य आठवण

चिरगांवी आमच्या घरी असतांनाच्या विशेष आठवणी.

बॅरिस्टर म्हणजे विलायतेतून शिकून आलेला मोठा माणूस ही माझी समजूत. कारण आमचे वडील विष्णुपंत दामले, गांवच्या वैमनस्यातून निर्माण झालेल्या एका खटल्यात त्यावेळच्या रत्नागिरीच्या न्यायालयात केवळ पांच-दहा मिनिटेच युक्तिवाद करून बॅ. जिनांनी त्यांना सोडविले. ५०० रु. घेतले. असे हे बॅरिस्टरांचे बुद्धिचातुर्य. मिळून काय मोठा. अति-मोठा फार फार मोठा असतो बॅरिस्टर एवढेच ऐकून मला माहीत.

एकदा काय झाले, आमचे शेतकरी कुटुंब–रहाट्यासाठी नवीन दोरखंडाची मळ करण्यासाठी आम्ही मुले, वडील व गडीमाणसे ओटीवर बसून काम करीत होतो. कोणी सोडणे कुटून काथ्या करीत, आम्ही मुले पेळ वळीत होतो व आमचे वडील सुंभ वळीत होतो. मध्येच हे बॅ. सावरकर कोठारातील आपले लेखनकाम सोडून बाहेर आले, व म्हणाले, विष्णुपंत किती सावकाश तुम्ही हे सुंभ वळता हो ! वडील म्हणाले, 'तात्या हे सोपे काम नाही, त्याला कसब लागते. तात्या म्हणाले, 'होय का, मग पहा तर !' असे म्हणून त्यांनी क्षणार्धात एक वावभर सुंभ भडभड वळून दाखविले तेव्हा आम्ही चकित झालो ! अरे हा बॅरिस्टर तर काथ्या कुटतो, सुंभ वळतो म्हणजे काय ? हा आहे तरी कोण ! साहजिकच कुतूहल वाटले, आदर वाटला.

तात्या आमचे घरच्या निरक्षर गड्यांना पाटी-पेन्सिल देऊन लिहिण्यास शिकवीत व आम्हालाही त्यांना मदत करण्यास सांगत. केव्हा केव्हा कंटाळा आला तरी नाही म्हणण्यास गड्यांना व आम्हालाही धीर होत नसे. नंतर हळूहळू आम्हाला विशेषतः आम्हा चारही बंधूंना सुटीचे दिवशी सकाळी तानाजीचा ( सिंहगडचा ) बाजीचा पोवाडा व अन्य देशभक्तीपर गाणी, रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले आदि श्लोक पाठ करण्यास देत, व आम्ही ते मोठ्या अभिमानाने जसजसे पाठ होतील तसे त्यांना

संध्याकाळी आळीपाळीने म्हणून दाखवीत, असू नव्हे कोणी कोणी किती पाठ केले ते म्हणून दाखविण्यास तेच सांगत असत. ज्याचे छ्यकर पाठ होत असे त्यांना भलाई ( शाबासकी ) देत. नसेल त्याला सांगत, अरे, येईल ग्रेईल. जरा आणखी मेहनत घे. पण निरुत्साही कधीही केले नाही. पुढे ते दोन्ही पोवाडे व अन्य गाणी, श्लोक एका ठेक्यात व एका तालासुरात आम्ही बंधू आमच्या ओपाळ्यावर बसून त्यांना म्हणून दाखविल्याचे मला पक्के स्मरते.

प्रथम ते आमच्याकडे आले ते एकटेच. कारण माई बाळंतपणासाठी माहेरी सातारला बहिणीकडे गेल्या होत्या. सौ. माई सुखरूप बाळंत झाल्या. मुलगी झाली. नाव ठेवले प्रभात. सौ. माई आपले कन्यारत्न चि. प्रभात, तात्यांच्या भाभी व त्यांची दहा वर्षांची मुलगी मंगू यासमवेत शिरगांवी येत असल्याचे पत्र आले. ही सर्व मंडळी रात्री सुमारे दहाचे सुमारास येतील अशी अपेक्षा. त्या दिवशी त्या रात्री तात्या हातात पाटी पेन्सिल घेऊन " तुम्ही आम्ही सकळ हिंदु बंधु बंधु " हे पद रचीत होते. मंडळी मुंबईहून रत्नागिरीस व रत्नागिरीहून शिरगांवी सारवट गाडीने ( घमनी–बैलगाडी ) येणार होती. तेव्हा ते गीतरचनेचे काम चालू असता मध्येच आम्ही म्हटले, 'तात्या, माई आल्या. गाडीचा आवाज ऐकू येतोय.' हे ऐकताच ते झटकन् उठून खळ्यात आले. खरं तर गाडी आलीच नव्हती. आवाजाचाही ठावठिकाण नव्हता. आम्ही खोटंच सांगितलं होतं. निव्वळ पोरखेळ, पण ते मुळीच रागावले नाहीत. मला फसविता काय रे गुलामांनो! असे मोठ्या खिलाडू वृत्तीने म्हणून परत आपले पदरचनेस घरात गेले. ते पद होते मला वाटते, नव्हे नक्कीच 'तुम्ही आम्ही सकल हिंदु बंधु बंधु' असा या विश्वात पदरचनेने वेळी रात्री रात्रौ ११ च्या सुमारास वीरपत्नी माईंचे कन्यारत्न प्रभातला घेऊन आमच्या घरात येणे झाले, धन्य तो दिवस! केवढे भाग्यवान आम्ही व आमचे घर!

## आणि रत्नागिरीतल्या या आठवणी !

मी रत्नागिरीच्या शाळेत जाऊ लागलो. तेथे टिळक आळीत नामदार लेलेंच्या घरात त्यांचे बिऱ्हाड होते. तेव्हा दुपारचे सुट्टीत पाणी पिण्यासाठी मी व माझे एक-दोन मित्र की जे बॅरिस्टरना पहाण्यास उत्सुक असत, सौ. माईंकडे जात असू. मी लहान, थोडा अवखळ असल्यामुळे मला महत्त्वाचे काम सांगत नसत. मोठ्या भावांना सांगत. क्रमांक एक तात्या ( सर्वांत मोठा भाऊ ) व क्रमांक तीन गजाननराव यांना. क्रमांक दोन मोरोपंत हे १९२६ पासून शिक्षकाची चाकरी करीत त्यामुळे त्यांनाही विशेष काम देत नसत.

मी मोठा झाल्यावर व गजाननराव चाकरीनिमित्त डोंबिवलीस गेल्यावर मात्र त्यांनी मला हाताशी धरले. तोपर्यंत गजाननरावांनाच कामे सांगत. आम्हा सर्व भावांत



गजाननरावांवरच त्यांची भिस्त होती. एकूण काय १९२९ पासून स्वयंसेवक म्हणून त्यांचा घनिष्ठ संबंध आला आणि त्याला कारणही तसेच झाले. एकदा विठ्ठल मंदिरातील गणेशोत्सवात 'उःशाप' नाटकातील एक महत्त्वाचा प्रवेश आम्हा मुलांकडून करविला. त्यातील मुख्य काम विसनचे होते. ते त्यांनी मला अभिनयासह शिकविले. भाषण जवळजवळ पुस्तकाचे दोन–तीन पाने एवढे होते. मी ते अस्खलित तात्यांच्या भाषणाप्रमाणेच त्यांच्या शैलीदार चढ–उतारावर व हावभावांसह करून दाखविले तेव्हा प्रथम त्यांनी माझे कौतुक केले. शाळेतील माझ्या एक–दोन शिक्षकांनीही वाहवा केली. तेव्हापासून पुढे प्रत्येक संवादात, स्पर्धेत काम दिले. 'वीर बंदा बैरागी' या त्यांच्या स्वतंत्र वैनायक वृत्तातील काही निवडक वेचे पतित पावन मंदिरातील गणेशोत्सवाच्या वेळी त्यांच्या विशिष्ट ढसक्यात म्हणून दाखविले आहेत.

रत्नागिरीतील पहिले सहभोजन वरच्या आळीत ( सध्या स्वरूपानंद स्मारक आहे तेथे ) शापाचे नाट्यगृहात झाले. अर्थात त्यात आम्ही बंधूंनी भाग घेतला. व नंतर उष्ट्या पत्रावळी उचलण्यास कोणीसुद्धा माणूस पुढे येईना. तेव्हा आम्ही, साळवी गुरुजी आदि स्वयंसेवकांनी उष्टी काढली. या सहभोजनामुळे लोकांत बरीच खळबळ माजली. नंतर पतित पावन मंदिरात सहभोजन या विषयावर एक परिसंवाद केला गेला. त्यात सहभोजनाच्या बाजूने मी बोललो, 'धर्माचे स्थान हृदय, पोट नव्हे. आपणाला पचेल आणि रुचेल ते अन्न कोठेही कोणाबरोबरही त्यांच्या पंक्तीला बसून खाल्ले म्हणजे जात जात नाही, धर्म बुडत नाही. मात्र ते अन्न वैद्यकदृष्ट्या शुद्ध व स्वच्छ असले पाहिजे.' हे ऐकून माझे वडील ताडकन उठले नि म्हणाले, 'तात्या अजूनपर्यंत मी तुमच्याशी सहमत होतो. आता मात्र कहर झाला. तुम्ही माझ्या मुलांना बिघडवीत आहात, म्हणून वाईट वाटते.' त्यावेळी समारोप करताना तात्या म्हणाले, विष्णुपंत म्हणतात की मी त्यांची मुले बिघडवीत आहे मी विचारतो की ही मुले कोणाची? ती तुमची तशीच या राष्ट्राची म्हणजे माझीही आहेत. तरी लक्षात घ्या मी त्यांना बिघडवीत नसून घडवीत आहे.'

अशा रीतीने सावरकरांच्या रत्नागिरीतील सर्व सामाजिक सुधारणांच्या चळवळीत अस्पृश्य वस्तीत जाऊन भजन, कीर्तन, सत्यनारायण, घरोघरी अस्पृश्य बंधूंसह जाऊन, सवर्णांस सोने देणे, प्रभातफेऱ्या, मेळे, संवाद, नाट्यप्रवेश, गाणी, पदे म्हणणे, भाषण स्पर्धा, स्वदेशी, मालाच्या गाड्या फिरविणे, आपल्यावेळी ठरलेल्या थोर हिंदू नेत्यांच्या सभा, प्रसिद्धीसाठी दवंडीपर्यंत सर्व लहान मोठी कामे सावरकरांच्या आज्ञेनुसार मी वेळोवेळी केली आहेत, अनेकांतील एक स्वयंसेवक म्हणून.

तसेच पतितपावन मंदिरात गणेशोत्सवाचे वेळी अस्पृश्यांचे गायत्री पठण, गीता पठण यात मी विशेषकरून भाग घेत असे. भंगीबुवांचे कीर्तनात त्यांना माळ घालून बुक्का लावण्याचेही काम मी केले आहे.

## झाले बहु, होतील बहु परंतु यासम हा !

असे हे स्वयंभु सावरकर. यांची आणखी एक आठवण सांगतो. मी एकदा असाच वर माडीवर रत्नागिरीचे घरी आतील जिन्याने त्यांच्या खोलीत गेलो (कारण त्यांचा आमचा एवढा घरोबा होता) साधारणतः ते जरा काही खुट्ट झाले तरी पटकन् विचारीत, कोण आहे ? पण यावेळी त्यांचे लक्ष गेले नाही. तेव्हा मी सहज विचारले, तात्या, काय एवढे वाचता आहात ? अरे तुला काय सांगू ! संस्कृत महाभारतातील कृष्ण शिष्टाई पर्व वाचीत होतो. खरोखर श्रीकृष्णासारखा श्रीकृष्णच होऊन गेला आणि खरेच रत्नागिरीला त्यांच्या लिहिण्याच्या खोलीत त्यांच्या मेजासमोर केवळ श्रीकृष्णाचेच हातात बासरी असलेले व पाठीमागे शेला सरसावणारे एकमेव छायाचित्र होते. तेच एक काय ते त्यांचे मुख्य दैवत होते, नव्हे होतेच.

दरवर्षी मराठी सातवीच्या परीक्षेसाठी ते एक स्वतंत्र भाषण देत असत. रत्नागिरी हे जिल्ह्याचे ठिकाण. तेथे या परीक्षेचे मुख्य केंद्र होते. म्हणून सर्व जिल्ह्यातील मुले परीक्षेस येत. त्यांच्यांवर सामाजिक सुधारणेचे संस्कार करण्यासाठी हे व्याख्यान असे. आपल्या चळवळीचा प्रचार व प्रसार करण्याची हरएक संधी ते नेहमी हेरून त्याचा संपूर्ण लाभ उठवीत असत.

अधूनमधून आपल्याच घरी माडीवर सज्जात ते होतकरू तरुणांच्या साप्ताहिक बैठका दर शनिवारी घेत. त्यात हिंदुसंघटन, भाषाशुद्धी, राष्ट्रवाद, समाजवाद, साम्यवाद, असे विषय घेऊन बोलण्यास सांगत. तसेच शिवाजी, टिळक, मॅझिनी, रामदास, स्टॅलिन, लेनिन, आदि थोर पुरुषांवरही भाषणे, परिसंवाद घडवून आणीत, असा होता त्यांच्या कामाचा झपाटा.

### सावरकर पुण्यतिथी २६ फेब्रुवारी

उपरिनिर्दिष्ट सावरकर संस्कारात वाढलो असल्याने त्यांच्या ऋणातून अंशतः तरी मुक्त व्हावे म्हणून मी आमच्या गावातील मराठी शाळेकडे एक सहस्र रुपये दिले आहेत. त्याच्या व्याजातून शाळा दरवर्षी २६ फेब्रुवारीला सावरकर पुण्यतिथी साजरी करते, मुलांच्या सावरकर स्मृति वक्तृत्व स्पर्धा घेतल्या जातात.

### सौ. माई सावरकर स्मृती

शिरगांवचे पहिले अखिल हिंदू हळदीकुंकू वीरपत्नी माई सावरकरांचे हस्ते झाले. त्याची स्मृती म्हणून वार्षिक हळदीकुंकू समारंभ दरवर्षी साजरा करण्यासाठी एक सहस्र रुपये ज्योती महिलामंडळाकडे दिले. त्याच्या व्याजातून हा सौ. माई सावरकर स्मृती निमित्त अखिल हिंदू हळदीकुंकू समारंभ ज्योती महिला मंडळ शिरगांव साजरा करीत असते.

• •



## ५६

वसुंधरा पटवर्धन
बेळगाव ५९०००५.

## सावरकर ज्ञानेश्वर होते

स्वातंत्र्यवीर सावरकरांना अनेक वेळा अनेक सभांतून पाहिले होते. गर्दीच्या समुद्रात बसून ! आधीच्या लहान असलेली त्यांची मूर्ती दुरून दिसणाऱ्या मूर्तीएवढी दिसायची आणि त्यांची ती ओजस्वी वाणी आकाशवाणीसारखी ऐकू यायची.

पण एकेक वेळ आपल्या कुंडलीत भाग्यरेखाच असते. दादरला सावरकर सदनमध्ये तात्याराव राहात असताना त्यांच्या एका वाढदिवसाला जाण्याचा दैवदुर्लभ योग आला. माझ्या वडिलांना बरे नव्हते म्हणून त्यांनी मला हार घेऊन पाठविले होते. देशभक्त म्हणून दिगंत कीर्ती असलेले सावरकर पांढरे स्वच्छ धोतर आणि तसाच एक पांढरा सदरा घालून घरगुती पोषाखात बसले होते. इथेही शुभेच्छा देणाऱ्यांची रीघ लागलेली होतीच, परंतु सावरकरांच्या चेहऱ्यावर आनंद होता. कृश मूर्ती, वार्धक्याची छटा, पण मुद्रेवरचे तेज व सामर्थ्याची आभा तशीच होती. मी त्यांना खाली वाकून नमस्कार केला आणि त्यांच्या हातात हार दिला. वडिलांचा निरोप सांगितला. त्यांनीही उलट निरोप दिला, " लागविलकरांना म्हणावं, प्रकृतीला जपा. देशाला तुमची गरज आहे. "

माझे वडील हिंदुसभेचे कार्यकर्ते होते. तरुण वयात क्रांतिकारकांच्या सहवासात होते. मनात आले, सावरकरांच्या संदेशातही देशभक्तीच लपलेली आहे. ज्याचा उपयोग देशाला आहे, त्याची जपणूक केलीच पाहिजे. सावरकरांच्या धमन्यांतून देशभक्तीचे रक्त वाहत होते. हनुमानाप्रमाणे त्यांनी आपले हृदय फाडून दाखवले असते, तर त्यात अखंड हिंदुस्थानचा नकाशा दिसला असता.

अशा या पोलादी मनाच्या महान् देशभक्ताच्या वृद्ध हातात मी हार ठेवला तेव्हा ते हात मला फिकट गुलाबी दिसले. त्या हातांचा आकार, ती निमुळती बोटे ही एका संवेदनशील कलावंताची असावी तशी होती. त्या हातांनी वर्षानुवर्षे कोलू फिरवला असेल हे खरेच वाटत नव्हते. सावरकरांच्या मुठीत गुलाबाची फुलेही होती आणि पोलादाचे वज्राहटही होते. या परस्परविरोधी गोष्टी ज्यांना जन्मभर सांभाळता आल्या त्यांची बुद्धिमत्ता किती प्रखर असेल ! आणि त्यांचे मनही कसे उत्तुंग, कोमल असेल !

खूप वर्षे झाली, श्री. जमनालाल बजाज हिंदुमहासभेतर्फे निवडणुकीला उभे होते. पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात सभा होती. सावरकर प्रचाराच्या भाषणासाठी आले होते. अंगात दोन-अडीच ताप, एक पाय जमिनीवर टेकवत नव्हता, अशा दुखत

होता. जवळ छत्री होतीच, तिच्या आधाराने उभे राहून ते म्हणाले, " यांना निवडून द्या हे सांगायला मी एका पायावर उभा आहे. " उभे राहवत नव्हते तरी उभ्यानेच बोलले. खणखणीत वाणी. त्या छोट्याशा देहात विलक्षण सहनशक्ती, दुर्दम्य आशावाद आणि आश्चर्यकारक उत्साह होता.

प्रसंग कोणताही येवो. कल्पना करून मनाने त्याची आधीच तयारी केलेली असायची. कचखाऊपणा हा शब्दच त्यांना ठाऊक नव्हता. याच भाषणात ते विजेसारख्या लखलखीत स्वरात म्हणाले, " मरगळ ? कशाची मरगळ ? " या दोन शब्दांत इतका तेजस्वीपणा होता की, ते ऐकताच माझ्या मनात जणू प्रकाशाचा झोतच्या झोत उसळू लागला. काही दिवस मी त्यांचाच सूर लावून स्वतःशी म्हणत असे, " मरगळ, कशाची मरगळ ? "

एकदा क्रांतिकारकांच्या सत्काराची पुण्याला एक विराट सभा झाली. इतकी मोठी सभा मी कधी पाहिली नव्हती. अशी सभा फक्त श्रीकृष्णाची झाली असेल. सावरकर प्रत्येक क्रांतिकारकाची ओळख करून देऊन त्यांना हार घालत होते. नारळ देत होते. समारोपाचे भाषण चालले होते. ती लहानशी सुंदर मूर्ती त्या छोट्या देहात आभाळाएवढे मन आणि त्या मनाला शोभेसे एकेक अलौकिक उत्कट गुण त्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वात वसलेले होते. स्वातंत्र्य मिळाले पण आमची सिंधू पाकिस्तानात राहिली. तिच्या आठवणीने त्यांनी तिला जशी हाकच मारली. एक हात पुढे करून ते म्हणाले, " हे सुरसेविनी सिंधू आम्ही तुला विसरणार नाही "

हे ऐकताच प्रत्येकाचे मन सिंधूच्या पाण्याने हिंदकळले आणि डोळ्यातून अश्रू सांडू लागले. हे देशभक्तीत भिजून चिंब झालेले वाक्य त्या दिवशी ज्यांनी ज्यांनी ऐकले ते परम भाग्यवान होत. अशी उत्स्फूर्त, उत्कट भावना आणि असा देशप्रेमाने उचंबळून येणारा स्वर एखादवेळीच श्रवणशक्तीची तृप्ती करतो.

भागलपूरचा सत्याग्रह होता. दादरला प्रचंड सभा भरली होती. कार्यकर्ते मदत गोळा करण्यासाठी सभेत झोळ्या घेऊन फिरत होते. सावरकर बोलत होते. मदतीचे ते आव्हान देशभक्तीने भारलेले होते. लोक देहभान विसरले होते. सावरकरांचे अस्तित्वच माणसांना असामान्य पातळीवर घेऊन गेले होते. आत्मगौरवाच्या विलक्षण जगात प्रत्येक श्रोता त्यावेळी तरंगत होता. सावरकरांची प्रभावशाली भाषा श्रोत्यांच्या हृदयाला हात घालत होती. भाषा होती पण ती एका निःस्वार्थी, त्यागी, बुद्धिमान व कर्तृत्ववान अशा महापुरुषाची, महान देशभक्ताची सिद्ध वाणी होती. तिने लोकांना मंत्रमुग्धच केले असे नाही तर श्रोत्यांची तार सावरकरांच्या सुरानेच वाजू लागली. त्या सभेत प्रत्येक श्रोता थोडाफार सावरकर झाला होता. खिसे भराभर खाली होऊ लागले.

अशा किती सभा ऐकल्या आणि वाटले की असा वक्ता होणे नाही, असा शब्दप्रभू नाही. असा उत्तुंग कल्पनांचा महाकवी नाही आणि तरीही वास्तवाचे भान असणारा स्वसुखाची राखरांगोळी करणारा विरागी आणि द्रष्टा देशभक्तही नाही.



सावरकर उघड्या डोळ्यांनी जगले आणि प्रायोपवेशन करून उघड्या डोळ्यांनी गेले. त्यांचा देह अस्थिपंजर झाला होता. पण नजर गेली तरी डोळे उघडे होते.

त्यांचे देशभक्त पुतणे श्री. विक्रम सावरकर म्हणतात, " आमचे तात्या ज्ञानेश्वर होते. "

* *

**डॉ. विनायक रामचंद्र करंदीकर**
पुणे ४११०२९.

५७

## सावरकरांचे बंधुप्रेम

स्वातंत्र्यवीर सावरकरांना मी प्रथम पाहिले, तेव्हा माझ्या वयाला अठरा वर्षे पूर्ण होण्यास थोडा अवधी होता. देशात आणि आपल्या आसपास घडत असलेल्या घडामोडींकडे उत्सुकतेने पाहण्याचे कुतूहल मनात जागे झाले होते. क्रांतिकारकांच्या इतिहासावर सापडलेली एक दोन पुस्तके वाचली होती. सरदार भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, कन्हैय्यालाल दत्त यांच्या धीरोदात्त आत्मसमर्पणाबद्दल मनात अपार आदर होता. महाराष्ट्रातील चाफेकर बंधू यांच्या कितीतरी आठवणी, त्यांचे वारसदार ते स्वातंत्र्यवीर सावरकर. त्यांचे सहकारी ते नाशिकमधील अनंत कान्हेरे, तर लंडनमधील मदनलाल धिंग्रा. सावरकरांना झालेली पन्नास वर्षांच्या काळ्या पाण्याची शिक्षा, त्यांनी भारताच्या बाहेर असताना समुद्रात घेतलेली उडी. अंदमानमधील त्यांच्या वास्तव्याचे भीषण पर्व. त्यानंतरची रत्नागिरीची स्थानबद्धता या सर्वांभोवती पराक्रमाचे व अद्भुततेचे वलय होते. या पृष्ठभूमीवर वार्ता ऐकली की सावरकर पूर्ण बंधमुक्त झाले. रत्नागिरीहून ते कोल्हापूरला आल्यावर त्यांचे अभूतपूर्व स्वागत झाले. आता ते पुण्याच्या वाटेवर आपल्या मिरजेत व शेजारच्या सांगलीत छोटासा मुक्काम करणार, त्यांचा नागरिकांच्या वतीने प्रकट सत्कार होणार. किर्लोस्कर मासिकामधून नाना विषयांवर येऊन गेलेले त्यांचे प्रभावी लेख वाचले होते. त्यातील शब्दप्रभुत्वाचा साक्षात्कार मनाला झाला होता. आता त्यांची रोमांचकारक वाणी ऐकावयास मिळणार. ताज्या तरुण रक्ताच्या त्या वयात त्यांच्याविषयीचा असीम आदरभाव मनात उफाळून उठला. या महान वीर पुरुषाचे आपल्या गावात आगमन होणार तर आपण काय करू शकू असा विचार माझा समवयस्क मित्र बंडू ( आताचे डॉ. म. क. [illegible]-पुढे काही वर्षे केसरीचे व्यवस्थापक झालेले ते ) आणि मी यांच्या मनात उत्पन्न झाला.

७

मिरजेतील हिंदुमहासभेचे प्रमुख नेते म्हणजे पंडित महादेवशास्त्री दिवेकर आणि दा. मो. भट. आम्ही दोघे दिवेकरशास्त्र्यांना जाऊन भेटलो आणि त्यांना म्हटले की, सावरकरांच्या मिरजेतील वास्तव्यात जे जे कार्यक्रम ठरतील त्या सर्वांमध्ये स्वयंसेवक म्हणून सांगाल ते काम करावयास आम्ही तयार आहोत. त्यांनाही तसे कोणीतरी धावाधावी हवे होतेच. त्यांनी आम्हाला होकार दिला. स्थानकावरील स्वागत कोणाकोणाच्या भेटीगाठी, कार्यकर्त्यांना निरोप पोचविणे सभास्थानीची व्यवस्था करणे येथपासून तो महासभेचे मिरजेतील पदाधिकारी, काही प्रतिष्ठित व्यक्ती, अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातीतील दोघे-तिघे बांधव या सर्वांच्या एकत्रित सहभोजनाच्या पंगतीत वाढणे, येथवर पडेल ते काम आम्ही दोघांनी केले. मिरज-सांगलीतील खाजगी वा सार्वजनिक असा एकही कार्यक्रम आम्ही चुकवला नाही. ते दोन-तीन दिवस एका भारलेल्या अवस्थेत गेले, त्यांचा सारा तपशील येथे देण्याचे कारण नाही. पण सारांशाने सांगायचे तर वयाची जवळ जवळ पंचावन्न वर्षे पुरी करीत असलेल्या आणि त्यातील निम्मेअधिक आयुष्य अपार हालअपेष्टा सोसत, कारावासात व स्थानबद्धतेत काढलेल्या या झुंजार पुरुषाच्या ठायी पंचविशीतील तरुणाला असावा असा जोष आणि आवेश आहे. तो त्यांच्या ओजस्वी वाणीत व भेदक दृष्टीत क्षणाक्षणाला प्रत्ययाला येतो आणि एवढ्या यातना-पर्वातून जावे लागले असूनही त्यांच्या हृदयातील स्वातंत्र्यभक्तीचा अंगार कालच्या तसा धगधगीत आहे, अशी प्रचीती त्या दोनतीन दिवसांमध्ये त्यांच्या होत राहिलेल्या प्रसंगाप्रसंगांतील दर्शनात येऊन गेली.

या सर्वांची द्योतक म्हणून एकच घटना सांगितली तरी पुरेशी आहे. सरदार कुर्लेकर हे मिरजेतील एक प्रतिष्ठित गृहस्थ, त्यांच्याकडे सावरकरांना चहासाठी बोलावलेले होते. सावरकरांना जवळून पाहता यावे म्हणून दाराशी आसपासची बरीच माणसे गोळा झालेली होती. त्या छोट्या रस्त्यावर त्यांची गर्दी मावत होती. घराच्या अंगणातही बरीच माणसे उभी होती. हातात छत्री घेतलेले सावरकर तेथील कार्यक्रम आटोपून बाहेर निघाले. बरीच माणसे असल्यामुळे घरातून चटकन् बाहेर पडणे शक्यच नव्हते. कोणाशी एखादा शब्द बोलत, कोणाकडे सहास्य दृष्टी टाकत, कोणाचा नमस्कार स्वीकारत, कोणाशी प्रत्युत्तरादाखल एक-दोन शब्द बोलत, सावरकर सुमारे वीस फुटांचे अंगण ओलांडून बाहेर पडत होते. एवढ्यात आमच्या ओळखीचा असलेला श्री. बाळ कुलकर्णी या नावाचा सतरा-अठरा वर्षांचा एक तरुण पुढे झाला. सावरकरांना त्याने पायाला हात लावून नमस्कार केला, आणि त्यासाठी खाली वाकलेल्या उठता-उठता त्याचा सावरकरांविषयीच्या आदराचा आवेग एवढा अनावर झाला की, त्याच्याही लक्षात आले नाही आणि त्याने एकदम सावरकरांना मिठी मारली. तो हमसाहमशी रडू लागला, डोळ्यांतून घळाघळा अश्रू येऊ लागले आणि जोरजोरात येणारे हुंदके त्याला आवरेनासे झाले. अकस्मात हे दृश्य पडल्यावर भोवतालची सारी माणसे चकीत झाली, सर्वत्र एकदम शांतता पसरली.



कोवळ्या वयातील भावनाप्रधान अशा त्या तरुणाचा आवेग सावरकर समजू शकले, त्यांनाही असा अनुभव पहिलाच असेल असे नाही. त्यांनी त्याच्या पाठीवरून हात फिरवला, थोडे थोपटल्यासारखे केले आणि मग त्याला सामोरा धरून त्याच्याकडे आपल्या तेजस्वी दृष्टीने पहात त्याला म्हटले, "थांब, थांब, हे काय ? क्रांतिकारक कधी असा रडतो काय?" एवढे होईतो बाळही मागे सरकला. दहा-पाच क्षणांत सारा प्रसंग अगदी आकस्मिकपणे घडून गेला. सावरकर पुढे गेले व दाराबाहेर पडले. त्यांचे एक वेगळेच दर्शन त्या प्रसंगात आसपासच्या सर्वांना होऊन गेले. त्यांच्या मुखातून त्या तरुणाला उद्देशून उत्स्फूर्तपणे शब्द बाहेर पडला, तो कोणता ? तर क्रांतिकारक, सावरकरांमधील पंचविशीतील क्रांतिकारक पन्नाशी उलटून गेल्यावरही किती जागा होता, त्याची ही सहज पटून गेलेली साक्ष होती. सांगली-मिरजेला झालेल्या साऱ्या खाजगी आणि प्रकट कार्यक्रमांतून सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील कोणत्या एका घटकाचा प्रकर्षाने आविष्कार झाला असेल तर त्यांच्या या वीरपुरुषाला साजेशा तेजस्वी वृत्तीचा. प्रत्यक्ष पाहिले तेव्हा मला दिसलेले सावरकर कसे होते याचे प्रातिनिधिक उदाहरण आजवर स्मरणात राहिलेले आहे. त्यानंतर त्यांना जेव्हा जेव्हा पाहिले तेव्हा हीच प्रचीती येत गेलेली आहे.

यानंतर बारा वर्षे उलटल्यावर १९४९ च्या उत्तरार्धात डॉ. बाळाराव सावरकर हे मुंबईतील त्यांच्या निवासस्थानी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या घटका मोजत असताना माननीय काशीनाथपंत लिमये त्यांची प्रकृती पहाण्यास गेले होते. तेव्हा मी त्यांच्या बरोबर होतो. डॉ. सावरकर ज्या खोलीत होते तेथे आम्ही सुमारे अर्धा तास होतो. वातावरण गंभीर होते. सर्वांची मने अस्वस्थ होती. कोणीकोणी येत-जात होते. या वेळीही काशीनाथपंतांच्या बरोबर आलेला एक स्वयंसेवक म्हणून मी एका कोपऱ्यात बाजूला बसून सारे काही पाहत होतो. योगायोग असा की, नेमके त्याचवेळी बाळारावांची प्रकृती पाहण्यासाठी म्हणून तात्याराव तेथे आले. वातावरणातील गांभीर्य अधिक गडद झाले. तात्याराव थोड्या अंतरावरील एका खुर्चीवर स्वस्थ थोडा वेळ बसले आणि बाळारावांची सेवाशुश्रूषा करीत असलेल्या व्यक्तींशी एक दोन वाक्ये बोलून परत गेले. थोरले बंधु बाबाराव आधीच हे जग सोडून गेले होते. आता धाकटा भाऊ, ज्याचा तरुणपणी लिहिलेल्या पत्रातून व क्वचित कोठे अन्य लेखनातून भेटणारा त्यांचा लाडका 'बाळ' मृत्युशय्येवर पडला होता. बाळाराव आणि तात्याराव या दोघा बंधूंना त्या प्रसंगात एकमेकांच्या समोर पहाताना मनात काय काय येऊन गेले असेल त्याचा तर्क कुणीही करू शकेल, सावरकरांचे तेथे घडलेले दर्शन वेगळे होते, अगदी निराळ्या प्रसंगातील होते.

• •

५८

श्री. मो. वि. दामले
मु. शिरगाव, जि. रत्नागिरी.

## विजयी वीरांना साजेसा निरोप

स्वा. सावरकर हे रत्नागिरीस संघीज्वराची ( प्लेग ) साथ असल्यामुळे नोव्हेंबर १९२४ ते जून १९२५ असे सुमारे ७ महिने शिरगावी आमच्याकडे वास्तव्यास होते. त्यामुळे आमच्या घरच्या सर्व मंडळींना ते ' आपल्यातीलच एक ' वाटत आणि त्यांना आम्ही तुमचे तळ्या संबोधीत असू.

तात्या रत्नागिरीस ८ जानेवारी १९२४ ते १० जून १९३७ ही सुमारे १३-१४ वर्षे स्थानबद्ध होते. राजकारणात भाग घ्यावयाचा नाही नि शासनाच्या ( त्यावेळी भारतावर परकीय ब्रिटिश शासन होते ) पूर्वपरवानगीशिवाय रत्नागिरीबाहेर कुठे जायचे नाही, अशी दोन बंधने त्यांच्यावर होती.

परंतु त्यांचा मूळ ' पिंड ' क्रांतिकारकाचा असल्याने या काळातही कार्यकर्ते हेरून त्यांच्यात सशस्त्र क्रांतीचा प्रचार करण्याचे कार्य ते गुप्तपणे करीत असत. कै. वामनराव चव्हाण ( बडी ) श्री. वासुदेवराव दर्वीकर, श्री. गजाननराव दामले, श्री. पवार, श्री. भाटकर आणि प्रसिद्ध महाराष्ट्रीय क्रांतिकारक कै. वासुदेव बळवंत गोगटे यांच्या क्रांतिप्रकरणाचे ' स्फूर्तिस्थान ' तात्याच होते, अशी ब्रिटिश शासनाची खात्री होती. पण तसा पुरावा सापडत नसल्याने सरकार तात्यांविरुद्ध काही करू शकत नव्हते. तथापि कै. चव्हाण ( बडी ) यांनी धोबी तलावावर केलेल्या गोळीबाराच्या प्रकरणात ' चौकशीला मदत देत नाही ' म्हणून तात्यांना रत्नागिरीच्या तुरुंगात सुमारे १९ दिवस ठेवण्यात आले होते.

पहिले महायुद्ध १९१८ साली संपले. या युद्धात भारताने ब्रिटिशांना भरीव मदत केली होती. म्हणून युद्धकालीन आश्वासन दिल्याप्रमाणे ब्रिटिशांनी ' मॉटेग्यु चेम्स फोर्ड ' सुधारणा दिल्या; पण त्या हिंदवासीयांच्या आकांक्षेच्या मानाने अगदीच अपुऱ्या होत्या; म्हणून गांधीजींच्या नेतृत्वाखाली ' असहकारितेचे ' आंदोलन भारतात धुमधडाक्याने सुरू होते. त्यामुळे भारतीयांना आणखी कोणते राजकीय हक्क द्यायला पाहिजेत याची चौकशी करून शिफारस करण्यासाठी ब्रिटिश सरकारने १९२९ साली सायमन कमिशन भारतात पाठवले. मात्र या कमिशनच्या ७ सभासदांत एकही हिंदी गृहस्थ नव्हता.

भारतीयांनी या कमिशनवर बहिष्कार टाकण्याचे ठरविले. ज्या ज्या ठिकाणी कमिशन गेले त्या त्या ठिकाणी जनतेने प्रचंड निषेध मोर्चे काढून ' सायमन परत जा ' या घोषणेने आसमंत दणाणून सोडले.



या मोर्चांवर अनेक ठिकाणी लाठीहल्ले झाले. लखनौला पंडित जवाहरलाल नेहरू व कै. पं. गोविंद वल्लभपंत यांनाही या हल्ल्याचा प्रसाद मिळाला.

कमिशन पंजाबात लाहोर येथे गेले. त्याच्या निषेधार्थ कै. लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली एक प्रचंड निषेध मोर्चा निघाला होता. त्यावेळी मोर्चाच्या अग्रभागी असलेल्या लालाजींच्या छातीवर लाठीचा एक जबरदस्त लाठीचा फटका मारण्यात आला- इतका जबरदस्त, की त्यामुळे पुढे थोड्याच दिवसांत लालाजींचा अंत झाला.

लालाजींवरील लाठीहल्ल्याच्या वार्तेने सावरकर खूप बेचैन झाले होते. त्यातच या हल्ल्यानंतर थोड्याच दिवसांत झालेल्या लालाजींच्या मृत्यूमुळे त्यांच्या बेचैनीचे परिसीमा गाठली होती. रत्नागिरीतील ज्या तरुणांचे त्यांच्याकडे जाणे-येणे होते त्यांपैकी पुष्कळांजवळ ते म्हणत, " लालाजींच्या मृत्यूचा प्रतिशोध घेणारा एकही तेजस्वी तरुण भारतात नसावा, ही केवढी शरमेची गोष्ट !

सावरकर या बेचैन मनःस्थितीत असतानाच एका सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास ते रत्नागिरीत कै. अच्युतशेट मलुष्टे यांच्या पेढ्यांच्या दुकानात बसलेले असताना ; ( तात्या रत्नागिरीच्या त्यांच्या वास्तव्यात सायंकाळी एकतर कै. अच्युतशेट मलुष्टे यांच्या पेढ्यांच्या दुकानात किंवा कै. डॉ. शिंदे यांच्या दवाखान्यात येऊन बसत असत ) बातमी येऊन धडकली की, " लालाजींवरील लाठीहल्ल्याचा प्रतिशोध म्हणून सॉंडर्स साहेबाला गोळ्या घालून ठार करण्यात आले. " ही बातमी ऐकून तात्या इतके हर्षभरित नि उत्साहित झाले, की त्यांनी तेथेच १ रतल ( त्यावेळी ' किलो ' नव्हता. 'रतल' होता. ) पेढे घेऊन ते येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या हातावर एक-एक पेढा ठेवू लागले. ' कसले पेढे ! ' असे विचारता म्हणत ' सगळेच भारतीय तरुण अद्याप भेकड्या आईचे दूध प्यालेले नाहीत, हे पाहून कोणत्या सच्च्या भारतीयास आनंद होणार नाही ! मला तोच आनंद आज झाला आहे. '

या घटनेच्या ४।८ दिवस अगोदर सावरकरांच्या एका भाषणाबद्दल रत्नागिरीच्या कलेक्टर महाशयांकडून त्यांना पाचारण करण्यात आले होते. आणि त्यावेळी १॥-२ तास कलेक्टर साहेबांशी चर्चा करून त्या भाषणाने आपणावर असलेली बंधने आपण तोडलेली नाहीत हे कलेक्टर साहेबांना त्यांना पटवून द्यावे लागले होते. म्हणून तात्यांच्या या पेढे वाटण्याचा विपरीत परिणाम होणार, अशी अनेकांच्या मनात पाल चुकचुकली होती आणि तसे झालेही. दुसऱ्याच दिवशी सावरकरांना कलेक्टर साहेबांकडून बोलावणे आले नि पेढे वाटण्याबद्दल स्पष्टीकरण मागण्यात आले. तात्यांनी काय स्पष्टीकरण दिले माहीत नाही. मात्र त्यांना कडक समज देण्यात आली, असे म्हणतात.

पुढे सॉंडर्स हत्या प्रकरणात दे. भ. भगतसिंग, दे. भ. राजगुरू, दे. भ. सुखदेव व यतीनदास यांच्यावर खटले होऊन पहिल्या तिघांना फाशीची शिक्षा झाल्याचे व दुसऱ्या यतीनदास हे तुरुंगात ६२ दिवस उपोषण करून त्यांचा मृत्यू झाल्याचे

सगळ्यांना ज्ञात आहे. इतिहासात लाहोर कटाचा खटला अशी त्याची नोंद आहे.

वै. भ. भगतसिंग आदींना फाशी दिले त्या दिवशी 'हा भगतसिंग हाय हाय' हे शोकगीत रचून ते म्हणत. रत्नागिरीतील तरुणांची एक शोकयात्रा तात्यांच्या उत्तेजनामुळे रत्नागिरीत निघाली होती. हे रत्नागिरीच्या जुन्या लोकांना माहीत आहे.

या शोकगीतात भगतसिंगादी हुतात्म्यांना ते दिलासा देतात –

"हा हुतात्म्यांनो अहा । जाळता तरी चित्ती
विजयाविषयी निश्चिंतची रहा ।"

## तात्यांपेक्षा माझा जीव मोलाचा नाही

१९४८ साली गांधीजींची हत्या झाली त्यावेळी माझी आई सौ. वेणूताई ही मुंबईस माझे कनिष्ठ बंधू रा. नारायणराव दामले यांचे सावरकर सदनातील बिऱ्हाडात रहाण्यास गेली होती. गांधी हत्येनंतर ३–४ दिवस सावरकर सदनावर हल्ला करून ते जाळण्याचा नि तेथे रहाणाऱ्यांना जबरदस्त मारहाण करण्याचा गुंडांचा बेत होता. माझ्या आईबरोबरच त्यावेळी माझ्या बंधूंची दुसरी एक वयस्कर बाई तेथे होती. या दोघींनाही माझ्या बंधूंनी सावरकर सदनावर हल्ला होऊन आतील रहिवाशांना मारहाण होण्याचा संभव असल्यामुळे "तुम्हाला बाहेर कोठे सुरक्षित स्थळी पोचवू का?" असे विचारले. दुसऱ्या बाईंनी पोचवा असे सांगितले; पण माझी आई म्हणाली, 'हजारो लोकांचे स्फूर्तिस्थान असणाऱ्या तात्यांच्या (स्वा. सावरकरांना आमचे कुटुंबीय नुसते तात्याच म्हणत.) जीवापेक्षा का माझा जीव अधिक आहे? मी येथेच रहाणार. माझे काय व्हायचे असेल ते होईल." आणि ती तशीच सावरकर सदनात पुढे महिनाभर माझ्या बंधूंकडे राहिली. शासकीय कडक बंदोबस्तामुळे 'सावरकर सदन' या त्यात रहाणारे यांना काहीच उपद्रव झालेला नाही ही गोष्ट निराळी; पण माझ्या आईच्या मनोवृत्तीची यामुळे कल्पना येईल.

पुढे गांधी खून खटल्यातून सावरकरांची निष्कलंक सुटका झाल्यावर त्यांना माझ्या आईबद्दलची ही बातमी कळली तेव्हा त्यांना माझ्या आईबद्दल खूप आश्चर्य नि कौतुक वाटले हे सांगणे नको.

## तत्त्वज्ञानाबाबत तडजोड नाही

स्वा. सावरकर १९२४ ते ३७ रत्नागिरीस स्थानबद्ध होते. या मुदतीत त्यांना राजकारणात भाग घेण्याची बंदी होती. परिणामतः त्यांनी या काळात समाजप्रबोधनाचे महाराष्ट्रातील मूलगामी कार्य रत्नागिरीत इतक्या धूमधडाक्याने केले, की त्या काळात रत्नागिरी हे समाजसुधारणेचे केंद्र झाले होते.



हिंदुसमाज एकजिनसी नि बलशाली व्हावा म्हणून समाजात रूढ असलेल्या सिंधुबंदी, व्यवसायबंदी, वेदोक्तबंदी, शुद्धीबंदी, स्पर्शबंदी, रोटीबंदी नि बेटीबंदी या 'सप्तबंद्या' हिंदु समाजाने तडातड तोडून टाकल्या पाहिजेत, असा त्यांचा दावा होता. त्यांपैकी सिंधुबंदी व व्यवसायबंदी या नष्ट झाल्याच आहेत. उरलेल्या पाच बंद्या आंदोलन करून तोडल्या पाहिजेत, असे ते म्हणत.

या सप्तबंधांपैकी मुख्यतः वेदोक्तबंदी, शुद्धीबंदी, स्पर्शबंदी, नि रोटीबंदी, तोडण्यासाठी त्यांनी रत्नागिरीतील दानशूर कै. भागोजीशेट कीर यांच्याकडून रत्नागिरीत श्री. पतितपावन मंदिर बांधवून घेतले. या मंदिरातील श्री लक्ष्मीनारायणाच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेच्या समारंभासाठी महाराष्ट्रातील अनेक पुढारी नि कार्यकर्त्यांना पाचारण करण्यात आले होते आणि बरेच आलेही होते.

मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेचे धार्मिक विधी करण्यासाठी मुद्दाम काशीहून व नाशिकहून शास्त्री, पंडित आले होते २२ फेब्रुवारी १९३१ ला हा समारंभ होता.

काशी, नाशिकचे ब्राह्मण, पुरोहित, रत्नागिरीस आल्यावर त्यांना मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेचे सर्व धार्मिक विधी कीर शेटजींच्या हस्ते घेणार व ते भंडारी जातीचे आहेत हे कळून आले. म्हणून त्यांनी कीर शेटजी हे जातीने भंडारी असल्यामुळे आम्ही वेदोक्त पद्धतीने धार्मिक विधी करणार नाही असे सावरकरांना सांगितले. तेव्हा सावरकर एका बाजूला आणि काशी, नाशिकचे, शास्त्री, पंडित दुसऱ्या बाजूला या पद्धतीने दिवसभर शास्त्रार्थ चालला होता. तथापि शास्त्री, पंडित, कीर शेटजींच्या हस्ते वेदोक्त पद्धतीने धार्मिक विधी करण्यास तयार होईना!

इकडे देवप्रतिष्ठेच्या मुहूर्ताला केवळ दोन तास उरले होते म्हणून कीर शेटजी डोळ्यांत आसवे आणून सावरकरांना म्हणाले, "पुराणोक्त पद्धतीने तर पुराणोक्त पद्धतीने, पण मूर्तीची प्राणप्रतिष्ठा ठरलेल्या मुहूर्तावर होऊ द्या!"

त्यावर सावरकर तात्काळ म्हणाले, "शेटजी, देऊळ आपले, आपण धनी, तेव्हा समारंभ आपण करावा. पण प्रत्येक हिंदूला वेदोक्ताचा अधिकार आहे, या तत्त्वाला आपण सोडणार असाल तर आपण मलाही सोडावे. तत्त्वाचे अधिष्ठान म्हणून हे नवे देऊळ हवे आहे. ते साधत नसेल तर आपणही मला सोडावे. पण जर का आपण तत्त्वास सोडणार नसाल तर याही परिस्थितीत मी समारंभ पार पाडीन. पण आमच्या अखिल हिंदु स्मृतीच्या आधारे पूर्वास्पृश्यांसह अखिल हिंदूंचा जो हजारोंचा समुदाय आज येथे जमला आहे, त्या हजारो हिंदूंच्या हस्ते देवमूर्ती उचलून जय देवा, असा घोष करून आम्ही ती मूर्ती स्थापणार. हाच आमचा विधी. 'हिंदुधर्म की जय' चे हजारो कंठांतून निघणारे जयघोष हाच आमचा वेदघोष आणि 'मामेति नियते देवो' हाच आमचा शास्त्राधार."

तात्यांच्या या तळमळीच्या आणि निर्धारयुक्त बोलण्याने कीर शेटजींना आनंद नि समाधान वाटले आणि ते उत्साहाने म्हणाले, "ठीक आहे, मी तत्त्व सोडीत नाही,

आणि तुम्हाला तर नाहीच नाही !"

शेवटी मसुरकर महाराजांच्या आश्रमातील वे. शा. संपन्न गणेशशास्त्री मोडक यांनी महाराजांच्या आज्ञेनुसार कीर शेटजींच्या हस्ते वेदोक्त पद्धतीने सर्व विधी यथासांग पार पडले. आणि २२ फेब्रुवारी १९३१ ला श्री पतितपावनच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा श्री शंकराचार्य, डॉ. कुर्तकोटी यांच्या हस्ते 'हिंदुधर्म की जय' च्या गगनभेदी आरोळीने करण्यात आली.

तत्त्वाबाबत तडजोडीला सावरकर कधीच तयार नसत.

• •

डॉ. वि. म. शिंदे

५९

## स्वा. सावरकर सुवर्णस्मृती

तात्यांच्या सहवासात राहून राष्ट्रीय वृत्तीच्या जोपासनेची आणि समाजकार्याची दीक्षा घेण्याचे भाग्य अनेकांना लाभले. त्या भाग्यवंतांपैकी मी एक आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या परिसाच्या सहवासात एक तपाहून अधिक काळ राहावयास मिळालेल्या भाग्यवंतांच्या जीवनाचे सोनेच झाले असे म्हणावे लागेल.

प्रत्येक हिंदूस वेदोक्त पूजेचा अधिकार आहे, असे श्रीमान शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनी सांगूनही आपण श्रीमान भागोजी शेट कीर हे ब्राह्मणेतर आहेत म्हणून त्यांच्या हस्ते श्री पतितपावन देवतांची प्राणप्रतिष्ठा करताना वेदोक्त विधी न करता पुराणोक्तविधी करण्याचा हट्ट धरला तर लक्षात ठेवा 'हिंदुधर्म की जय' हा वेदघोष करून अखिल हिंदुबांधवांच्या हस्ते मूर्तीची स्थापना करू. श्रीपतितपावन मंदिराच्या स्थापनेच्यावेळी यजमान श्री कीरशेट हे भंडारी असल्याने त्यावेळी तेथे जमलेल्या कर्मठ भटजींनी वेदोक्त पूजा करण्याचे नाकारले होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष असल्याने त्यांविषयी कोठे ना कोठे काही वाचावयास मिळते. अशाच एका क्षणी रत्नागिरीतील स्वा. वीरांच्या वास्तव्याच्या काळाचा चलत्–चित्रपट मनःचक्षूपुढे सरकत असताना त्यातील सुवर्ण–स्मृतींचे टिपलेले हे काही कण.

ब्रिटिश साम्राज्य उलथवून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी युद्धाच सशस्त्र क्रांतीचे व्रत घेणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही 'अभिनव भारत' या क्रांतिकारक गुप्त संघटनेच्या द्वारा ब्रिटिशांचा थरकाप उडविला. अशा तऱ्हेचा देदीप्यमान क्रांतिवीर ब्रिटिशांना मानवणारा नव्हता. स्वातंत्र्यवीर सावरकरांना दोन जन्मठेपींची म्हणजे पन्नास वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा देऊन ज्येष्ठबंधू क्रांतिवीर बाबाराव सावरकर यांच्यापाठोपाठ अंदमानमध्ये १९११ मध्ये पाठविले. ही शिक्षा ऐकून गर्भगळीत न होता त्या निधड्या छातीच्या क्रांतिवीराने आपल्या मातृभूमीला उद्देशून

मानूनी घे साची । जननि गे । मानुनि घे साची
अल्पस्वल्प तरि । सेवा आपुल्या अर्भक बाळाची
ऋण हे बहु झाले । तुझ्या स्तनींचे स्तन्य पाजुनी
धन्य आम्हा केले.
ऋण ते फेडाया । हप्ता पहिला । तत्स्थंडिली देह
अर्पितो हा ॥

या काव्यपंक्ती लिहिल्या.

'फिर रे कोल्हू फिर' म्हणत दुर्दैवाला आणि दुर्गाधिकारी क्रूरकर्मा बारी यांच्या जाचाला न जुमानता तेथेही मोठ्या कल्पकतेने हाती अडकविलेल्या शृंखलांच्या सहाय्याने लिकिलिक भाषेत अन्य कारागृहवासीयांशी संपर्क साधून स्वातंत्र्यासाठी झगडता यावे म्हणून त्यांच्या कोमेजलेल्या मनाला उभारी आणण्याचे कार्य त्यांनी चालू ठेवले. अशा तऱ्हेने १९११ ते १९२२ पर्यंत अंदमानच्या कारागृहात अनन्वित छळालाच नव्हे तर प्रत्यक्ष मृत्यूलाही न भिता जन्मठेपेच्या शिक्षेपैकी अकरा वर्षे यमयातना भोगत काढली. १९२२ मध्ये त्यांना परत भारतात आणण्यात आले. स्वा. वीरांच्या शौर्याची, कर्तृत्वाची, असामान्य धैर्याची, स्वातंत्र्यप्रीतीची, एवढी दहशत ब्रिटिशांना वाटत होती, की स्थानबद्धतेत त्यांना कोठे ठेवावे याची निश्चिती होईना ! शेवटी रत्नागिरीसारख्या आजूबाजूच्या ठिकाणी त्यांना स्थानबद्ध करून ठेवावे असे ठरवून १९२४ मध्ये त्यांना रत्नागिरीला आणण्यात आले. राजकारणात भाग घ्यावयाचा नाही. अनुज्ञेविना जिल्ह्याबाहेर जावयाचे नाही, असे काही निर्बंध त्यांच्यावर घालण्यात आले.

अमर होय ती वंशलता । निर्वंश जीचा देशाकरिता ।

या त्यांच्याच काव्यपंक्तीप्रमाणे त्यांची जीवनधारणा असल्याने वीर सावरकरांनी सशस्त्र क्रांती नाही, राजकारण नाही. देशाच्या उत्कर्षाच्या दृष्टीने तितक्याच महत्त्वाचा असा समाजसुधारणेचा कार्यक्रम हाती घेतला. जीवनातील क्षण नि क्षण, शरीरातील कण नि कण राष्ट्रासाठी वेचण्यात आनंद मानणाऱ्या स्वा. वीरांनी रत्नागिरी येथे आल्या आल्या समाज प्रबोधनाला सुरुवात करून सामाजिक क्रांती घडवून आणली. अस्पृश्यता निवारण, भाषाशुद्धी, स्वदेशीची चळवळ, रोटी–बंदी, दुष्ट रूढी, भ्रामक अंधश्रद्धा यांवर आपल्या तर्कशुद्ध विज्ञाननिष्ठित अमोघ वक्तृत्वाचे घणाघाती आघात करून सतत तेरा वर्षे जनजागृतीचे कार्य केले. त्या काळात रत्नागिरी येथील आमच्या कुटुंबियांप्रमाणे पटवर्धन, मलुष्टे, लागू, जोशी, दामले, साळवी, हर्डीकर,

गांधी, वळी, आठवले, लेलेकर इ. अनेक कुटुंबे स्वातंत्र्यवीरांच्या यज्ञकर्मात सहभागी झाली.

माझे वडील कै. म. ग. शिंदे तर स्वा. वीर सावरकरांचे अगदी उजवे हात समजले जात. प्रत्येक सार्वजनिक कार्यात ते सावरकरांबरोबर सतत असत. जेथे स्वा. वीर सावरकर तेथे डॉ. शिंदे अशी वस्तुस्थिती होती. मात्र माझ्या वडिलांची आद्याक्षरे 'म ग' अशी असल्याने काहीजण विनोदाने आधी सावरकर मग शिंदे असे म्हणत. तर्काला, बुद्धीला पटेल स्वतःला रुचेल अशी कोणतीही समाजहितोपयोगी गोष्ट करतानाही तमा न बाळगता निर्भयपणे करण्याची शिकवण त्यांनी सहकाऱ्यांना दिली. स्वतः मांडलेली मते विचार कृतीत आणून इतरांना स्वा. वीरांनी आदर्श घालून दिला. त्यांच्या रत्नागिरीतील तेरा वर्षांचे वास्तव्य म्हणजे समाजकार्याचे एक पर्वच ठरले.

स्वा. सावरकरांना सभांतून वगैरे संबोधताना 'तात्याराव' असे म्हणत. पण त्यांच्याशी संभाषणातून घरच्या एखाद्या वडीलधाऱ्याला म्हणावे तसे प्रेमादराने केवळ 'तात्याच' म्हणत. आम्ही लहान मुलेसुद्धा 'अहो तात्या' म्हणून निःसंकोचपणे हाक मारीत असू. तात्यांच्या सहवासात राहून राष्ट्रीयवृत्तीच्या उपासनेची आणि समाजकार्याची दीक्षा घेण्याचे भाग्य अनेकांना लाभले. त्या भाग्यवंतांपैकी मी एक आहे. स्वा. वीर सावरकरांसारख्या परिसाच्या सहवासात एका तपाहून अधिक काळ राहण्याचे मिळालेल्या भाग्यवंतांच्या जीवनाचे सोनेच झाले, असे म्हणावे लागेल. त्यांच्या सहवासातील काही स्मृतींचे सुवर्णकण येथे देण्याचा विचार आहे. त्यात पुनःप्रत्ययाचा आनंद लाभावा व वाचकांनाही स्वा. वीर दैनंदिन जीवनक्रमात तेथे कसे वागत, याची कल्पना यावी हा हेतू आहे.

तात्यांचा पेहराव ठरलेला असे. डोक्यावर काळी वाटोळी टोपी, सॅटिनचा पांढरा स्वच्छ कोट, कॉलरचे बटण लावलेला पांढऱ्या रेशमाचा शर्ट, सोनेरी फ्रेमचा चष्मा, लांब कल्ले, वर वळणारी ओठावरून खाली आलेली मिशी, डोक्याच्या समोरचाली केस व मध्ये टक्कल, एका खिशात सुगंधी तपकिरीची डबी, कोटाच्या आतील खिशात जंबिया, एका बाजूला पीठ भरून पुढे सोगा सोडलेले धोतर, काळे पंपशू, हातात सदैव लोखंडी मुठीची छडी असा त्यांचा वेश असे. एरवी बोलतानाच नव्हे तर व्यासपीठावरून बोलतानासुद्धा डाव्या हातात छडीची मूठ धरून ती पुढ्यात जमिनीवर टेकून ते बोलत असत. तात्या मध्यम उंचीचे होते. नेहमी कसरतीची जोडी फिरवीत असल्याने त्यांच्या खांद्याचे स्नायू मजबूत आणि छाती रुंद व भरदार होती. ते ताठ चालीत. स्वच्छ उच्चार, आवेश, आवाजातील चढउतार, जलदगती, अस्खलितपणा ही त्यांच्या बोलण्याची वैशिष्ट्ये होती. त्यांचे भाषण ऐकताना समोर बसलेला श्रोताच नव्हे तर त्यांना विरोध करायला आलेला विरोधकही त्यांच्या अमोघ वक्तृत्वाने मंत्रमुग्ध होऊन जाई.

समाजक्रांतीची गंगोत्री समजल्या जाणाऱ्या पतितपावन मंदिराची-स्वा. वीर



सावरकरांच्या प्रेरणेने दानशूर भागोजीशेठ कीर यांच्या दातृत्वाने आणि डॉ. म. ग. शिंदे यांच्या परिश्रमाने अखिल भारतातील अस्पृश्यांसाठी खुल्या असलेल्या या पहिल्या मंदिराची-स्थापना झाली. एकदा पतितपावन मंदिरात हिंदुधर्मातील दुष्ट रूढी आणि अंधश्रद्धा यांवर अनेक कोटिक्रम करून तर्कशुद्ध पद्धतीने त्याचे खंडन करीत असता एक जुन्या मताचे कर्मठ ब्राह्मण सद्गृहस्थ उभे राहून तात्यांना शिव्याशाप देऊ लागले. स्वयंसेवक त्यांना खाली बसविण्यासाठी धावले. पण तात्यांनी त्यांना थांबवून सांगितले की, प्रत्येकाला आपले विचार, मते मांडण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यांना बोलू द्या. त्यांचं बोलणं म्हणजे शिव्याशाप देऊन झाल्यावर तात्यांनी विद्वत्तापूर्ण कोटिक्रम करून त्यांचे समाधान केलं.

स्वदेशीची चळवळ हाती घेतल्यावर तात्यांनी प्रत्येक दुकानदाराकडे जाऊन साबण, साखर, कापड वगैरे स्वदेशी वस्तू विकायला ठेवा म्हणून विनवणी करावी. स्वयंसेवकाकडून हातगाडीवरून स्वदेशी माल घरोघर विकण्यासाठी पाठवावा एवढेच नव्हे तर गृहिणींनाही स्वदेशी साखर अंधुक आहे, कमी गोड आहे, या बांगड्या फिक्या रंगाच्या आहेत, ठिसूळ आहेत; पण स्वदेशी आहेत. तेव्हा थोड्यातरी घ्या, अशी विनवणी करावी. अखिल हिंदू गणेशोत्सवातील मेळ्यातूनसुद्धा आम्हा मुलींकडून

'करू चला स्वदेशीच्या अंगिकाराला ।
देशी व्रत हे प्राण व्रत हे इतुके तरी पाळा ॥'

अशी गाणी पण म्हणवून घ्यावी. आणि स्वदेशीचा प्रचार करावा, असा नित्यक्रम असे. थोर क्रांतिकारक, विद्वान, वक्ता, बॅरिस्टर, कवी, साहित्यिक, अशा थोर या देशभक्ताला भिकाऱ्यासारखे घरोघरी जाऊन स्वदेशीचा वापर करा म्हणून सांगायची काय आवश्यकता होती? स्वातंत्र्यासाठी खूप हालअपेष्टा भोगल्या, आता उर्वरित आयुष्य या गादीवर सुखानं कंठावे, असा कोता विचार त्यांना कधी शिवला नाही. अखेरच्या क्षणापर्यंत मातृभूमीसाठी झिजणे हे एकच ध्येय त्यांच्यापुढे होते.

व्यायाम करणाऱ्या तरुणांबद्दल तात्यांना फार आपलेपणा वाटायचा. सूर्यनमस्कार घालणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काही काळ त्यांनी गो.-भक्त फंडाच्या सहाय्याने विनामूल्य दूध प्यायला देण्याची व्यवस्था केली. एखादी व्यक्ती त्यांना भेटावयास आली की एकदाच आपल्या तीक्ष्ण दृष्टीने तिच्याकडे पाहून त्या व्यक्तीची कुवत क्षणार्धात ओळखून त्याप्रमाणे त्या व्यक्तीचा समाजकार्याकडे उपयोग करून घेत. तरुणांना तुम्ही बलसंवर्धन करता की नाही म्हणून नेहमी विचारीत. रत्नागिरी नगरपालिकेमध्ये व्यायामशाळा सुरू करण्याविषयीचा प्रस्ताव प्रथम माझ्या वडिलांनी मांडल्यामुळे तात्यांनी त्यांचे स्थानिक वृत्तपत्रातून अभिनंदन केले. लाठी, दांडपट्टा, जंबिया, नेमबाजी (एअरगनने) यांचे तरुणांना शिक्षण देण्यासाठी वर्ग उघडले. शाहीर नानिवडेकरांना बोलावले होते. स्त्रियांसाठीही वर्ग सुरू केले होते. तुम्ही शरीराने व मनाने सुदृढ झालात तर तुमच्याकडे वाकडी नजर करून पहायची छाती व्हायची नाही.

तुम्ही तेथल व्हा, आधुनिक शास्त्राचा उपयोग शिका, अद्ययावत विज्ञानाची माहिती घ्या. असं त्यांनं आम्हाला सांगणं असे.

त्यावेळी पूर्वास्पृश्यांची ( महार, चांभार, भंगी वगैरे ) सावलीसुद्धा घ्यावयाची नाही, एवढी अस्पृश्यता होती. हिंदुसमाजावरील हा लांच्छनास्पद कलंक दूर करण्या-साठी तात्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध मोहीम उघडली. ' आधी केले मग सांगितले ' या तत्त्वाप्रमाणे त्यांनी परटवणे येथील हरिजन वाड्यात जाऊन श्री. आपटे यांच्या घरी भाजी-भाकरी खाल्ली. त्यावेळी आम्ही बंधू त्यांच्याबरोबर होतो. आमच्या घरी पूर्वास्पृश्यांच्या स्त्रियांना ओटीवर बोलावून हळदी-कुंकू देण्याचा क्रांतिकारक समारंभही त्यावेळी करण्यात आला. या दोन भयंकर भ्रष्टाचारी ( ! ) गोष्टींमुळे काही काळ शेजाऱ्यांनी आम्हाला बहिष्कृत केलेले होते, म्हणजे आमच्याकडील दिवाळीच्या फराळाच्या ताटांचा त्यांनी स्वीकार केला नाही. शेजारीच नव्हे तर आमच्या आजोळीसुद्धा आम्हाला हीच वागणूक मिळाली. आजोळी गेल्यावर ' शिवा शिव ' पाळून पंचगव्य घ्यावं लागे, अर्थात तात्यांची व्याख्याने ऐकून हरिजनाने एका टोकाला धरलेल्या चिंध्यामुळे ( बांबू ) शिवाशिव होते म्हणून स्नान करणाऱ्या आजोबांनी नंतर आपल्या घरी कामाला हरिजन मुलगा ठेवला. अस्पृश्यतेचा मन्य पुतळा करून स्वातंत्र्यलक्ष्मी चौकात दहन केला.

परटवणे येथे महारवाड्यात एक मिशनरी शाळा होती. पुस्तके, कपडे, पाटया, वर्णेफुटाणे, यांच्या प्रलोभनाला बळी पडून तेथील हरिजन-वाड्यातील मुले त्या शाळेत जात. तेथे त्यांना त्या धर्माची शिकवण देण्यात येई. तात्यांनी प्रथम काही दिवस त्या मुलांना आमच्या अंगणात जमवून चणेफुटाणे, पाटया देऊन हिंदू धर्माची शिकवण देण्यास प्रारंभ केला. नंतर परटवणे येथील एक नागरिक श्री. खेडकर यांच्या सहाय्याने शाळा बांधून तेथे सर्व मुलांना संमिश्रपणे बसविण्यावर कटाक्ष ठेवला. काही वेळा शिक्षक अस्पृश्यांच्या मुलांना लांबूनच शिकवत. शिक्षा करायची झाली तर छडी फेकून मारीत. इतर मुलंही सुरुवातीला आपली गोणपाटं त्या मुलांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत. तात्यांच्या या प्रयत्नामुळे ती मिशनरी शाळा लवकरच बंद पडली.

नवीन देवनागरी लिपी ( सावरकर लिपी ) आणि भाषाशुद्धीसाठीसुद्धा शाळेतून त्यांनी प्रचार केला. आम्हा सर्व मुलांना नवीन लिपी वापरावला भाग पाडले. झाशीच्या राणीचा, तानाजीचा, शिवाजीचा पोवाडा त्या लिपीतून आम्ही लिहून काढीत असू. त्यांचे इंग्रजी, मराठी, संस्कृत, हिंदी आणि काही परकीय भाषांवर प्रभुत्व होते असे असूनही त्यांच्या व्याख्यानाच्या वेळी ते मराठीत असेल तर एकही इंग्रजी शब्द येऊ देत नसत. त्यांच्याबरोबर बोलताना सारखी तारांबळ उडे, मुंबईला त्यांना भेटायला मी गेलो असता ' काय करतोस ' असं विचारलं. मी म्हणालो, एल. एल. बी. करीत होतो. पण वडील वारल्यामुळे मेडिकलला गेलो आहे. माझ्या या भेसळजरी बोलण्याकडे दुर्लक्ष करीत ते म्हणाले, हो तू भिषक होत होतास. आता वैद्यक शिकतो आहेस, त्यांची



भाषा संस्कृतप्रचुर आणि भारदस्त असे. पुष्कळ वेळा त्यांच्या भाषणाची टिपणे घेण्यास आलेल्या ब्रिटिशांच्या नजरबंदांची ( सी. आय. डी. ) पंचाईत व्हायची कारण तात्यांची भाषा आणि विषय त्यांच्या डोक्यावरून जात असे. मग ते दुसऱ्या दिवशी वडिलांच्या दवाखान्यात येऊन ' डॉक्टरसाहेब, काल रात्री तात्या काय बोलले हो ? ' म्हणून विचारा-यचे. अर्थात सहजाचा भाग वगळून वडील त्यांना माहिती सांगत.

पतितपावन मंदिराच्या प्रवेशद्वारी ' अहिंदूस अनुज्ञेविना प्रवेश नाही ' अशी पाटी होती. एकदा तात्या युसुफ मेहेर अलींना मंदिरात घेऊन आले. ती पाटी वाचल्यावर मेहेर अली मिश्किलपणाने म्हणाले अहो मला कसं आत घेतलंत ? तात्यांनी तेवढ्याच मिश्किलपणाने सांगितले की " ती पाटी तुमच्यासाठी नाही, महंमदपैगंबरासाठी आहे. "

पतितपावन मंदिरातील गणेशोत्सवात अस्पृश्यता निवारण करण्यासाठी तात्यांनी अनेक उपक्रम सुरू केले. व्याख्याने, संवाद, मेळे, नाटक, वगैरे त्यावेळच्या संमिश्र मेळ्यातून ' तुम्ही आम्ही सकल हिंदु बंधु बंधु ', ' अखिल हिंदू विजय ध्वज हा उभवू या पुन्हा ' अशी स्वरचित गाणी बसवून घेतली. स्वतः लिहिलेले संवाद आमच्याकडून बसवून घेत. प्रथम प्रथम भगवा ध्वज हातात घेऊन दिंडीच्या मागून गाणी म्हणायला संकोच वाटायचा पण तात्यांच्या शिकवणीमुळे मग निर्भयपणा आला. याच मेळ्यात आणि याच मंदिराच्या व्यासपीठावर आजच्या खासदार बापूसाहेब परुळेकर, डॉ. मनोहर जोशी इत्यादींनी वक्तृत्वाचे पहिले धडे गिरवले आहेत.

श्रीमान कीरशेट अखिल हिंदू गणेशोत्सवाच्या वेळी प्रतिवर्षी पतितपावनाच्या वाढदिवसानिमित्त पंचपक्वानांचे सहभोजन घालीत. तात्यांसारखा योजक त्यांचा सहभोजन म्हणून उपयोग करून घेई प्रत्येक पंगतीमध्ये पूर्वास्पृश्य असलाच पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष असे. तात्यांची व्याख्याने ऐकून पुष्कळ लोक सहभोजनात सहभागी होण्यासाठी येत. पण बुद्धीला पटले तरी मनाची तयारी होत नसे. त्यामुळे ठरवून काही जण सवर्णांची स्वतंत्र पंगत करीत. तात्यांच्या लक्षात ही गोष्ट आली की आम्हा स्वयंसेवकांना ते अशा पंक्तीमध्ये एक महार, भंगी, चांभार, अशा अस्पृश्य बंधूंना नेऊन बसवायला सांगत. मग अशा लोकांची पंचाईत व्हायची. काही लोकांना सहभागी व्हायला चाले, पण वृत्तपत्रात प्रसिद्धी नको असायची, कारण सहभोजनात भाग घेणाऱ्यांची नावे दुसऱ्या दिवशी छापली जात असत. आम्ही अशा लोकांना तुमची नावे छापत नाही असं सांगून सरळ दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात त्यांची नावे छापून आणीत असू. विनोद म्हणजे केवळ स्पृश्य लोकांतच अस्पृश्यता होती असं नव्हे तर अस्पृश्यांमध्येही ती होती. भंग्याच्या शेजारी महार बसायला तयार नसे. आणि महाराजवळ चांभार बसत नसे; स्त्रियांचे स्वतंत्र सहभोजन असे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर सावरकर सहभोजन घडवून आणतात याचा यावर पुण्यातील काही पुढारी मंडळींचा विश्वास बसत नसे. त्यासाठी तात्यांनी एक तोडगा काढला. गणपती विसर्जन मिरवणुकीच्या वेळी विनामूल्य भजी, चहा गाडीवर मिळत असे. मात्र तो घेणारे

स्वयंसेवक अस्पृश्य असायचे, तरीही, त्यासाठी लोकांची गर्दी होई. सहभोजनाच्या वेळी जन्मजात जातिभेदोच्छेदनार्थम् सहभोजनम् करिष्ये ! असा संकल्प तात्या स्वतः सोडीत. पतितपावन मंदिराच्या प्रवेशद्वारी एक उपहारगृह तात्यांनी सुरू केलं, तेथे सर्व अस्पृश्यांना इतरेजनांबरोबर बसून चहा पिता येत असे. एवढंच नव्हे तर पदार्थ देणारी मुलंही अस्पृश्य असत. त्यावेळी इतर उपहारगृहांतून हरिजनांसाठी, अस्पृश्यांसाठी बाहेर स्वतंत्र बाकडी असत.

दारू पिण्याविषयी तात्यांना फार तिटकारा असे. दारू पिऊ नये म्हणून मेळ्यातून 'तू सोड सोड भाऊ दुष्ट दारूला' अशी गाणीही त्यांनी रचली होती.

सार्वजनिक तलावात पाय टाकून तो भ्रष्ट केल्यामुळे त्याचे पाणी हिंदू लोक पीत नसत. तात्यांनी पायच काय पण रुमेल नि पचेल ते सर्व खा; खाण्याने धर्म बुडत नाही. कारण धर्माचे स्थान हृदय आहे, पोट नाही, असे सांगून सर्वांची समजूत घातली.

पूर्वी पिंजारी पटवेकरी, टिनमेकर बँडचा व्यवसाय हिंदू करीत नसत. तात्यांनी अस्पृश्यांचाच बँड सुरू केला. अस्पृश्य पिंजारी तयार केला. अस्पृश्यांचा बँड चांगला होता.

नेपाळ स्वतंत्र हिंदू राष्ट्राचे 'प्रिन्स' हेमचंद्र जंग राणा व गुरखा संघाचे अध्यक्ष ठाकूर चंदनसिंग यांना रत्नागिरी येथे बोलावून त्यांना नागरिकांतर्फे मानपत्रे दिली. हिंदू सभेच्या अधिवेशनासाठी नेपाळचे प्रतिनिधी म्हणून माझ्या वडिलांची राणाजींनी निवड केली.

तात्या स्वतः करेल फिरवून व्यायाम करत. मालिश, स्नान केल्यानंतर ध्यान-धारणा करीत. कुलदगाणा हेअरऑईल वापरीत.

आपण थोर क्रांतिकारक व विद्वान बॅरिस्टर आहोत याची प्रौढी न मिरवता तात्या सहकाऱ्यांबरोबर चहा भजी खात. चेष्टामस्करी करीत.

मशिदीवरून सवाद्य मिरवणुका नेण्यावरून पुष्कळ वेळा तक्रारी व्हायच्या, तात्या आपल्या सहकाऱ्यांमध्येच सर्वांत पुढे असायचे त्यामुळे आम्हा मुलांना चेव येत असे.

एकदा गणपतीची मिरवणूक चालली असता एका पाद्री गृहस्थाने तात्यांना म्हटले, "काय हो, या मातीत कसला देव आहे तुमचा ?" त्यावर सावरकरांनी त्यांच्याच धर्मातील अनेक दाखले देऊन त्यांना निरुत्तर केले. ते क्षमायाचना करून निघून गेले.

तात्यांची रहाणी काटकसरीची, पाळलदर्शीवर लिहित. वर्तमानपत्राच्या कडेच्या कोऱ्या कागदावर चिठ्ठी लिहीत. त्यांचे कपडे पांढरे स्वच्छ असत पण पुष्कळ वेळा रफू केलेले असत. तात्यांना मांसाहार प्रिय होता. आमच्या घरी नेहमी मांसाहाराच्या पंक्ती उठत. तात्या बहुधा आमच्या घरी नेहमी येत असत. तेथे त्यांची भेटायला आलेल्या पाहुण्यांशी भेट होत असे. कारण तात्यांच्या रहाण्या जागेवर कोण आला, कोण गेला हे पहाण्यासाठी साध्या वेषातील पोलिसांचा पहारा असे. तात्यांची त्यावेळी



जप्त असलेली पुस्तके, मॅझिनीचे चरित्र, अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर वगैरे पुस्तकांची हस्तलिखिते, रिव्हॉल्व्हर्स आमच्याकडे आहेत या कल्पनेने अनेक वेळा सी.आय.डी.ची धाड आमच्या घरावर पडत असे.

अशा अनेक आठवणी मनःचक्षुंपुढे दाटी करीत आहेत पण त्याला कोठेतरी आवर घालणं भाग आहे. पुनःप्रत्ययाचा आनंद अनुभवण्यात मन गुंग आहे.

* *

६०

श्री. लक्ष्मी गो. देव
डोंबिवली पूर्व, जि. ठाणे.

## मी पाहिलेले सावरकर

स्वातंत्र्य मिळविण्यापूर्वीचा तो काल. सर्व युवकांचे रक्त एकाच ध्येयाने सळसळत होते. 'भारत इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झालाच पाहिजे.' 'स्वतंत्र भारत' हेच आपले एकमेव ध्येय. हे साध्य करण्यासाठी सर्व नेते भिन्न मार्गांनी प्रयत्न करीत होते. आम्ही त्यावेळी विद्यार्थीदशेत होतो. रोज नव्या बातम्या येत. रात्रीच्या वेळी 'परदास्य सुखा मानुनिया जीव जगावा का मृत्यु नसावा' असे गाणे (याच तऱ्हेची अनेक गाणी असत.) म्हणत कोणीतरी येई. चाळीच्या चौकात त्याचा आवाज घुमायचा. (आम्ही त्यावेळी गिरगावात गायवाडी येथे रहात होतो.) गाणं ऐकलं की, काय वाटायचं ते वर्णन करणं अशक्य. मग देशासाठी लढणारांची माहिती गोळा करायची, लेख वाचायचे हे करीत असता सशस्त्र क्रांतिकारक म्हणूनच वीर सावरकरांचे नाव मनावर ठसले. सरकारने जप्त केलेले 'माझी जन्मठेप' पुस्तक कुठून तरी मिळवून वाचून काढले. बोटीच्या पोर्ट होलमधून कडक पहारा असूनही उडी मारून पोहत पोहत सुटून जाण्यासाठी धडपडणारे वीर सावरकर कसे असतील हे पाहण्याची इच्छा अनावर झाली. सुदैवाने वाडीतील गणेशोत्सवात त्यांचे व्याख्यान ठरले. रात्री ९॥ वाजता आज वीरांचे दर्शन घडणार म्हणून व गर्दीत जागा मिळणार नाही म्हणून आम्ही दोन-चारजणी आठ वाजल्यापासून स्टेजजवळ बसून राहिलो.

रात्री ९॥ वाजता वीर सावरकर धीम्या चालीने १०-१२ जणांच्या घोळक्यातून स्टेजच्या दिशेने येत असलेले दिसले. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. धोतर, सदरा, कोट व काळी टोपी, सोनेरी काडीचा चष्मा या साध्या वेषात फार उंच नाही, फार ठेंगणी नाही. किंचित कृश अशी मूर्ती व्यासपीठावर चढत होती. नंतर परिचय वगैरे औपचारिक झाल्यावर वीर सावरकर बोलायला उभे राहिले. आणि सतत वीस

तास स्पष्ट लयबद्धीत शब्दांत सुस्पष्ट विचारांचा वर्षाव श्रोत्यांवर होत राहिला. वाक्य कुठे सुरू व्हायचे, कुठे संपायचे हे कळायचेच नाही. प्रत्येक वाक्य नव्हे, शब्द योग्य तेथे जोर देऊन उच्चारण्याची त्यांची पद्धत मनावर इतका ठसा उमटवून गेली की, त्यानंतर आजतागायत तसे व्याख्यान ऐकायला मिळाले नाही अशी खंत राहिली. त्यानंतर त्यांचे व्याख्यान गणेशोत्सवात अगर दुसऱ्या कोणत्याही निमित्ताने जेथे असेल तेथे जायचेच असे ठरवले. कितीतरी व्याख्याने ऐकली, पण त्यांनी केलेली हिंदू शब्दाची व्याख्या प्रयत्न करूनही पाठ झाली नाही. ( दहा–बारा ओळींची ती व्याख्या ते कसे म्हणून दाखवीत हे आश्चर्यच राहिले. ) मराठी भाषेला संस्कृतच्या साहचर्याने कसा मारदस्तपणा येतो, कसे प्रौढत्व येते ते. त्यांचं व्याख्यान ऐकून किंवा त्यांचे लेख वाचूनच कळेल, साधे 'च' हे अक्षर पण कोणताही विचार मांडून झाल्यावर 'नाहीच नाही' 'होयच होय' असं आवेशपूर्ण विधान त्यांनी केलं की हा 'च' केवढा अर्थवाही व्हायचा ( आता वयामुळे वाक्ये आठवत नाहीत, नाहीतर जास्त स्पष्ट करता आलं असतं ) प्रत्येक वेळी 'हिंदू' शब्दाचं विवरण झालंच पाहिजे आपण काय करायला हवं, शस्त्राशिवाय अहिंसेच्या मार्गाने स्वराज्य मिळणं कसं अशक्य आहे हे इतक्या प्रभावी रीतीने तात्याराव सांगत की प्रत्येक व्याख्यानात ४५ वेळा तरी टाळ्यांचा कडकडाट व्हायचाच. त्या दीड तासाच्या भाषणात कधीही विसंगती नाही, एका विचारातून दुसरा विचार. त्यांची मुद्देसूद मांडणी, भाषा प्रौढ पण श्रोत्यांना समजावून सांगत आहेत अशा पद्धतीने सावकाश बोलणे. ऐकणाऱ्याला आपण शिकत आहोत असं वाटायचे. व्याख्यान संपले तरी कानांत त्यांचे शब्द घुमत रहायचे. त्या मंत्रमुग्ध अवस्थेत वास्तवाचं भान यायला वेळ लागायचा. व्याख्यान संपूच नये असं वाटायचं. किती वर्षे लोटली स्मरणशक्ती कमी होत चालली. तरीही गायवाडीत व्याख्यान देणारे तात्याराव सावरकर डोळ्यांपुढे असेच्या तसे उभे रहातात. मी पाहिलेले सावरकर असे होते. अजोड वक्ते ! म्हणून म्हणावंसं वाटतं,

झाले बहु होतील बहु परंतु यासम हा !

• •

सौ. शैलजा राजे
सी २१, सुंदरनगरी,
३०८ सोमवार पेठ, पुणे ११.

६१

## असे होते सावरकर

मला वाटतं १९३७ साल असावं. नक्की आठवत नाही. अगदी आमच्या घरासमोरच कै. प्रबोधनकार ठाकरे रहात होते. त्यांच्या मुलीशी माझी मैत्री नसली



तरी चांगलीच ओळख झाली होती. एक दिवस ती त्यांच्या बाल्कनीत न् मी आमच्या, अशा उभ्या होतो. तिनं हळूच खूण केली. कसली ते मला कळलंच नाही.

संध्याकाळी दोघी गल्लीत आम्ही भेटलो. मी विचारलं, 'काय सांगत होतीस गं ?'

'रस्त्यावरून कोण जातंय ते पहा.'

असं सांगत होते, 'अगं सावरकर होते ते. आपल्या गल्लीत डॉ. प्रधानांच्या बंगल्यात रहायला आले म्हणे !'

स्वतःच्या बावळटपणाचा खूप राग आला. दादांच्या विषयी म्हणजेच प्रबोधनकार ठाकरे–घरात नेहमीच बोललं जाई. आमचं काही नातंही होतं म्हणे. दादांचा ( ठाकरे ) एक प्रकारचा दरारा वाटायचा आमचे दादा म्हणजे माझे वडील ठाकऱ्यांशी रस्त्यात भेट झाली की बोलत उभे रहायचे, खूप वेळ ! काय बोलायचे ते मात्र कळायचे नाही.

पण एक दिवस दादा म्हणजे माझे वडील अतिशय आनंदानं सांगत आले आज सावरकरांना जवळून पाहिलं. दोन शब्द बोललेही !

पुन्हा हळहळ ! आमच्या दादांच्याजवळ 'माझी जन्मठेप' होते, कडी कुलपात ठेवलेले ! आणखीही बरंच काही असावं. खरं तर आमचे दादा खादी वापरायचे. आमच्या घरात महात्मा गांधींचा मोठा फोटो, दादांच्या गुरूंच्या शेजारी लावलेला होता पण त्या दिवशी दादांच्या चेहऱ्यावर सावरकरांची भेट झाल्याचा जो आनंद मला दिसला तो मी जन्मात विसरणार नाही. त्या दिवशी दादांनी आम्हा मुलांना तात्यांच्या अनेक गोष्टी सांगितल्या ज्या आम्हाला एखाद्या परिकथेसारख्या अतर्क्य वाटल्या. आमचे डोळे विस्फारित होत्या !

एवढं मात्र खरं, सावरकर नावाची एक महान विभूती आपल्या एवढ्या जवळ रहात असून आपल्याला दर्शन होत नाही याची खंत वाटत होती. आपल्या नशिबातच त्यांचं दर्शन नाही. असं मनाशी म्हणत होते. मग दादांच्या हाता पाया पडून 'माझी जन्मठेप' वाचायला मागून घेतलं.

पुढे १९३८ साली जून महिन्यातला शाळेतला पहिलाच दिवस. खांडके बिल्डिंगमध्ये शाळा. जिन्यावरच कुसुम मराठे भेटली. आता तिच्याही अन् प्रभाच्याही मागे दुर्दैवाने कै. हा शब्द वापरावा लागतोय.

कुसुमने माझ्या खांद्यावर हात ठेवला न् म्हणाली, अग आपल्या वर्गात प्रभा सावरकर आलिय. सावरकरांची मुलगी !

क्षणभर कानावर विश्वासच बसला नाही. हिंदु-हृदयाचे सम्राट, क्रांतिवीर सावरकर यांची मुलगी आमच्या वर्गात ! वार्तेनेच अंगावर रोमांच उभे राहिले. धडाधड जिना चढून तिला पहायला गेले. गोड चेहऱ्याची, गालाला खळी पडणारी प्रभा मैत्रीण झाली की तिला त्या नात्यानं आम्ही बांधून घेतली? पण आता मला ज्यांचं दर्शन हवं होतं ते नक्की होणार होतं.

आणि ते शाळं प्रथम दर्शन. प्रभा नको म्हणत असतां तात्यांच्या विश्रांतीच्या वेळी गेलो. तात्या झोपले होते. ते तेजपुंज दर्शन घेऊन निमूट परत आलो. परंतु नंतर एक दिवस तात्या खुर्चीत बसले असतांना त्यांना पाहिलं. त्यांच्याशी बोलल्ो. तात्यांनी आमची प्रेमानं चौकशी केली आणि मग तात्यांना सवड असेल तेव्हा आमचा साळुंक्यांचा थवा 'सावरकर सदन' मध्ये जात होता. आता ती. माईंच्याही आम्ही मुली झालो होतो. आणि ही आमचा अभिमान होता. कळत नकळत अनेक गोष्टी मनावर कोरल्या जात होत्या. आम्ही अर्धवय वयाच्या! तात्यांचा हिंदुधर्माभिमान आम्हाला माहीत झाला होता. पण तात्यांची हिंदूची व्याख्या आम्हाला कुठं कळत होती? माझी एक शरीफ नावाची मैत्रीण होती जुनी. तात्यांचा प्रभाव मनावर वाढला न् मी तिच्याशी असलेलं मैत्रीचे नाते तोडले. तिचा भाऊ सैन्यात होता. एक दिवस तो रजेवर आला असता म्हणाला, 'मला सावरकरांचं दर्शन होईल का ग?'

'छट! तात्या हिंदुधर्माभिमानी आहेत.' मी जोरात सांगितलं पण अनुभव वेगळा आला. शेखभय्या कसे कुणास ठाऊक पण तात्यांच्यापर्यंत पोचले. आणि तात्या त्यांच्याशी नीट बोललेही म्हणे! शेखभय्या तात्यांच्याबद्दल अतिशय आदरानं बोलत होते. तात्यांनी म्हणे त्यांना गुरुमंत्र दिला होता. देशभक्तीचा! हेच शेखभय्या नंतर आझाद हिंद सैन्यात हुतात्मा झाले!

• •

६२

श्री. पु. गोखले

## दोन प्रकांड पंडितांची अविस्मरणीय भेट

त्या दिवशी तात्यांच्या स्वभावातला सर्वस्वी वेगळा पैलू मला प्रत्यक्षात सापडला.

बॅरिस्टर मुकुंद रामराव उर्फ बाबाराव जयकर नव्यानेच स्थापन झालेल्या पुणे विद्यापीठाचे कुलगुरू झाले होते. या विद्यापीठाच्या स्थापनेस ज्या मंडळींचा हातभार लागलेला होता त्यांत बाबारावांचा मोठा वाटा होता. पूर्वीच्या मुंबई इलाख्याच्या गव्हर्नरचे प्रशस्त निवासस्थान आणि त्याचे विस्तीर्ण आवार पुणे विद्यापीठाला मिळाले होते. एका शहराच्या नांवाने विद्यापीठ स्थापन करण्यामागचा कुटील डाव उधळला गेला तो दोन गोष्टींमुळे! साहेबाच्या काळातलं राज्यपालाचं शांत सुंदर निवासस्थान



आणि शेकडो एकरांच्या आवाराबरोबरच त्याला सर्वच दृष्टींनी सुयोग्य असे बाबा-रावांसारखे कुलगुरूही लाभले होते! जयकरांनी आपल्या कारकीर्दीचा प्रारंभही महाराष्ट्राच्या त्यागमय इतिहासाला शोभेल असाच केला होता. कुलगुरू म्हणून वेतन घेण्याचे नाकारूनच न थांबता त्यांनी विद्यापीठाच्या निवासस्थानात न राहता स्वतःच्या बंगल्यात 'मातृस्मृतीत' वास्तव्य करण्याचे ठरवलं!

बाबारावांच्या या नव्या कामगिरीबद्दल तात्यारावांच्या मनात आदर वाढत होता. जयकरांची राजकीय क्षेत्रातील भूमिका कट्टर राष्ट्रवादी होतीच. त्यामुळे दोघांनाही एकमेकांविषयी प्रेम आणि आपुलकी वाटत असे. याचे प्रत्यंतर तात्यांनी जयकरांच्या बंगल्याच्या आवारात पाऊल ठेवले त्याच क्षणी आले.

तात्या मोटारीतून उतरायचे होते. तोच जयकरांनी पुढे येऊन आपल्या भरघोस स्वागतात आणि विशिष्ट शैलीत म्हटले, "तात्याराव, तुम्ही माझ्या वास्तूला भेट देत आहात याचा मला फार आनंद होतो आहे!"

पायउतार होताच नमस्कार करून त्यांच्याशी हस्तांदोलन करीत हसतच तात्या उद्गारले, "पुण्यातल्या या सुंदर बंगल्यात मी प्रथमच येत असलो तरी मुंबईला मी आपल्याकडे अनेकवेळा आलोय!"

इतके बोलून थोडे मागे सरकत तात्यांनी बागेकडे पाहिले आणि पुन्हा त्या वास्तूकडे बघत म्हटले, "हा तर एखाद्या बड्या इंग्रजाचा बंगला आहे असं वाटतंय. मला बालकाळातल्या तिकडच्या दिवसांची आठवण येतेय!"

जयकरांनी उत्तर दिले, "मला तसं आर्किटेक्चर फार आवडतं!"

आर्किटेक्चर हा इंग्रजी शब्द ऐकताच मी तात्यांकडे दृष्टी वळवली. आर्किटेक्चर म्हणजे वास्तुशिल्प असं तात्या जयकरांना सांगतात की काय असं माझ्या मनात आले. तात्यांनी बाबारावांना मराठी प्रतिशब्दाचे स्मरण दिले नाही. हाही अनुभव मला नवाच होता.

तात्यांनी बाह्यरचनेतील दगडांकडे बघत विचारले, "वास्तूचे हे विविधरंगी दगड कुठे मिळाले?"

"रंगीबेरंगी दगडांची रचना मला आवडते. त्यासाठी जोधपूर, जयपूर अशा गांवाहून मी मुद्दाम हे दगड मिळविले!"

दोघे चालत चालत निरीक्षण करीत होते. परत वळत तात्या म्हणाले, "बाहेरची भिंत पाहूनच तुमच्या कलापूर्ण स्वभावाचं चांगलं प्रत्यंतर येतंय!" तात्यांनी व्यक्त केलेलं मत वस्तुस्थितीदर्शकच होते. बॅ. जयकरांचा तो बंगला खरोखरच सुंदर आणि वैशिष्ट्यपूर्ण होता. केवळ बाहेरचं रूपच नव्हे तर बंगल्यातली सारी रचना आणि मांडणी मोहक होती. ती पिढीजात श्रीमंतीला आणि अत्यंत रसिक मनाला अनुरूप अशीच होती. त्याने वास्तव्यही तेथेच असल्याने मांडणीतील टापटीपही नजरेत भरत होती.

तात्या सहसा कोणाच्या घरी जायला, उगाच कोणाला भेटायला किंवा गप्पाष्टकं

ठोकत बसायला उत्सुक नसत. पण जयकरांशी ते फारच मनमोकळेपणाने बोलत असल्याचे मला स्पष्टपणाने जाणवत होते.

घरात शिरताच जयकर म्हणाले, " तात्याराव, आज मी तुम्हाला चहाबरोबर अनेक प्रकारची पण निव्वळ सँडविचेस फक्त देणार आहे. "

बाबाराव असं सांगत असतानाच तात्यांचं लक्ष भिंतीवर लावलेल्या एका तैलचित्राकडे गेलं. ते चित्र बघताच एका प्रसिद्ध चित्रकाराचं नाव ( मी ते नाव विसरलो आहे ) घेत तात्यांनी विचारलं, " मुंबईच्या तुमच्या बंगल्यातल्या जिन्यातलं ते चित्र माझ्या स्मृतीत घर करून राहिलेलं आहे. त्याची तशीच एखादी कलाकृती तुम्ही इथं लावलीय की नाही ? "

बाबाराव चमकून पहात उद्गारले, " तात्याराव, मला रसिक म्हणता म्हणता तुम्हीही तसेच कलाप्रेमी आहात हे मला आत्ता जाणवतंय ! अहो ! तो माझा आवडता चित्रकार आहे. त्याचं दुसरं पण तितकंच चांगलं चित्र मी इथल्या जिन्याच्या भिंतीवर लावलंय. चला दाखवतो ! जिन्याने वर येताय ना ? "

त्या दोघांना काही विशेष बोलायचे असेल तर आपण त्यांच्याबरोबर जाणे योग्य नाही असे ठरवून कोणी मागोमाग गेले नाही.

मी, स्वतः तात्यांचे वैयक्तिक कार्यवाह श्री. बाळ सावरकर आणि श्री हरिभाऊ भिडे तात्यांच्या समवेत आलो होतो. आम्ही बसलो होतो त्याच्या पलीकडच्या बाजूला मोठ्या टेबलावर बशा, कपबशा, सुंदर विणकाम केलेल्या रुमालाने झाकलेले पाण्याचे ग्लास यांची मांडणी चालू होती. तितक्यात स्वयंपाक्याने मला विचारलं, " साहेबांसह एकूण पाच माणसं ना ? "

मी मानेनं होकार देताच तो आत गेला.

दोघे परत खाली येईपर्यंत वेळ काढण्यासाठी मी हरिभाऊंना म्हटलं, " तुमची पंचाईत आहे. इथल्या साहेबी शिष्टाचाराप्रमाणे तुम्हाला खाद्यपदार्थांचा नेहमीसारखा समाचार घेता येणार नाही अन् ही सँडविचेस मांसाहारी असल्याने तुम्हाला खाताही येणार नाहीत. जयकरांच्या आचाऱ्याकडून आम्ही नेहमीच मांसाचे पदार्थ करून घेतो. तो चविष्ट जेवण करणारा आहे. "

हरिभाऊंनी कोणतंही उत्तर देण्यापूर्वी दोघे परत आले. सारी मांडामांड पूर्ण झालेली होती. आम्ही सगळेच त्या टेबलाभोवती बसलो.

कोणकोणत्या प्रकारची सँडविचेस केलेली आहेत ते हातानं दाखवत बाबारावांनी वर्णन केलं. " सार्डीन, रावस आणि पापलेटचे तुम्हाला आवडतात म्हणून मुद्दाम केले आहेत. चटणी, अंडी आणि चीज यांचे तीन प्रकार आणि हे दोन मांस आणि चिकनचे असले तरी अगदी लुसलुशीत आहेत. तुम्हाला सहज चावता येतील. "

जयकरांनी एकेक नमुना तात्यांच्या बशीत ठेवण्याचा प्रयत्न करताच तात्या म्हणाले, " इतक्या प्रेमाने तुम्ही केलेल्या पदार्थांचा स्वादच संतुष्ट करतो आहे. मी



एखाद् दुसरा तुकडा घेईन. अधिक खाणे आता मानवत नाही. "

इतका वेळ गंभीर बोलणे झाल्यामुळे तात्यांना चेष्टा करण्याची लहर आली असावी. त्यांनी हसत सांगितलं, " सगळे पदार्थ एकटा हरिभाऊ संपवून टाकील.

" पण हरिभाऊ भिड्यांना मांसाहार चालत नाही. " मी मध्येच म्हटले.

" अरे, म्हणून तर तसं म्हणालो. तुम्हा दोघांचा मला विसर करा पडेल ! " तात्यांनी हसत उत्तर दिलं. हरिभाऊ हातात एक नमुना उचलून म्हणाले, " मांसाहार करीत नसलो तरी अंड्यापर्यंत मी पोहोचलोय ! "

त्याला चिडवण्यासाठी तात्या उद्गारले, " तू घेतला आहेस त्यात मासा आहे. "

हातातल्या सँडविचेसकडे हरिभाऊंनी चमकून बघितलं आणि सांगितलं, " समोर आलेली खाण्याची वस्तू कधी टाकू नकोस असं आईनं शिकवलंय ! " आम्ही सगळे मनमोकळेपणानं हसलो. चहाचा घोट घेत तात्या जयकरांना म्हणाले, " आपण हे पद स्वीकारलंत त्यामुळे विद्यापीठाची उंची वाढली आहे. मानधन किंवा वेतन नाकारून स्वतःच्या वास्तूत निवास करण्याचे ठरवलेत हे खरोखरच अभिनंदनीय आहे. तुमच्या नेतृत्वाखाली पुणे विद्यापीठ भरीव कामगिरी करील याची ही खात्रीच आहे. तुमच्याशी गप्पा झाल्या की मला आनंद वाटतो म्हणून वेळ काढून आलो. "

सहसा कुणाकडे न जाणारे तात्या वाकडी वाट करून बॅरिस्टर साहेबांकडे का आले असावे ते कोडं सुटलं !

मेजावरचे सारे रुचकर पदार्थ आमची वाट पहात असताना साहेबी पद्धती सांभाळायची म्हणून आम्ही काही वेळाने ती मन प्रसन्न करणारी वास्तू सोडली.

• •

६२ बाबूमिया

## सयाजीराव, सावरकर, व बडोदे

बडोदे व सावरकर यांचा फार जवळचा संबंध होता. याचे कारण सावरकरांचा उदय होण्याआधीपासून लो. टिळक व सयाजीराव महाराज यांची फार जवळीक होती. त्या दोघांचे संबंध रामदास व शिवाजी यांच्याप्रमाणे होते.

सयाजीरावांच्या आधी मल्हारराव गायकवाड तर भलतेच राष्ट्रवादी होते.

त्यांच्या राजवटीत प्रथम गुजराथ, इंग्रजांच्या तावडीतून मोकळे करून मग महाराष्ट्र मग दक्षिण भारत नंतर उत्तर भारत व शेवटी पूर्ण भारत मुक्त करण्याची एक योजना शिजत होती. पण तो कट फसला. रेसिडेंट विरुद्ध यांस विष देण्याचा आळ इंग्रजांनी मल्हारराव गायकवाडांवर आणून त्यांना कैद केले व मद्रास येथे नेऊन ठार केले. इंग्रजांनी, ते कॉलऱ्याने मद्रास येथे मरण पावले असा मेडिकल रिपोर्ट प्रसिद्ध केला.

लो. टिळक आपले सहकारी न्या. आठल्ये व बापट यांच्या हस्ते सयाजीरावांना सामाजिक सुधारणांच्या योजना धाडीत. बडोदे एक प्रयोगशाळा होती. तेथे खूप मोकळे वातावरण होते. बडोद्यात जर ही सुधारणा पचली तर देश स्वतंत्र झाल्यावर आपोआप ती सुधारणा सर्व देशभर लागू करता येईल अशी योजना होती. त्यामुळे फुकट पण आवश्यक प्राथमिक शिक्षण योजना, मुलींना शिक्षण, अस्पृश्यांचा उद्धार व शिक्षण, प्रत्येक खेडेगांवी फुकट लायब्ररी, दवाखाना, व पिण्याच्या पाण्याची सोय वगैरे अनेक योजना प्रथम बडोद्यात सुरू झाल्या त्यामुळे इंग्रज चरफडत असत.

सयाजीराव महाराज आणि लो. टिळकांचे परराष्ट्रमंत्री ( ऑनररी ) होते. राजा असल्यामुळे त्यांना सारखे परराष्ट्रात जाणे आर्थिक व सामाजिक दृष्ट्या शक्य होते. राजकीय हेतू लक्षात आल्यामुळे लॉर्ड कर्झन या व्हाईसरॉयने त्यांच्या परदेशगमनावर बंदी आणली. सयाजीरावांनी आपण आपल्या तब्येतीसाठी ट्रीटमेंटसाठी युरोपात जातो असा बहाणा केला व लॉर्ड कर्झनवर मात केली.

सयाजीराव युरोपात गुप्तपणे सर्व क्रांतिकारकांना भेटत असत. त्यांना बडोदे संस्थानात नोकऱ्या देखील देत असत. अरविंद घोष बडोदा कॉलेजात व्हॉईस प्रिन्सिपॉल होते. त्यांचे जहाल विचार सांथीच्या रोगाप्रमाणे होते. त्यांनी बडोद्यात कित्येक तरुणांची डोकी राष्ट्रवादाने 'पिकवून' टाकली होती. चांदोद कर्नाळी येथे नर्मदेच्या तीरावर राष्ट्रीय शाळा सुरू केली तेथे बॉम्ब बनवीत. तेथून हे बॉंब बंगालमध्ये जात.

एकदा खासेराव जाधव तात्यासाहेब नेन्यांच्या त्यांच्या मित्राकडे रात्री आले. एरवी मी तुम्हास सांभाळून घेतो पण आता ते शक्य नाही. उद्या मुंबईहून बडोद्यात गोऱ्या पोलिसांची एक पार्टी सकाळी धडकणार आहे व सरळ चांदोद कर्नाळीस छापा घालणार आहे, अशी मला खात्रीलायक माहिती मिळाली आहे. तरी आताच्या आत चांदोदला घोड्यावरून जा व तेथील सर्व सामग्री नष्ट करून परत या असे त्यांनी तात्यासाहेबांना सांगितले. खासेराव बडोद्याचे पोलिस कमिशनर व तात्यासाहेब सयाजीरावांचे खाजगी चिटणीस होते.

तात्यासाहेबांनी तेथे घोड्यावर जाऊन सर्व साफसुफी केली. व मध्यरात्री बडोद्यात परत आले. ठरल्याप्रमाणे गोऱ्या पोलिसांची पार्टी चांदोदला सकाळी रवाना झाली. त्यांनी पाहिले तर तेथील मुले चक्क घोरत पडली होती. सात वाजता झोपणारी मुले कसली क्रांतिकारक असाही प्रश्न पडला. तेथेच झडतीत त्यांना काहीच आक्षेपार्ह मिळाले नाही. तरीदेखील त्यांच्या प्रमुखाने ही मला मिळालेली खबर अतिशय



खात्रीलायक खबऱ्याकडून आलेली आहे. येथे राष्ट्रीय शाळा नसून बॉम्ब बनवितात म्हणून आपण या शाळेस टाळे मारणार असे जाहीर केले.

पुढे ही राष्ट्रीय शाळा बडोद्यास आणली गेली. पण बडोद्यात रेसिडेंटचे हेराचे जाळे पक्के होते. त्यामुळे चांदोदप्रमाणे ही राष्ट्रीय शाळा फारशी चालली नाही. पण तेथील मास्तरांचे काय करायचे! तात्यासाहेबांनी काका, मामा व भाऊ या तीन मास्तरांना महाराणी चिमणाबाई हायस्कूलात पंचाहत्तर रुपयांवर नोकरीस ठेवून घेतले. पुढे हे मास्तर बडोदे सोडून गेले.

त्यांपैकी काका म्हणजे काका कालेलकर, मामा म्हणजे गोव्याचे मामा मुकादम व भाऊ म्हणजे स्वामी कुवल्यानंद, तात्यासाहेब म्हणजे पांडुरंग वासुदेव नेने, प्रस्तुत लेखकाचे आजोबा.

अहमदाबादेस व्हॉईसरॉयवर बॉंब टाकण्याचा संशय या तात्यांवर होता. बाब नावाच्या केशकर्तनकारास सयाजीरावांच्या खासगी सेवेत ठेवून घेण्याचा आरोप त्यांच्यावर होताच. हा बाब सावरकरांच्या नाशिकच्या अभिनव भारताचा सुरुवातीचा सभासद होता. हा बाब सयाजीरावांबरोबर इंग्लंड, युरोप व अमेरिकेच्या यात्रेत असे. क्रांतिकारकांना त्याच्या हस्ते निरोप जात व गुप्त भेटी घडत. सयाजीराव अत्यंत सावध राजा असल्यामुळे इंग्रज इंटलिजन्सना चकवून वेष पालटून या सर्व भानगडी होत. गोऱ्या मुलींबरोबर प्रेम करणे हे या भानगडीसाठी उत्कृष्ट 'कव्हर' होते. काही मंडळींना हा क्रांतिकारक भाग अज्ञात असल्यामुळे त्यांना या इंग्रज व फ्रेंच युवतीच नजरेसमोर दिसायच्या. त्या मंडळींनी सयाजीरावांपासून सावरकरांपर्यंत सर्वांची यथेच्छ बदनामीदेखील भारतात केली.

मला आठवते पुण्याच्या टिळक विश्वविद्यालयाच्या डॉ. हर्षे यांनी मला सांगितले " डोंट आस्क मी, आय वाज देअर ॲट दॅट टाइम इंडिया हाऊस वॉज ए बॉथेल ! "

बिचाऱ्या हर्षांना क्रांतिकार्यातील " सेफ कव्हर " कसे समजणार !

या साऱ्या भानगडीमुळे इंग्रज सरकारच्या रेसिडेंट या प्रतिनिधीने सयाजीरावांवर हा तुमचा तात्या नेने नावाचा खाजगी कारभारी नोकरीतून काढून टाका असा खूप दाब आणला, इंग्रज हुषार. त्यांची सूचना बहारीची होती. आपण एवढे सुशिक्षित महाराजे, आपल्याला हा नॉन मॅट्रिक सचिव शोभत नाही. असे अतिशय कायदेशीर 'आर्ग्यूमेंट' त्यांनी सयाजीरावांसमोर मांडले व त्यांना नोकरीवरून काढून टाकले.

खरी मेख अशी होती की माणिकराव व तात्या नेने यांच्या हस्ते सयाजीरावांची सून शकुंतला राजे यांच्या बंगल्यावर गुप्तपणे क्रांतिकारकांना पैशाची मदत केली जात असे अशी खबर रेसिडेंटला मिळाली होती. त्यावेळेस गुजराथी–मराठी वाद मुद्दाम उभा करून इंग्रज प्रतिनिधी बातम्या मिळविण्यात हुषार होता. बापटांची हकालपट्टी अशीच झाली.

सयाजीराव इंग्रजांपेक्षा जास्त हुषार. त्यांनी नॉनमॅट्रिक पांडुरंग वासुदेव नेन्यांना

नोकरीतून काढून टाकून बी. ए. पास झालेल्या नव्या दमाच्या विष्णु पांडुरंग नेन्यांना आपले वैयक्तिक सचिव म्हणून नेमले. हे बापापेक्षा जास्त उपयोगी ठरले. कारण इंग्लंडमध्ये व युरोपात दोनदा हे विष्णु पांडुरंग नेने सयाजीरावांच्या गुप्त क्रांतिकार्यात सहकारी म्हणून काम करीत होते.

सावरकर एकदा बडोद्याच्या भेटीत विष्णु पांडुरंग नेन्यांकडे चहासाठी आले होते. त्यावेळी मार्सेल्स उडीचा विषय निघाला व त्यावर दोघांत चर्चाही झाली होती. सावरकरांनी त्यावेळेस नेन्यांना सांगितले, "त्या उडीत पुढे खूप मालमसाला भरला गेला. मी समुद्र पोहलो म्हणजे अगदी थोडेच अंतर पोहून गेलो. सुटकेचा तो एकच मार्ग शिल्लक होता. अडाणी लेखकांनी संडासाच्या भोकातून मी उडी मारली. वगैरे खूप रंगविले. खरे म्हणजे मी पोर्टहोल (खिडकी) तून उडी मारली होती. मला फ्रेंच येत असते तर मी पकडला जाणे शक्यच नव्हते. इंग्रज व फ्रेंच यांच्या ऐतिहासिक हाडवैराचा मला निश्चित फायदा मिळाला असता आणि मुख्य म्हणजे पॅरिसमध्ये आपली माणसे होती.

आजही भारतीय इतिहासात बऱ्याच दंतकथा आहेत. उदा. अरविंदांचे पाँडिचरीस जाणे. गदर वगैरे नंतर आल्या. खरे म्हणजे फ्रेंच मुलुखात शस्त्रांचा साठा तयार ठेवून उठाव झाला की अशाच प्रकारच्या गोवा, नेपाळ व अफगाणिस्तान येथील शस्त्रांच्या साठ्याच्या वापराचे 'को ऑर्डिनेट' करण्यासाठी अरविंद बाबू पाँडिचरीस गेले होते.

१९१५ साली भारत स्वतंत्र झाले असते पण कृपालसिंग व मूलासिंग या दोन सरदारांच्या गद्दारीमुळे अमृतसरचा कट फसला. नाहीतर पुन्हा १८५७ ची पुनरावृत्ती त्या वर्षी झाली असती. 'स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्राध्यक्ष' अशी सयाजीरावांची हेडलाईन पॅरिस येथून निघणाऱ्या सोशॅलिस्टने त्यावेळी दिली होती. कट फसल्यामुळे बिचाऱ्या रासबिहारी बसु (बोस) यांना कायमचे जपानमध्ये परागंदा व्हावे लागले.

अरविंदांचे बरेचसे हस्तलिखित क्रांतिकारक साहित्य दुर्दैवाने नेन्यांच्या घरी वाळवीने खाऊन टाकले. बंगाली साहित्याच्या या नुकसानीस नेने मंडळी दोषी आहेत पण त्यावेळी गुप्तपणे सारे जतन करण्याच्या गडबडीत ही वाळवी एवढी भयंकर असेल असे वाटले नसावे.

पहिल्या महायुद्धात भारतीय संस्थानिक व जर्मन्स एकत्र येऊन इंग्रजांना चकनाचूर करण्याची योजना अशीच फसली.

दुसऱ्या महायुद्धाच्या आधी एका सहकाऱ्यास 'संस्कृत स्कॉलर' चे 'कव्हर' देऊन बर्लिनला धाडले गेले. या सहकाऱ्याने सयाजीराव व हिटलर यांच्यात गुप्त योजना घडवून आणली.

बर्लिनला 'ऑलिंपिक' भरले त्यावेळी या सहकाऱ्याने सयाजीराव व हिटलर



यांच्या भेटी गुप्तपणे घडविल्या. पहिले महायुद्ध गेले; काही हरकत नाही. दुसऱ्या महायुद्धात भारतीय संस्थानिक निश्चित हिटलरला मदत करतील अशी ही योजना होती. पोलिस वगैरे देखील उच्च पातळीवर पोचले होते. जयप्रकाश तुरुंगातून भिंतीवरून उडी मारून पळून गेले. ही देखील दंतकथा. दुपारी बारा वाजता ते पोलिसांच्या जीपमधून बाहेर काढले गेले.

दुर्दैवाने हे 'कोलॅबोरेशन' होऊ शकले नाही. कारण प्रिन्सेस चेंबरचे (नरेंद्र मंडळाचे) अध्यक्ष सयाजीराव महाराज १९३९ सालीच मरण पावले होते.

ते गेल्यावर या सहकाऱ्याकडे एक छोटीशी तार त्या युद्धकाळी बर्लिनहून आली होती.

त्या तारेचा मजकूर होता,

Greatly Grieved

Herr Hitter

ही तार या सहकाऱ्याकडे कशी आली त्याचे कुतूहल बऱ्याच जणांना होते. पण इंग्रजांनी महायुद्ध चालू होते म्हणून ते प्रकरण दडपून टाकले.

हे सहकारी म्हणजे माझे वडील विष्णु पांडुरंग नेने.

पुढील वर्षी तेही टायफॉइडने मरण पावले. अरेरे त्यावेळी टेपरेकॉर्डर असता व माझे वडील हयात असते तर किती चांगली माहिती मिळाली असती.

उदा. एमडेन बोटीतून सावरकरांना अंदमानातून सोडवून आणून त्यांना अमेरिकेस न्यायचे होते.

सावरकर स्वतंत्र भारतात अमेरिकेस का गेले नाहीत हे कोडे अजून मला सुटलेले नाही.

• •

**के. कृ. जावडेकर**
पुणे.

६४

## जीवनात परिवर्तन घडविणारे सावरकरांचे भाषण

कूपर जमनादास मंत्रिमंडळाने स्वातंत्र्यवीर वि. दा. तथा तात्याराव सावरकर यांची १९३७ साली रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून मुक्तता केली. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा हिंदुस्थानात सर्वत्र मुक्त संचार सुरू झाला. १९३७ साली ते पनवेल

येथे आले होते. तेथील टेनिस क्लबच्या क्रीडांगणावर त्यांचा भव्य सत्कार पनवेलकरांनी केला होता. त्यावेळी समोरच एक नारळाचे झाड दिसत होते. त्याच्या बुंध्याकडे पाहून ते विचारमग्न झालेले दिसले. आपल्या उत्तराच्या भाषणात त्या बुंध्याचा उल्लेख करून ते म्हणाले, " अंदमानात मला ज्या कोठडीत ठेवण्यात आले होते तेथून मला एक नारळाच्या झाडाचा बुंधा असाच दिसत असे. अंदमानातील तो बुंधा व आता येथे दिसणारा हा बुंधा या दोघांकडे पाहात असताना मधल्या काळात केवढे स्थित्यंतर या देशात घडून आलेले आहे, याचा विचार मनात घोळत आहे. " अशी सुरुवात करून सावरकरांनी आपल्या वक्तृत्वपूर्ण भाषेत क्रांतिकारक कार्य, लो. टिळकांचे कार्य व गांधीजींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसची चळवळ यांचा सुंदर आढावा घेतला. " काँग्रेसच्या अनुनयवृत्तीने मुस्लिम अल्पसंख्य कसे मुजोर बनले आहेत, याचे विवेचन केले. बहुसंख्य हिंदूंना जर मानाने जगावयाचे असेल तर त्यांनी हिंदुमहासभेच्या ध्वजाखाली एकत्र आले पाहिजे. " असे प्रतिपादिले व ते पुढे म्हणाले, " आपल्या कुटुंबात जर चार भाऊ असतील, तर त्यातील एका भावाने हिंदुसभेच्या कार्यासाठी आपणास वाहून घेतले पाहिजे. " सावरकरांच्या वक्तृत्वपूर्ण भाषणाचा माझ्या तरुण मनावर फार परिणाम झाला व त्यांनी शेवटी जे आवाहन केले ते जणू काय मलाच उद्देशून केले असे मला वाटले आणि त्या दिवशीच मी निश्चय केला की, आपण हिंदुसभेचेच कार्य यापुढे करावयाचे. त्यावेळी मी पनवेल येथील वि. खं. हायस्कूलमध्ये शिकत होतो. माझ्या गावात म्हणजे पळस्पे ( ता. पनवेल ) येथे मी हिंदुसभेच्या कार्यास प्रत्यक्ष प्रारंभ केला. १९३७ ते ४७ ही दहा वर्षे मी हिंदुसभेचे कार्य सबंध कुलाबा ( आता रायगड ) जिल्ह्यात झपाटल्याप्रमाणे केले. खेडोपाडी जाऊन मी सभा घेऊन सावरकरांचा हिंदुराष्ट्रवादाचा संदेश तळागाळापर्यंत पोचविला. हिंदुसभेचे सभासद नोंदले व प्रचार केला. पुढे कुलाबा जिल्हा हिंदुसभेचा कार्यवाह म्हणूनही काम केले. त्यावेळी कै. दे. म. रामभाऊ मंडलीक, कै. वीर बापूराव जोशी ( महाड ), कै. बापूराव भागवत ( पेण ), आदींचे मार्गदर्शन मला लाभले. कुलाबा जिल्हा लोकल बोर्डात हिंदुसभेचा मोठा गट निवडून आला होता. हिंदुसभेने शेतकरी कामगार पक्षाशी सहकार्य करून कै. नारायण नागू पाटील यांना अध्यक्षपदी निवडून आणले होते व काँग्रेस पक्षाची मक्तेदारी संपुष्टात आणली होती.

त्यानंतर ४८ साली गांधी वधाची घटना घडल्यानंतर मी पुण्यास श्री. मामाराव दाते यांच्या ' दै. काळ ' मध्ये सहसंपादक म्हणून काम करू लागलो. संपामुळे ' काळ ' बंद पडल्यावर ' दै. भारत ', ' दै. तरुण भारत ' व शेवटी ' दै. केसरी ' चे मी सहसंपादक म्हणून काम केले. या काळात वरील वृत्तपत्रातून हिंदुसभेच्या वृत्तांना वेळोवेळी प्रसिद्धी दिली व हिंदुसभेच्या कार्यात प्रत्यक्ष भागही घेतला. हिंदुसभेचे कार्य करता यावे म्हणून सरकारी नोकरी न पत्करता पत्रकारिता पत्करली. पुणे, नगर हिंदुसभा, महाराष्ट्र प्रदेश हिंदुसभा यांचा पदाधिकारी म्हणूनही अनेक वर्षे कार्य केले. निवृत्तीनंतरही आज-



पावेतो हिंदुसभेचे कार्य करीतच आहे. सावरकरांच्या ३७ साली ऐकलेल्या एका भाषणामुळे माझे सारे जीवन हिंदुसभेच्या विचाराने व कार्याने व्यतीत झाले. हिंदुसभेचा वैभवशाली काळ मी पाहिलेला आहे. सावरकरांची अनेक प्रसिद्ध भाषणे मी ऐकली आहेत. सध्या हिंदुसभेला संघटना म्हणून अडचणीचा काळ आला असला, तरी यापुढे सावरकरांचा हिंदुराष्ट्रवादाचा विचारच देशाला व हिंदूंना तारक ठरेल, अशी माझी अचाट दृढ श्रद्धा आहे.

• •

**श्री. ज. जोशी**
' शब्दश्री ', माजी सैनिक वसाहत,
मोरे विद्यालयासमोर, पुणे ३८.

६५

## मागून सुचलेले सुविचार

आम्ही तरुण असताना सावरकर मुक्त होऊन पुण्या-मुंबईस यावयास लागले होते. त्यांच्या अनेक सभा मी ऐकल्या आहेत. तरुणांवर तेव्हा साम्यवादाचा प्रभाव असल्यामुळे सावरकरांची उपेक्षाच नव्हे तर काहीशी अवहेलनाही आम्ही करत असू. आता त्यातील मूर्खपणा कळतो. कारण सावरकर साम्यवादविरुद्ध नव्हते.

• •

**जोशी**
अमरावती.

६६

## असामान्य आठवणी

स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. उपाख्य तात्याराव सावरकर हे एक अतिवीर व श्रेष्ठ देशभक्त, पुढील पन्नास वर्षे कालचक्र पाहू शकणारे द्रष्टे, साहस व धैर्याचे मेरू, भारतीय स्वातंत्र्याकरता सर्वस्वाचा होम करून रणनीती म्हणून क्रांतिकार्याचे उद्गाते व नेते महाकवी तर्कनिष्ठ, बुद्धिमंत व चिंतनशील विचारवंत, थोर साहित्यिक, महान

वक्ते, चतुरस्त्र लेखक, भाषा प्रभु, देखण्या व्यक्तित्वाचे, अनेक गुण समुच्चयांचा, एक ईश्वरी अवतार व चमत्कार होते. त्यांचे श्रेय हे भिन्न्तिरूप अशा या बंधुत्रयास व सर्व सावरकर कुटुंबियांस आहे.

लहानपणी त्यांचे बाबतचे पहिले ऐकलेले म्हणजे त्यांनी रचिलेले सिंहगड व नरवीर बाजी प्रभू यांचे पोवाडे, छत्रपती शिवरायांची आरती तसेच पुढे त्यांचेबाबत अंदमानमधील बंदिवानांनी म्हटलेल्या "अजब तेरी कुदरत और अजब तेरा खेल, मच्छीके बापमें कैसा आया शेर" या ओळी. मार्सेल्स येथे समुद्रातील उडी ही तर त्यांची अलौकिक साहसकथा होतीच.

१९३५-३६ चा सुमार असावा. त्यावेळी ते रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून काही कारणास्तव मुंबईस आले होते. माझे मातुल कै. श्री. रा. भ. गद्रे हे त्यावेळी मुंबईस चित्रपट निर्मिती करीत असत. त्यांनी उमाजी नाईक हा चित्रपट काढला व तो गिरगावमधील मॅजेस्टिक चित्रपटगृहात दाखविला जाणार होता. स्वा. वीर सावरकर हे त्याकरता प्रमुख पाहुणे व अध्यक्ष म्हणून येणार होते. त्यांना तेथे आणण्याचे काम मजकडे सोपविले गेले होते. नियोजित वेळी कार्यक्रमाकरिता येण्यास स्वा. वीर सज्ज होते. चलत् चित्रपटगृह, छायाचित्रे, उपनाम इ. शब्द प्रथमच त्यांचे तोंडून ऐकण्यास मिळाले. चित्रपटानंतर त्यांचे सत्कार प्रसंगी दिलेला पुष्पगुच्छ श्रीमती हिराबाई बडोदेकर यांना देत ते त्यांना म्हणाले की तुम्ही हिंदुत्वनिष्ठता टिकवून धरलीत याबद्दल आदराचे प्रतीक म्हणून तुम्हाला मी हा पुष्पगुच्छ देत आहे. चित्रपटात चित्रित केलेली कथा इतिहासाला धरून आहे का ? असा प्रश्न विचारता त्यांच्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे त्यांनीच मला प्रतिप्रश्न केला की तुम्ही कॅप्टन गंफितोष यांनी उमाजी नाईक यांचे चरित्र लिहिले आहे ते वाचलेत का ? लुइफिशर या अमेरिकन वार्ताहराने भारतीय काँग्रेस मान्यता देत असता तुम्हीच तेवढे फाळणीला विरोध का करता ? असे त्यांना विचारले असता त्यांनी त्याला तुम्ही अमेरिकेत असे नियोल्यान वेगळे तोडून घाल काय ? असा प्रतिप्रश्न विचारून निरुत्तर केले होते.

दुसऱ्या महायुद्ध काळात त्यांचे अमरावती येथील डॉ. जोशी सभागृहात सैनिकीकरण या विषयावर अत्यंत श्रवणीय असे भाषण झाले. एखाद्या कसलेल्या हरदास पुराणिकापेक्षाही तपशीलवार असे त्यांनी नव देण्याची आख्यान देऊन शेवटी ते म्हणाले की मी तुमच्या केवळ मनोरंजनासाठी हे सांगितले नसून यातील बोध घ्यावा घ्यानी घ्या व ब्रिटिशांनी आजवर बंद केलेली सैन्याची द्वारे त्यांना नियमाने उघडावी लागत आहेत. तेव्हा प्रचंड संख्येने सैन्यप्रवेश करा म्हणजे त्याच बंदुका त्यांचेवर रोखता येतील. कलाप्रमाणे ही शस्त्रविद्या हस्तगत करा. या आधी त्यांनी मुंबईस मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून आता लेखण्या मोडा व बंदुका हाती घ्या हा संदेश दिलाच होता. 'शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्र चर्चा प्रवर्तते' हे महर्षी व्यासांचे उद्गार त्यांनी पुनरुच्चारित केले. रिकूटवीर म्हणून त्यांचा काहींनी उपहास केला.



नतमस्तक नाही का कवीमनाचि म्हणण्यात आले ? पण त्यांचे सूत्र होते 'वरं जनहितं ध्येयम् केवलान् जनस्तुतिः मनस्वी कार्यार्थी गणयति न दुःखं न च सुखं' या भूमिकेतून त्यांनी त्या उपहासाकडे दुर्लक्ष केले. श्री ज्ञानदेवांनी जसे हाल सोसूनही पसायदान मागितले.

अमरावती येथील त्यांचे सत्कारप्रसंगी स्वागतगीत सुरू असताना त्यांची बोटे मेजाशी त्या लगबग संगीताशी ताल धरत होती कारण मूळात त्यांचा आत्मा कवी व रसिकाग्रणीचा होता. परिस्थितिवशात् राजकारणी.

'Nepolenic in stature he was a prize for his size' असे त्यांचेबद्दल जोसेफ चौंफिल्ड यांनी लोकमान्यांबद्दल म्हटले त्याप्रमाणे सार्थपणे म्हणता येईल. त्यांचेबद्दल जेवढे आठवावे किंवा लिहावे तेवढे थोडेच आहे. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे उद्गार, "तुका म्हणे जे जे बोला ते ते साजे या विठ्ठला" हे त्यांना तंतोतंत लागू पडतात. तो दिवस दूर नाही की जेव्हा 'तुझ्या यशाचे पोवाडे गाती तोफांचे चौघडे' हे आपण पाहू व ऐकू शकू. भारताचा तो परमोत्कर्षाचा क्षण असेल.

• •

श्री. बाळ शंकर देशपांडे
मुंबई ४ गिरगाव.

६७

## एक साहित्यिक आठवण

मी स्वा. सावरकरांना प्रथम पाहिले ते १९३९ साली. मे महिन्यात. आमच्या उमरखेड (जि. यवतमाळ) या छोट्या गावी त्यावेळी भागानगर निःशस्त्र प्रतिकाराचे आंदोलन सुरू होते. या आंदोलनात भाग घेणारे सत्याग्रही आमच्याच गावी प्रथम येऊन नंतर ते निजामी हद्दीत प्रवेश करीत. ही हद्द आमच्या गावापासून सुमारे ३ मैलांवर आहे. निजामचे राज्य व विदर्भ यांची सीमा निश्चित करणारी पैनगंगा नदी ओलांडली की त्या राज्यात प्रवेश होतो. असे दर ४।८ दिवसांनी उत्तर भारतात आर्य समाजातर्फे या आंदोलनात भाग घेण्यासाठी सत्याग्रह्यांचे तांड्यांच्या तांडे आमच्या गावी येत. प्रभातफेऱ्या, सायंफेऱ्या, व्याख्याने, वगैरे आयोजित करून लोकांत उत्साहाचे वातावरण निर्माण करीत व ७ दिवसांच्या मुक्कामानंतर निजाम हद्दीत प्रवेश करीत. एके दिवशी सर्वांत मोठा जथा (सुमारे १०,०००) दहा हजार सत्याग्रही आमच्या गावाहून निजाम राजवटीत प्रवेश करण्यासाठी कूच करणार होते.

त्यांना समारंभपूर्वक निरोप देण्याचे गावकऱ्यांनी मनात आणले व त्यासाठी स्वा. वीर सावरकरांना निमंत्रण देण्याचे ठरवले. सावरकरांनी आनंदाने या निमंत्रणाचा स्वीकार केला. निरोप समारंभाच्या वेळी व्हावयाच्या त्यांच्या भाषणासाठी आसपासच्या खेड्यापाड्यांतून अनेक स्त्री-पुरुष आले होते. संध्याकाळी आपल्या गावच्या देवालयाच्या पटांगणात अत्यंत स्फूर्तिदायक आवेशपूर्ण असे त्यांचे भाषण ऐकताना श्रोते भारावून गेले होते. सभेसाठी जमलेला समुदाय एवढा प्रचंड असूनही सुरुवाती पासून अखेर-पर्यंत विलक्षण शांतता पसरली होती.

त्यानंतर मी स्वा. सावरकरांना पाहिले व ऐकले ते १९४४ साली. भारताला स्वातंत्र्य मिळाले नव्हते. प्रकट सभा, भाषणे यावर बंदी होती. त्यामुळे लहानसहान मर्यादित जागेत राजकीय स्वरूपाच्या सभा होत. लोक अमाप उत्साहाने सभेला उपस्थित रहात. अशीच एक सभा दादरला ब्राह्मण सेवा मंडळाच्या जागेत भरली होती. तात्यारावांच्या भाषणासाठी श्रोते प्रचंड संख्येने उपस्थित होते. त्या सभेत शि. ल. करंदीकर वगैरे बोलायचे होते. तात्या बोलायला उठले तेव्हा आधीच्या श्रोत्यांनी बराच वेळ घेतल्यामुळे मी थोडक्यात माझे भाषण आटोपणार आहे कारण वेळ बराच झाला आहे असे जेव्हा तात्या म्हणाले तेव्हा सर्व श्रोत्यांनी तात्यांना बोलायचा आग्रह केला. कितीही वेळ झाला तरी चालेल. आम्हाला कंटाळा येणार नाही. असे श्रोत्यांनी आश्वासन दिले तेव्हा तात्या म्हणाले, ठीक आहे तर ! माझे भाषण संपेपर्यंत तुम्हाला बसून रहावे लागेल. श्रोत्यांनी पुन्हा तसे आश्वासन दिल्यावर तात्यांचे भाषण सुरू झाले. ते तास, दोन तास बोलत राहिले असते तरी श्रोते शांत चित्ताने बसून राहिले असते यात शंका नव्हती. परंतु पाऊण एक तासातच तात्यांनी भाषण संपवले. त्याविषयी त्यांची प्रकृती बहुधा बरी नसावी. अधूनमधून त्यांना खोकला येत होता. थकवाही आल्यासारखा दिसत होता. असो.

यानंतर मी तात्यांना पाहिले ते त्यांच्याच निवासस्थानी, शिवाजी पार्कमधल्या सावरकर सदनात. त्यावेळी मी मुंबईस नोकरीच्या निमित्ताने येऊन स्थायिक झालो होतो. दादरच्या सुप्रसिद्ध छबिलदास शाळेमध्ये शिक्षक म्हणून रुजू झालो. एके दिवशी दहाव्या इयत्तेत मराठीचा तास घेताना मला कळले की त्याच वर्गात स्वा. सावरकरांचा मुलगा विश्वास हा शिकत होता. मुंबईस आल्यापासून तात्यांना एकदा तरी समक्ष भेटावे असे मला मनापासून वाटत होते. विश्वास आपला विद्यार्थी आहे हे कळल्या-नंतर माझ्या इच्छेने विशेष जोर धरला. त्याला मी बोलून दाखविले तेव्हा त्याने तत्काळ तात्यांची भेट घडवून आणण्याचे आश्वासन दिले. तात्यांच्या संमतीने विश्वासने भेटीचा दिवस नक्की केला. सकाळी दहाची वेळ तात्यांनी दिली होती. जाताना मी माझा पहिला वहिला कथासंग्रह बरोबर घेतला होता. तो तात्यांना सप्रेम भेट म्हणून द्यायचा माझा मानस होता. भेटीत तात्यांनी मी शाळेत कधीपासून रुजू झालो; शिकवण्याचे विषय कोणकोणते; मुंबईला येण्यापूर्वी वास्तव्य कोठे होते वगैरे



प्रश्न आस्थेने विचारले. थोड्यावेळाने मी तात्यांना माझा कथा संग्रह देऊ लागलो तेव्हा ते म्हणाले तुम्ही मला आपले पुस्तक फुकट देणार आहात ? मी हो म्हटले तेव्हा ते म्हणाले हे बरोबर नाही. पुस्तक छापायला लागत नसते त्याच्यासाठी खर्च झालेला असतो. त्यावर मी म्हणालो कबूल आहे पण हे पुस्तक तुम्ही ठेवाच, ते आता विकताही येणार नाही. कारण त्यावर मी तुमचे नाव घालून सप्रेम भेट असे लिहिले आहे. तात्यांनी थोडे हसल्यासारखे केले. व ते पुस्तक ठेवून घेतले. त्या पुस्तकातल्या एका गोष्टीत तात्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला होता. तो वाचून दाखविण्याचा माझा विचार होता. परंतु भेटीसाठी दिलेली वेळ संपल्यामुळे मी तात्यांच्या पायांना स्पर्श करून वंदन केले व त्यांचा निरोप घेतला.

तात्यांना समक्ष भेटून त्यांच्याशी बातचीत केल्याची आता एकच आठवण माझ्या संग्रही आहे १९५६ किंवा ५७ सालची गोष्ट असावी. त्यावेळी शाळेतली नोकरी सांभाळून दुपारच्या वेळी मी वसंत मासिकाच्या संपादकीय विभागात काम करीत होतो. त्याच मासिकात मराठीचे मानकरी ही माझी प्रदीर्घ लेखमाला क्रमशः प्रसिद्ध होत होती. खाडिलकर, फडके, य. गो. जोशी, चि वि जोशी, कवि यशवंत अनंत काणेकर, कुसुमाग्रज इत्यादी २० लेखकांचा त्या लेखमालेत अंतर्भाव करण्याचे मी ठरवले होते. त्यात तात्यांचाही समग्र साहित्याचा थोडक्यात परिचय करून देण्याचे निश्चित केले होते. हा लेख खूपच गाजला व पुढे तो पुस्तक रूपाने श्री. बाळाराव सावरकर यांनी प्रसिद्ध केला. वसंतमध्ये लेख प्रसिद्ध होण्यापूर्वी तो तात्यांना वाचून दाखवावा व त्याबद्दलची त्यांची प्रतिक्रिया अजमावून पहावी अशी माझी इच्छा होती. यावेळची भेट श्री. भिडे गुरुजी किंवा श्री दामले यांपैकी कोणीतरी घडवून आणली असावी. ठरलेल्या वेळी मी सावरकर सदनात प्रवेश केला. मी येणार असल्याची त्यांना कल्पना होतीच. मला पाहून ते म्हणाले, आलात ? बसा तुमचा लेख वाचून दाखवणार आहात ना ? ठीक आहे चालू करा. तात्यांनी न्हाव्याला बोलावले होते. व तो त्यांची त्या ठिकाणी वाट पहात होता. याची मला कल्पना नव्हती म्हणून मी थोडासा बुचकळ्यात पडल्यासारखा झालो होतो. माझी मनःस्थिती तात्यांच्या लक्षात आली असावी. ते म्हणाले, तुम्ही वाचायला सुरुवात करा. न्हाव्याचा माझ्या डोक्याशी संबंध आहे. कानाशी नाही.

मग मी त्यांच्यावरचा लेख वाचायला सुरुवात केली. लेख फार मोठा होता. हस्तलिखिताची पाच-पंचवीस पृष्ठे वाचून झाल्यावर ते मला म्हणाले, आता पुरे. लेख चांगला लिहिला आहे. असेच लिखाण चालू ठेवा. त्या सूचनेने मी नाउमेद झालो नाही. अथवा विरसही झाला नाही तो लेख १०० पृष्ठांचा होता. तो सबंध वाचून होईपर्यंत तात्यांना तात्कळत बसवावे, एवढ्या महामानवाचा आपण वेळ घ्यावा हे मलाही योग्य वाटले नाही. मी नम्रपणे त्यांना नमस्कार केला व त्यांचा निरोप घेतला.

त्यानंतर मी तात्यांना पाहिले ते त्यांच्या अंत्ययात्रेच्या वेळीच. सावरकर सदना-

समोर मोठ्या लॉरीवर पांढऱ्या शुभ्र वस्त्रात गुंडाळलेला त्यांचा निश्चल देह ! तेच त्यांचे शेवटचे दर्शन !

• •

श्री. शं. दा. ढहाळे
यवतमाळ ४४५००१.

६८

## सावरकरांच्या दर्शनाचा झालेला परिणाम

### इंदूरला मी पाहिलेले सावरकर

स्वातंत्र्यपूर्व काळ. हिंदुस्थान देशावर परक्या इंग्रजांची मुलकी सत्ता असताना ती सत्ता उलथून टाकायला सजलेल्या क्रांतिकारकांचे त्यागमय जीवन अन् अखंड ध्येयनिष्ठा यांचे अतिशय ओजमय आविष्करण ज्या एका महान अद्वितीय व्यक्तीत झालेले आहे ती एकमेव अद्वितीय व्यक्ती म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर उपाख्य तात्याराव सावरकर. आजही देशभक्तांच्या अंतःकरणात क्रांतीच्या कल्पना प्रस्फुरित करण्याचे सामर्थ्य सावरकरांच्या अष्टपैलू जीवनचरित्रात निश्चितच आहे.

हिंदुस्थान स्वातंत्र्याच्या संग्रामातील लढाई उघडपणाने चालू होती. देशातील स्वातंत्र्याचे वारे वाहात होते परकीय सत्तेविषयी घृणा आणि स्वातंत्र्यलढ्यातील नेत्याविषयी प्रेम, आदर लहानांपासून थोरापर्यंत, देशाच्या या टोकापासून, त्या टोकापर्यंत दिवसेंदिवस वृद्धिंगत होत होती. असहकार, बहिष्कार, अहिंसक मार्गाने त्याचप्रमाणे दुसरीकडे सशस्त्र क्रांतीचा उठाव करून देश परकीय सत्तेच्या जोखडाखालून मुक्त करण्याची चळवळ अधिक जोरात चालू होती. संबंध देशच पूर्णतः जागृतीच्या एका विलक्षण वातावरणातून जात होता. स्वदेशी, स्वातंत्र्य याविषयी ओढ सर्वत्र दिसत होती.

स्वातंत्र्यप्रेमाचे हे वारे आम्हा मुलांना पण लागले. राष्ट्रीय नेत्यांच्या अटकेमुळे पडणाऱ्या हरताळात मिरवणुकीत सामील झाल्याबद्दल पोलिसांच्या छड्यांचा प्रसाद खाण्यात विद्यार्थीही अग्रेसर राहू लागले. थोर नेत्यांचे बिल्ले कोट, शर्टाच्या कॉलरवर, पोलक्यावर लावून अभिमानाने शाळेत जाण्याची चाल रूढ झाली. वर्तमानपत्रे, मासिके यात येणारी थोर नेत्यांची छायाचित्रे आम्ही जमवू लागलो. त्यांची प्रकाशित होणारी छोटेक चरित्रे आम्ही आवडीने वाचू लागलो.

अशातच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी जीवावर उदार होऊन जाण्याचा धोका पत्करूनही मार्सेलिस बंदरात आगबोटीच्या बारीकशा झरोक्यातून समुद्रात उडी टाकून



फ्रान्सचा किनारा गाठला ही माहिती वाऱ्यासारखी दूर पसरली. अशक्यप्राय गोष्ट शक्य झाल्याने ही माहिती आम्हास अद्भुततासारखी वाटली. अशा घटनांमुळे स्वातंत्र्य चळवळीचे आम्हास कमालीचे आकर्षण वाटे.

नक्की दिवस व वर्ष आता आठवत नाही, पण १९४०-४१ साल असावे. स्वातंत्र्यवीर सावरकर इंदूरला येणार होते. वरील पार्श्वभूमीवर साहजिकच आम्हा सर्वांच्या मनात कुतूहल निर्माण झाले होते. स्वातंत्र्य लढ्यात सर्वस्व पणाला लावून इंदूर नगरीस ते भेट देणार होते. सावरकर दिसतात कसे हा तेव्हा कुतूहलाचा विषय होता.

स्वा. वीर तात्याराव सावरकरांचे भाषण इंदूर नगरीच्या मध्यवर्ती स्थानी असलेल्या नव्या राजवाड्याच्या मागील पटांगणात होणार होते. या पटांगणाचे त्यावेळचे नाव होते माणिक चौक. आज ते सुभाष चौक म्हणून ओळखले जाते. या भव्य पटांगणात सावरकरांचे दर्शन होण्याचा व त्यांचे प्रभावी भाषण ऐकण्याचा योग जुळून येत होता.

सावरकर येण्याची वेळ जसजशी जवळ येत चालली तसतशी लोकांची उत्सुकता वाढत चालली. सर्वांची नजर लागली सावरकर येणार असलेल्या वाटेकडे आणि लक्ष होते सावरकरांना घेऊन येणाऱ्या मोटारीकडे. डोळे भरून पहाता यावे म्हणून सावरकर नीट दिसावे म्हणून, नियोजित वेळेच्या कितीतरी आधीपासून नागरिकांनी मोक्याच्या जागा पटकाविल्या होत्या.

ठरलेल्या वेळी सावरकर आले. त्यांना पहाण्याकरिता जो तो पुढे पुढे सरकू लागला. एकच जल्लोश ! सारेचजण सावरकरांचे दर्शन घेण्याकरिता उत्सुक. भारतमातेचा, स्वातंत्र्य-देवीचा सारखा जयघोष. औपचारिकपणाने आगत-स्वागत झाल्यावर स्वा. वीर सावरकर व्यासपीठावर भाषण देण्यास उभे राहिले.

ठेंगणी मूर्ती, साधा वेष, धोतर, कॉलरचा शर्ट, त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे उघड्या कॉलरचा कोट आणि डोक्यावर त्यांची नेहमीची वैशिष्ट्यपूर्ण ठेवण असलेली काळीभोर गोल टोपी, इंदूर हिंदी भाषी भागात असल्याने सावरकरांचे भाषण हिंदी भाषेतून झाले. मंत्रमुग्ध करून टाकणारे. सावरकरांच्या अंतःकरणाच्या आतल्या गाभाऱ्यातून निघणारा शब्दन् शब्द सारा समुदाय उत्कटतेने ऐकत होता. असे ओजस्वी भाषण इंदूरच्या नागरिकांना त्यापूर्वी कधी ऐकायला मिळाले नव्हते. भाषण आता आठवत नाही, पण ते हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययुद्धाविषयीचे होते हे सांगणे नको.

भाषण संपले. भारतमातेच्या स्वातंत्र्याचा सारखा जयघोष. उत्कंठा होती स्वा. सावरकरांच्या दर्शनाची. उत्सुकता होती सावरकरांचे भाषण ऐकण्याची, ती परिपूर्ण झाली. आल्या वाटेनेच सावरकर आपल्या विश्रामस्थानी परत गेले. सावरकरांच्या पाठमोऱ्या मोटारीवर दृष्टी केंद्रित करून त्यांना मानाचा मुजरा देऊन सर्व आपापल्या स्थानी परतले अंतःकरणात एक प्रकारचा स्फुल्लिंग घेऊन ! सृष्टिक्रमाप्रमाणे तो दिवस उजाडला आणि मावळला परंतु त्या दिवशी ऐकलेल्या भाषणाने स्फुरलेला

स्फुलिंग आजही नवीन आहे. ती पाहिलेली सावरकरांची मूर्ती हृदयपटलावर जीवनाचा आदर्श म्हणून जशीच्या तशीच विराजमान अवस्थेत आजही आहे कसलाही किंतु मनात न येता.

• •

शैलजा पंडित
पुणे ३०

६९

## लोकांना हवेहवेसे वाटणारे स्वा. सावरकर

मी अगदी लहानपणी माझे मेव्हणे श्री. रा. स. भट यांच्याकडे शिकण्यास आले. श्री. रा. स. भट हे कट्टर हिंदुत्वनिष्ठ असल्यामुळे त्यांच्याकडे असताना मला वीर सावरकरांचे वाङ्मय व पुष्कळ गोष्टी वाचावयास मिळाल्या. त्यांना गांधी वधात पकडल्याचे समजले. त्या लहान वयातही माझ्या अंतःकरणास फार मोठा धक्का बसला. मला खूप वाईट वाटले पण परमेश्वर कृपेने वीर सावरकरांवर आलेले ते संकट दूर झाले व सर्वच हिंदुस्थानातील त्यांच्या भक्तांना परमानंद झाला. पुनःपुन्हा विघ्ने आली तरी उत्तम पुरुष प्रारंभ केलेले आपल्या शक्तीतील काम कधीच सोडीत नाहीत. त्याप्रमाणे हिंदुमहासभेचे कार्य करीत असताना एवढे मोठे संकट येऊनही वीर सावरकरांनी नव्या उत्साहाने 'पुनश्च हरि ओम्' या लोकमान्यांच्या वचनाप्रमाणे पुनश्च हिंदुमहासभेच्या कामात उडी घेतली. व त्यासाठी १९४९ या वर्षी कलकत्ता येथे भरणाऱ्या हिंदु महासभेच्या अधिवेशनाला जाण्यासाठी ते मुंबईहून कलकत्ता मेलने निघाले. महासंकटातून मुक्त झालेल्या या आपल्या नेत्यावर मुंबईपासून कलकत्ता पर्यंतच्या रेल्वे स्थानकावर जनता त्यांचे वर प्रचंड सत्काराचा वर्षाव करीत होती. अशा या ऐतिहासिक प्रवासात नागपूरच्या रेल्वे स्थानकावर मला त्यांचे दर्शन झाले. सरकारी आरक्षकांचे सर्व बंदी हुकूम झुगारून देऊन नागपूरची जनता हजारोंच्या संख्येने रेल्वे स्थानकात घुसली होती व हजारोंच्या संख्येने बाहेर दर्शनासाठी उभी होती. नागपूरच्या स्थानकात त्यांना घेऊन येणाऱ्या गाडीने नागपूरच्या स्थानकात प्रवेश करताच गाडीच्या दरवाज्यात पांढरेशुभ्र धोतर, पांढराशुभ्र कोट, डोक्यावर गोल काळी टोपी व डोळ्यावर सोनेरी काडीचा गोल काचेचा चष्मा अशा थाटात गौर वर्णात सूर्याप्रमाणे चकचकणाऱ्या चेहऱ्याची असामान्य मूर्ती पहाताच नागपूरकरांनी प्रचंड टाळ्या वाजवून जयजयकार करून त्यांचे स्वागत केले. मथुरेत कंसाशी द्वंद्व करून त्यास ठार मारणारा



श्रीकृष्ण गोकुळात परत आल्यावर जसा गोकुळवासीयांना आनंद झाला तसाच नागपूरच्या जनतेसही अत्यानंद झाला. नागपूरच्या स्थानकावर गाडी थोडाच वेळ थांबणार असल्यामुळे जवळ असलेल्या व्यासपीठाकडे सावरकरांना नेण्यात आले व त्याठिकाणी शेकडो हार व असंख्य पुष्प यात बुडालेले सावरकर भाषण करू लागले. लोकांच्या कानावर कित्येक वर्षांनंतर सावरकरांचा तो मधुर आवाज पडताच श्रीकृष्णाची मधुर मुरली ऐकणाऱ्या त्या गोपींप्रमाणेच नागपूरची ती जनता त्या भाषणात गुंग होऊन गेली.

सावरकर बोलत होते - बंधु-भगिनींनो, माझ्या शत्रूंनी मला संपूर्णपणे नाहीसे करण्याचा कट उधळून तुमच्यापुढे जिवंत उभे रहाण्याचे भाग्य नियतीने मला दिले आहे. मी त्यावेळी हिंदुत्वाच्या मागे पाच-दहा लोकही उभे रहाणार नाहीत, असे दुष्ट भविष्य केले होते. पण आज कोट्यवधी जनता त्या हिंदुत्वाच्या मागे उभी राहून माझ्या शत्रूला चोख उत्तर दिले आहे. तुमच्या या निष्ठेला साक्ष ठेवून मी सांगतो की शेवटचा श्वास असेपर्यंत मी हिंदुत्वासाठी लढत राहीन. त्याकरता मला फासावर जावे लागले तरी चालेल. मी माघार घेणार नाही.

आकाशात कडाडणाऱ्या विजेप्रमाणे गर्जत असलेल्या त्या भाषणाने नागपूरकर जनतेमध्ये उत्साहाची प्रचंड वीज संचरल्याप्रमाणे ती नागपूरकर जनता सावरकरांचा जयघोष करीत नागपूरच्या स्थानकातून बाहेर पडली.

माझ्या त्या लहान वयात जनतेच्या सावरकर भक्तीचा तो प्रचंड स्फोट स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रचंड शक्तीचा प्रभाव, नियतीने सावरकरांच्या रूपाने हिंदुस्थानला दिलेला आशीर्वाद-पुढे या गोष्टी कित्येक दिवसपर्यंत माझ्या मनात घोळत होत्या.

त्या दिवशीचे ते सावरकरांचे वंदनीय दर्शन व जनतेचा तो अवर्णनीय उत्साह या साऱ्याच गोष्टी अविस्मरणीय आहेत.

• •

श्री. देविदास दत्तात्रय खाने
जि. यवतमाळ

७०

## तरुणांनो, सैन्यात भरती व्हा

साधारणपणे दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा काळ होता तो. मी त्यावेळी अमरावतीहून नुकताच नागपूर येथे शालेय शिक्षणासाठी आलेला होतो व त्यावेळी स्वातंत्र्य-

वीर बॅरिस्टर सावरकर नागपूरला येणार म्हणून नागपूरच्या जनतेमध्ये मोठे उत्साहपूर्ण वातावरण होते व एक प्रकारचे काहीतरी विशेष ऐकायला मिळणार आहे असे सगळीकडे ऐकायला येत होते. त्याचवेळी लढाईच्या कामावर सैन्यभरती करण्याचेही काम फार जोरात चालू होते. पण लढाई म्हटले की अंगावर काटा. कारण त्यात मरण ओढवले तर ! या अशा भीतीने कोणी जाण्यास धजत नसत.

परंतु बॅरिस्टर सावरकरांचे विशेषेकरून नवतरुणांना उद्देशून नागपूरच्या टाऊन हॉलमध्ये भाषण होणार आहे असे समजले व त्यासाठी बहुतेक शाळा-कॉलेजचे विद्यार्थी त्या भाषणास हजर झाले होते. त्यात मीही गेलो होतो.

अलोट गर्दी असल्यामुळे एका कोपऱ्यात उभे राहूनच मी सावरकरांना पाहिले. ठेंगणी मूर्ती, घारे डोळे, गोल चष्मा, धोतर व डोक्यावर गोल टोपी असा त्यांचा वेष होता. डोळे तर इतके पाणीदार होते की, त्यांच्या चेहऱ्याकडे पाहणारा मनुष्य एकदम त्यांच्या तीक्ष्ण नजरेने मयगस्त होऊन जाईल. डोळ्यांमध्ये एक प्रकारचे काहीतरी उद्दिष्ट साध्य करण्याच्या विचारात असावेत असे विलक्षण परंतु स्वार्थीलायक भाव सतत दिसत असत. तरळत असत. ध्येय दृष्टी म्हटले तरी चालेल असे मला वाटते. भाषणास प्रारंभ झाला. काय भाषण दिले हे जरी संपूर्ण स्मरत नसले तरी त्यांनी भाषणामध्ये नवतरुणांना सैन्यात भरती होण्यासाठी उत्तेजन दिले, नव्हे तर एक प्रकारचा ठाम असा आदेशच दिला.

शेजारी कुठे तरी कुजबूज चालू होती की, भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीची भाषा बोलणारे वीर लढाईत सैन्यात भरती व्हा म्हणताहेत म्हणजे परकीय इंग्रजांना मदत करायची भाषा बोलताहेत, हे कसं काय ?

तथापि क्षणातच त्यांचा असे आवाहन करण्यामागचा हेतू स्पष्ट झाला की, तरुणांनो, सैन्यात भरती होऊन सैनिकी शिक्षण, बंदुका चालविण्याचे शिक्षण मिळण्याची एक नामी सुवर्णसंधी चालून आली आहे त्याचा आवर्जून फायदा घ्या. कारण आपल्यालाही आपले उद्दिष्ट गाठण्यासाठी त्याची नितांत गरज आहे. तीच बंदूक यथावकाशाने About Arm करून परकीयांच्या छातीवर रोखता येईल. तेव्हा माझ्या बोलण्याचे उद्दिष्ट लक्षात घ्या. हीच सुवर्णसंधी आहे ती दवडू नका.

बहुतेक भाषण ऐकण्यास आलेल्यात एक प्रकारचे आवेशाचे वातावरण निर्माण झाल्याचा भास झाला. परिणामी बरेच तरुण व शालेय विद्यार्थी सैन्यात भरती होण्याचा निर्धार करू लागले. कित्येकजण गेलेही. त्यांचे ते शब्द मात्र अजूनही कानात आवाज करतात, ' तरुणांनो, सैन्यात भरती व्हा ' मला तर आजही म्हणजे १९८८ साली असे वाटते की, त्यांनी दिलेल्या त्या वेळच्या आदेशाचे आजही पालन करणे अत्यावश्यक आहे. त्याशिवाय मातृभूमीचे स्वातंत्र्य अबाधित राहणे केवळ अशक्य आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

जिंकला जरी जिंकला असला तरी त्याचा बंदोबस्त ठेवण्यासाठी व तो अबाधित



राखण्यासाठी मातृभूमीच्या प्रत्येक नागरिकास सैनिकी शिक्षण अत्यावश्यक आहे. अन्यथा व्यर्थ होय. त्यांच्या द्रष्टेपणाचाही अनुभव यामुळे आल्यावाचून राहात नाही.

• •

श्री. श्रीकृष्ण सदाशिव देशपांडे
मु. पोस्ट नाशिकरोड,
नाशिक ४२२१०१.

७१

## स्वा. सावरकरांचे शेवटचे दर्शन

स्वा. सावरकर १९३७ साली नाशिकला प्रथमच आले होते. मी व माझे वडील त्र्यंबकेश्वर येथून त्यांच्या सभेसाठी नाशिकला आलो होतो. त्यावेळी माझे वय १३ वर्षांचे होते. वडिलांनी सावरकरांबद्दल सांगितलेल्या माहितीवरून त्यांना पाहण्यासाठी फारच अधिरता होती. व्यायंतराव महाराज पटांगणावर सभा होती. सावरकर आले, सारे वातावरण चैतन्यमय झाले. त्यावेळी दूरध्वनी योजना ( Loud Speakar ) नव्हती. सावरकर म्हणाले, मी टेबलावर उभे राहूनच बोलतो. सावरकर लहानशा टेबलावर उभे राहिले व त्यांचा मंत्रमुग्ध आवाज व आवेश साऱ्या पटांगणात किती तरी जणांच्या कायम स्मरणात असेल. स्वा. सावरकरांचे पहिले दर्शन मी १५-२० फुटापर्यंतच असल्याने कायमचे लक्षात आहे. फाशीवर जाताना क्रांतिकारकांनी हातात गीता घेतली होती. बायबल किंवा कुराण नव्हे. अशी अनेक वाक्ये आठवतात. सार्वजनिक वाचनालयाच्या वार्षिक उत्सवाकरिता त्यांना सरकारवाड्यातील वरच्या मजल्यावर चालता येत नसल्याने आरामखुर्चीसारख्या एका फळ्यावर उचलून आणले होते. त्यावेळी त्यांचे झालेले भाषण, तेच नाद, माधुर्य व मनाला जाऊन भिडणारे डोळे डोळ्यांसमोर दिसतात. भाषा शुद्धीकरणावर बोलताना ते म्हणाले, आपण सहजच पत्नीचा उल्लेख ' वाईफ ' असा करतो. मराठीतले अर्धांगी अथवा प्रिया, भार्या असे चांगले शब्द वापरत नाही. निदान ' ती ' तर कुठे गेली नाही ! असे म्हणताच सर्व सभागृहात हास्याची लाट पसरली.

त्यानंतर मी नोकरी निमित्त देवळाली कॅम्प येथे असताना सावरकर नाशिकरोड स्थानकावर आले. व नाशिकरोड जनतेतर्फे त्यांचे स्वागत झाले. त्यावेळी त्यांचे भाषण ऐकण्याचा योग आला त्यावेळी त्यांनी माझ्या मनात पकडून नेताना स्थानकावर कसा अंधार होता. व बाजूस भीषण शांतता होती. त्याची मला आठवण होते. असे सांगितले त्याचवेळी शिवाजी उद्यान जवळ त्यांचे भाषण झाले. ' कान्हेरे उद्यान '

ऐवजी शिवाजी उद्यान त्यांना पसंत नव्हते. त्यावेळी कशाला शिवाजी महाराजांचे पुतळे उभारता, त्यावर काळा पडदा टाका असे स्पष्ट म्हणाले,— तीच तेजस्वी मुद्रा टोपीची ऐट, छबी डोळ्यांसमोर आहे. गुलालवाडी व्यायाम शाळेत, त्यांचे भाषण झाले तरुणांनी सैन्यात जावे, वैमानिक व्हावे असे विचार जनतेस सांगितले. त्यावेळी म्हार येथे त्यांचे जाहीर भाषण झाले, त्यावेळी सुद्धा प्रयत्न करुन दूरध्वनी सुरू झाला नाही. त्यावेळी त्यांनी केलेले भाषण आठवते, ' आता परत इकडे येण्याची शक्यता कमी, आता आम्ही जातो आमुच्या गावा ' या शब्दांनी त्यांनी समारोप केला. तेच स्वा. वीर सावरकरांचे शेवटचे दर्शन.

• •

**श्री. भिमराव कुंडलिकराव चोपडे**
**जि. सोलापूर.**

## ७२

## असा वक्ता होणे नाही

मी सन १९४१ ते ४३ सांगलीस ट्रेनिंगला होतो. खेर मंत्रिमंडळाने माननीय सावरकर यांच्यावरील सर्व बंधने काढलेली होती.

कै. नरसिंह चिं. केळकर व स्वा. सावरकर हे ठिकठिकाणी भाषणे देत दौऱ्यावर होते. ते त्यावेळी सांगलीस आले होते. नागपंचमीचा दिवस होता.

सावरकरांना पहाण्यासाठीही आयर्विन पुलावर व समोरच्या खाणीवरील रस्ते माणसांनी फुलून गेले होते. बसावयास जागा मिळेनाशी झाली होती.

कुणीतरी प्रास्ताविक केले. त्यानंतर न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वा. वीर बोलावयास उभे राहिले. एवढा अफाट समुदाय भाषण ऐकण्यास जमला होता, परंतु कमालीची शांतता होती. दुपारी ३ वाजता त्यांनी भाषणास सुरवात केली आणि त्यांचे भाषण सायंकाळी ६ वाजता संपले, एवढा वेळ झाला असेल अशी कोणासही कल्पनादेखील आली नाही.

तुम्ही कोणत्याही पक्षाचे असा परंतु त्यांच्या वक्तृत्वाचा ओघ एवढा जबरदस्त होता की ते जे विचार मांडीत होते त्या प्रवाहात सर्व श्रोतृवर्ग वाहून जात होता. तुमची कुठलीही विचारसरणी असली तरी त्यांचे वक्तृत्वात कमालीची ओढ व आकर्षकता होती की सर्व श्रोते त्यात गुंग होऊन गेले होते. भाषण ऐकताना त्यांचे विचार पटत होते व हेच बरोबर आहे असे श्रोत्यांस वाटत असे. एवढी अफाट शक्ती त्यांच्या भाषणात होती.



मी पुष्कळ वक्ते ऐकले, पाहिले परंतु आजपर्यंत मला असे भाषण पुनः ऐकावयास मिळाले नाही.

• •

**श्री. ल. भा. पेंढरकर**
**चिंचवड, पुणे ४११०३३**

## ७३

## परक्या माणसाचे सावरकरांच्याबद्दलचे विचार

मी सातवी किंवा आठवीत असेन. स्वा. वीर सावरकर नागपूर–रायपूरमार्गे कलकत्यास जाणार होते. रायपूरच्या आम्हा बाल स्वयंसेवकांना त्यांचे दर्शन घडणार होते. आम्ही पूर्ण गणवेशात रायपूर स्टेशनवर आलो. गाडी आली. आम्ही त्यावेळच्याप्रमाणे वंदनीय पण सैनिकी मानवंदना दिली. त्यांना आम्ही चार मैल पायी आल्याचे कळले त्यांचा फारच उत्साही व आनंदी चेहरा पाहून आमचा थकवा आम्ही विसरलो.

पुढे ६५ साली मी विमानदलात आग्रा येथे होतो. एका खोलीत २–३ एनसी ओज रहात असू. माझा सोबती फ्लाईट सार्जंट मायकेल राज हा तमीळ ख्रिश्चन होता. एक दिवस मी स्वा. सावरकरांची ' क्ष किरणे ' वाचत पडलो असता दुपारचे जेवण उरकून मायकेल आला. मी अजून जेवायला गेलो नव्हतो. तो आल्याचे मला कळले नाही म्हणून त्याने माझ्या हातचे पुस्तक काढून घेतले. त्याला जुजबी हिंदी वाचणे जमत असे. पुस्तकाच्या लेखकाचे नाव त्याने वाचले व म्हणाला, " हं हा तो Hindu सावरकरच ना ? " मी हो या नाही काहीच म्हटले नाही, तेव्हा तो म्हणाला " काय म्हणतो हा ? What are the X Rays ? " मी त्यावर त्याला शब्द उपयुक्त पण आशय नव्हे अशा अर्थाचा पुस्तकातील काही भाग वाचून दाखवला. तो अगदी अवाक् झाला. त्याने हळूहळू संपूर्ण पुस्तक मजकडून समजावून घेतले. त्यानंतर तो म्हणाला,

I know he was the denish enemy of British rules. He is a staunch Hindu. But ineven knew he was so realistic.

त्यानंतर कित्येक दिवस तो आपल्या तमीळ मित्रांना स्वा. सावरकरांची थोरवी सांगत असे. त्यांचे निर्वाणदिनी त्याने मला असेही सांगितले आम्ही दसरा दिवाळी साजरी करतो. मी म्हटले का बरे ? तेव्हा तो म्हणाला,

When the whole world around us rejoices we cannot

ते सभासद वा पदाधिकारी होते. स्वा. वीर सावरकर येथे आल्यावर सावरकरांची विचारसरणी त्यांना पसंत पडली म्हणून ते सावरकरांचे निकटवर्ती ( उजवा हात ) सहकारी बनले. सावरकर १९३० मध्ये रत्नागिरीहून कायम वास्तव्यासाठी आले. मुंबईचे सी. आय. डी. पोलीस पाठ घालीत असत, अन्य कोणाकडेही पोलिस कधी गेले नाहीत. गांधी खून खटल्याच्या वेळीही माझ्या चुलत मावशा कै. भास्कर दत्तात्रय शिंदे याला पोलिसांनी तात्यांचा निकटवर्ती म्हणून दाव केला. १९५५ साली तात्याराव पुनश्च रत्नागिरीला आले असताना केवळ माझ्या आईला भेटायला आले होते. माझे वडील १६ ते १९४८ ला वारले. आजही आम्ही पतितपावन संस्थेशी संबंधित आहोत. स्वा. वीरांच्या प्रेरणेने दानशूर कीर शेठच्या दातृत्वाने, डॉ. म. ग. शिंदे यांच्या परिश्रमाने अखिल भारतातील समाजक्रांतीची गंगोत्री समजल्या जाणाऱ्या पतितपावन मंदिराची स्थापना झाली. माझी आई आज हयात आहे ( वय ९० वर्षे ) तिची रेडिओवर मुलाखत ही झाली होती.

परिचय झाला ही आनंदाची गोष्ट !

• •

७७

श्रीमती कुमुद रेगे
जेलरोड रत्नागिरी.

## सावरकरांचे रत्नागिरीतील महान कार्य

मला आठवतो तो १९३४ ते १९३७ चा काळ. स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकर यांना १९२४ ते ३७ पर्यंत रत्नागिरी जिल्ह्यात ब्रिटिश सरकारने स्थानबद्धतेत ठेवले होते. कोणत्याही प्रकारची राजकीय हालचाल करायची नाही हे बंधन त्यांच्यावर घातलेले होते, 'तुजसाठी जनन ते मरण । तुजवीण जनन ते मरण ॥' हेच ज्यांचे श्वास-निःश्वास होते त्या स्वातंत्र्यवीरांकडे बोलण्या-लिहिण्यासारखे खूप होते, त्यामुळे सरकारचे बंधन काटेकोरपणे पाळलेही, आणि त्याच्या अर्थाने झुगारूनही दिले. लोकजागृती करण्याकरता त्यांनी सामाजिक प्रश्न हाताळायला सुरुवात केली. तात्याराव एक कर्ते सुधारक होते. 'आधी केले मग सांगितले' या रामदासी पंथातले हिंदुधर्म आणि जातीयता यासंबंधी त्यांनी बरेच वाचले होते, त्यापेक्षा बराच विचारही केला होता. परिणामी हिंदुधर्मातील स्पृश्यास्पृश्य भाव ते मानत नव्हते इतकेच नव्हे तर त्याचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे या मताचे ते होते. त्याकरिता सहभोजन ( प्रीति-



भोजन ) हा एक प्रभावी कार्यक्रम आहे असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या चतुःसूत्रीमधले ते एक सूत्र होतेच. म्हणून स्थानबद्धतेची संधी साधून रत्नागिरी येथील आपल्या वास्तव्यात सामाजिक क्षेत्रातील दोन विषय तात्यारावांनी प्रामुख्याने हाताळलेले मला आठवतात. ते म्हणजे एक सहभोजनाचा ( अस्पृश्यता निवारणाचा ) व दुसरा आपल्या भाषेत अंधश्रद्धा निर्मूलनाचा.

मी त्या वेळी १०।१२ वर्षांची, इंग्रजीच्या पहिलीच्या वर्गात शिकणारी. माझे वडील ( कै. अनंत दत्तात्रय रेगे वकील ) आणि तात्याराव डेक्कन कॉलेज ( पुणे ) मध्ये शिक्षण घेत असतांना वसतिगृहात शेजारच्या खोलीत रहाणारे त्यामुळे रत्नागिरीस आल्यावर ते आमच्या घरी वारंवार येत असल्याचे मला चांगलेच आठवते. इतकेच नव्हे तर घरात पाऊल टाकतानाच व्हरांड्यातील कोपऱ्यात ठेवलेल्या चपलांच्या स्टँडवरील ढिगाकडे पाहून काय वकीलसाहेब चपलांनी दुकान काढलेत काय ? असा विचारलेला प्रश्न अजूनही मी ऐकत असल्याचा केव्हातरी भास होतो.

रत्नागिरी शहरातील त्याकाळचे एक दानशूर गृहस्थ कै. भागोजी कीर यांचा तात्यारावांशी परिचय झाला. तो त्यावेळचे हिंदु महासभेचे येथील प्रसिद्ध कार्यकर्ते डॉ. महादेव गणपत शिंदे यांच्यामुळे. दाता ( कै. कीर ) आणि कार्यकर्ता ( तात्याराव ) यांच्या परिचयातून साकारले गेले, ते आमचे पतित पावन मंदिर. अतिशय कलापूर्ण, सर्व सोयींनी युक्त मनोवेधक अशी ती वास्तू १९३१ मध्ये पूर्ण झाली. आणि भंगी समाजातील शिवा नावाच्या धार्मिक वृत्तीच्या सद्गृहस्थाकडून मंत्रघोषात मूर्तीची पूजा करण्यात आली. आणि मंदिराचे 'पतित पावन' असे सार्थ नाव ठेवण्यात आले. ही पूजा काही दिवस चालू ठेवण्यात आली होती. आणि कोणत्याही हरिजनाने मंदिरात येऊन पूजा करावी अशी सवलत आजतागायत चालू आहे. मात्र ती किती लोकांना माहीत आहे आणि त्या दृष्टीने किती प्रयत्न केले जातात हे सांगणे कठीण.

या मंदिरात गणेशोत्सव सुरू करण्यात तात्यारावांनी सुरुवात केली. गणेशमूर्तीचे पूजन व रात्री तात्यारावांचे भाषण एवढे कार्यक्रम मला आठवतात. तात्यारावांची दोन मुले आणि इतर ५-६ मुले यांनी गायिलेल्या 'तुम्ही आम्ही सकल हिंदु बंधु बंधु' या गीताने कार्यक्रमाला सुरुवात होई. याच अर्थाची दोन-तीन पदे गायल्यानंतर शुभ्र पायघोळ धोतर नेसलेले, त्यावर पांढरा कोट, काळी टोपी या पेहरावातील बेताची उंची व जाडी असलेले प्रसन्न चेहऱ्याचे तात्याराव छडी टेबलावर आडवी ठेवून बोलायला सुरुवात करीत. त्यावेळी दूरध्वनी यंत्र निघाले नव्हते, आणि त्याची गरजही वाटत नव्हती. विद्वत्ता, कल्पकता, विषयाशी तादात्म्यता यातून निघालेले विचार इतक्या अमोघ वाणीने तात्याराव श्रोत्यांपुढे मांडत की मंदिराच्या सभागृहात वर असलेल्या गॅलरीत आणि मंदिराबाहेरच्या पटांगणातून खचून भरलेल्या सर्व त्यांच्या स्त्री-पुरुषांना त्यांच्या वक्तृत्वाच्या ओघात आकंठ न्हाऊन निघाल्याचे समाधान मिळे. गायीच्या पोटात तेहेतीस कोटी देव असतात या भोळ्या समजुतीवर तात्याराव

obtain us sad by standards. We belong to this country so naturally, all her sorrow and joy are ours.

स्वा. सावरकरांनी असे अगणित लोक देशप्रेमाने भारले असतीलच नाही का !

* *

सौ. उषा र. बडे
राजापेठ अमरावती

७४

## एका स्वयंसेविकेची आठवण

विनायक दामोदर सावरकर यांचे नांव ऐकले किंवा वाचले की, जराशी ठेंगणी मूर्ती गोरे गोल काळ टोपी, गोल कांचेचा चष्मा तेजस्वी चेहरा असे सावरकर डोळ्यांसमोर येतात. ( आठवतात )

ज्यांनी स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला त्या विनायकांना अगदी जवळून पहाण्याचा मला योग आला. हे माझे मी भाग्यच समजते. ( साल १९४०–४१ ). आमच्या न्यू एज्युकेशन सोसायटीच्या प्रांगणात एक मोठे व्यासपीठ तयार केले होते. वि. दा. सावरकरांना अमरावतीला हिंदुमहासभेच्या लोकांनी बोलावले होते. बाबासाहेब खापर्डे, रावबहादूर खरे व बरीच मान्यवर मंडळी उपस्थित होती. सावरकरांचे त्यावेळी अस्खलित भाषण झाले. आणि त्यावेळेस मी, माझी बहीण व इतर काही विद्यार्थिनींनी मिळून त्यांना नमन व स्वागतगीत म्हटले. नेत्यांचा मुक्काम श्री. खापर्डे यांच्या घरीच होता. संध्याकाळी खापर्डे यांच्या घरी जेवणाचा कार्यक्रम झाला. १–२ जणांना हिंदू करून घेतले. माझे वडील श्री. रा. ब. खरे हे याच शाळेचे लाईफ मेंबर होते. व हिंदुमहासभेचे कार्यकर्ते पण होते. म्हणून मी या सर्व कार्यक्रमांना हजर राहू शकले.

( पूर्वाश्रमीची उषा रा. खरे ) सौ. उषा र. बडे

सुस्वागतम् सुखद या काला । तव आगम हा अमरपुरीला
हासत हासत जनवृंद तोषला । स्वागतम् ॥ १ ॥
भारतभूचा भार हराया । नव युवकांना स्फूर्ती द्यावया
पुरुष विनायक आ ऽ ऽ ला ऽ ऽ ऽ ऽ । स्वागतम् ॥ २ ॥

हे स्वागतगीत म्हटले होते.

* *



श्री. अशोक विठोबाजी देवाड
मु. पो. शिरपूर ( बोके )
ता. आर्वी, जि. वर्धा.

७५

## सावरकर, पुन्हा जन्म घ्या !

आपला भारत देश हा सुजलाम् सुफलाम् सस्यश्यामलाम् आहे. अशा या पवित्रमय देशात अनेक थोर पुढारी, विचारवंत, नेते महात्मे, वक्ते, लेखक, क्रांतिकारक इत्यादी होऊन गेले. त्यांनी आपापल्या परीने भारतात लोकशाही नांदण्यासाठी खूप अतोनात परिश्रम केले.

त्यांच्याच अमिट अमोल अशा बलिदानाने भारतात असलेले गुलामशाहीचे साम्राज्याला पळता भुई करून सोडले. त्यापैकीच थोर पुढारी तरुण क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर सावरकर हेही होत.

" प्राण अर्पिले ज्यांनी त्यांचे, व्यर्थ न हो बलिदान
कोटी कोटी हृदयात जाग दे राष्ट्राचा अभिमान "

अशी ओवी आपण आकाशवाणीवरून नेहमी ऐकतो. तरी सुद्धा असली ही सामाजिक, राजकीय, आर्थिक भांडणतंटे का होतात हे जाणण्याकरिता पुन्हा सावरकरांना पुढील काळासाठी पुनर्जन्म घ्यावा लागेल असे म्हणणे वावगे वाटणार नाही.

* *

श्री. वि. म. शिंदे
उत्तरायण, ५६२ चिवा रोड,
रत्नागिरी.

७६

## एक आठवण

सावरकर येथे आले त्यावेळी माझे वडील वैद्यकीय व्यवसाय करीत होते आमच्या घराण्यात आयुर्वेदिक औषधे तयार करण्याची परंपरा होती. माझे आजोबा निष्णात वैद्य होते. ( कै. गणपत रामजी शिंदे. ते विनामूल्य औषधोपचार करीत. व्यवसायाने ते पोलिस अधिकारी होते. )' माझ्या वडिलांनी ' आर्य वनौषधी कारखाना म्हणून आयुर्वेदिक औषधे तयार करण्याची संस्था काढली तरी प्रामुख्याने ते वैद्यकीय व्यवसाय करीत. डॉ. म. ग. शिंदे म्हणून ते सर्वश्रुत होते. नगर परिषद जिल्हा लोकल बोर्ड जि. मराठा संघ, जि. हिंदुसभा ( अध्यक्ष ) अशा संस्थांमध्ये सातत्याने

ते सभासद व पदाधिकारी होते. स्वा. वीर सावरकर येथे आल्यावर सावरकरांची विचारसरणी त्यांना पसंत पडली म्हणून ते सावरकरांचे निकटवर्ती ( उजवा हात ) सहकारी बनले. सावरकर १९३० मध्ये रत्नागिरीहून कायम वास्तव्यासाठी आले. मुंबईचे सी. आय. डी. पोलीस पाठ धरीत असत. अन्य कोणाकडेही पोलिस कधी गेले नाहीत. गांधी खून खटल्याच्या वेळीही माझ्या चुलत मामाला कै. भास्कर दत्तात्रय शिंदे याला पोलिसांनी तात्यांचा निकटवर्ती म्हणून डाव केला. १९५५ साली तात्याराव पुनश्च रत्नागिरीला आले असताना केवळ माझ्या आईला भेटायला आले होते. माझे वडील १६ मे १९४८ ला वारले. आजही आम्ही पतितपावन संस्थेशी संबंधित आहोत. स्वा. वीरांच्या प्रेरणेने दानशूर कीर शेठच्या दातृत्वाने, डॉ. म. ग. शिंदे यांच्या परिश्रमाने अखिल भारतातील समाजक्रांतीची गंगोत्री समजल्या जाणाऱ्या पतितपावन मंदिराची स्थापना झाली. माझी आई आज हयात आहे ( वय ९० वर्षे ) तिची रेडिओवर मुलाखत ही झाली होती.

परिचय झाला ही आनंदाची गोष्ट !

* *

७७

**श्रीमती कुमुद रेगे**
जेलरोड रत्नागिरी.

## सावरकरांचे रत्नागिरीतील महान कार्य

मला आठवतो तो १९३४ ते १९३७ चा काळ. स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकर यांना १९२४ ते ३७ पर्यंत रत्नागिरी जिल्ह्यात ब्रिटिश सरकारने स्थानबद्धतेत ठेवले होते. कोणत्याही प्रकारची राजकीय हालचाल करायची नाही हे बंधन त्यांच्यावर घातलेले होते, 'तुजसाठी जनन ते मरण । तुजवीण जनन ते मरण ॥' हेच ज्यांचे श्वास-निःश्वास होते त्या स्वातंत्र्यवीरांकडे बोलण्या-लिहिण्यासारखे खूप होते. त्यामुळे सरकारचे बंधन काटेकोरपणे पाळलेही, आणि खऱ्या अर्थाने झुगारूनही दिले. लोकजागृती करण्याकरता त्यांनी सामाजिक प्रश्न हाताळायला सुरुवात केली. तात्याराव एक कर्ते सुधारक होते. 'आधी केले मग सांगितले' या रामदासी पंथातले हिंदुधर्म आणि जातीयता यासंबंधी त्यांनी बरेच वाचले होते. त्यापेक्षा बराच विचारही केला होता. परिणामी हिंदुधर्मातील स्पृश्यास्पृश्य भाव ते मानत नव्हते इतकेच नव्हे तर त्याचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे या मताचे ते होते. त्याकरिता सहभोजन ( प्रीति-



भोजन ) हा एक प्रभावी कार्यक्रम आहे असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या चतुःसूत्री-मधले ते एक सूत्र होतेच. म्हणून स्थानबद्धतेची संधी साधून रत्नागिरी येथील आपल्या वास्तव्यात सामाजिक क्षेत्रातील दोन विषय तात्यारावांनी प्रामुख्याने हाताळलेले मला आठवतात. ते म्हणजे एक सहभोजनाचा ( अस्पृश्यता निवारणाचा ) व दुसरा आजच्या भाषेत अंधश्रद्धा निर्मूलनाचा.

मी त्या वेळी १०/१२ वर्षांची. इंग्रजीच्या पहिलीच्या वर्गात शिकणारी. माझे वडील ( कै. अनंत दत्तात्रय रेगे वकील ) आणि तात्याराव डेक्कन कॉलेज ( पुणे ) मध्ये शिक्षण घेत असताना वसतिगृहात शेजारच्या खोलीत रहाणारे त्यामुळे रत्नागिरीस आल्यावर ते आमच्या घरी वारंवार येत असल्याचे मला चांगलेच आठवते. इतकेच नव्हे तर घरात पाऊल टाकतानाच व्हरांड्यातील कोपऱ्यात ठेवलेल्या चपलांच्या स्टँडवरील ढिगाकडे पाहून काय वकीलसाहेब चपलांचे दुकान काढलेत काय ? असा विचारलेला प्रश्न अजूनही मी ऐकत असल्याचा केव्हातरी भास होतो.

रत्नागिरी शहरातील त्याकाळचे एक दानशूर गृहस्थ कै. भागोजी कीर यांचा तात्यारावांशी परिचय झाला. तो त्यावेळचे हिंदु महासभेचे येथील प्रसिद्ध कार्यकर्ते डॉ. महादेव गणपत शिंदे यांच्यामुळे. दाता (कै. कीर) आणि कार्यकर्ता ( तात्याराव ) यांच्या परिचयातून साकारले गेले. ते आमचे पतित पावन मंदिर. अतिशय कलापूर्ण, सर्व सोयींनी युक्त मनोवेधक अशी ती वास्तू १९३१ मध्ये पूर्ण झाली. आणि भंगी समाजातील शिवा नावाच्या धार्मिक वृत्तीच्या सद्गृहस्थाकडून मंत्रघोषात मूर्तीची पूजा करण्यात आली. आणि मंदिराचे 'पतित पावन' असे सार्थ नाव ठेवण्यात आले. ही पूजा काही दिवस चालू ठेवण्यात आली होती. आणि कोणत्याही हरिजनाने मंदिरात येऊन पूजा करावी अशी सवलत आजतागायत चालू आहे. मात्र ती किती लोकांना माहीत आहे आणि त्या दृष्टीने किती प्रयत्न केले जातात हे सांगणे कठीण.

या मंदिरात गणेशोत्सव सुरू करण्यात तात्यारावांनी सुरुवात केली. गणेश मूर्तीचे पूजन व रात्री तात्यारावांचे भाषण एवढे कार्यक्रम मला आठवतात. तात्यारावांची दोन मुले आणि इतर ५-६ मुले यांनी गायिलेल्या 'तुम्ही आम्ही सकल हिंदु बंधू बंधू' या गीताने कार्यक्रमाला सुरुवात होई. याच अर्थाची दोन-तीन पदे गायल्यानंतर शुभ्र पायघोळ धोतर नेसलेले, त्यावर पांढरा कोट, काळी टोपी या पेहरावातील बेताची उंची व जाडी असलेले प्रसन्न चेहऱ्याचे तात्याराव छडी टेबलावर आडवी ठेवून बोलायला सुरुवात करीत. त्यावेळी दूरध्वनी यंत्र निघाले नव्हते. आणि त्याची गरजही वाटत नव्हती. विद्वत्ता, कल्पकता, विषयाशी तादात्म्यता यातून निघालेले विचार इतक्या अमोघ वाणीने तात्याराव श्रोत्यांपुढे मांडत की मंदिराच्या सभागृहात वर असलेल्या गॅलरीत आणि मंदिराबाहेरच्या पटांगणातून खचून भरलेल्या सर्व वयाच्या स्त्री-पुरुषांना त्यांच्या वक्तृत्वाच्या ओघात आकंठ न्हाऊन निघाल्याचे समाधान मिळे. गायीच्या पोटात तेहतीस कोटी देव असतात या भोळ्या समजुतीवर तात्याराव

वैज्ञानिक दृष्टिकोणातून घणाघाती प्रहार करीत. हे क्रांतिकारक विचार जुन्या सनातनी वृत्तीच्या वृद्ध स्त्री-पुरुषांनाही त्याक्षणी पटलेले त्यांच्या चेहऱ्यावरून व नेहमी वाढणाऱ्या उपस्थितीवरून दिसत असे. हा तात्यांचा वक्तृत्वाचा की विचारांचा परिणाम असा प्रश्न माझ्यासारख्यापुढे आज निर्माण होतो.

याच अनुषंगाने तात्यारावांचे लेख किर्लोस्कर मासिकातून प्रसिद्ध होत असत आणि त्या मासिकाचे संस्थापक आणि आद्य संस्थापक कै. शंकरराव किर्लोस्कर (शं. वा. कि.) ते मोठ्या उत्साहाने सचित्र छापत असत. गायीच्या पोटात ३३ कोटी देव असलेले चित्र किर्लोस्कर मासिकाच्या मुखपृष्ठावर पाहिलेले मला चांगले आठवते.

याबरोबरचा गणेशोत्सवातील दुसरा मोठा कार्यक्रम सहभोजनाचा. याची तयारी तात्याराव व माई स्वतः खपून करीत असत. उंच भरदार बांधा, केस कानामागून वळवून मानेवर किंचित खाली बांधलेला वेताच्या केसांचा साधा अंबाडा, साधा पण करारी स्वभाव दर्शविणारा, कष्टाच्या खुणा आणि किंचित उदास भाव असलेला चेहरा, अगदी साधी नऊवारी साडी नेसलेल्या, एकही बारीकसारीक दागिना ( मंगळसूत्राखेरीज ) अंगावर नसलेल्या माई सरकारी अधिकारी, वकील, डॉक्टर, व्यापारी इत्यादी प्रतिष्ठित मानलेली मंडळी व सर्व जातीचे अस्पृश्य मानले गेलेल्या लोकांच्या वाड्या वस्त्यांकडे जाऊन स्वतः या सहभोजनाचे निमंत्रण देत. या उभयतांचे मोठेपण ( विचाराने ) जाणून घेऊन आणि एक प्रतिष्ठा प्राप्त झालेला कार्यक्रम म्हणून बरीच मंडळी पण फार थोडी पत्नीसह उपस्थित रहात. त्यातही बहुतेक स्त्रियांचे उपवास ठरलेले असायचे. घरी जाऊन ओंघोळ करायची हे ही ठरलेलेच. तात्याराव स्वतः पंक्तीतून फिरत. विशेषतः मधूनमधून पंक्तीत हरिजनांना बसवीत आणि हरिजन मंडळीतही पोटजातीची स्त्रीपुरुष मंडळी एकमेकांजवळ बसायला नाखूष असतात हे जाणून मिश्र पंगत तयार करीत. माई या कामाबरोबरच अनेक पदार्थ असलेले मिष्टान्न ( जिलबीचे भोजन ) सर्वांना मिळाले की नाही हे पहात पंक्तीतून फिरत असत. आजही असा कार्यक्रम महिला मंडळे मुद्दाम आखत नाहीत. त्याची जरुरी असावी हे आमचे दुर्भाग्य.

या कार्यक्रमाबरोबर हरिजन वस्तीत सावरतेने घडे वाचायला तात्याराव जात. फळ्या, पाट्या, खडू पुरवीत व त्या दृष्टीने शैक्षणिक कामही करीत. इतके महत्वाचे कार्य प्रभावीपणे करणाऱ्या तात्यारावांच्या जन्मशताब्दीच्या वेळी पतित पावन मंदिरात जे कार्यक्रम आयोजित केले गेले ते पाहून मंदिरातील ' पतितपावन ' आपले स्थान सोडून तर गेला नाही अशी शंका माझ्यासारख्यांना निश्चितच वाटून गेली असावी. तात्यारावांच्या स्मृतींना विनम्र प्रणाम !

• •



श्री. श्रीधर विश्वनाथ गोगटे
पुणे ४११००२.

७८

## एका गरीब विद्यार्थ्याची आठवण

### वीर सावरकर यांच्या आठवणी

मी ता. ७।१।१९०८ साली कर्जत गावाजवळील कोंढाणे गावी जन्मलो पण तीन महिन्यांतच माझे वडील वारल्यामुळे कोणाचा आधार नसल्यामुळे माझा व घरातील सर्वांचा सांभाळ आमच्या मावशीने ८–९ वर्षांपर्यंत केला. माझी मुंज मामाने १९१७ साली कर्जत मुक्कामी केली व नंतर मी माधुकरी मागून आणू लागलो. १९१८ साली गोडबोले नावाचे एक पुण्यातील कै. नगरकर ( शनिवार पेठ ) रहिवासी आईला सांगू लागले की तुम्ही पुण्यात चला. मी तुमची सोय लावून देतो. त्याप्रमाणे आम्ही पुण्यात आलो व कै. उपासनी शास्त्री यांच्या वाड्यात ( शनवारात नातूंचे बोळासमोर ) राहू लागलो. ८ दिवसांनी मी माधुकरी मागू लागलो. १९२० साली कै. टिळक ( बाळ गंगाधर ) यांचे वाड्याजवळ एक श्रीधर रामचंद्र केळकर नावाचे इंजिनियर रहात होते त्यांचेकडे ( महाजनवाडा ) मी माधुकरीस गेलो असताना त्यांनी माझी विचारपूस केली व मला दर मंगळवारी रु. १-५० देऊन २४ केसरी खपविण्याकरिता देऊ लागले. मी दर मंगळवारी २४ केसरी खपवीत होतो. गायकवाड वाड्यापासून फडके हौदापर्यंत ओरडत जात असे व कसेतरी २–२॥ तासात केसरी संपले की घरी येत असे. त्यात फक्त तीन आणे मिळत होते. १९२० ते १९२५ पर्यंत मी केसरी विकले आहेत. १९२४–२५ साली मला आठवते की, ' माझी अंदमानची सफर ' ( लेखक वि. दा. सावरकर ) ही काय कथा आहे म्हणून पहिला अंक वाचला व मनाला धक्का बसला व मला कधी भेट होईल का असे विचार सारखे मनात येत पण मी गरीब असल्यामुळे मन मारीत असे. प्रत्येक मंगळवारी माझी अंदमानची सफर प्रसिद्ध होत होती, ती मी वाचत होतो. व वाचून ओरडत असे, " माझी अंदमानची सफर " सावरकर म्हणून केसरी खपवत होतो. २४ केसरी खपावयास ५॥ ते ७-७॥ होत असत. तेव्हा केसरी खपत. नंतर माधुकरी मागून ५ नं. चे शाळेत जात होतो. सर्व अंदमान सफर प्रसिद्ध झाल्यावर एक दिवस गायकवाड वाड्यात गेलो. तेथे कै. विद्वांस, ज. स. करंदीकर, दा. वी. गोखले असे व्यवस्थापक होते. त्यांचे जवळून मी संपूर्ण अंदमान सफर वाचण्याकरिता मागितली व त्यांनी मला प्रत्येक अंकातील भाग दिला. त्यावेळेस मी रमणबागेत शाळेत जात होतो. ती वाचून भयंकर वाईट वाटले. व ओंकारेश्वर देवळात जाऊन श्री शंकराला नमस्कार केला व म्हणालो परमेश्वरा

मला अशा मानवाची भेट होईल का ! नंतर काही दिवसांनी केसरी वाड्यात त्यांचे आगमन झाले. त्यांना भेटण्याकरिता गर्दी जमली होती. मी सकाळी ७॥ वाजता गेलो. त्यांची भेट १० वाजता झाली. केसरी वाड्यात जाण्याचा जो रस्ता आहे त्याचेजवळ उजव्या हाताला एक जिना आहे. त्या जिन्याने रंगीत वर गेलो. व त्यांचे दर्शन झाले. व त्या दिवसापासून मी त्यांना गुरु मानीत आलो. नंतर मी प्रत्येक वेळेस पुण्यात आल्यावर त्यांना भेटत असे. त्यांनी मला एक दिवस विचारले की तुझे नांव काय ? तेव्हा मी सांगितले की श्रीधर विश्वनाथ गोगटे. मूळ गाव कर्जत. येथे नातूंचे हौदाजवळ श्री उपासनी शास्त्री यांचे वाड्यात रहातो, वडील नसल्यामुळे माधुकरी मागून ९ नं. चे शाळेत जातो व केसरी विकतो. मला बाबू म्हणून हाक मारतात. त्या वेळेपासून त्यांची भेट झाली की मला बाबू ठीक आहे ना असे विचारतात. त्यांचे भाषणाला मी बऱ्याचवेळा हजर राहिलो, शनवार वाड्यासमोर एकदा भाषण झाले त्यावेळेस फार मोठा समाज जमला होता. तसा समाज एकाही पुढाऱ्याच्या सभेला जमलेला मी पाहिला नाही. मी मार्च १९३२ साली लष्करी आर्सेनलमध्ये टायपिस्ट म्हणून नोकरीला लागलो कारण सावरकरांची विचारसरणी मला १०० टक्के पटली की मुख्य मुख्य जागेवर जाऊन काम व त्याच्या शिकून घ्या, व स्वराज्य मिळाल्यावर त्याचा आपल्याला उपयोग होईल. १९३२ चे आधी कै. वा. ब. गोगटे यांनी हॉटसन यांचेवर फर्ग्युसन कॉलेजमध्ये गोळी झाडली होती त्याची आठवण कॅप्टन स्मिथ नांवाच्या ऑफिसरला होती, त्याने मला दरवाज्यावर विचारले तुझे नांव काय ? मी सांगितले गोगटे. तेव्हा तो एक मिनीट थांबला व मला म्हणाला, हॉटसन गोगटे तुझा भाऊ का ? मी सांगितले. नाही तरीसुद्धा त्याने गेट कीपरला सांगितले की याचेकडे लक्ष ठेवणे व एक महिना ऑफिसमध्ये जातांना व बाहेर जातांना माझी पूर्ण झडती घ्यावी हा Dauge ous Man, आहे कारण मी गोगटे. असेच मी १५ वर्षे इंग्लिश ऑफिसरच्या हाताखाली काम केले. मी जरी काम करीत असलो तरी कै. सावरकरांची जी सरकारने हाल-अपेष्टा केली त्याची पूर्ण आठवण मला होतच होती.

मला १९३६ साली रत्नागिरीला जाण्याची संधी मिळाली. आमचे जवळच करमरकर आरवलीचे रहातात त्यांचे घर बघण्यासाठी तेव्हा आरवलीस जाऊन मी रत्नागिरीला कै. सावरकरांची भेट घेण्याच्या इच्छेने प्रथमच गेलो. तेथील थीबा राजाला डांबून ठेवलेला समुद्राजवळचा किल्ला व तेथील परिसर मनाला आनंददायक वाटला. पण त्यावेळेस मला त्यांची भेट झाली नाही नंतर पुन्हा मला १९४७ साली रत्नागिरीस जाण्याची संधी मिळाली व योगायोगाने मी कीर यांनी बांधलेल्या देवळात गेलो. व परत घरी जात असता रस्त्यावर एक पान-विड्याचे दुकान आहे तेथे बाकावर बसलेले पाहिले व मी तेथेच पाया पडलो व आनंदित झालो. नंतर पुण्यात आल्यावर केसरी ऑफिसमधील दालनात भेटत असे.

१९६५ साली मी माझ्या १०।११ वर्षाच्या मुलीला स्व. सावरकरांना भेटण्याकरता दादरला सावरकर सदनात घेऊन गेलो. बरोबर माझे श्वशूर, पत्नी, मी असे सदनात गेलो. दरवाज्यावरील मध्या तेथे नव्हता. सर्वांना घेऊन मी माडीवर गेलो, तेथे गेल्यावर त्यांनी विचारले कोठून आलात ? मी सांगितले की पुण्याहून तेव्हा म्हणाले, मी नेहमी पुण्यात येतो तेथे भेटावयाचे, मी सांगितले की केसरी ऑफिस मधील जिन्यात रांग लागलेली असते. नंतर त्यांनी विचारावयास सुरुवात केली. हे कोण मी सांगितले हे श्वशूर आहेत, कल्याणला असतात. तेथील शाळेत नावाजलेले हेडमास्तर श्री. रामचंद्र गणेश अभ्यंकर उर्फ रामभाऊ आहेत. ही लहान मुलगी कोण ? ही माझी मुलगी पुष्पा. ह्या कोण ? ही माझी बायको तेव्हा तावडतोब मला म्हणाले, बाबू, ही बायको नाही ही माझी धर्मपत्नी असे म्हण. व हाताचा पंजा वरती करून आपले समोर कसे म्हणावे हे दाखवून दिले. हीच आमची शेवटची भेट. त्यावेळेस त्यांना रु. २५ व पेढे तसेच वहिनींची ओटी भरून त्यांना खण-नारळ व पेढे दिले व साष्टांग नमस्कार घातला. नंतर मी अंत्ययात्रेला दादरला गेलो होतो. अशा आहेत माझ्या आठवणी.



* *

## ७९

**श्री. मा. सि. अळोकर**
नागपूर २२.

## सावरकरांना वंदन

पुष्कळ वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी मी कॉलेजमध्ये शिकत होतो. त्यावर्षी नागपूरच्या धंतोलीच्या मैदानात हिंदु महासभेचे अधिवेशन भरले होते आणि मुख्य वक्ते होते स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर. त्यांचे भाषण आपणास ऐकावयास मिळणार म्हणून खूपच उत्सुकता होती. मंडप अगदी पूर्णपणे गच्च भरला होता त्यामुळे लांबूनच लाऊडस्पीकरद्वारे भाषण ऐकावयास आले तसे त्यांचे प्रत्यक्ष दर्शनही घडले. अत्यंत ओजस्वी अस्खलित स्पष्ट आवाज व आवेशपूर्ण भाषण ऐकून मन प्रफुल्लित झाले. मातृभूमीकरिता स्वतःच्या संसाराचे बलिदान करणाऱ्या व्यक्तीला पाहून मन गदगदून गेले. ह्या महापुरुषाने कोणत्याही स्वार्थबुद्धीने प्रेरित न होता केवळ मातृभूमी स्वतंत्र व्हावी ह्या एकाच उद्देशाने स्वतःच्या सर्वस्वाचे बलिदान केले. खडतर असा तुरुंगवास भोगला. अत्यंत हालअपेष्टा सहन केल्या. त्या महान विभूतीच्या दर्शनाने मी स्वतः धन्य झालो. पण ह्या महापुरुषाने एवढा त्याग का केला, हालअपेष्टा का भोगल्या हा प्रश्न आज मनात रहातो. केवळ मातृभूमीला पारतंत्र्याच्या शृंखलातून सोडवण्या-

साठी एवढे बलिदान केले पण आजची परिस्थिती पाहून मन विषण्ण होते. त्यांच्या बलिदानाची किंमत कोणालाच करता आली नाही. आज जिकडे पहावे तिकडे स्वार्थाचे किडे वळवळताना दिसतात. अमाप धन, चैनबाजी व सत्तेसाठी चालणारी लाथाळी पाहिली म्हणजे ज्या सावरकरांनी निःस्वार्थी बुद्धीने केवळ मातृभूमीच्या उत्कट प्रेमापायी आत्मसमर्पण केले ते व्यर्थ झाले हा विचार मनात येऊन मन विषण्ण होते. त्या महापुरुषाला माझे कोटी कोटी प्रणाम !

• •

**आचार्य बाळाराव सावरकर**
**मुंबई**

८०

## सिद्धपुरुष भगवान श्री विनायक दामोदर सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर हे मोठे समाजसुधारक म्हणून अनेकांना मान्य आहेत. आपल्या समाजातील अनेक भोळसट रूढींवर, चालीरीतींवर, प्रवृत्तींवर त्यांनी तर्कशुद्ध बुद्धिवादाने कडक शब्दांत टीका केली आहे. यामागे त्यांचा हेतू हा हिंदुसमाज समर्थ विज्ञानवादी, बुद्धिवादी, राष्ट्रनिष्ठ, सद्धर्माभिमानी व्हावा हाच होता. याच दृष्टीने त्यांनी स्वतः निर्मिलेल्या अखिल हिंदुध्वजावर कृपाण आणि कुंडलिनी ही दोन अभ्युदय आणि निःश्रेयस यांची प्रतिके म्हणून अंकित केली आहेत.

या ध्वजासंबंधी माझी शंका विचारताना मी म्हटले, " तात्या, आपण हिंदूंच्या आणि अन्य धर्मियांच्याही भोळ्या अशास्त्रीय श्रद्धांवर कडक टीका करत असता पण आपणच ह्या ध्वजावर बुवाबाजीचे जे मूळ असे अनेक बुद्धिवादी म्हणतात त्या योगशास्त्राचा आधार असलेली कुंडलिनी का घातली आहे ? "

मी पुढे काही बोलणार होतो पण तात्यांनी मला थांबविले आणि ते म्हणाले, " ही कुंडलिनी आणि योगशास्त्र ह्या दोन्ही गोष्टी शास्त्रीय आहेत. त्या भाकडच्या कल्पना नाहीत. ध्वजपुस्तिकेत मी तसे लिहिलेही आहे. एवढेच नव्हे तर यासंबंधात माझ्या मधूर नाशिकच्या आठवणी आणि जन्मठेप यातही त्यासंबंधी चर्चा केली आहे. " मी म्हटले " आठवणीत आपण योगाच्या मागे लागून बाबा कसे फसले हे लिहिले आहे.

ते म्हणाले, " तुझे वाचन ठीक आहे. पण लक्षात घे, शस्त्राचा दुरुपयोग हा जसा शस्त्राचा दोष नाही, तसा योगसिद्धीचा दुरुपयोग हा योगशास्त्राचा दोष नाही. कुंडलिनी



ही शास्त्रीय आहे. मी स्वतः पूर्ण अनुभव घेऊन हे सारे सांगत आहे. माझी जन्मठेप मध्ये कवितांतून मी तसे लिहिले आहे. तूही अभ्यास कर. प्रथम वाच. मग झेपते का पहा, पटते का पहा. "

पुढे या संबंधात दोन तीन जणांशी त्यातील ज्ञाता अशा योगशिष्यांशी तात्यांनी केलेली चर्चा मी ऐकली तेव्हा तेव्हा माझी यासंबंधीची उत्सुकता वाढत गेली

या काळात तात्यांनी काही काही वेळा मला दिलेल्या पूर्वसूचना सांगितलेल्या भावी काळातील चालू दैनंदिन घटनाही खऱ्या झालेल्या पाहिल्या. मला त्यांच्या ह्या शक्तीचे आश्चर्य वाटे पण तशा गोष्टी मी कोणाला सांगत नसे. कारण त्या सांगणे म्हणजे बुवाबाजी करणे असे मला वाटे.

पुढे सावरकर चरित्र लिहिताना यासंबंधी उलगडा करून घेण्यासाठी मी योगसूत्रे वाचली. त्यांचा अर्थ सांगणारी स्वामी विवेकानंद, कोल्हटकर, रेळे यांची मराठी तसेच कल्याण मासिकाने प्रसिद्ध केलेली हिंदी पुस्तके वाचली. त्यातील विभूत्या पादात दिलेल्या सिद्धी वाचताना त्यासंबंधी विचार करताना मला वाटू लागले की या सिद्धी तात्यांनीही प्राप्त करून घेतल्या असल्या पाहिजेत. अंदमानात दहा वर्षे मिळालेल्या एकांतवासाच्या त्यांनी जन्मतः मिळालेल्या सिद्धी अभ्यासाने ध्यानधारणेने अधिक पक्क्या केल्या असल्या पाहिजेत.

माझ्या मते योगी सावरकरांना खालील सिद्धी प्राप्त होत्या. ( १ ) भूत आणि भविष्यकाळाचे ज्ञान ( विभूतीपाद क्र. १६ ), ( २ ) ज्ञानम् परिचित दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणे ( वि. पा. क्र. १९ ), ( ३ ) शरीरातील क्रियांचे ज्ञान ( वि. पा. ८ ), ( ४ ) तहानभूक यावर नियंत्रण ( वि. पा. ३० ), ( ५ ) सिद्ध पुरुषांचे दर्शन ( वि. पा. ३२ ), ( ६ ) जागृत प्रतिभास्थान ( वि. पा. ३३ ), ( ७ ) चित्तासंबंधीचे ज्ञान ( वि. पा. ३४ ), ( ८ ) स्वार्थसंयमाने प्राप्त आत्मज्ञान ( वि. पा. ३५ ), ( ९ ) पंचेंद्रियांनी होणारे सूक्ष्मज्ञान ( वि. पा. ३६ ), ( १० ) शरीर अग्नीप्रमाणे तेजस्वी होणे ( वि. पा. ४० ), ( ११ ) रूप, लावण्य, बळ वज्रासारखे शरीर लाभणे. ( वि. पा. ४६ ), ( १२ ) आत्मसाक्षात्कार आणि वैराग्य ( वि. पा. ४९-५० ) ( १३ ) विवेकज्ञान ( वि. पा. ५२ ), ( १४ ) कैवल्यमोक्षप्राप्ती ( वि. पा. ५५ )

सावरकरांची लेखभाषणे वाचली; जीवनचरित्र पाहिले की हे सर्व ते कसे करू शकले. त्यांच्या हातून अशा गोष्टी कशा घडल्या याचे आश्चर्य वाटते. बुद्धिवादी याची कारणे शोधू लागतात. माझ्या मते पातंजल योगसूत्राप्रमाणे त्यांना त्यातील काही सिद्धी पूर्वजन्माने जन्मतःच ( समाधिपाद सूत्र १९ ) प्राप्त होत्या. अंदमानच्या बंदिवासातील एकांतात त्यांनी ध्यानधारणा समाधी या मार्गाने त्या सुदृढ केल्या. नवीन मिळविल्या. त्यांचा उपयोग त्यांनी आपला देश, समाज, राष्ट्र यासाठी केला. वैयक्तिक स्वत्वप्राप्ती आणि उपयोगासाठी केला नाही ते खरे ज्ञानी कर्मयोगी आणि त्यागी होते. त्यांनी यश कीर्ती, विज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य मिळविले. त्यांना हे सर्व मिळाले. हे ज्याला मिळाले

त्याला ' भगवान ' म्हणावे अशी ' भगवान ' या शब्दाची व्याख्या आहे.

म्हणूनच मी म्हणतो की श्री विनायक दामोदर सावरकर हे जसे वीर वक्ते विद्वान, लेखक होते तसेच ते सिद्ध पुरुष आणि भगवान होते.

• •

श्री. अच्युत शंकर जोशी
रत्नागिरी.

८१

## सावरकरांचा व्यवहारीपणा

स्वा. सावरकर १९२४ मध्ये रत्नागिरी येथे आले मी त्यावेळी १० वर्षांचा होतो सावरकर रहात असत त्यांचे जवळच मी माधुकरी मागून रहात होतो. सावरकरांचे ६० रुपये आणणेसाठी सरकारी ट्रेझरीत मी जात असे. मला सावरकर दोन कागद ( फार्म ) भरून देत असत. ट्रेझरीत त्यावेळी श्री. शंकरराव प्रधान, श्री. श्रीरामभाऊ पुरोहित ही दोन माणसे सावरकरांची मित्र म्हणून होती. त्यांच्यापैकी एकाजवळ ते कागद नेऊन देत असे. अर्धा पाऊणतास थांबल्यावर ते पैसे माझ्याजवळ आणून देत असत. अशा प्रकारे बरेच वर्षे ( १०-१२ ) मी हे काम करीत होतो. त्यानिमित्त तात्याराव मला फक्त ४ आणे देत असत. मला त्यावेळी तेही फार आवश्यक होते. तात्या सांगत असत की मी मनीऑर्डरने पैसे घरी मागवू शकतो पण ते चार आणे सरकारला न मिळता तुला मिळावेत हा माझा हेतू आहे. यावरून सरकारबाबत त्यांच्या मनातील राग दिसून येतो.

श्री पतितपावन मंदिराच्या स्थापनेचे वेळी वेदोक्त की पुराणोक्त हा घोळ मोठ्या प्रमाणात झाला.

फाल्गुन शु ५, दिनांक २२ फेब्रुवारी १९३१ हा श्री पतित पावनाचा स्थापना दिन निश्चित झाला. त्यावेळी काशी, रामेश्वर, पुणे, नाशिक, मुंबई, येथून अनेक शास्त्री मंडळी श्रीमान् कीर शेटजींनी बोलाविली होती. त्यामध्ये कीर शेट हे भावक जातीने भंडारी असल्यामुळे त्यांना वेदोक्ताचा अधिकार नाही असे काही शास्त्री मंडळींचे मत होते. बरीच लढाजंगी चर्चा झाली. शेवटी श्रीमान कीर शेट हे ही चलबिचल झाले व सावरकरांना म्हणाले, तात्या आता ही मंडळी म्हणताहेत त्याप्रमाणे आपण पुराणोक्त पद्धतीने स्थापना करू या. त्यावर तात्या म्हणाले, हे पहा शेटजी आपण ज्या तत्त्वाकरिता मंदिर बांधले आहे ते तत्त्व जर तुम्ही सोडाल तर मलाही सोडल्यासारखे होईल. तुम्ही मुळीच डगमगू नका. मी सर्व काही व्यवस्थित पार पाडीन. नंतर ज्या शास्त्री मंडळींना हे मान्य नव्हते त्यांना दक्षिणा व येण्या-जाण्याचा खर्च देऊन परत पाठविले आणि श्री. मसुरकर महाराज, त्यांचे श्री. मोडकशास्त्री, श्री. शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी इत्यादी मंडळींनी स्थापनेचे कार्य पूर्ण केले. सावरकरांनी तत्त्व सोडले नाही. सहभोजनाविषयी सनातन्यांचा आरोप खोडून अखिल हिंदू गणेशोत्सवात १ स्त्रियांचे व १ पुरुषांचे अशी दोन दिवस सहभोजने होत होती. दोन्ही मिळून दोन हजार पाने व्हायची. सर्व खर्च श्रीमान कीर शेट करायचे. त्यावेळी सहभोजनात भाग घेणाऱ्या मंडळींच्या नावाची यादी वर्तमानपत्रात प्रसिद्ध व्हायची. ही नावे खोटी व बोगस आहेत असे काही सनातनी मंडळींचे म्हणणे होते. व तसे ते वर्तमानपत्रात प्रसिद्ध करीत. यावर सावरकरांनी एक तोडगा काढला तो असा की गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीचे वेळी एक खटारा गाडी घ्यायची. त्यामध्ये चहाचे पिंप व भजी ठेवायची आणि नाक्यानाक्यावर गाडी थांबवून पूर्वास्पृश्य-भंगी चांभार, ब्राह्मण, इत्यादी मुलांकडून ती लोकांना वाटायची. ही भजी खाणारे व चहा पिणारे हजारो लोक असायचे, मग तात्या सांगत माझ्या सनातनी बंधूंनो, आता तरी नीट डोळे उघडून पहा काय चालले आहे ते. त्यावर सनातनी मंडळींची काहीही प्रतिक्रिया नाही.

• •

पांडुरंग गोविंद शिरगांवकर
पाळशेत ( गुहागर ),
जि. रत्नागिरी.

८२

## सावरकरांचे तेजस्वी उद्गार

१९६२-६४ साल असावे. माझे मित्र दत्ता विलणकर तात्यांचे परम भक्त आहेत. ते नेहमी बाळ सावरकर, पंडित बखले सारख्यांच्या संगतीत नेहमी वावरतात. एकदा आम्ही दोघे मुंबईला गेलो होतो. तेव्हा तात्यांना भेटावयाचे मनात आले. विलणकरने बाळ सावरकरांतर्फे फोन करून परवानगी घेतली. आम्ही गेलो. तात्यांच्या दिवाणखान्यात प्रवेश करताच तात्यांचे दर्शन घडले. मला प्रेमाचे भरतेच आले. तात्यांनी विचारपूस केली. काम विचारले. आम्ही केवळ दर्शनासाठी आल्याचे सांगितले. गाव कोणता विचारले. पाळशेत गावात मुसलमान वस्ती किती? आम्ही उत्तरलो एकही घर नाही. यासरशी तात्यांचे डोळे एकदम बारीक होऊन चमकले व स्वच्छ दातांच्या मिटलेल्या पंक्तीतून ( दात ओठ खाल्ल्यासारखे ).

' या ! असाच सर्व हिंदुस्थान निर्यवन झाला पाहिजे !' हे वाक्य बाहेर पडले मी ते तेव्हा पाहून कृतार्थ झालो. त्यांच्याजवळ अधिक बोलण्याची आमच्या जवळ क्षमता नव्हतीच. धन्यता वाटून आम्ही लोकच निघालो.

• •

श्री. गणेश नारायण दांडेकर
दापोली.

८३

## सावरकरांची थोर योग्यता

स्वातंत्र्यवीर सावरकरांना पुणे येथे संघाचे उन्हाळी वर्गात मे १९३८ मध्ये अगदी जवळून पहाण्याचा योग आला. स्वातंत्र्यवीर वर्गाचे स्थानी ( भावे स्कूल ) ११-३० वाजता आले. सर्व कार्यकर्त्यांना ( ६०० ) शिस्तबद्ध बसवून घेतल्यावर त्यांचे शिवाजीचा गौरवशाली इतिहास या विषयावर भाषण सुरू झाले. एक तासात वातावरण एवढे भारावून गेले की स्वातंत्र्यवीरांनी ' आता तुमची वेळ झाल्यामुळे मी भाषण संपवतो ' असे म्हणताच सर्व शिक्षणार्थींनी ' नाही नाही, आणखी बोला आणखी बोला ' असा एकच उत्स्फूर्त गिल्ला केला. स्वातंत्र्यवीर मग आणखी अर्धा तास बोलले.

स्वातंत्र्यवीर किती मोठे होते याचे मोजमाप घेण्याचे माझेजवळ साधन नाही. तरी पण एका प्रसंगाने मला त्यांची उंची लक्षात आली. त्याच उन्हाळी वर्गात संघाचे सरसंघचालक पू. डॉ. हेडगेवार यांचे एक दिवस दुपारी तीन वाजता सर्व शिस्तशीर बसलेल्या शिक्षणार्थींपुढे भाषण सुरू झाले. दहा मिनिटे होतात तोच हॉलचे दारामध्ये स्वातंत्र्यवीर आले. लगबगीने तेथे जाऊन पू. डॉक्टरांनी त्यांचे पाय धरले व स्टेजवर आणून त्यांना बसवले. आम्ही सर्वजण अत्यंत विस्मित होऊन पहातच राहिलो.

• •

अच्युत लक्ष्मीकांत परळीकर
परळी वैजनाथ,
जि. बीड.

८४

## सावरकरांचा मोठेपणा

काळ किती सरसर निघून जातो. दिवसामागून दिवस, महिन्यामागून महिने, वर्षामागून वर्षे संपली. पाहता पाहता ५० वर्षांहून अधिक काळ झाला. दुसरे महायुद्ध



सुरू होण्यापूर्वीचे ते वर्ष असावे. वीर सावरकरांची स्थानबद्धतेतून नुकतीच सुटका झाली होती. त्यापूर्वी ते अंदमानच्या अंधेरीतून रत्नागिरीला आले होते. मी व माझे काही शाळामित्र हैद्राबाद संस्थानातून पुण्यास आलो होतो. आमचा मुक्काम नूतन मराठी विद्यालयात होता. योगायोगाने त्याच सुमारास स्वा. सावरकर पुण्यास आल्याचे समजले. आमच्या बरोबर असलेल्या मार्गदर्शकांनी ( श्री नातू ) स्वा. वीर सावरकरांची भेट घेण्याचे ठरविले व सुदैवाने ती घडून आली.

पुण्याचे प्रसिद्ध ' केसरी ' ( त्यावेळचे द्वि-साप्ताहिक ) च्या कार्यालयात दुसऱ्या मजल्यावर आमची ही भेट झाली. ती बैठक भारतीय पद्धतीची व टापटिपीची होती. ते तक्क्यास टेकून बसले होते. निजाम संस्थानातील काही मुले भेटीस आल्याचे समजताच त्यांनी आम्हांस वर गादीवर बोलावले व जवळ बसवून घेतले. आत्मीयतेने आस्थेवाईक-पणे आमची चौकशी केली. निजाम स्टेट मध्ये आमचे कसे काय चालले आहे त्याची आवर्जून विचारपूस केली. ( त्याकाळी साधारणतः १९३५ मध्ये हैद्राबाद संस्थानात स्वातंत्र्याची मोठी चळवळ झाली होती. तसेच हैद्राबाद संस्थानच्या परिस्थितीबद्दल काही समज-गैरसमज ही होते. आमच्याबद्दल त्यांना वरील तळमळ दिसून आली. आपल्याबरोबर आम्हा सर्वांना कसाचा ताजा रसदी प्यावयास लावला हे पक्के आठवते ! आम्ही त्यांच्याशी सुचतील तसे दोन शब्द बोललो. तेथील बैठकीचे वातावरण व स्वा. वीर सावरकरांचे आमच्याशी वागणे खेळीमेळीचे व मोकळेपणाचे होते त्यामुळे आम्हाला बराच धीर आला. आम्ही त्यांना आदराने नमस्कार केला व त्यांचा निरोप घेतला.

• •

श्री. जगन्नाथ विष्णु आठल्ये
रत्नागिरी ४१५६१२.

८५

## सावरकरांची आत्मीयता

मी १९३० साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झालो, त्या काळात म्हणजे १९२४-३७ या काळात स्वा. सावरकर रत्नागिरीत होते. त्यावेळी अस्पृश्यता निवारणाचा एक भाग म्हणून दसऱ्याच्या दिवशी सोने घरोघर जाऊन देत असत. एकदा ३-४ ते पूर्व-स्पृश्यांसह आमचे घरी सोने घेऊन आले तेव्हा मी पुढे होऊन सोने दिले-घेतले परंतु आमचे घराणे जुन्या विचाराचे असल्यामुळे व आम्ही विद्यार्थीदशेत असल्यामुळे

त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे स्नान करावे लागले. ( दरम्यान बराच काळ लोटला ) पतित पावन मंदिर संस्था ट्रस्टचा १० वर्षे विश्वस्त म्हणून व ३ वर्षे अध्यक्ष म्हणून काम केले. या काळात संस्थेचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. सदर मंदिर माझे घरासमोरच असल्यामुळे १९३० पासून आजपर्यंतचा सर्व इतिहास डोळ्यांपुढे आहे.

१९३० ते ४० पर्यंत मी किराणा मालाचा व्यापार करीत असे. श्री. तात्या हे माझे ग्राहक होते. ते केव्हा ना केव्हा जाता-येताना दुकानात येऊन बसत व स्वदेशी साखर विक्रीस ठेवण्याबद्दल आवर्जून सांगत. तेव्हा पुढे देशात साखर कारखाने निघाले तसे नव्हते. फक्त बेलापूर येथे कारखाना होता व तेथील साखर पिवळसर असे. तिला गुळी साखर म्हणत. ती थोडी महाग असे. तरीही देशी असल्यामुळे ती ठेवावी असा तात्यांच्या प्रचाराचा भाग होता, त्यात त्यांचा द्रष्टेपणा दिसतो.

सन १९५४ साली माझ्या मुलीचे लग्न मुंबईस झाले. त्यावेळी त्यांना निमंत्रण देण्याकरिता मी व माझे मुंबईचे बंधू चि. वैजयनाथराव, गेलो होतो. ( आता सदर बंधू नाही. ) त्यावेळी तात्यांनी " मी लग्नकार्याला कोठेही जात नाही. कारण इतकी निमंत्रणे येतात की तसे जाणे शक्य होत नाही. शिवाय एकाकडे जाणे व एकाकडे न जाणे हे योग्य नाही. " असे सांगून एक पुस्तक आणून त्यावर स्वाक्षरी करून ' शेष अहेर ' म्हणून मुलीला द्यावा असे सांगितले. या गोष्टीबद्दलही आम्हा उभयतांना कौतुक वाटले. सदर बंधू कलकत्ता अधिवेशनाचे वेळी स्वा.वीर सावरकरांचे बरोबर जी मंडळी गेली त्यात ते होते. इतका त्यांचा माझा तात्यांशी जवळचा परिचय असल्याने निमंत्रण द्यावे व समक्ष भेटावे हा हेतू होता.

• •

एस. एम. जोशी
पुणे ४११००४.

८६

## सावरकरांचा सर्व पक्षांबद्दल आदर

१९३४ साली मी आणि अच्युतराव पटवर्धन रत्नागिरीच्या दौऱ्यावर होतो. तेव्हा रत्नागिरीस आम्ही सावरकरांना भेटण्यास गेलो होतो त्यावेळी तेथील त्यांच्याशी थोडी बातचीत केली त्यामुळेही आम्हाला कार्याची प्रेरणा मिळाली. स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील सरकारी बंधने काढून घेतली आणि ते देशभर हिंडू लागले. ३६ साली ते पुण्यास आले असताना त्यांचा भारतमाता मंदिरात तरुणांच्या वतीने सत्कार करण्यात



आला. मी बोलताना म्हणालो, ' सावरकर यांनी आम्हाला देशसेवेचे बाळकडू पाजले आहे. त्यांना गांधींच्या शांततामय मार्गाने पुढे जाण्याचा विचार पटत नव्हता. हिंदु-मुसलमान ऐक्याविषयीही त्यांचे विचार वेगळे असले तरी मी नतमस्तक होऊन त्यांना अभिवादन केले. त्यावेळी ते उठले, माझ्या पाठीवर थोपटून म्हणाले, हरकत नाही. मतभेद असले तरी आपण सारे देशासाठीच प्रयत्न करीत आहोत. तुम्ही पुढे चला. देश एक व्हावा, शक्तिमान बनावा हीच तर आपणा सर्वांची इच्छा आहे. त्यांनी दिलेल्या या धीराने मला खूप खूप बरे वाटले.

त्यांच्या अमृतमहोत्सवप्रसंगी एस. पी. कॉलेज मैदानावर मोठी सभा झाली. जयवंतराव टिळक म्हणाले, आपल्या देशात मरगळ आल्यासारखी दिसते ती कशामुळे? मी त्यांना सांगितले सावरकरवादी असाल तर त्यांच्या मार्गाने तुम्हाला पुढे जावे लागेल. आम्ही टिळकवादी गांधीवादी म्हणवितो. त्यांचे धडे मात्र गिरवीत नाही. उगाचच मरगळ आली असे ओरडतो. सावरकरांचा शस्त्रनिष्ठ मार्ग आम्ही कोठे पाळतो आहोत ! इत्यादी, सावरकरांचे उत्तराचे भाषणही सर्वांना सांभाळून नेणारे होते.

• •

अनंत धोंडो खांबेटे
मुंबई २२.

८७

## सावरकरांची नेत्रदीपक सुटका

१९३६ साल असावे. गव्हर्नर एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये श्री. जमनादास मेहता असताना केवळ त्यांच्याच खटपटीने त्यावेळी रत्नागिरीस स्थानबद्ध असलेल्या तात्याराव सावरकरांना मुक्त करण्यात आले. त्यानंतर लगेच पुणे-मुंबई रेल्वे गाडीने ते बोरीबंदर स्थानकावर यावयाचे मुंबईच्या दैनिकातून जाहीर झाले होते. त्यांच्या स्वागतासाठी काही मुंबई हिंदुमहासभेची व सावरकरनिष्ठ मंडळी बोरीबंदर स्थानकावर उपस्थित होती. रेल्वेगाडी फलाटावर आल्याबरोबर जमावाने तात्याराव सावरकरांचा जयजयकार उच्चरवाने सुरू केला. मी त्यावेळी तात्यारावांच्या जवळून चालत होतो. जयजयकार होत असता " हिंदुस्थान हिंदुओंका, नहीं किसीके बापका " ही घोषणा देण्यास सुचविले. त्यावेळी पाकिस्तान निर्मितीची बीजे पेरली जात होती. त्याला विरोध दर्शविणारी ही घोषणा लगेच सर्वांनी उचलून धरली. त्यांच्या भोवतालच्या गलक्यातून फलाटाबाहेर येत असताना उपरोक्त घोषणा मोठमोठ्याने चालू ठेवण्यासाठी तात्याराव सुचवीत होते. हे मी प्रत्यक्ष अनुभवले.

फलाटावाहेर येऊन त्यांच्यासाठी तयार ठेवलेल्या मोटारीत बसायला जात असता श्री. जमनादास मेहता तात्याराव सावरकरांपुढे लगबगीने येऊन उद्गारले,

"Now I am going. My presumption is that you are a free man." असे म्हणून ते त्यांच्या मोटारीत बसून निघून गेले. त्यानंतर कै. तात्यारावांचे कृष्ण सिनेमात ( गिरगाव पोलिस स्टेशनजवळचे ) स्वागत व भाषण झाले.

• •

सुशीला आपटे
सोलापूर

८८

## सावरकरांचा आदर्श

मला कै. सावरकरांविषयी आदर असल्याने मी अनेक वेळा त्यांच्या घरी दर्शनार्थ गेले होते. त्या त्या वेळी माझ्या मुलाला आशीर्वाद त्यांनी दिलाच. मी सरसेनापती होणार मोठेपणी असे म्हणण्याऐवजी मी जनरल होणार म्हणाला की लगेच ते दुरुस्त करायचे जनरल नव्हे सरसेनापती.

मी एका गृहस्थांच्या सोबतीने सोलापूरहून मुंबईला आले होते सावरकर त्याच गाडीने व्याख्यान दौरा आटोपून आले होते. मी सामानाजवळ उभी होते. सोबतचे गृहस्थ व्हिक्टोरिया ठरवायला गेले होते. माझ्यापासून १५-२० पावलांवर ती मंडळी उभी होती. कै. तात्यारावांचे माझ्याकडे लक्ष गेले. लगेच त्यांनी एकाला मजकडे पाठविले. मी एकटी असल्याने सोबतीची जरूरी आहे काय हे विचारायला! ४० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्यांची तत्परता पाहून मी थक्क झाले. आता कोणाला मदत हवीसे दिसल्यास मी स्वतः होऊन विचारते, हा त्यांच्या आचरणाचा परिणाम!

• •

डॉ. जोशी
अमरावती.

८९

## हिंदुराष्ट्राचा ध्यास

ही आठवण सन १९३७-३८ मधील आहे. स्वा. वीर रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून नुकतेच मुक्त होऊन त्यांच्या झंझावाती दौऱ्यात अमरावती येथे आले असताना



येथील नगरपालिकेने त्यांचे आपारात त्यांचा प्रचंड सत्कार समारंभ आयोजित केला. पुष्पहारांमध्ये ते अक्षरशः झाकून गेले होते. व ते हार दूर करणाऱ्यांचीच फार त्रेधा तिरपीट उडत होती. सत्काराला उत्तर देताना त्यांचे फारच उत्कृष्ट भाषण झाले. भाषणाचे शेवटी त्या काळातल्या एका पूर्वास्पृश्य व्यक्तीच्या हस्ते आणलेल्या तांब्याभांड्यातून त्यांनी पाण्याचा एक घोट घेतला. व ते म्हणाले की मला पाण्याची तहान लागली म्हणून मी हे पाणी प्यालो नाही तर मला अखिल हिंदू समाजाच्या ऐक्याची फार तहान लागली म्हणून मी हे पाणी प्यालो. जन्मजात अस्पृश्यतेचा मृत्युलेख मजकडून लिहिला गेलाच आहे. पण तुम्ही विपरीत रूढींच्या सात बेड्या खळकरात तरवार मोडीत काढा. अखिल हिंदू समाज व हिंदूराष्ट्र हे एकसंघी, एक जिनसी व महाबलाढ्य व्हावे हे स्वप्न मी अहोरात्र पहात आहे. त्यांच्या ओजस्वी विचारांनी व घणाघाती वक्तृत्वाने सारा श्रोतृवृंद भारावून गेला होता. त्यावेळचे हे त्यांचे भाषण ऐकलेल्या श्रोत्यांच्या कानात हे त्यांचे शब्द अजून निनादत आहेत.

• •

श्री. अच्युत मोरेश्वर जठार
बंदर रोड, मुंबई २६.

९०

## सावरकरांची मौलिक आठवण

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या शूरपणाच्या कथा आम्ही ऐकल्या होत्या. ती जगप्रसिद्ध सावरकरांची इंग्लिश खाडीतील उडी तरुणांचे मन आकर्षून घेते. पराक्रमी क्रांतिकारक देशभक्त, साहित्यिक, कवी, वक्ता अशी सावरकरांची अनेक रूपे असलेले सावरकर आयुष्यात काही वेळ आले. याचा मला खूप आनंद व अभिमान वाटतो.

राजापूरच्या विश्वनाथ विद्यालयात ३३।३४ साली सावरकर आले होते. माझ्या शेजारी काशिनाथ येसा महार हा विद्यार्थी बसला होता. त्याच्याजवळ ते प्रथम गेले. त्याला ते ओळखीत होते. त्याचे वडील रत्नागिरीला पोलिसात होते. त्याची चौकशी केल्यावर ते माझ्याकडे वळले. आम्ही दोघे विद्यार्थी महार व ब्राह्मण जवळ बसलेले असल्यामुळे त्यांनी मला नाव, गाव, तालुका, जिल्हा, इलाखा व देश कोणता हे प्रश्न विचारल्यावर महार हे कोणत्या धर्माचे हे विचारले. मी हिंदू धर्मातले हे सांगितल्यावर त्यांनी आमच्या साळवी गुरुजींना या वयात एवढे समजले तरी बस! असे सांगून ते दुसऱ्या वर्गात भेट देण्यासाठी गेले. या नंतर साळवी गुरुजींनी सावरकरांविषयी खूप

माहिती सांगितली ( अगदी अलीकडे मला कोणीतरी सांगितले की त्यावेळी सावरकर राजापूरला खादी भांडाराचे उद्घाटन करण्यासाठी आले होते.

सावरकरांशी आपले संभाषण झाल्याचा मला खूप आनंद वाटतो. पुणे-मुंबईला त्यांची बरीच भाषणे ऐकली. तथापि डोळ्यांसमोर चित्रपट दिसावा तशी त्यांची ओजस्वी ओघवती भाषा माइकवर जणू काय २५।३० वर्षांचा तरुण आवाजात बोलत आहे असे वाटे. अजून त्यांच्या भाषणाचा आवाज कानात घुमत आहे. जय स्वातंत्र्यवीर सावरकर की जय !

* *

जयसिंग ग. तुपे
घर नं. ५६,
पाषाण, पुणे ८.

## ९१

## सर्वांना आवडणारे सावरकर

कै. तात्यासाहेब केळकरांचे सन १९४७ साली पुण्यात निधन झाले. केळकरांच्या जिमखान्यावरील ' पुष्करणी ' येथे जाऊन आम्ही चार पाच जणांनी अंत्यदर्शन घेतले. अंत्ययात्रा सुरू झाली ती मजल दरमजल करीत टिळकस्मारकाजवळ आली. तेवढ्यात एकच गलबला उडाली. आले ! आले ! सावरकर आले अशी कुजबूज सुरू झाली. तात्याराव आले हे कळताच प्रत्येकजण त्यांना वाट करून देई. सावरकरांनी तात्यांचे अंत्यदर्शन घेऊन त्यांना पुष्पहार अर्पण केला. त्या छोट्याशा गोष्टीतही तात्याराव सावरकरांच्या बद्दल जनतेत किती मोठा आदर होता याचीच चुणूक दिसून आली. त्यानंतर त्या प्रचंड अंत्ययात्रेचे ओंकारेश्वराच्या पटांगणात पदार्पण झाले व विराट सभा झाली. त्या सभेत सर्वांत शेवटी तात्यारावांनी तात्यासाहेबांना श्रद्धांजली वाहिली. त्यात ते म्हणाले जिवंतपणी तात्यासाहेबांना ज्यांनी त्रास दिला त्यांनीच अखेर तात्यांचा थोर म्हणून गौरव केला हीच खरी तात्यासाहेबांच्या थोरपणाचीच पावती होय. असे होते तात्याराव सावरकर निर्भीड व कठोर टीकाकार.

दुसरी आठवण तात्याराव सावरकर केसरीच्या अतिथीगृहात पुण्यास आले की उतरायचे तेथे त्यांना पहाण्याचे भाग्य मला लाभले. त्यांचा पांढरा स्वच्छ पेहराव व त्यावरील टोपी सदैव स्मरणात राहील. ते फक्त विचारले तरच बोलत. असेच आम्ही चार पाच जण त्यांच्याकडे गेलो तर ते म्हणाले काय काम काढले. आम्ही सांगितले की दर्शनास आलो. त्यांनी सर्वांची चौकशी केली. आम्ही त्यांना ' केसरीतच ' कामे करतो असे सांगितले तेव्हा त्यांच्या चेहेऱ्यावर हसू आले. ते हसू अजूनही आठवते. असे होते तात्याराव सावरकर.



श्री. एम. आर. ठकार
पिंपरी, पुणे ४११०१८.

## ९२

## स्वातंत्र्यवीरांचा स्फूर्तिदायक सहवास

आम्ही शाळकरी विद्यार्थी असताना मा. तात्यारावांचा सहवास मिळाला. पुण्याचे माजी महापौर श्री. गणपतराव नलावडे हे आमचे नायक. प्रभातफेरी, सायकलफेरी, सभेचे ठिकाणी स्वयंसेवक इत्यादी प्रकारे काम करीत होतो.

साधारणतः दरवर्षी मे महिन्यात हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांची बैठक असायची. वसंतव्याख्यानमाला, जाहीर भाषणे याकरता तात्यारावांचा मुक्काम केसरीवाड्यात ४।६ दिवस असे. दररोज सायंकाळी रात्री आम्ही पण तेथे जात असू. कधी कधी त्यांच्याबरोबर भोजन करण्याचे भाग्य मिळत होते. बॅ. जमनादास मेहता, आत्मारामभोपटकर, भालाकार भोपटकर, तात्यासाहेब खापर्डे, इ. मान्यवर व्यक्तीसमवेत तात्यारावांचे भाषण, मार्मिक विनोद जरी चालत असले तरी आमच्याकडे त्यांचे लक्ष असे. काही वस्तुती, काही कार्य विषय (आमचे आवाक्यातील ) इत्यादीवर आमच्या-बरोबर पण बोलत असत. सहजपणे नवे मराठी प्रतिशब्द सुचवले जात.

मी दोन वेळा नागपूर अधिवेशनाला गेलो असताना ही ओळख ठेवून स्वातंत्र्य-वीरांनी माझी विचारपूस करून व्यासपीठावर बसवून घेतले. त्यांचे पुण्यात गाजलेले ' माझी कल्पना मला करू द्या, खऱ्या ठरल्या तर प्रॉफेट ठरेन मी; खोट्या ठरल्या तर वेडा ठरेन मी ' हे भाषण अगदी जवळून ऐकले. त्यांची तेजस्वी मुद्रा, रुबाबपूर्ण चाल-चाल मला सहजपणे पाहता आले. ही धन्यता केवढी !

१९३९ साली स्वातंत्र्यवीरांच्या स्वाक्षरीने माझे नवीन खास स्वाक्षरी पुस्तक सुरू केले. त्यानंतर अनेक मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या मिळविल्या. ते पुस्तक अजूनही माझ-जवळ सुरक्षित अवस्थेत आहे. पुनःप्रत्ययाचा आनंद देत आहे.

स्वातंत्र्यवीरांचे पवित्र स्मृतीत नम्र अभिवादन !

**स्वरचित :** ' दसरा गीत खालीलप्रमाणे—

दशहरा म्हणजे दुष्कृत्ये दुराचारी यांचे करणे निर्दालन
सत्यवचनी रामाने केले सज्जन ऋषिमुनींचे संरक्षण ॥ १ ॥

रावणवध जरी प्रत्यक्ष पुनः देखिला त्या दूरदर्शनी
समाधान कशाचे दुष्कृत्ये दुःप्रवृत्तिंच्या पुनरागमनी ॥ २ ॥

ण असतो बाणाचा तो धारणकर्ता हात गुंतला तरी कोठे ?
भीरेवर रोष ज्याचा अखंडकरी अवनीवरी इथे निघे ॥ ३ ॥

ठामपणे परि वाटे त्याला चाळत आहे तो,
स्थान शोधितो त्याचे
दुःखाचे करुनी निर्दालन संधी देण्या तुम्हा आम्हा
शमी पूजन करण्या दसऱ्याचे ॥ ४ ॥

• •

## ९३

आचार्य अत्रे

सबंध महाराष्ट्रात पांढरी शुभ्र मानवी असलेले दोनच पुरुष.
१ ) स्वातंत्र्यवीर सावरकर.
२ ) नारायण राजहंस तथा बालगंधर्व.

• •

## ९४

बॅ. बॅप्टीस्टा

नेपोलियानीक इनसायीज द्री वीश प्राईस फॉर हीज साईज.

• •

## ९५

रा. स. भट
कार्यवाह वीर गौरव समिती, पुणे.

## मी निवडणूक लढवणार नाही

१९५२ सालची गोष्ट. लोकसभेची पहिलीच निवडणूक तोंडावर आली होती. त्यावेळी सावरकरांनी निवडणुकीला उभे राहावे असे मला वाटत होते. त्याच सुमारास



मी मुंबई येथे गेलो असताना योगायोगाने वीर सावरकरांची भेट झाली. मी त्यांना भेटल्यावर प्रथमच म्हटले की, "गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ आपण हिंदुत्वाचा प्रचार करीत आहात, पण त्याला मिळावे तेवढे यश मिळत नाही. त्यामुळे आपणास निराशा वाटत नाही का ?"

सावरकर हसून म्हणाले की, "त्यात निराशा वाटण्यासारखे काय आहे ? कुठलेही नवीन तत्त्वज्ञान समाजात रूढ होण्यासाठी दीर्घकाल जावा लागतो. एवढा मोठा हिटलर पण प्रारंभी त्याच्या सभांना अत्यंत अल्प उपस्थिती असे. कित्येक वेळी लोकांनी त्याला दगड मारले आहेत, तोच आज जर्मनीचा सर्वेसर्वा झाला आहे. हिंदुत्वाचेही तसेच होईल. एक काळ असा येईल की, हजारो लोक हिंदुत्वाचा जयजयकार करून ते तत्त्वज्ञान डोक्यावर घेतील व संपूर्ण हिंदुसमाज हिंदुत्वासाठी प्राणपणाने लढेल."

त्याचवेळी स्वातंत्र्यवीरांनी लोकसभेची निवडणूक लढवावी अशी त्यांना मी विनंती केली. त्यावर ते म्हणाले, "लोकसभेत निवडणूक लढवून जाण्याची माझी मुळीच कल्पना नाही. या देशाचा राष्ट्राध्यक्ष निवडला जावा अशी यंत्रणा निर्माण करणारे आम्ही स्वतः संसद सदस्य होण्यापेक्षा राष्ट्राध्यक्ष निवडणारे आम्ही, अशा प्रकारे राष्ट्राने आम्हास ओळखावे अशी आमची इच्छा आहे. म्हणून मी स्वतः निवडणुकीला उभा कधीही राहणार नाही असा निश्चय आहे." टेबलावर पडलेल्या दोन तारा दाखवून सावरकर म्हणाले, "हे पहा, बंगालमधून मुकर्जी व चटर्जी यांच्या दोन तारा आल्या आहेत व त्यात बंगालमधून मी लोकसभेची निवडणूक लढवावी, अशी विनंती केली आहे. आपण राहतो त्या प्रांतापेक्षा दुसऱ्या प्रांताच्या लोकांनी त्या प्रांतातून आपणास निवडून देण्याचा केलेला निश्चय हा केवढा सन्मान नाही काय ? पण निवडणूक लढवणार नसल्याने तोही मी स्वीकारणार नाही.

## कम्युनिस्टांना भिऊ नका

संयुक्त महाराष्ट्र आंदोलन चालू होते. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीत कम्युनिस्ट पक्ष आल्यास समितीची हानी होईल असे काही लोकांना वाटत होते. या विषयावर बोलताना सावरकर म्हणाले, "कम्युनिस्टांना मुळीच भिऊ नका, ते पण देशभक्तच आहेत, प्रत्येक देशात कम्युनिझम आला आहे व त्याची तत्त्वे प्रत्येक ठिकाणी वेगळी आहेत. आपल्या हिंदुस्थानात येणारा कम्युनिझम हा देशाला उपकारकच असेल अशी माझी निश्चिती आहे." ते पुढे मला म्हणाले, "तुम्ही 'कौटिलीय' अर्थशास्त्र वाचले आहे का ? नाही ना ? बरे ! मार्क्सचे 'कॅपिटल' तरी वाचले का ? नाही ना ! मग मी सांगतो ते ऐका. मार्क्सचे कॅपिटल म्हणजे कौटिलीय अर्थशास्त्राने चघळून टाकलेला चोथा आहे, असे माझे मत आहे."

## चोर, दरोडेखोरांना सुद्धा शिक्षण द्यायलाच पाहिजे !

वीर सावरकरांना अगदी लहान वयापासून आपल्या मित्रांना विविध विषयांवर शिक्षण देण्याचे व्यसनच होते. रत्नागिरी येथे पूर्वास्पृश्यांच्या मुलांना झोपड्यांतून जाऊन, त्यांनी शिक्षण घेण्याचे नाकारले तरी सावरकरांनी त्यांना शिक्षण दिले आहे. अंदमानातही शिक्षेच्या काळात सावरकरांनी तेथील अशिक्षित बंदी, चोर, दरोडेखोर यांनादेखील असेच वळेवळे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांचे सहकारी राजबंदी त्यांना म्हणत, "चोर, दरोडेखोरांना शिक्षण देणे म्हणजे काळाचा अपव्यय आहे." त्यावर सावरकर उत्तर देत, "मुळीच नाही. या अशिक्षित बांधवांना सुशिक्षित करणे आपले आद्य कर्तव्य आहे. स्वराज्यात हिंदुस्थानात खेड्यापाड्यांत जाऊन हे काम करावे लागेल, त्यात कमीपणा कसला ? तसे असते तर आफ्रिकेच्या जंगलातून या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आदिवासींना शिक्षण देण्यात आयुष्याने आयुष्ये घालविलीच नसती. चोर, दरोडेखोरांना काय कमी समजता ? अरे, एका दरोडेखोरानेच तुम्हाला रामायण दिले आहे ते विसरू नका."

* *

ज. श्री. टिळक
पुणे.

९६

## लिपीशुद्धीबाबतचे सावरकरांचे कार्य

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी भाषाशुद्धी व लिपीशुद्धीचे रत्नागिरीत आंदोलन केले. स्वभाषाभिमान राष्ट्रनिर्मितीचा एक अवश्य घटक आहे, असे ते म्हणत असत. शिवाजीमहाराजांनी 'राज्यव्यवहारकोश' यासाठीच लिहिला याचा ते उल्लेख करत. भाषाशुद्धीबाबत व लिपीशुद्धीबाबत त्यांचा फार कटाक्ष असे. क्रमांक, दिनांक, चित्रपट, बोलपट, प्राचार्य, प्राध्यापक, महापौर, दूरदर्शन आदि अनेक मराठी शब्द सावरकरांनी सुचविले व आता ते मराठीत रुळलेले आहेत.

भाषाशुद्धीचा प्रयत्न किंबहुना फारशी, इंग्रजीतील शब्दांना मराठी भाषेतील पर्यायी शब्द राजकारणात रूढ करण्याचे काम प्रथम केसरीने केले व अनेक शब्द प्रचारात आणले. लिपीशुद्धीबाबतसुद्धा लोकमान्यांचा प्रयत्न होता. नागरी लिपी यंत्रक्षम करावी हा त्यांचा प्रमुख उद्देश होता. नागरी लिपीपुरता पाहता रोमन लिपीपेक्षा तिच्या



टंकांची संख्या अत्याधिक. तसेच दुसरी अडचण म्हणजे तिच्या सरणीतील मात्रादिक स्वरचिन्हे अक्षरांच्या वर-खाली लिहिली जात असत. टंक जुळविण्यात सरळ रेषेत एकापुढे एक टंक लावीत जाणे सोपे असते, पण अक्षरांच्या वर व खाली चिन्हे जुळविताना पुरणाचा ( डिमी ) त्रास पडे. ही अडचण टाळण्यासाठी प्रथम निर्णयसागरने जोडाक्षरांचेही अखंड टंक पाडले; त्यामुळे पुरणाची ( डिमी ) अडचण नाहीशी झाली. पण या सगळ्या खटाटोपात खिळ्यांची संख्या रोमन लिपीप्रमाणे थोडी होण्याऐवजी उलट वाढलीच. लोकमान्य टिळक लंडनमध्ये असताना त्यांनी एकटंकासारख्या ( मोनो टाईप ) यंत्रावर बसविता येईल असे टंक, मूळ टंकाचे अवयव पाडून प्रयत्न केला. ते एकटंकीयंत्राच्या कारखानदारांशी बोलले, पण पुढे लोकमान्यांचा अकस्मात मृत्यू झाल्याने ते तसेच राहिले.

लोकमान्य टिळकांनंतर केसरीचे संपादक तात्यासाहेब केळकर यांनी टिळकांनी केलेल्या सुधारणा लक्षात घेऊन २२० टंकसंख्या असलेला टिळकटंक पाडला. पुरणाची ( डिमी ) भानगड त्यात नव्हती. मूळ अक्षररूपात पालट करावयाचा नाही, असा सर्वसाधारण निर्धार लिपी सुधारणेच्या प्रयत्नात होता.

सावरकर, लिपीशुद्धीची ही चळवळ पुढे नेत होते. साहित्यसम्राट श्री. तात्यासाहेब केळकर २४ साली रत्नागिरीस गेले असता त्यांनी यावर पतितपावन मंदिराच्या गच्चीवर तात्यारावांशी चर्चा केली. मराठी साहित्य संमेलनात जी 'लिपी-सुधारणा-समिती' स्थापन झाली त्याचे तात्यासाहेब केळकर हे अध्यक्ष होते. प्रामुख्याने 'अ' ची बाराखडी लवकरच चालू करावी असा शिफारसी त्यात झाला होता. पण केसरीत ती चालू झाली नव्हती. यासंबंधी तात्यारावांनी केळकरांना विचारले असता ते म्हणाले की, "केसरीत हे आता जमेल असे वाटत नाही; पण सह्याद्रीत ते मी चालू करतो." त्याप्रमाणे १९३६ जुलैच्या अंकापासून 'अ' ची बाराखडी सह्याद्रि मासिकात वापरली जाऊ लागली.

पुढे तात्याराव सावरकर १९५२ मध्ये पुण्यात आले असता केसरी संस्थेच्याच अतिथीगृहात उतरले होते व केसरी संस्थेने त्यांना एक चहाचा अल्पोपहारही दिला होता. त्या अल्पोपहाराला रँगलर परांजपे, केशवराव जेधे, बाबूराव सणस, महामंडोपाध्याय दत्तो वामन पोतदार, नानासाहेब गोरे, शंतनुराव किर्लोस्कर, कमिशनर स. गो. बर्वे आदि मंडळी उपस्थित होती. या भेटीत तात्यारावांना मी म्हणालो, "दिवंगत हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पिण्यासाठी दि. १० मे रोजी केसरीचा 'स्वातंत्र्ययुद्ध विशेष अंक' आम्ही काढत आहोत, त्यात आपण लेख लिहावा." तेव्हा मी केसरीचा संपादक होतो. तात्याराव सावरकरांना केसरीत लेख छापण्यास देणे याचा आनंद होतात. पण ते हसत म्हणाले, "मी लेख देईन; पण केसरीने तो सावरकर-लिपीत लिहून निदान 'अ'च्या बाराखडीत व नवा 'ब' वापरून छापला पाहिजे. त्याप्रमाणे त्यांनी 'तेव्हा स्वातंत्र्य संपादन, आता स्वातंत्र्य संरक्षण' असा लेख

पाठविला आणि त्यात आम्ही सावरकरलिपी काहीशी वापरलीही. तो लेख ११ मे १९५२ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे.

पुढे मे ५८ मध्ये ते पुन्हा पुण्यात आले असताना स्वतः माझ्याबरोबर केसरीच्या टंकशाळेत येऊन लिपीशुद्धीविषयी त्यांनी टंक पाडणाऱ्या कामगारांना व तंत्रज्ञांना मार्गदर्शन केले. परंतु पुढे असे लक्षात आले की, 'अ' ची बाराखडी पाहून लेख तातडीने छापणे त्वरित शक्य होणार नाही; म्हणून मग त्यांनी लिहिलेले 'भारताच्या इतिहासातील सोनेरी पाने' हे लेख तसेच छापले.

लिपीशुद्धीचा हा प्रयत्न काही प्रमाणात पुढे मामाराव दाते यांनीही चालविला व एकटंकावर छिद्रकांच्या टंकात सुधारणा करून त्यांनी तो बसविला. हे एकटंक जुळणीयंत्र ते पुण्यात घेऊन आले. श्री. मामाराव दाते यांच्या एकटंकावर सर्वसाधारणतः २०० अक्षरे बसविली आहेत. पुढे तो प्रयत्न अधिक झाला असता तर जलद जुळणी झाली असती. पण आता एकटंक मागे पडला व ओळी टंकही मागे पडला व चित्र-जुळणी ( फोटो-कंपोज ) आल्याने सर्वच तंत्र बदलले व मुद्रण ऑफसेटवर सुरू झाले.

सावरकरांना भाषाशुद्धी व लिपीशुद्धी हा राष्ट्रीय विचाराचा एक भाग वाटत असे व त्या कळकळीमुळे म्हणूनच त्यांनी अनेक प्रयत्न केले. केसरीचे संपादक श्री. केतकर यांनी त्यांना २९ साली लिहिलेले पत्र माझ्याजवळ आहे. त्यात ते लिहितात, " इंग्रजी चार प्रकारच्या लिप्या आपण शिकतो; तर मग मराठी मुद्रणलिपी थोडीशी निराळी असल्यास काय बिघडेल ? यामुळे इंग्रजीइतकीच ती सुलभ होईल." लिपीशुद्धीचा व केसरीचा हा संबंध लक्षात घेऊनच तात्याराव सावरकरांनी ५२ साली केसरीत ते आले असता लिपीशुद्धीविषयी मार्गदर्शन केले.

* *